
मेहता मराठी
ग्रंथजगत
दीपावली २०२५
पृष्ठे १४४ । किंमत ₹ १००
भारतीय सैन्यदलातील
तमाम सैनिकांच्या
धैर्य, शौर्य आणि चिकाटीला
मानाचा मुजरा...

मेजर कौस्तुभ राणे । शुभम मस्तापुरे । बालाजी आंबोरे । गणेश ढवळे । रामचंद्र माने । राहुल बिन्नर
मिलिंद खैरनार । संदीप जाधव । योगेश भदाने । रविंद्र घनावडे । विनोद वानोळे । संभाजी कदम
शाम कांबळे । घनश्याम राजपुत । अक्षय गोडबोले । किरण थोरात । संतोष गुरव । श्रावन माने
पोपट माळी । नंदकुमार फराटे । नितीन कोळी । विनोद पिंगळे । ज्ञानेश्वर पाटील शेटफळे

गणेश वनशिंगे
निलेश चव्हाण
राजेंद्र तुपारे
भोजलीग काळेल
सुधाकर जाधव
संदीप ढोक
दिपक घाडगे
रामनाथ हाके
सुमेश गवई
एकनाथ माने
नवनाथ गात
सौरभ भराटे
अजित काशिद
अशोक बाबर
सुभाष कराडे
राधाकिसन नामदे
संभाजी कदम
रूपेश वीर
निलेश धाकड
कुनाल गोसावी
विकास समुद्रे




रविंद्र धनावडे
प्रफुल्ल मोहरकर
मारूती जावळे
चंद्रकांत धवडगे
मासुर आगा
मंगेश बालपाडे
दिगंबर उपले
किसन थोरात
राहुल शिंगाडे
बाबासाहेब कावरे
योगेश धामने
नितीन राठोड
संजय राजपुत
केशव गोसावी
मल्हारी खंडु लहिरे
अर्जुन वाळुंज
राम वाघमारे
प्रकाश जाधव
अनिकेत सुभाष मोळे
सुरज मस्करगिरगाव
सर्जेराव खार्डे

नायब सुभेदार नारायण ठोवरे । सुनील रावसाहेब वलटे । योगेश मनोहर लांडगे
राजेंद्र सोमनाथ जगदाळे । दैवत दत्तात्रय सालुके । विठ्ठल जाधव । विठ्ठल जायभाय । अजय वानखेडे
राजू गायकवाड । बालाजी अंकुरे । प्रवीण पटनकुडे । विजय कनसे । राहुल शिंदे । बाळासो पळसकर
दिपक शिंदे । जवान संभाजी भोसले । राहुल सुळगेकर । परमेश्वर जाधवर । जोतिबा चौगुले
सना आलम मुल्ला । वैभव गवंडी । राकेश सोनटके । प्रथमेश दिलीप कदम । नवनाथ दाभाडे
मे. शशिधर विजय नायर । निनाद मंदावग्रे । गंता महेंद्र चार्लीस । महेश तिकडे । संदिप सावंत
अप्पा मते । ज्ञानेश्वर जाधव । सुरेश चित्ते । तस्लिम मुन्नीवाला । नायक भुषण दांडेकर । विशाल कडव




# मेहता मराठी ग्रंथजगत

दीपावली २०२५
वर्ष पंचविसावे
किंमत : ₹ १००

★

संपादक
अखिल मेहता

★

संस्थापक संपादक
शंकर सारडा

★

संपादन साहाय्य
प्रतीक येतावडेकर

★

मुखपृष्ठ व मांडणी
यशोधन लोवलेकर

★

संपादक-मुद्रक-प्रकाशक
अखिल मेहता
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२



# । अनुक्रम ।


**संपादकीय** ६

**कदम कदम बढाए जा...!**
मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी (नि.) १०

**त्या रणरागिणी**
सदानंद कदम १६

**कर्तृत्वाची उज्ज्वल गाथा**
अभिषेक कुंभार २४

**द डिफ्युज**
डॉ. संजय ढोले ३२

**''आई, मी सैनिक झालो!''**
भाग्येश विजय शिंदे ४२

**अधिकारी म्हणून भारतीय सैन्यातील जीवनप्रवास**
कर्नल संजोग शिंदे
अनु. : प्रीता कानिटकर, विशाखा बेके ४८

**'पपेट'वाला**
फारूक एस. काझी ५२

**ते देशासाठी लढले...**
एकनाथ आव्हाड ५८

**समाजभान जपणारे संवेदनशील साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा**
डॉ. उमा विरुपाक्ष कुलकर्णी ६२

## पुस्तकाच्या पानांतून


**पंचगंगेच्या तीरावरून**
डॉ. जयसिंगराव पवार ६८

**ऑपरेशन सिंदूर**
ले. ज. सुदर्शन हसबनीस
अनु. : डॉ.शुचिता नांदापूरकर फडके ८४

**छोटा जवान**
व्यंकटेश माडगूळकर ९८

**सैनिक हो, तुमच्यासाठी...**
आनंद यादव १०८

**भारतीय सैनिक**
सुशांत सैनी
अनु.: जुई कुलकर्णी ११२

**परमवीर चक्र**
मे. ज. इयान कारडोझो
अनु. : ज्योत्स्ना लेले १२२

**अथक**
स्वाती चांदोरकर १२२



।संपादकीय।

# मेहता मराठी ग्रंथजगत @२५

यंदाचा 'मेहता मराठी ग्रंथजगत'चा हा २५वा दिवाळी अंक. साहित्य विषयक मासिकांची परंपरा मराठी साहित्यात खूप पूर्वीपासून आहे. प्रकाशन संस्थांच्या गृहपत्रिका (House Magazine) यालाही मोठी परंपरा आहे. या गृहपत्रिका प्रकाशित करण्यामागचा महत्त्वाचा हेतू म्हणजे प्रकाशित होणारे नवे साहित्य, साहित्यविषयक कार्यक्रमांची दखल इत्यादी गोष्टींसाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण करणे हा असतो. या माध्यमातून प्रकाशक आणि वाचक यांच्यामध्ये संवादाचा एक पूल उभारला जातो. एका अर्थाने गृहपत्रिका या त्या त्या प्रकाशन संस्थेची मुखपत्रे म्हणून काम करत असतात.

'मेहता पब्लिशिंग हाऊस' येणाऱ्या वर्षात संस्थेच्या स्थापनेचा सुवर्ण महोत्सव साजरा करेल. १९७६ साली या प्रकाशन संस्थेची मुहूर्तमेढ पुण्यात रोवण्यात आली. या संस्थेने गेल्या ४९ वर्षांच्या काळामध्ये अनेक पुस्तके, दर्जेदार अनुवाद, लेखकांचे समग्र साहित्य मराठी वाचकांपर्यंत पोहोचवले. आपल्याही प्रकाशन संस्थेची एक गृहपत्रिका असावी, या भावनेतून 'मेहता मराठी ग्रंथजगत' संपादित करून मासिक स्वरूपात वितरीत केले जाऊ लागले. त्याला आज २५ वर्षं पूर्ण होत आहेत! मराठीतील ग्रंथ व्यवहार हा 'लोकल ते ग्लोबल' पोहोचला पाहिजे, हे स्वप्न उराशी बाळगून प्रकाशन व्यवसायात नवनवे प्रयोग अमलात आणणारे प्रकाशक सुनील मेहता यांनी समीक्षक शंकर सारडा यांच्या सहकार्याने 'मेहता मराठी ग्रंथजगत' या गृहपत्रिकेची कल्पना प्रत्यक्षात आणली. सन २००० ते आजतागायत याचे संपादन व वितरण केले जाते आहे.

या अंकाचे शंकर सारडा हे दीर्घकाळ कार्यकारी संपादक होते. त्या नंतर सुनिता दांडेकर, अनिरुद्ध पाटील, वंदना घाटगे, अंजली पटवर्धन, योजना यादव, पूजा भडांगे हे सहाय्यक संपादक म्हणून काम पाहत होते. अंकाच्या माध्यमातून विविधांगी विषय असणारे दिवाळी अंक संपादित केले गेले. त्यातील काही लक्षात राहिलेले आणि दखलपात्र अंक म्हणजेच पत्र वाङ्मय, व्हर्च्युअल फॅन्टसी, तंत्र माध्यमे आणि मराठी साहित्य, वाचन संस्कृती इत्यादी अंक आजही आठवतात. संस्थेचे मान्यवर लेखक रणजित देसाई, आनंद यादव यांच्यावर विशेषांक संपादित केले गेले. दर उन्हाळी सुट्टीत बालविशेषांक संपादित केला जातो.

यंदाचे वर्ष 'मेहता मराठी ग्रंथजगत' या अंकाचे पंचविसावे वर्ष. यावर्षी विशेष लेख या सदरात प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी 'मराठीतील गृहपत्रिका' या लेखात मराठी प्रकाशन ग्रंथ व्यवहारात असणाऱ्या गृहपत्रिकांचे महत्त्व अधोरेखित करणारा लेख लिहीला. यामध्ये गेल्या ५० वर्षांत प्रकाशित केल्या गेलेल्या गृहपत्रिकांचा आढावा आपल्याला पाहायला मिळतो. तसेच अनिरुद्ध पाटील, वंदना घाडगे यांचेही संपादन करत असतानाचे अनुभव मांडणारे लेख ही अलीकडेच अंकात प्रकाशित केले गेले. खऱ्या अर्थाने २५ वर्षांचा लेखाजोखा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

मागील दोन वर्ष, २०२३ आणि २०२४ साली दिवाळी अंकातून अनुक्रमे 'साहित्य आणि मिथक' व ' कोण म्हणतं मराठी वाचक कमी झालाय?' यावरील लेखांचे संपादन करून दिवाळी अंक प्रसिद्ध करण्यात आले. त्या अंकांना वाचकांचा उदंड असा प्रतिसाद मिळाला. याहीवर्षी भारतीय सैन्यदलास समर्पित असा अंक संपादन केला गेला आहे. या अंकात मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी (नि) सदानंद कदम, अभिषेक कुंभार, भाग्येश शिंदे, मेजर कर्नल संजोग

शिंदे यांचे लेख आहेत. डॉ. संजय ढोले यांची एक कथा, फारुख काझी व एकनाथ आव्हाड यांच्या बालकथा आहेत. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या परिवारातील एक सदस्य अनुवादिका व लेखिका उमा कुलकर्णी यांनी डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. तो एक वाचनीय असा लेख या अंकात वाचकांसाठी आहे. या दिवाळी अंकाच्या निमित्ताने वाचकांसाठी अनोखी अशी पर्वणी असणार आहे!

या अंकाच्या संपादनापाठीमागे एक महत्वाचे कारण म्हणजे भारतीय सैन्य दलाप्रती कृतज्ञताभाव व्यक्त करणे. अलीकडील काळात भारतीय सीमांवर वाढलेले दहशतवादी हल्ले, त्यांना चोख प्रत्युत्तर देणारे आपले भारतीय जवान आपल्या जीवाची पर्वा न करता भारतीय सीमारेषावर तैनात असतात. भारतीय सैन्यदल तिन्ही ऋतूत, दिवसरात्र आपल्या देशाचे रक्षण करत असते. प्रसंगी प्राणाची बाजी लावून ते देशाच्या संरक्षणासाठी शहीदही होतात. सैन्यदल, सैन्यातील सैनिक हे सजगपणे देशाचे रक्षण करत आहेत, म्हणूनच आपण सर्व जण सुखाने श्वास घेत आहोत हे इथे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

'ऑपरेशन सिंदूर' नावाची एक मोठी लष्करी कारवाई भारतीय सैन्यदलाच्या मार्फत यशस्वीरित्या पार पाडण्यात आली. पहलगाम येथे दहशतवादी संघटना पुरस्कृत जो भ्याड हल्ला झाला, त्यात निष्पाप भारतीय नागरिकांना नाहकपणे मृत्यूमुखी पडावे लागले. त्या भ्याड हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ही लष्करी कारवाई करण्यात आली. या मोहिमेचे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर पडसाद उमटले. या 'ऑपरेशन सिंदूर' यावर आधारित दोन पुस्तके आमच्या प्रकाशन-संस्थेमार्फत लवकरच प्रकाशित होत आहेत. 'ऑपरेशन सिंदूर' हेच त्या पुस्तकाचे शीर्षक असेल. त्याचबरोबर हे पुस्तक मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांत प्रकाशित होणार आहे. एका महत्वाच्या लष्करी मोहिमेचे दस्तावेज असणारे हे पुस्तक वाचकांच्या पसंतीस निश्चितच उतरेल याची खात्री वाटते. याच पुस्तकातील संपादित अंश खास आमच्या वाचकांसाठी दिवाळी अंकात प्रसिद्ध करण्यात आला आहे.

अलीकडेच २४ सप्टेंबर २०२५ रोजी मेहता पब्लिशिंग हाऊसचे लेखक डॉ. एस. एल. भैरप्पा यांचे बंगळूरू येथे वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. डॉ. भैरप्पा आणि मेहता पब्लिशिंग हाऊस यांचा ऋणानुबंध १९९१ सालापासूनचा! 'पर्व' ही त्यांची महाभारतावरील बृहतकादंबरी अनुवाद स्वरूपात मेहता पब्लिशिंग हाऊसने मराठी वाचकांसमोर आणली. त्यानंतर भैरप्पा यांची बहुतांश सर्वच पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली. आजमितीला त्यांची १३ पुस्तके आमच्या ग्रंथसूचीत आहेत. ही पुस्तके वाचकप्रिय या सदरात मोडणारी आहेत; कारण बहुतांश पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या कायमच बाजारात येत असतात. अलीकडच्या काळात, जानेवारी २०२२ साली सुनील मेहता यांचे निधन झाल्यानंतर आमच्या संस्थेच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे पहिले लेखक म्हणजे डॉ. भैरप्पा होत. 'गृहभंग' या अनुवादित कादंबरीच्या प्रकाशनासाठी पुण्यातील आमच्या पुस्तक दालनात भैरप्पा आले होते. त्या प्रकाशन समारंभास झालेली गर्दी भैरप्पा यांची लेखक म्हणून असलेली लोकप्रियता अधोरेखित करणारी ठरली.

त्या नंतर २०२४ साली जुलै महिन्यात डॉ. भैरप्पा यांनी आमच्या संस्थेच्या कार्यालयात सदिच्छा भेट दिली होती; पण दुर्दैवाने ही भेट अखेरची ठरली! त्याही वेळेस डॉ. भैरप्पा, सहना विजयकुमार, अनुवादिका उमा कुलकर्णी यांच्या सोबतच्या गप्पा कायम स्मरणात राहतील. डॉ. एस. एल. भैरप्पा यांना महाराष्ट्रात उदंड अशी वाचकप्रियता लाभली. ती एवढी होती की, डॉ. भैरप्पा हे मराठी लेखक आहेत मात्र ते लिखाण कन्नडमध्ये करतात अशी लोकप्रियता आणि ओळख त्यांना कर्नाटकात लाभली. सामाजिक नैतीकमूल्ये जपणारा सजग लेखक म्हणून डॉ. भैरप्पा हे त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक कार्यातून कायमच स्मरणात राहतील. डॉ. एस. एल. भैरप्पा यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

मराठी ग्रंथ व्यवहार व साहित्य क्षेत्रात साहित्य संमेलनाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. १४७ वर्षांची परंपरा आणि ९८ साहित्य संमेलनाचा अनुभव गाठीशी घेऊन '९९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' स्वराज्याची तिसरी राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सातारा येथे होत आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी महाकादंबरीकार 'विश्वास पाटील' यांची संभाजी, नॉट गॉन विथ द विंड, नागकेशर बंदा रुपाया, क्रांतिसूर्य, पानिपतचे रणांगण इत्यादी पुस्तके आम्ही प्रकाशित केली. 'महासम्राट' ही छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र असणाऱ्या चार खंडातील कादंबरीमालेचे दोन खंड अनुक्रमे महासम्राट, झंजावात, रणखैंदळ हेही प्रसिद्ध केले आहेत. आमच्या संस्थेचे मान्यवर लेखक, वाचकप्रिय कादंबरीकार म्हणून ख्यात असलेले विश्वास पाटील यांना अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मेहता पब्लिशिंग हाऊस परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा!!

**आमच्या सर्व वाचक, वितरक व हितचिंतकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!!**

अखिल मेहता

## ।। साहित्य पुरस्कारासाठी आवाहन ।।



'प्रकाशक सुनील मेहता
साहित्य सृजन पुरस्कार




'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येतो. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी : ₹ ३०,०००**
**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह : ₹ २०,०००**

**पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :**

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.


अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : **१ नोव्हेंबर, २०२५**


पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो दिलेल्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर २०२५मध्ये केली जाईल. १२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.


२५ वर्षांची परंपरा


## रणजित देसाई
यांची साहित्यसंपदा














ebook available


२५ वर्षांची परंपरा




## शिवाजी सावंत
यांची साहित्यसंपदा









ebook available

# कदम कदम बढाए जा...!

## प्रवास भारताच्या रणदुर्गांचा!

**मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी (नि.)**



'तुम्हालासुद्धा ते लक्ष्य, प्रहार चित्रपटांत दाखवलंय, तसं ट्रेनिंग वगैरे असतं का? म्हणजे तुम्हीसुद्धा रायफल वगैरे हातात धरता का?', 'तुम्हा मुलीमुलींची काही वेगळी अशी ब्रिगेड किंवा रेजिमेंट असते का?', 'तुम्हाला तर फक्त office work असेल नं आर्मीमध्ये?', 'ते सगळं ठिके; पण तुमच्या लग्नाचं कसं मग?' अशा प्रश्नांची सरबत्ती आमच्यावर केली जात असे. आम्हा महिला-अधिकाऱ्यांना त्याची हळूहळू सवय झाली. कधी गंमत, कधी उपहास, कधी आश्चर्य असं सगळं या प्रश्नांमधून प्रतिबिंबित होत असे. आज संरक्षण दलांमधल्या महिला-अधिकारी, त्यांचं ट्रेनिंग, प्रत्यक्ष कामकाज आणि योगदान यांवर प्रकाश टाकणारे अनेक व्हिडिओज आपण you tubeवर सहज बघू शकतो. पण काही वर्षांपूर्वी, जेव्हा महिला-अधिकाऱ्यांची संख्या खूप मर्यादित होती, त्यांच्याविषयी फारशी माहिती नव्हती आणि मुख्य म्हणजे अत्याधुनिक मोबाइल्स प्रचलित नव्हते, तेव्हा अशा कितीतरी प्रश्नांना संरक्षण दलातल्या महिला-अधिकाऱ्यांना सामोरं जावं लागत असे. एक तो काळ होता... आणि एक आजचा! सध्या 'अत्यंत अभिमानाने सांगावं' असं खूप काही या क्षेत्रात घडत आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे लष्करातल्या सिग्नल कोअरच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि वायुदलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंह संपूर्ण देशात प्रसिद्ध झाल्या. त्यांच्याद्वारे विलक्षण उत्साह आणि सकारात्मकता देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आणि अत्यंत भारावलेल्या अवस्थेत भारताचं स्त्रीमन वर्दी घालण्याचं स्वप्नं पाहू लागलं!

यामुळे स्त्रियांच्या आतापर्यंतच्या कारकिर्दीची आणि एकूणच भारतीय लष्करातल्या स्त्रीशक्तीची चर्चा संपूर्ण देशात सुरू झाली. एका मुलाखतीत कर्नल सोफिया कुरेशी अभिमानाने म्हणाल्या, 'माझी पणजी झाशीच्या राणी लक्ष्मीबरोबर लढली होती! ती शौर्याची परंपरा असल्याने मीही सैन्यात जाण्याचं स्वप्नं पहिलं!' किती प्रेरक आहे हे! भारताच्या इतिहासात थोडं डोकावलं, तर ही दीर्घ वाटचाल समजून घेण्यासाठी मदत होईल.

परकीय आक्रमकांशी लढणाऱ्या कित्येक रणलक्ष्मी भारताच्या इतिहासाला नवीन नाहीत. त्यांच्यापासून ते अगदी स्वतंत्र भारताच्या सीमा अबाधित ठेवण्यासाठी तैनात असलेल्या संरक्षण दलांमधल्या सशस्त्र महिलांपर्यंतची ही वाट सोपी नाही. यामागे फार बिकट वळणांचा अथक प्रवास आहे, तितिक्षा आहे, संघर्ष आहे! अगदी सुरुवातीपासून ते आत्तापर्यंतचा त्यांचा प्रवास खरंच खूप वळणावळणांचा आहे. उत्तरोत्तर त्यांनी मोठीच मजल मारली आहे. वेगवेगळ्या संरक्षण खात्यांत त्या समर्थपणे कार्यरत आहेत. तथापि, त्यांची जडणघडण, त्यांच्यासमोरची शारीरिक तसंच कायदेशीर आव्हानं, त्यांची मानसिक क्षमता असे अनेक सुंदर पैलू उलगडण्यासाठी अजूनही बराच वाव आहे, असं जाणवतं. एकूणच, महिलांच्या लष्करातल्या योगदानाचा प्रवास आणि त्याचा इतिहास रोचक आहे.

### स्वातंत्र्यपूर्व काळ

स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांनी लष्करात काम करण्याचे काही दाखले आपल्याला मिळतात. ब्रिटिश इंडियन आर्मीनं १८८८ साली 'इंडियन मिलिटरी नर्सिंग सर्व्हिस (IMNS)नावाची शाखा उघडून त्यात महिला परिचारिकांना प्रवेश देण्यास सुरुवात केली. यांनी पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात महत्त्वाची कामगिरी बजावली. यात भारतीय मुलींनी मोठं बलिदान दिलं. पुढच्या काळात मात्र दुर्दैवानं ब्रिटिशांसाठी लढलेल्या भारतीय सैनिकांप्रमाणेच या महिलांच्या योगदानाविषयीही खूप कमी उल्लेख आपल्याला मिळतात. त्यानंतर दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी, मार्च १९४२ साली ब्रिटिश सैन्याला साहाय्य करण्यासाठी Women's Auxiliary Corpsच्या अंतर्गत Women's Royal Naval Indian Serviceसुद्धा सुरू करण्यात आली होती. यातही महिलांचा मोलाचा सहभाग होता.

### राणी झाशी रेजिमेंट – स्वातंत्र्यासाठी युवतींची धाडसी झेप

१९४२ सालाच्या दरम्यान 'कदम कदम बढाए जा... खुशी के गीत गाए जा... ये जिंदगी है कौंम की... तू कौंम पे लुटाए जा' हे गाणं म्हणत हातात रायफल घेऊन शिस्तीत संचलन करणारी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या 'आझाद हिंद सेने'तली मुलींची राणी झाशी रेजिमेंट! पोटापाण्यासाठी बाहेर स्थलांतरित झालेल्या मूळ भारतीय परिवारातल्या या साध्या मुली होत्या; पण त्यांनी आकाशाला गवसणी घातली होती! भारतातल्या मुलींनीही शस्त्र-प्रशिक्षण घेऊन भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात बरोबरीने उभं राहावं, असं नेताजींचं स्वप्नं होतं. त्याच्या पूर्ततेसाठी झाशीच्या राणीचा आदर्श समोर ठेवून त्यांनी कॅप्टन लक्ष्मी यांच्या साथीने 'राणी झाशी रेजिमेंट' उभी केली. नेताजींच्या खंबीर आणि संवेदनशील नेतृत्वाखाली कितीतरी धाडसी पावलं या मुलींनी त्या वेळी टाकली. परंतु जपानच्या साथीने भारतातल्या ब्रिटिशांवर आक्रमण करण्याची नेताजींची योजना यशस्वी होऊ शकली नाही आणि या मुलींना लढाई न करता परत फिरावं लागलं. त्यानंतर लगेच नेताजींचा संशयास्पद अपघात झाला. आझाद हिंद सेना विलीन झाली. मात्र, या युवतींचा जसबा, त्यांची अभंग ऊर्मी अद्वितीय होती. यामुळे भारताच्या इतिहासात त्या सदैव स्मरल्या जातील, प्रेरणादायी ठरतील!

### स्वातंत्र्यानंतरची सुरुवात

आज औद्योगिक क्षेत्रात 'diversity' हवी म्हणून अगदी आग्रहाने महिलांचा सहभाग सर्व स्तरांवर वाढताना आपल्याला दिसतो. मात्र, स्वतंत्र भारतात लष्करासमोरची आव्हानं खूप वेगळी होती. या काळात लष्करात प्रवेश मिळवून हातात प्रत्यक्ष शस्त्र घेण्यासाठी मुलींना बरीच वर्षं वाट पाहावी लागली. इतर अनेक क्षेत्रांमध्ये पायवाट तयार करणाऱ्या स्त्रियांना जो संघर्ष करावा लागला, तो संरक्षण दलांमध्येसुद्धा करावा लागला आहे. कारण इथे स्त्री-पुरुष समानतेपेक्षाही 'देशाची सुरक्षा' हा विषय प्राधान्याचा होता. १ नोव्हेंबर १९५८ रोजी भारतीय सैन्याच्या वैद्यकीय विभागाने (AMC) पात्र असलेल्या महिलांना नियमित स्वरूपात प्रवेश (regular commission) द्यायला सुरुवात केली. अनेक वर्षांनी, १९९२ साली विशेष तरतुदी-अंतर्गत मेडिकल व्यतिरिक्त अन्य युवतींना लष्करामध्ये पाच वर्षांसाठी अधिकारपदावर नेमणूक करण्याची सुरुवात झाली. यथावकाश हा कालावधी वाढवून दहा वर्षांचा आणि नंतर चौदा वर्षांचा करण्यात आला. २००८ सालापासून महिला-अधिकाऱ्यांचा प्रशिक्षण कालावधी २४ आठवड्यांवरून शॉर्ट सर्व्हिस कमिशन (SSC)मधून येणाऱ्या पुरुष-अधिकाऱ्यांप्रमाणेच थेट ४९ आठवडे करण्यात आला.

### सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

१७ फेब्रुवारी २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक निर्णय दिला - सध्या सैन्यात नोकरीत असणाऱ्या सगळ्या महिला-अधिकाऱ्यांना स्थायी (पर्मनंट) कमिशनचा पर्याय देण्यात यावा. हा पर्याय न निवडणाऱ्या; पण १४ वर्षांपेक्षा जास्त नोकरी केलेल्या महिला-अधिकाऱ्यांनासुद्धा २० वर्षांनंतर सेवानिवृती आणि पेन्शन व इतर सुविधा देण्यात याव्यात. वरिष्ठ पदांच्या निवडीसाठीही महिला-अधिकाऱ्यांना बरोबरीने संधी मिळायला हव्यात. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी वरिष्ठ नेत्यांची दृढ इच्छाशक्ती आणि त्याला कायद्याची भक्कम साथ - दोन्ही आवश्यक असल्याचं न्यायालयाने अधोरेखित केलं. या ऐतिहासिक निर्णयाचं सर्वत्र स्वागत झालं. पुढच्या काळात सगळ्या मुद्द्यांना लक्षात घेऊन अनेक ठोस धोरणं भारतीय लष्करात आखली गेली. आता अनेक महिला अधिकारी त्यांच्या रेजिमेंटच्या कमांडिंग ऑफिसर (CO) होऊन अत्यंत सक्षमपणे रेजिमेंटचं नेतृत्व करत आहेत.

### राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी(NDA)मध्ये युवतींचा प्रवेश

भारताच्या लष्करी इतिहासातला या वर्षीचा आणखी एक ऐतिहासिक दिवस म्हणजे, ७५ वर्षांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमधून मुलींची पहिली बॅच प्रशिक्षित होऊन २०२५च्या मे महिन्यात बाहेर पडली. संरक्षण दलांचा एक 'करिअर' म्हणून विचार करणाऱ्या देशातल्या कानाकोपऱ्यातल्या मुलींसाठीच काय; पण समस्त भारतीय स्त्रियांसाठी हा दिवस मोठी प्रेरणा घेऊन आलेला आहे! साहसाची नवनवीन शिखरं पादाक्रांत करण्यासाठी प्रत्येकाला या युवतींचा प्रवास दिशा दाखवत राहील, यात शंका नाही.

मुलींचा हा प्रवास मुळीच सोपा वा सहज मिळालेला नव्हता, कायद्याचं अस्त्रं वापरून तो खेचून आणावा लागला, हेही तितकंच खरं. डॉ. कुश कालरा यांनी दाखल केलेल्या या याचिकेत मुलींना NDAच्या प्रवेश-परीक्षांना बसण्यासाठी केवळ लिंगाच्या आधारावर मज्जाव करणारं भारतीय लष्कराचं धोरण, संविधानाने

प्रत्येक नागरिकाला प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांचं थेट उल्लंघन आहे, अशा ठोस कारणांवर युक्तिवाद करण्यात आला. १८ ऑगस्ट २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने NDAसाठी मुलींचा मार्ग मोकळा केला. त्यांना प्रवेश-परीक्षेला बसण्याची अनुमती मिळाली. त्याच्या निकालावर आधारित त्यांच्या प्रवेशासंबंधी तरतूद करण्यात यावी या न्यायालयाच्या आज्ञेप्रमाणे मुलींविषयी पुढचं धोरण आखण्यात आलं. नेमून दिलेल्या परीक्षा आणि चाचण्या उत्तीर्ण करून २०२२पासून युवतींची पहिली बॅच खडतर सैन्य-प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत दाखल झाली. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीसाठीसुद्धा ही गोष्ट सोपी नव्हती. त्यांना समाविष्ट करण्यासाठी, त्यांचं वास्तव्य सुलभ व्हावं यासाठी प्रबोधिनीने काही अंतर्गत बदलही केले. त्यांच्यासाठी सुविधा उभारण्यात आल्या.

**आव्हानांची मालिका**

प्रशिक्षण सुरू झालं आणि अनेक आव्हानांना या मुलींनी खंबीरपणे तोंड दिलं. तीन वर्षं आत्यंतिक खडतर असं प्रशिक्षण यांना झेपेल का? आता यांच्यासाठी वेगळा स्क्वाड्रन सुरू करण्यात येईल की आधीच असलेल्या १८ स्क्वाड्रन्समध्ये यांना विभागण्यात येईल? NDAमधल्या अत्यंत अवघड समजल्या जाणाऱ्या camp greenhorn, camp rovers, camp तोरणा इत्यादी कॅम्प्सनासुद्धा या मुली जाणार का? या मुली मुलांबरोबरच प्रशिक्षण घेतील का? एक ना दोन... किती शंका होत्या!

पण आपल्या दृढ इच्छाशक्तीच्या जोरावर, अथक मेहनतीने या सगळ्या शंकांच्या पलीकडे गेल्या आणि सगळं आत्मसात करत राष्ट्रीय संरक्षण अकॅडेमीमधून बाहेर पडल्या!

**आधी अधिकारी, मग स्त्री (officer first, then woman)**

लष्कराची प्रत्यक्ष कार्यप्रणाली खऱ्या अर्थाने समानतेवर आधारलेली आहे. संरक्षण दलांमध्ये मुळातच फक्त आणि फक्त गुणवत्तेच्या आधारावरच मुला-मुलींची निवड करण्यात येते. मग तिथे कोणतेही इतर निकष नाहीत- जात, धर्म, लिंग... काहीही नाही, केवळ **'भारतीय'** एवढीच ओळख राहते. तिथे आम्हा मुलींना 'तुम्ही आधी एक 'अधिकारी' आहात... आणि नंतर एक स्त्री...' असं बिंबवण्यात येतं. एक 'सक्षम लीडर' म्हणून निरनिराळे पैलू पाडत आम्हाला तासलं जातं. मानसिक, शारीरिक अशा कोणत्याही पातळीवरची दुर्बलता प्रशिक्षणाअंती कायमची संपलेली असते! दुर्दम्य आत्मविश्वासासह राष्ट्ररक्षेची शपथ घेऊन आम्ही अकॅडेमीच्या बाहेर पडतो. प्रत्यक्ष काम करताना, रेजिमेंट्समध्ये कोणतीही शंका मनात न ठेवता महिला अधिकाऱ्यांवर कामगिरी सोपवली जाते. स्त्री-पुरुष या वादाला थारा न देता दोघांनी पूरक पद्धतीने काम करत यशस्वी व्हावं, हीच धारणा यामागे आहे. स्त्री-पुरुष अधिकारी, जवान सगळे सारखाच(एकाच प्रकारचा) गणवेश घालतात. या क्षेत्रात स्त्रियांना केवळ शारीरिक शक्तीच्या जोरावर न जोखता त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचा जोश, त्यांचे प्रयत्न हे गुण नेहमीच कौतुकास्पद ठरतात. अशा अथक प्रयत्नांमुळे गुणवत्तेच्या वाटेवर चालत गेली अनेक वर्षं स्त्री-पुरुष दोघांनीही आजवर उज्ज्वल इतिहास निर्माण केला आहे.

**स्त्रीशक्तीची नेत्रदीपक कारकीर्द**

२०१० साली ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडेमी, चेन्नई इथल्या प्रशिक्षणात सर्वोत्कृष्ट कॅडेट म्हणून मानाची तलवार (sword of honour) मिळवणारी पहिली युवती अधिकारी मेजर दिव्या अजित कुमार, काबुलमध्ये २०१० साली भारतीय दूतावासावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात अनेक नागरिक आणि सैनिकांचे प्राण वाचवणाऱ्या, 'सेना मेडल' या पुरस्काराने सन्मानित कर्नल मिताली मधुमीता, 'wonder woman' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या





गोष्टींच्या मोहमयी दुनियेची सफर घडवणारी
सलमान रश्दी यांची अफलातून कादंबरी

ebook available

**हारुन आणि गोष्टींचा समुद्र**

सलमान रुश्दी । अनु. वंदना भागवत
किंमत : ₹ २८०

आणि हजारो पोलादी सैनिक घडवणाऱ्या भारताच्या पहिल्या स्त्री-कमांडो ट्रेनर सीमा राव, दीर्घकाळ सैन्यात आणि नंतर आरोग्य विभागात प्रशासकीय सेवा देत उत्तुंग आदर्श ठेवणाऱ्या लेफ्ट.जनरल माधुरी कानिटकर या सगळ्या वीरस्त्रिया प्रेरणादायी आहेत. एव्हरेस्ट शिखराची आव्हानात्मक चढाई असो वा क्लिष्ट आंतरराष्ट्रीय मोहीम; भारतीय सैन्यातल्या स्त्रियांनी सर्वत्र यशाचा झेंडा रोवला आहे.

**मैलाचे दगड**

भारतीय संरक्षण दलांमध्ये महिला एकेक मैलाचा दगड रोवत आहे. एप्रिल २०२३मध्ये, पाच युवती-अधिकारी चेन्नई इथून प्रशिक्षित होऊन तोफखाना (Artillery) विभागात प्रथमच नियुक्त करण्यात आल्या. BSF, आसाम रायफल्स, कोस्ट गार्ड इत्यादी अनेक विभागांत महिला-जवानही कार्यरत आहेत. सैन्यातल्या स्त्री-शक्तीच्या अशा कितीतरी उल्लेखनीय वीरकथा सांगता येतील! 'फायटर पायलट' म्हणून युवती-अधिकारी शत्रूच्या विमानांचा अचूक वेध घेत आहेत. नायक अमित शर्मा या एका हुतात्मा जवानाची पत्नी, सात वर्षांच्या मुलीची आई सैन्यात अधिकारी होण्याचं स्वप्नं बघते आणि सगळ्या बंधनांना झुगारून, अपरिमित जिद्दीने ते स्वप्नं प्रत्यक्षात आणते, ही विलक्षण घटना भारतीय सैन्यात प्रथमच घडवून आणणारी मेजर प्रिया सेमवाल! केवळ अधिकारी झाली नाही; तर त्यातही पराक्रम गाजवला! २०१८ साली पश्चिम बंगाल इथल्या हल्दिया ते पोरबंदरपर्यंत नौकायान अभियानासाठी मेजर प्रिया यांची निवड झाली (Army Sailing Expedition). ४५ दिवसांत ३५०० सागरी मैल अंतर पार करण्यात ५० जणांचा हा संघ यशस्वी झाला. याची 'लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंद घेतली गेली. पुढे फेब्रुवारी २०२२ सालच्या सागरी मोहिमेतही ती निवडली गेली. चेन्नई-निजामापट्टणम्-वायझॅग-निजामापट्टणम्-चेन्नई अशा समुद्रमार्गाने जात जवळपास ९०० सागरी मैल (nautical miles) एवढं अंतर या नौकेने पार केलं आणि नवा इतिहास रचला! अशा प्रकारे लष्कराच्या महिला अधिकाऱ्यांनी स्वतंत्रपणे पार पाडलेलं हे पहिलंच नौकायान अभियान आहे.

**नाविक सागर परिक्रमा – २**

भारताच्या नौदलात कार्यरत असणाऱ्या लेफ्टनंट कमांडर रूपा आणि लेफ्टनंट कमांडर दिलना या दोन महिला-अधिकाऱ्यांनी प्रचंड सामुद्रिक अंतर कापून मे २०२५मध्ये यशस्वीरीत्या सागर परिक्रमा पूर्ण केली. अजस्र लाटांना मागे टाकत अपूर्व धैर्याने त्यांनी ही मोहीम फत्ते केली. जवळपास तीन वर्षं प्रशिक्षण घेत, अथक परिश्रम करत त्यांनी हा पराक्रम केला. कुसुमाग्रजांच्या, 'अनंत आमुची ध्येयासक्ती' या शब्दांची आठवण करून देत प्रत्येक भारतीयाचं ऊर अभिमानाने भरून यावं, असा हा अचाट पराक्रम आहे!

**लष्करात नेतृत्वाचं बदलतं स्वरूप: आधुनिकीकरणाचं योगदान**

संरक्षण दले म्हणजे शारीरिक शक्तीचं प्रकटीकरण हे समीकरण अतूट असलं, तरी आजच्या युद्धात तंत्रज्ञानाची भूमिका किती महत्त्वाची ठरते, हे आपण सध्या बघत आहोत! वेगवेगळी शस्त्रं, उपकरणं असो वा दळणवळण, संपर्क, रसद अशा इतर महत्त्वाच्या बाबी... आज आधुनिकीकरणामुळे चित्र संपूर्णपणे बदललेलं दिसून येतं. त्यामुळे स्त्रियांना तिन्ही दलांमध्ये नवनवीन संधी निर्माण होत आहेत. मुळात नेतृत्वाचं स्वरूप आमूलाग्र बदलत आहे. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर परिस्थितीचं योग्य आकलन करत, आपल्यातलं प्रशासन कौशल्य प्रस्थापित करत, महिला-अधिकाऱ्यांनी अथक परिश्रमांनी स्वतःला प्रत्येक पातळीवर सिद्ध केलं आहे, यात शंका नाही. येणाऱ्या युवक-युवतींसाठी साहसी वाटा निर्माण करत, भारतीय संरक्षण दलांमध्ये कार्यरत असणाऱ्या धुरंधर अशा या स्त्री-शक्तीला एक कडक सॅल्युट! जय हिंद!

✪





स्वातंत्र्यलढ्याच्या पार्श्वभूमीवर घडणारी
तीन बहिणींची हृदयस्पर्शी कहाणी

ebook available

**इंडिपेन्डन्स**

चित्रा बॅनर्जी दिवाकरूनी । अनु. लीना सोहोनी
किंमत : ₹ ५९०




चार्ल्स ट्रम्पर या यशस्वी आणि चतुर व्यावसायिकाची
रहस्यमय अंगाने उलगडत जाणारी
संघर्षमय जीवनगाथा

ebook available

## अॅंज द क्रो फ्लाइज

जेफ्री आर्चर । अनु. लीना सोहोनी
किंमत : ₹ १२९९





आर्मस्ट्रॉंग आणि टाउनसेंडचं एका वृत्तपत्राच्या मालकीवरून
जागतिक पातळीवर रंगलेलं संघर्षनाट्य

ebook available

## द फोर्थ इस्टेट

जेफ्री आर्चर । अनु. लीना सोहोनी
किंमत : ₹ १२९९




बॉलीवूड अभिनेत्रीच्या मृत्युभोवती गुंफलेलं विलक्षण रहस्य,
ज्याच्या उलगड्यातून अनेक काळी रहस्यं
उलगडत जातात.

ebook available

## मसाला ॲन्ड मर्डर

पॅट्रिक लियॉन्स । अनु. सई साने
किंमत : ₹ ४२०




२५ वर्षांची परंपरा


## महाकादंबरीकार विश्वास पाटील


यांची सातारा येथे होणाऱ्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे हार्दिक अभिनंदन


### विश्वास पाटील
यांची साहित्यसंपदा


ebook available









# त्या रणरागिणी

## सदानंद कदम



भारतीय स्वातंत्र्यलढ्यात पुरुष क्रांतिकारकांच्या खांद्याला खांदा लावून लढलेल्या वीरांगनांची फारशी माहिती अपवाद वगळता आपल्या कानावर पडत नाही किंवा वाचायला मिळत नाही. अपवादाने जी नावं कानावर पडतात किंवा वाचायला मिळतात, त्या थोर होत्या यात शंका नाहीच; पण त्याच तोडीच्या अनेक स्त्रियांची माहिती अजूनही तशी समोर आलेली नाही. अशा स्त्रियांच्या स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाबद्दलचे ऐतिहासिक अहवाल आपलं समाधान करत नाहीत. तसे अहवाल तयार करणारांनीच केवळ त्यांच्यावर अन्याय केला असं नाही; तर आपल्या इतिहास लेखकांनीही त्यांची दखल घेतलेली दिसत नाही. त्यांनीही त्यांच्यावर अन्यायच केला आहे, असं म्हणायला पुष्कळच जागा आहे.

मुख्य प्रवाहापासून आजही दूर राहिलेल्या या स्त्रिया एका ध्येयवादानं भारलेल्या होत्या, हे त्यांची कामगिरी वाचताना लक्षात येतं. त्यांना लौकिकार्थानं यश मिळालं नसेल; पण त्यांचं स्वातंत्र्यलढ्यातलं योगदान काही कमी नाही आणि ते नाकारताही येणार नाही. त्यांना मिळालेलं समाधान यश आणि अपयश अशा पट्ट्यांनी मोजता येणार नाही. त्यांचं सारं आयुष्यच त्यागाचं प्रतीक होतं, हे त्यांचा अभ्यास करताना ध्यानी येतं. क्रांतिकारकांच्या सहवासात आलेल्या आणि काही ना काही योगदान दिलेल्या या स्त्रियांच्या कार्याची दखल घ्यायलाच हवी. ही वाटचाल करत असताना त्यांनी भोगलेल्या दु:खाची आणि घेतलेल्या कष्टांची जाणीव ठेवायला हवी.

अशा स्त्रिया जशा सशस्त्र लढ्यात सहभागी झाल्या होत्या, तशाच त्या गांधीजींच्या चळवळीत... नि:शस्त्र लढ्यातही कार्यरत होत्या. या दोन्ही ठिकाणी कार्यरत राहिलेल्या स्त्रियांचा निश्चय, प्रतिकूल परिस्थिती त्यांनी दाखवलेली निष्ठा आणि आत्मसमर्पणाची वृत्ती सारखीच होती, वंदनीय होती. अशा लढवय्या स्त्रियांपैकी दोन रणरागिणीविषयी, त्यांच्या लढ्याविषयी आज आपण पाहणार आहोत. एक आहेत- राणी झाशी रेजिमेंटच्या प्रमुख आणि जगातल्या पहिल्या महिला कर्नल असलेल्या धगधगत्या क्रांतिकारक लक्ष्मी सेहगल आणि दुसऱ्या आहेत- प्रतिसरकारच्या तुफान सेनेच्या लीलाताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या राजुताई बिरनाळे. पैकी कर्नल लक्ष्मी सेहगल यांच्याविषयी आपण वाचलेलं असतं, त्यांचं नावही अधूनमधून आपल्या कानावर पडत असतं. पण लीलाताई पाटील आणि राजुताई बिरनाळे यांचं तसं नाही. राजुताईच्या सांगली जिल्ह्यातल्या आजच्या पिढीलाही त्यांची फारशी ओळख नाही. पण या दोघींचा मात्र परस्परांशी संबंध आहे आणि तोच आपण पाहणार आहोत.

क्रांतिसिंह नाना रामचंद्र पाटील यांचं नेतृत्व हे बहुजनांचे, समाज-सुधारणेच्या चळवळीतून उभं ठाकलेलं नेतृत्व होतं. हे नेतृत्व उदयाला येत असतानाच देशाच्या राजकीय पटलावर गांधीजींचा उदय होत होता. त्यांचे विचार आणि नेतृत्व प्रमाण मानून नाना



लीलाताई पाटील



लक्ष्मी सेहगल

पाटलांनी उभारलेल्या प्रतिसरकारविषयी आपण ऐकलेलं असतं. या सरकारची कार्यपद्धती मात्र गांधींच्या आणि काँग्रेसच्या अहिंसा तत्त्वात न बसणारी होती. या बाबतीत त्यांचे आदर्श होते- नेताजी सुभाषचंद्र बोस आणि त्यांचं आझाद हिंद सरकार (सेना). या सरकारला समोर ठेवूनच नाना पाटलांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रतिसरकार उभारलं होतं. त्या काळात देशभरात अशी चार सरकारं स्थापन झाली होती. मिदनापूर (पश्चिम बंगाल), बालिया (उत्तर प्रदेश), भागलपूर आणि हे सातारा येथील प्रतिसरकार. इतर तीन ठिकाणची अशी सरकारं कोसळली, तरी नाना पाटलांच्या प्रतिसरकारने हार मानली नव्हती. ते सरकार सर्वांत जास्त काळ चाललेलं सरकार होतं. या सरकारनं केवळ तरुणांचीच सशस्त्र दलं उभारली नव्हती, तर स्त्रियांच्या पलटणीही उभारल्या होत्या आणि याही बाबतीत त्यांचे आदर्श होते नेताजी आणि त्याचं आझाद हिंद सरकार (सेना).

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकार प्रमाणेच आपलंही सशस्त्र दल असावं, ही नाना पाटील आणि नागनाथ नायकवडी यांची इच्छा होती. त्यासाठी नागनाथअण्णा नेताजींना भेटण्याच्या प्रयत्नातही होते. दिल्लीलाही गेले होते. ही भेट झाली की नाही याच्या नोंदी मिळत नसल्या, तरी प्रतिसरकारच्या तरुणांना प्रशिक्षित करण्यासाठी, स्वतंत्र सैन्यदल उभारण्यासाठी दोन क्रांतिकारक इकडे आले होते आणि इथल्या तरुणांना लष्करी प्रशिक्षण देत असताना त्यांपैकी नानकसिंग यांचं बलिदानही झालं होतं. इंग्रजांनी केलेल्या गोळीबारात नानकसिंग मारले गेले होते. पण हे झालं तरुणांच्या सैन्यदलाबद्दल. पण नागनाथअण्णा आणि नाना पाटील यांनी त्याच्या प्रतिसरकारची... महिलांची तुफान सेनाही उभारली होती. धुळ्याच्या लीलाताई पाटील या त्याचं नेतृत्व करत होत्या. या लीलाताई म्हणजे धुळे खजिना लुटीतील क्रांतिकारक उत्तमराव पाटील यांच्या पत्नी. लीला पाटील यांची तुफान सेना आणि त्या सेनेच्या खंद्या लढवय्या राजुताई बिरनाळे यांच्याविषयी पाहण्याअगोदर आपण आझाद हिंद सरकार आणि त्यांच्या राणी झाशी रेजिमेंटची माहिती घेऊ.

सिंगापूर येथे ९ जुलै, १९४३ रोजी झालेल्या एका सभेत नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ‘प्रत्येक व्यक्तीनं देशाच्या स्वातंत्र्यासाठी आझाद हिंद फौजेत सामील व्हावं’ असं आवाहन केलं. याच सभेत त्यांनी राणी झाशी रेजिमेंटची कल्पना जाहीर केली होती. ही कल्पना त्यांना काही अचानक सुचलेली नव्हती. तिचं बीज अगोदरच त्यांच्या मनात रुजलेलं होतं. १९२८मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात त्यांनी पुरुषांप्रमाणेच स्त्रियांचीही पथकं तयार केली होती. इथल्या महिला क्रांतिकारक त्यांचा आदर्श होत्याच. याचा उल्लेख त्यांनी १२ जुलै, १९४३च्या आपल्या भाषणात केला आहे. ते म्हणाले होते, ‘आपल्या देशातील शूर भगिनींनी भारतातील गुप्त क्रांतिकारकांच्या संघटनेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रसंगी त्यांनी आपल्या बंधूंच्या खांद्याला खांदा लावून नेमबाजीही केली आहे...’



पती उत्तमराव पाटील यांच्यासमवेत लीलाताई

१४ जुलै, १९४३पासून लक्ष्मी सेहगल या 'महिला पलटणीच्या कमांडर आणि संघटक' म्हणून काम पाहू लागल्या. त्यांचं लष्करी प्रशिक्षण सुरू झालं. नेताजींनी आपल्या कल्पनेतील महिलांची पलटण कशी असेल याचं एक चित्र रंगवलं होतं. त्याची माहिती पाणबुडीतील त्यांचे सहकारी आबीद हसन यांच्या 'मेन फ्रॉम इम्फाल' या पुस्तकात वाचायला मिळते. नेताजींच्या स्वप्नातील राणी झाशी रेजिमेंटला आकार देण्यासाठी लक्ष्मी सेहगल (तेव्हाच्या स्वामिनाथन), श्रीमती चिदंबरम आणि यल्लाप्पा कामाला लागले होते. या पलटणीत सामील झालेल्या स्त्रियांना प्रशिक्षित करण्यासाठी यल्लाप्पा यांनी आझाद हिंद फौजेतील दोन हवालदार नेमले होते. या कामी आबीद हसन सर्व ती मदत करत होतेच. १५ महिलांवर सुरू झालेल्या या पलटणीत १६ जुलै रोजी असलेल्या महिलांची संख्या दोनशेवर गेली होती. यथावकाश ही संख्या वाढतच गेली. त्यासाठी मलाया आणि कौलालंपूर येथील लक्ष्मी सेहगल यांच्या दौऱ्याचा खूप उपयोग झाला होता. या सगळ्या वार्ता 'यंग इंडिया'मधून देशवासियांना वाचायला मिळत होत्या.

२२ ऑक्टोबर, १९४३ रोजी 'राणी झाशी रेजिमेंट'ची रीतसर घोषणा करण्यात आली. कर्नल लक्ष्मी सेहगल यांच्या मदतीला आता श्रीमती एम. एस. थीवरही आल्या होत्या. स्त्रियांना बंदुका चालवण्याबरोबरच बौद्धिकही दिलं जात असे. भारताचा, इथल्या क्रांतिकारकांचा, नेत्यांच्या त्यागाचा आणि बलिदानाचा इतिहास सांगण्यात येत असे. इंग्रजांचं भारतावरील आक्रमण, मध्य पूर्व आशियातील युद्ध आणि त्याचं महत्त्व, इंग्रजांच्या युद्धसंघटना आणि प्रशासनातील कच्चे दुवे यांविषयीही माहिती देण्यात येत असे. पाठीवर पाच-पाच किलो वजनाचं सहित्य घेऊन चालणारी कवायत आणि संचलन, बंदूक प्रशिक्षण सगळं कसं अगदी सांग्रसंगीत होत होतं, असं कर्नल लक्ष्मी सांगत होत्या. (ऑक्टोबर १९९८मध्ये, मी त्यांच्या सहवासात कानपूर येथे पंधरा दिवस राहिलो होतो. त्यांच्या आत्मवृत्ताचा आणि त्यांच्या त्या काळातील दैनंदिनीचा मी केलेला मराठी अनुवाद अक्षरदालन प्रकाशन, कोल्हापूर यांनी प्रकाशित केलेला आहे.)


खडतर प्रशिक्षणानंतर ३० मार्च, १९४४ रोजी राणी झाशी रेजिमेंटमधील 'राण्यांची' पहिली 'पासिंग आउट परेड' सिंगापूर येथे आली. आझाद हिंद फौजेचे कार्यकारी प्रमुख कर्नल नय्यर यांना मानवंदना देण्यात आली. या संचलनाला आझाद हिंद फौजेचे सर्व अधिकारी, जपानी अधिकारी उपस्थित होते आणि सिंगापूरची जनताही मोठ्या संख्येने उपस्थित होती. या नंतर मेजर सत्यवती थीवर यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात स्त्रियांची भरती सुरू झाली. जगाच्या इतिहासातल्या स्त्रियांच्या त्या एकमेव पलटणीने ब्रह्मदेशाच्या आघाडीवर धाव घेतली.

या राणी झाशी रेजिमेंटचे दोन विभाग होते- एक 'परिचारिका विभाग' आणि दुसरा 'लढाऊ विभाग.' असं असलं, तरी दोन्ही विभागातील स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण सक्तीचं होतं. या रेजिमेंटचं मुख्यालय सिंगापूर येथे असलं, तरी परिचारिकांना प्रत्यक्ष रणभूमीवर जावं लागत होतं. सिंगापूरनंतर ब्रह्मदेश आणि बँकॉक येथेही रेजिमेंटच्या छावण्या उभारण्यात आल्या होत्या. जुलै १९४३मध्ये सुरू झालेल्या ब्रह्मदेश येथील छावणीच्या प्रमुख होत्या- श्रीमती बी.चंद्रन.

राणी झाशी रेजिमेंटच्या प्रत्येक तुकडीत चौदा,सोळा किंवा



*कार्यकर्त्यांसोबत क्रांतिसिंह नाना रामचंद्र पाटील*



*क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी*

वीस 'राण्या' असत. तीन तुकड्यांची मिळून एक कंपनी होत असे. यांपैकी काही कंपन्यांना प्रत्यक्ष लढाईत भाग घेण्याची संधी मिळाली. संपूर्ण राणी झाशी रेजिमेंट प्रशिक्षित असली, तरी तिला लढाईत भाग घेता आला नाही. मेमियो टेकडी युद्धातला विजय मात्र रेजिमेंटच्या नावावर नोंदवला गेला आहे. रंगूनमध्ये झालेल्या अनेक चकमकीत त्यांनी भाग घेतला होता. रंगून पडलं, तेव्हा या तुकडीतल्या राण्यांना कैदही भोगावी लागली. पण त्या इंग्रजांसमोर झुकल्या नाहीत. शरण गेल्या नाहीत.

१७ डिसेंबर, १९४४ रोजी नेताजी म्हणाले होते, 'आमचे लक्षणीय यश म्हणजे आम्ही पूर्व आशियातील भारतीय स्त्रियांमध्ये निर्माण केलेली जागृती. आमच्या आवाहनानुसार, या स्त्रिया राणी झाशी रेजिमेंटमध्ये भरती झाल्या. त्यांनी आपली लष्करी कार्यक्षमता सिद्ध केली आहे. आपल्या वागणुकीने आणि शौर्याने त्या भारताला सन्मान आणि वैभव मिळवून देतील यात शंका नाही....' या राणी झाशी रेजिमेंटचं नेतृत्व केलं होतं- कर्नल लक्ष्मी सेहगल यांनी. आझाद हिंद फौजेच्या 'राणी झाशी रेजिमेंट'ची रणरागिणी म्हणून हाती बंदूक घेऊन रणमैदान गाजवणारी ती पहिली भारतकन्या. जगातल्या पहिल्या महिला पलटणीची पहिली कर्नल. आझाद हिंद फौजेचा अलौकिक प्रारंभच नव्हे; तर प्रखर ज्वालामधली त्या चळवळीची ऐन दुपार आणि तिच्या अस्ताच्या लांबचलांब पडलेल्या घनदाट सावल्या पाहणारी क्रांतिकन्या होती ती. तिचाच आदर्श मानून छत्रपती शिवरायांच्या या महाराष्ट्रात खांद्याला बंदूक अडकवून, डोंगर-दऱ्यांतून हिंडत इंग्रजांना सळो की पळो करून सोडलं, ते प्रतिसरकारच्या 'तुफान सेने'च्या लीलाताई पाटील आणि राजुताई बिरनाळे यांनी. पण त्या आजही तशा अपरिचितच राहिल्या आहेत.

क्रांतिसिंह नाना रामचंद्र पाटील यांचं साताऱ्याचं प्रतिसरकार. या सरकारचं एक अंग होतं 'तुफान सेना.' स्त्रियांची ही 'तुफान सेना' आझाद हिंद सेनेतील 'राणी झाशी रेजिमेंट'च्या धर्तीवर उभारण्यात आली होती आणि या 'तुफान सेने'च्या सेनापती होत्या खानदेशच्या लीलाताई उत्तमराव पाटील. महात्माजींनी 'चले जाव'चा नारा दिला आणि सगळा देश पेटून उठला, तेव्हाची गोष्ट. साताऱ्यात आधी मोर्चे आणि नंतर भूमिगत चळवळ अशा स्वरूपात स्वातंत्र्यलढा सुरू ठेवला. साधारण १९४३च्या सुमारास पणुम्ब्रे गावी एक बैठक झाली होती आणि हा लढा पुढे सुरू ठेवायचा की नाही, यावर चर्चा करण्यात आली. वैचारिक मतभेदही झाले. यातूनच पुढे नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकार स्थापन झालं. या सरकारची 'तुफान सेना'ही अस्तित्वात आली.

सातारा जिल्ह्यात त्या वेळी दरोडेखोरांचं मोठं प्रस्थ होतं. त्यांच्या टोळ्यांनी दहशत निर्माण केली होती. कामेरीच्या ज्ञानू कुंभार आणि सखाराम बारबट्टे यांनी तर 'कामेरी कोर्ट'च स्थापन केलं होतं. या कोर्टाच्या निर्णयापुढे जाण्याची कुणाचीच हिंमत होत नव्हती. अशा अनेक लोकांनी सामान्य जनतेत मोठी दहशत निर्माण केल्याने जीवित आणि वित्त सुरक्षित नव्हतं. अशा लोकांना हाताशी धरून इंग्रज सरकारने नवाच खेळ सुरू केला होता. या दरोडेखोरांना त्यांनी चिथावणी दिल्यानं या लोकांनी 'महात्मा गांधी की जय', 'नाना



*कर्नल लक्ष्मी सेहगल यांच्यासोबत लेखक*

पाटील की जय’ अशा घोषणा देत दरोडे घालायला सरुवात केली होती. त्यामुळे भूमिगत क्रांतिकारकांविषयी गैरसमज निर्माण होऊ लागला होता आणि त्याचा बंदोबस्त करणं अत्यावश्यक झालं होतं. कारण नाना पाटलांच्या प्रतिसरकारचा सगळ्यांत मोठा आधार होता- जनतेचा विश्वास. त्या विश्वासाच्या बळावरच त्यांची भूमिगत चळवळ सुरू होती. या दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्याच्या गरजेतून ‘तुफान सेना’ आकाराला आली.

नाना पाटील यांच्या या तुफान सेनेचा आदर्श होती नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारची ‘राणी झाशी रेजिमेंट.’ नाना पाटलांनी गणपतराव लाड, नागनाथ नायकवडी, आप्पा लाड आणि राजुताई पाटील-बिरनाळे यांच्या सहकार्याने ‘तुफान सेना’ उभारली. गणपतराव उर्फ जी. डी. बापू लाड हे या तुफान सेनेचे प्रमुख ‘फिल्ड मार्शल’ झाले. या तुफान सेनेने गावगुंडांचा आणि दरोडेखोरांचा कसा बंदोबस्त केला हे जी.डी.बापूंनी सांगितलं होतं. (‘क्रांतिअग्रणी’ जी.डी.बापू यांची एक प्रदीर्घ मुलाखत मी आणि पत्रकार जयसिंग कुंभार यांनी ध्वनिचित्रमुद्रित करून ठेवली आहे.) पण तुफान सेनेचं काम काही एवढंच नव्हतं. केवळ एवढ्याच कामासाठी तिची स्थापना झाली नव्हती.


ग्रामसफाई, साक्षरताप्रसार, दारूबंदी, हुंडाबंदी, अस्पृश्यता निवारण, कर्जमुक्ती आणि सावकारशाहीचा बंदोबस्त ही कामंही तुफान सेना करत होती. नाना पाटलांनी गावोगावी न्यायदान समित्या स्थापन केल्या होत्या. त्या समित्यांच्या निर्णयांची कार्यवाही करणं, भूमिगत क्रांतिकारकांना लागेल ती मदत करणं हीसुद्धा तुफान सेनेचीच जबाबदारी होती. थोडक्यात, नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या ‘ग्रामराज्या’चा कणा होती ‘तुफान सेना.’ या सेनेच्या शाखा प्रत्येक गावात स्थापन करण्यात आल्या होत्या. सेनेत भरती झालेल्या स्त्रियांना दोन महिन्यांचं प्रशिक्षणही दिलं जात असे. याची जबाबदारी प्रत्येक गावात असलेल्या तुफान सेनेच्या प्रमुखावर होती. अशा सात-आठ प्रमुखांवर एक गटप्रमुख असे आणि अशा सर्व गटप्रमुखांचे ‘फिल्ड मार्शल’ होते- जी.डी.बापू लाड. तुफान सेनेच्या सैनिकांचं प्रशिक्षण त्यांच्याच मार्गदर्शनाखाली कुंडलच्या छावणीत होत असे.


नाना पाटलांच्या प्रतिसरकारची ही तुफान सेना त्या वेळच्या सातारा आणि दक्षिण सातारा जिल्ह्यात पसरली होती. साधारण पाचशे गावांत तिच्या शाखा होत्या. या तुफान सेनेनं गावगुंडांचा बंदोबस्त केला, काही दरोडेखोरांचं मतपरिवर्तन करून त्यांना चळवळीत सहभागी करून घेतलं. शेकड्यांनी गुंडांना ठेचून काढत त्यांच्या टोळ्या मोडून काढल्या. गुन्हेगारांना सगळ्या गावासमोर ठोकून काढलं. त्यांना योग्य त्या शिक्षा दिल्या. त्याच्याही दंतकथा पसरत गेल्या. कुणी म्हणालं- ‘गुंडांना पकडून पायाला पत्र्या



२५ वर्षांची परंपरा

# अश्विन सांघी

यांची साहित्यसंपदा


















ebook available

ठोकतात म्हणून ते प्रतिसरकार.' परंतु तसं होत नव्हतं.

नाना रामचंद्र पाटील यांच्या प्रतिसरकारच्या या 'तुफान सेने'नं हैदराबादच्या मुक्तिसंग्रामातही काम केल्याचं या सेनेचे एक प्रमुख भाई भगवानराव पाटील लिहितात. परभणी येथील अण्णासाहेब गव्हाणे आणि उत्तमराव पाटील यांनी संपर्क साधल्याने जी.डी.बापू लाड हे आपल्या तुफान सेनेचे अडीचशे गटप्रमुख घेऊन तिकडे गेले आणि त्यांनी तिकडेही तुफान सेनेच्या शाखा उघडल्या.

तुफान सेनेचे फिल्ड मार्शल गणपतराव लाड असले, तरी या सेनेच्या सेनानी होत्या- उत्तमराव पाटील यांच्या पत्नी लीलाताई पाटील आणि त्यांच्या सहकारी राजुताई पाटील-बिरनाळे. लीलाताई यांना अमळनेर कोर्ट, पोस्ट आणि स्टेशन जाळून मोर्चा काढल्याबद्दल आणि कायदेभंग केल्याबद्दल एकूण चौदा वर्षांचा तुरुंगवास झाला होता. ही शिक्षा धुळे, ठाणे आणि येरवडा येथे भोगत असतानाच त्यांनी १९४५मध्ये तुरुंगातून पलायन केलं. वर्षभर त्या भूमिगत राहिल्या आणि १९४६मध्ये प्रकट झाल्या. पुढे १९७२ ते १९७८ या काळात त्या शिंदखेडच्या आमदारही होत्या.

या तुफान सेनेच्या लढवय्या स्त्रियांची संख्याही काही कमी नव्हती. राजुताई बळवंत बिरनाळे या त्या सेनेच्या प्रमुख होत्या. शिवाय, सिंधू नलवडे, शांता देशपांडे, हिरा जोशी, इंदिरा देशपांडे, इंदुमती पाटणकर, सीता माली, गीता पाटील, कमलाबाई मोरे, मैना यमगर, सोनाबाई शिराळकर, अनसूया मालवणकर, शकुंतला कुलकर्णी, लक्ष्मीबाई नायकवडी आदि स्त्रियांनी तुफान सेनेची कमान सांभाळली होती. यांपैकी इंदुमती पाटणकर आणि लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी यांच्याबद्दल आपण ऐकून असतो; पण राजुताई बिरनाळे यांच्याबद्दल फारशी माहिती नसते. या बाई इंग्रजांच्या लेखी 'जैनी राजू' म्हणून प्रसिद्ध होत्या आणि त्यांच्यावर त्याकाळात इंग्रज सरकारनं मोठं इनाम लावलं होतं.

ज्येष्ठ लेखक आणि महाराष्ट्राच्या इतिहासाचे भाष्यकार डॉ. यशवंत दिनकर फडके हे औदुंबरच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते, तेव्हाची गोष्ट. या संमेलनाच्या आधी एक दिवस ते सांगलीत आले होते आणि त्यांना राजुताई बिरनाळे यांची भेट घ्यायची होती. त्यांच्यासोबत गेल्याने मलाही राजुताई बिरनाळे यांचं दर्शन झालं. तेव्हा य.दि.फडके यांनी राजुताई बिरनाळे यांची एक प्रदीर्घ मुलाखत ध्वनिमुद्रित केली होती. नंतर त्यांनी 'तुफान सेने'च्या 'जैनी राजू'बद्दल लेखही लिहिला होता. असं असलं, तरी आजही लीलाताई पाटील आणि राजुताई बिरनाळे या तुफान सेनेच्या दोन रणरागिणींबद्दल पुरेसं लेखन झालेलं नाही. यांपैकी एक आहेत- इंग्रजांचा तुरुंग फोडून पळालेल्या सेनानी लीलाताई उत्तमराव पाटील आणि दुसऱ्या आहेत- तुफान सेनेच्या 'जैनी राजू' अर्थात राजुताई बिरनाळे.


✪


२५ वर्षांची परंपरा


सर्वच चवी जिभेवर रेंगाळत ठेवणारी
साऱ्या कुटुंबाची हवीहवीशी सखी...

कमलाबाई ओगले
यांची साहित्यसंपदा

रुचिरा
भाग १ व २



किंमत : ₹ ३९५



किंमत : ₹ २७५

ebook available





एका लहान मुलाचं भावविश्व मांडता मांडता जगण्याच्या वास्तवावर नेमकं बोट ठेवणारी अस्वस्थकारक कादंबरी

ebook available

## खोल खोल पाणी

पेरुमाल मुरुगन । अनु. सुप्रिया वकील
किंमत : ₹ ४९५





अश्विन सांघी यांच्या खिळवून ठेवणाऱ्या रंगतदार शैलीत, कुत्ता कदम मालिकेतील पहिली थरारक कादंबरी...

ebook available

## रेझर शार्प

अश्विन सांघी । अनु. लीना सोहोनी
किंमत : ₹ ५२५



जॉर्ज ऑर्वेलच्या जन्मस्थळीच जन्मलेल्या एका लेखकाची रहस्यमय, गुंतवून ठेवणारी कादंबरी

ebook available

## मोतिहारीचा माणूस

अब्दुल्ला खान । अनु. उल्का राऊत
किंमत : ₹ ४४०



पाळीव प्राणी-पक्षी आणि लहान मुलं
यांच्यातील अनोखी मैत्री पालकांना सांगते...

## हकूनामटाटा (ऑल इज वेल)

मंजुश्री गोखले
किंमत : ₹ १५०





अनुभवांनी विणलेलं जीवनचक्र,
सुधा मूर्तींच्या शब्दांनी उजळलेलं...

ebook available

## द सर्कल ऑफ लाइफ

सुधा मूर्ती । अनु. लीना सोहोनी
किंमत : ₹ ३५०




धर्म, तपश्चर्या आणि मृत्यूच्या पलीकडचं जीवन
'द नागा स्टोरी' कादंबरीतून उलगडेल
एक अनोखं आध्यात्मिक रहस्य

ebook available

## द नागा स्टोरी

सुमन बाजपेयी । अनु. मंजिरी धामणकर
किंमत : ₹ २५०

# कर्तृत्वाची उज्ज्वल गाथा
## (मराठा लाइट इन्फंट्री)

**अभिषेक कुंभार**



सातव्या शतकात हिन्दुस्थानात आलेल्या एका चीनी प्रवाशाने- 'उत्साही, अभिमानी, युद्धप्रिय, स्वतःच्या चुकांबद्दल पश्चात्ताप करणारे, मदत करणाऱ्यांसाठी कमालीचे आभारी, संकटात सापडलेल्या आपल्यांसाठी सर्वस्व अर्पण करणारे, तर त्यांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्यांसोबत रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत सूड उगवण्याची तयारी ठेवणारे, त्यातही प्रतिस्पर्ध्याला आव्हान देत त्यास युद्धासाठी ललकारणारे' अशा आशयाचं लिखाण एका समाजाविषयी लिहून ठेवलं आहे. हा समाज म्हणजे, दुसरा कुणी नसून 'मराठा समाज' होय.

यातील काही गुणस्वभावांत कालनुरूप बदल घडला असला, तरी मराठ्यांच्या या स्वभावगुणांतलं मूलभूत स्वरूप कायम राहिलं. १४व्या शतकातील मराठ्यांनी कृष्णा आणि इतर नद्यांवरील त्यांच्या राजधान्या गमावल्या. नाइलाजाने, या साऱ्यांना दख्खन पठारावरील अगदी पश्चिम काठावर जाऊन स्थायिक होण्याची वेळ आली. निसर्गाने मराठ्यांना वैशिष्ट्यपूर्ण घडवलं, असं म्हणता येईल. पश्चिम घाटावरील मनुष्य आणि प्राणी यातील एकाकी संघर्षात मराठा गडी खऱ्या अर्थाने घडला. त्याची लष्करी कौशल्यं वाढली आणि कोणत्याही प्रतिकूल वातावरणात टिकून राहण्याची नैसर्गिक वृत्ती या माणसांमध्ये विशेषत्वाने निर्माण झाली.

शौर्य, धैर्य, कर्तृत्व, नेतृत्व यांचा हाच वारसा आजही मोठ्या अभिमानाने सांगत मराठा सैन्याने गेली अडीच शतकं भारताच्या लष्करी पटलावर आपलं वर्चस्व गाजवलं आहे. 'मराठा लाइट इन्फन्ट्री' ही भारतीय लष्कराच्या सर्वांत जुन्या आणि सर्वांत प्रसिद्ध रेजिमेंटपैकी एक आहे, ज्याचा गौरवशाली इतिहास २५० वर्षांहून अधिक काळ पसरलेला आहे. मुंबईच्या बेटांवरील ईस्ट इंडिया कंपनीच्या मालमत्तेचं रक्षण करण्यासाठी, 'जंगी पलटण' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रेजिमेंटच्या पहिल्या बटालियनची स्थापना ऑगस्ट १७६८मध्ये झाली. यानंतरची दुसरी बटालियन 'बॉम्बे सिपॉय' म्हणून स्थापन करण्यात आली, तर 'काली पंचविन (काळी पाचवी)' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुसऱ्या तुकडीने पुढच्या वर्षी तिसऱ्या तुकडीचे बॉम्बे सिपॉय म्हणून काम केलं. तेव्हापासून रेजिमेंटची ताकद वाढत गेली.

४ फेब्रुवारी १६७० रोजी शिवरायांच्या आज्ञेनुसार, तानाजी मालुसरेंनी सिंहगड किल्ला जिंकला. हा दिवस मराठा लाइट इन्फंट्री देशभर 'मराठा दिवस' म्हणून साजरा करत असते. तानाजी मालुसरे यांनी घडवलेल्या या इतिहासाप्रमाणेच मराठा लाइट इन्फंट्रीचा इतिहास अविश्वसनीय लढाया आणि बलिदानं यांनी भरलेला आहे. राज्यकर्त्यांकडून व्यापाराचे परवाने घेऊन आपल्या देशांत स्वतःची वखार स्थापन केलेल्या इंग्रजांनी या आपल्या वखारीच्या सुरक्षिततेसाठी या सैन्यदलाची स्थापना केली. 'राष्ट्र' ही संकल्पना त्या काळी अस्तित्वात नव्हती. तन्ख्यावर कुठल्याही तुकड्या कुणाच्याही बाजूने लढत असत. शिवाजी महाराजांनी






आरमारनिर्मितीसाठी पोर्तुगीज कामगार कामावर घेणं, मराठ्यांच्या तोफखान्याची भिस्त गारद्यांवर असणं इतकंच काय; तर त्या काळात महादजी शिंदे यांच्याकडेही कवायती फ्रेंच तुकड्या होत्या.

अठराव्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात सुरतेपासून खाली गेलेल्या संपूर्ण पश्चिम किनारपट्टीवर लढल्या गेलेल्या प्रत्येक मोठ्या लढाईत बॉम्बे सिपॉय, काळी पाचवी या दोन तुकड्या आघाडीवर होत्या. 'अँग्लो-म्हैसूर युद्ध' म्हणून प्रसिद्ध असलेल्या टिपू सुलतान विरुद्धच्या मोहिमेतही या सैन्याने चमक दाखवली. १७९९ साली झालेल्या श्रीरंगपट्टणच्या लढाईतही मराठ्यांनी आपली तलवार गाजवल्याचा इतिहास आहे. लॉर्ड वेलेस्लीच्या शब्दांत सांगायचं झालंच तर, Their counduct and success were 'seldom equalled and never surpassed.'

अठराव्या शतकाचा शेवट हा या रेजिमेंटल गटाच्या विस्ताराचा विशेष साक्षीदार होता. यानंतर अनेक मोहिमांमधून मराठ्यांनी आपल्या युद्धलालसेची चमक साऱ्या जगाला दाखवली. १८१४–१८१६ या दरम्यान झालेल्या नेपाळच्या गुरखा सैन्याविरुद्ध तर ब्रिटिशांना वाली हे केवळ मराठेच होते. कारण गुरखा सैन्याच्या पर्वतीय युद्धशैलीला तोंड देईल अशी कुठली दुसरी रेजिमेंट त्या काळात अस्तित्वात नव्हती. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, या तुकड्या मध्यपूर्वेपासून चीनपर्यंत विविध मोहिमांमध्ये लढल्या. १८४१मध्ये पहिल्या अफगाण युद्धादरम्यान बलूच प्रदेशातील काहूनच्या वेढ्यात आणि दादरच्या संरक्षणात त्याच्या तुकड्यांच्या शौर्यपूर्ण वर्तनाच्या सन्मानार्थ, काली पंचविनला (काळी पाचवी) तुकडीला 'लाइट इन्फंट्री' या पदवीने सन्मानित करण्यात आले.



त्यानंतर, १८६७-६८च्या सर रॉबर्ट नेपियरच्या एबिसिनियन मोहिमेतील शौर्यासाठी बॉम्बे इन्फंट्रीच्या तिसऱ्या आणि दहाव्या रेजिमेंटला (सध्या अनुक्रमे १ मराठा ली आणि २ para) हा सन्मान देण्यात आला. या रेजिमेंटने १९२२मध्ये 'पाचवी मराठा लाइट इन्फंट्री' ही पदवी स्वीकारली.

मराठ्यांचे खरे लढाऊ गुण पहिल्या महायुद्धादरम्यान (१९१४-१८) जगाच्या विशेष समोर आले, जेव्हा दीर्घकाळ चाललेल्या मेसोपोटेमियन मोहिमेमध्ये तीन मराठा बटालियन १०३व्या, ११४व्या आणि ११७व्या तुकड्यांनी स्वतःला सिद्ध केलं होतं. मेसोपोटेमियातील लढ्यात मराठ्यांना मोठ्या प्रमाणावर जीवितहानी सोसावी लागली; परंतु त्यांनी कधीही स्वतःचं धैर्य गमावून एक इंचही जमीन गमावली असं झालं नाही. हेच त्यांचं शौर्य साऱ्या जगाच्या डोळ्यांत भरलं. ११७व्या मराठा (सध्याचे ५ मराठा ली) यांचं कर्तृत्वही असंच काहीसं उच्च श्रेणीचं. मेसोपोटेमियामधील मोहिमेदरम्यान आणि विशेषतः कुट-अल-अमारा येथील १४६ दिवसांच्या कडवट वेढ्यात जे शौर्य ११७ या तुकडीने दाखवलं, त्यासाठी त्यांना या विशेष सेवेसाठी 'रॉयल बटालियन'चा दर्जा देण्यात आला. शरक्वतच्या लढाईत ११४च्या मराठ्यांचं शौर्यही काही कमी नव्हतं. त्यांना त्यांच्या कर्तृत्वाबद्दल एकूण २८ शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आले, त्यांतील दोन प्रतिष्ठित सेवा आदेश, चार लष्करी क्रॉस, सहा भारतीय ऑर्डर ऑफ मेरिट, सोळा भारतीय प्रतिष्ठित सेवा पदकं देण्यात आली आणि मोठ्या संख्येने मेन्शन-इन-डिस्पॅच प्रदान करण्यात आले.

याचप्रमाणे, १९१८ साली १०५, ११०, आणि ११६व्या मराठा तुकडीनेही आपला विशेष जंगजोहर गाजवल्याचं इतिहास सांगतो. पैकी १०५व्या मराठा इन्फंट्रीने १९१८मध्ये पॅलेस्टाईनमध्ये शेरॉनच्या खोऱ्यात जनरल ॲलनबीच्या आक्रमक नेतृत्वात मोठी लढाई केली, तर तेव्हा, ११६ मराठा दक्षिण कुर्दिस्तानमधील भीषण लढाईत गुंतले होते. १९२२मध्ये, या साऱ्या तुकड्या टप्प्याटप्प्याने भारतात परतल्यानंतर, मुंबईच्या या सहा तुकड्या विलीन करून एकच गट तयार करण्यात आला आणि 'पाचवी मराठा लाइट इन्फंट्री' म्हणून नियुक्त करण्यात आलं.

बसरा, कुत, बगदाद या भागात मराठ्यांनी लढाया केल्या. याच दरम्यान, पूर्व आफ्रिकेत आजच्या टांझानिया, केनिया या भागांतही मराठे जर्मन सैन्याच्या विरोधात लढले. Western Frontला युरोपच्या भूमीवर खंदक युद्धात मराठ्यांनी फ्रान्समध्ये यप्रेस, सोम्म, नेवे शॅपेल अशा प्रसिद्ध लढायांमध्ये आपला जंगजोहर दाखवला. पहिल्या महायुद्धातील या लढ्यामुळेच फ्रान्समधील युद्धस्मारकांवर श्रद्धांजली वाहण्यासाठी, इतिहासाच्या स्मृतीला मानवंदना करण्यासाठी, आजही मराठा लाइट इन्फंट्रीचे जवान फ्रान्समध्ये पथ-संचलन करताना दिसतात.

१९३९-४५च्या दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान सगळ्याच तुकडीतील मराठ्यांचा वावर हा दुसऱ्या महायुद्धात उघडल्या गेलेल्या प्रत्येक आघाडीवर दिसून येतो. मग ते बर्माचे घनदाट जंगल असो अथवा इथिओपियातील बोडके डोंगर, उत्तर आफ्रिकेतील वैराण वाळवंट असो वा इटलीतील नद्या, बर्मातील संघशक आणि रुयावा, आफ्रिकेतील केरेन, तोब्रूक, हायफा पास, इटलीतील कॅसिनो असा सर्वत्रच मराठ्यांच्या कर्तृत्वाचा दरारा होता. इटलीत गाजवलेल्या शौर्याबद्दलच मराठा लाइट इन्फंट्रीतील नायक यशवंत घाडगे आणि शिपाई नामदेव जाधव यांना महायुद्धातील सर्वोच्च अशा 'व्हिक्टोरिया क्रॉस पुरस्कारा'ने गौरवले गेले.

याव्यतिरिक्त, रेजिमेंटला आठ प्रतिष्ठित सेवा ऑर्डर्स, बावन्न मिलिटरी क्रॉस, चौदा भारतीय ऑर्डर ऑफ मेरिट आणि ५६ भारतीय प्रतिष्ठित सेवा पदकं प्रदान करण्यात आली. तर १३० इतर सन्मानाचेही मराठे हकदार ठरले. दुसऱ्या महायुद्धात कोल्हापूरकर छत्रपतींनी ब्रिटनला युद्धनिधी व राजाराम रायफल्स ही आपली









सैन्यतुकडी या युद्धासाठी मदत म्हणून देऊ केली. पुढे या तुकडीचं स्वतंत्र भारतात सन्मानपूर्वक मराठा लाइट इन्फंट्रीमध्ये सामिलीकरण करण्यात आलं. यामुळेच करवीर छत्रपती घराण्याला आजही या रेजिमेंटचं 'मानद कर्नल ऑफ दि रेजिमेंट' म्हणून सर्वोच्च मानाचं पद दिलं जातं. १९१५ मध्ये शाहू महाराज १०३ मराठा लाईट इंफंट्रीचे ऑनररी कर्नल केले गेले.

राजाराम महाराजांना १९२४ साली GCIE, लेफ्ट. कर्नल १९२७ , GCSI - १९३१ हे किताब मिळाले. १९३८ मध्ये पाचवी मराठा लाईट इंफंट्रीच्या टेरीटोरियल बटालियनचे ओनररी कर्नल केले गेले.

मंदिराला ज्या पद्धतीने कळस चढवला जातो, त्याच पद्धतीची कामगिरी मराठा लाइट इन्फंट्रीची उत्तरोत्तर वाढत गेलेली आपल्या नजरेस पडते. देशाच्या स्वातंत्र्यानंतर अगदी लगेचच सुरू झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धाने अगदी उग्र स्वरूप धारण केलं होतं. संपूर्ण काश्मीर आपल्या ताब्यात घेण्याची असुरी मनशा बाळगून आलेल्या जिहाद्यांपासून हे नंदनवन मोकळं करण्याची जबाबदारी सर्वप्रथम येऊन पडली, ती याच मराठा जवानांवर. त्यांनी या युद्धात जम्मू आणि काश्मीर प्रदेशात महत्त्वपूर्ण आणि विशिष्ट भूमिका बजावली. पाकिस्तानच्या समर्थनार्थ आलेल्या टोळीवाल्यांना आणि त्यांच्या पाठोपाठ आलेल्या पाकिस्तानी लष्कराने जम्मू-काश्मीर संस्थानावर आक्रमण केलं आणि या संघर्षाला तोंड फुटलं.

या आक्रमणाला तोंड देण्यासाठी उघडण्यात आलेल्या फ्रन्टलाइन ऑपरेशनमध्ये मराठा लाइट इन्फंट्री बटालियन या प्रदेशात तैनात करण्यात आलेल्या भारतीय लष्कराच्या पहिल्या तुकड्यांपैकी एक होती- नौशेरा आणि झंगरच्या लढाईत इन्फंट्रीने आपलं महत्त्वपूर्ण योगदान दिलं. दुसरी- बटालियन, पॅराशूट रेजिमेंट (तेव्हाची तिसरी मराठा लाइट इन्फंट्री) ही सामरिकदृष्ट्या महत्त्वाची क्षेत्रं पुन्हा ताब्यात घेण्यासाठी मोहिमांच्या आघाडीवर होती.

नौशेरा येथील लढ्यात मराठा सैन्याने दाखवलेलं शौर्य इतक्या उच्च कोटीचं होतं, की त्याला इतिहासात तोड नाही. नौशेरा येथील युद्ध आघाडीवर झालेल्या झांबडाझांबडीत दुसऱ्या बटालियनला तब्बल ५००० आक्रमक पठाणांच्या हल्ल्याचा सामना करावा लागला. हे पठाण तेच होते, ज्यांचे नेते खान अब्दुल गफारखान यांनी भारताने आम्हाला लांडग्यांपुढे मरणासाठी सोडून दिलं, असं साऱ्या जमातीबद्दल बोलत होते. अफू आणि दारू यांची झिंग व धर्माची विशेष नशा डोक्यांत भिनवून काश्मीरचा घास घेण्यासाठी उतरलेल्या या टोळीवाल्यांनी मांडलेला उच्छाद अतिशय विदारक होता. जंगली म्हणवणाऱ्यांनाही कदाचित काही मर्यादा असतील, इतकं हिडीस वर्तन या टोळीवाल्यांनी सबंध घाटीतून केलं होतं. वर त्यांची संख्याही दुसऱ्या बटालियनहून कैक अधिक होती, तरीदेखील इन्फंट्रीचं सैन्य आपल्या सवयीप्रमाणे अगदी पाठ भिंतीला टेकेपावेतो लढलं आणि त्यांनी मोठ्या धैर्याने या टोळीवाल्यांचा हल्ला यशस्वीरीत्या मागे परतवला.

मुजऱ्याचे मानकरी असलेल्या या दुसऱ्या बटालियनला या लढ्यात तीन महावीर चक्रं, ११ वीरचक्रं देण्यात आली आणि २० मेन्शन-इन-डिस्पॅच देण्यात आले. आजही काश्मिरातील शेवटची पिढी यांचं गुणगान गायल्याशिवाय राहत असेल असं वाटत नाही.

१९६२ साली झालेल्या भारत-चीन युद्धातही मराठ्यांचं योगदान हे अधोरेखित करण्यासारखंच आहे. या युद्धात मराठा लाइटच्या काही तुकड्या ईशान्य सीमेच्या संरक्षणासाठी खड्या ठाकल्याचे उल्लेख आहेत. १९वी मराठा लाइट इन्फंट्री ही ६५व्या पायदळ दलाचा भाग होती आणि ती बोमदिला सेक्टर येथे तैनातीत होती.

इन्फंट्रीच्या कर्तृत्वाचा हा वारसा पुढेही असाच सुरू राहिला. तो काळ होता, १९६५चा. नुकतंच देशाने चीनविरुद्धचं एक युद्ध सोसलं होतं, त्यामुळे भारताची हालत नक्कीच खस्ता असणार या विचारांतून प्रतिस्पर्ध्याला नमवण्यासाठी पाकिस्तानने डाव आखला.

परंतु सारं काही त्यांच्या विचारांच्या अगदी विपरीत घडलं. याचं कारण होतं- भारतीय सैन्य आणि या भारतमातेच्या शिरपेचातील विशेष तुरा असणारी मराठा लाइट इन्फंट्री. रेजिमेंटच्या विविध तुकड्यांनी या युद्धातील विविध आघाड्या आपल्या कर्तृत्वाने यादगार करून सोडल्या आहेत. त्यांतील काही निवडक ठिकाणं सांगायचं झालं, तरी पहिला मान हुसैनीवालाच्या लढाईचा.


फिरोजपूर सेक्टर ज्यांनी इतिहास घडवला, तेच काळी पाचवी (काली पंचविन)चे जवान पंजाबमधील महत्त्वाचं हुसैनीवाला येथील प्रमुख ठाणं आणि सतलज नदीवरील पूल यांच्या संरक्षणासाठी छातीचा कोट करून उभारले होते. ती परिस्थिती अतिशय भयानक होती, कारण हा हे ठाणं नि हा पूल दुश्मनाच्या ताब्यात पडल्यास पाकिस्तानी सैन्याला थेट फिरोजपूरला जाण्याचा मार्ग मिळाला असता. त्यामुळे या जागेचं महत्त्व दुश्मनदेखील जाणून होते. पाकिस्तानने इथे अगदी स्फोटकांचा अग्निवर्षाव चालवला होता. परंतु मराठे हटले नाहीत. आपला तोफखाना आणि हातातील शस्त्रांच्या जोरावर, मुखी असलेल्या शिवरायांच्या जयघोषात काळी पाचवीच्या वीर मराठ्यांनी असा काही लढा दिला, की पाकिस्तानी सैन्याला माघार घेण्यावाचून काही गत्यंतरच उरलं नाही. त्यांनी शत्रूंचे वारंवार होणारे हल्ले हाणून पाडले, दोन रणगाडे नष्ट केले आणि इतर दोन ताब्यात घेतले. हे महत्त्वाचं पद धारण करण्याच्या त्यांच्या शौर्यासाठी आणि यशासाठी, दुसऱ्या मराठा लाइट इन्फंट्रीला 'हुसैनीवाला' हा बॅटल ऑनर देण्यात आला.

तिकडे काश्मीर सेक्टरमध्येही इन्फंट्रीने असंच शौर्य गाजवलं. १st मराठा लाइट इन्फंट्री जंगी पलटणीने प्रमुख शत्रुचौक्या आणि ठिकाणे काबीज करण्याची कामगिरी केली. सातव्या मराठा लाइट इन्फंट्रीने आपल्या स्थानांचं रक्षण करण्यासाठी दृढनिश्चय दर्शविला आणि पॉइन्ट ९१०८ ताब्यात घेण्यासह अनेक आक्रमक मोहिमा केल्या. २०वी मराठा लाइट इन्फंट्रीवर उरी येथील माहुरा पॉवर हाउसच्या संरक्षणाची जबाबदारी होती, या पॉवर हाउसचं तर रक्षण त्यांनी केलंच केलं; परंतु शत्रूच्या मोक्याच्या जागादेखील या वेळी मराठ्यांनी काबीज केल्या, त्या वेळी तेथील शत्रूशी दोन हात करताना परिस्थिती इतकी हातघाईवर आली होती की, या बटालियनला अक्षरशः लाथा-बुक्क्यांनी लढावं लागल्याचा इतिहास आहे. सियालकोट सेक्टरमध्ये १९व्या बटालियनने तर पाकिस्तानी हद्दीतील हुदियारा-बार्की रस्त्याच आपल्या ताब्यात घेतला होता. लाहोर प्रांतातील थट्टी जयमल सिंग हे गाव २० सप्टेंबर १९६५ रोजी ताब्यात घेतल्याचा इतिहास आहे. या लढ्यात मेजर मोहम्मद अहमद झाकी, मेजर सुरेंद्रप्रसाद यांनी व यांच्या तुकडीने उल्लेखनीय कामगिरी बजावली. या दरम्यान खाली राजस्थान सेक्टरमध्येदेखील चौथी आणि पाचवी मराठा तुकडी तैनातीत होती. या तुकड्या




२५ वर्षांची परंपरा

आनंद यादव
यांची साहित्यसंपदा








ebook available

सप्टेंबर १९६५ ते जानेवारी १९६६पर्यंत वाळवंटात कार्यरत होत्या. इथे त्यांना दुश्मनासोबत भयंकर वातावरणाचाही सामना करावा लागल्याचं इतिहास सांगतो.

बांगलादेश म्हटलं की, आपल्याला आठवतात- आयर्न लेडी श्रीमती इंदिरा गांधी आणि त्यांचं कर्तृत्व. त्यांच्या या कर्तृत्वात एखाद्या आयर्न डोमप्रमाणे मराठ्यांनी कर्तृत्व घडवल्याचा इतिहास आहे. पूर्व पाकिस्तानमध्ये, म्हणजेच बांगलादेशमध्ये घुसून पाकिस्तानी सैन्याचा पराभव करणं हाच १९७१ सालच्या भारत-पाकिस्तान युद्धातील मराठा लाइट इन्फंट्रीच्या सैन्याचा प्रमुख उद्देश होता.

९५व्या माउंटन ब्रिगेडचा भाग असलेले १st मराठा तुकडीने ढाक्याच्या दिशेने आगेकूच करण्याची महत्त्वाची भूमिका निभावली होती, या प्रवासात त्यांनी जमालपूर येथील पाकिस्तानी सैन्य तळ उद्ध्वस्त करून ते शहर ताब्यात घेण्यासाठी मोठी मोहीम केली. या लढ्यात त्यांना पाकिस्तानी लष्कराच्या ३१व्या बलुच रेजिमेंटच्या विरोधात तोंड देणं भाग पडलं. लढायला ही बलुच मंडळीदेखील कडवीच; पण तरीही मराठे उजवेच ठरले. या तुकडीने मोठ्या संख्येने पाकिस्तानी सैनिक आणि मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रं ताब्यात घेतली आणि दारूगोळाही ताब्यात घेतला. हा विजय इतका महत्त्वाचा होता की, त्याला 'जमालपूर' हा बॅटल ऑनर देण्यात आला.

पाचवी आणि सातवी मराठा लाइट इन्फंट्री या तुकड्याही बांगलादेशच्या मुक्तीत मोठ्या प्रमाणात सहभागी होत्या. त्यांनी पाकिस्तानी ठिकाणं आणि हल्ल्यांवरील छाप्यांसह अनेक कारवायांमध्ये सहभाग घेतला. पाकिस्तानी संरक्षण कमकुवत करण्यासाठी आणि त्यांच्या पुरवठा मार्गांमध्ये व्यत्यय आणण्यासाठी त्यांनी मुक्ती वाहिनी (बंगाली स्वातंत्र्यसैनिक) सोबत काम केलं. २२वी मराठा लाइट या तुकडीने दिनाजपूर सेक्टरमधील भयंकर आणि दीर्घकाळ चाललेल्या हिलीच्या लढाईत भाग घेतला.


पूर्व पाकिस्तानात वरील तुकड्या आपलं युद्ध खेळत असताना पश्चिम पाकिस्तानतही (आजचा मूळ पाकिस्तान) मराठे आपले दंड थोपटत दुष्मनाला धोपटून काढत होते. ४th मराठाने लेफ्टनंट कर्नल कुलदीप सिंग ब्रार यांच्या आधिपत्याखाली पंजाब आघाडीवर विशेष मर्दुमकी गाजवली. सरहद्दी ओलांडून त्यांनी पाकिस्तानची अनेक ठाणी आपल्या ताब्यात घेतली होती, त्यामुळे त्यांना 'नैनकोट' हा बॅटल ऑनर मिळाला. बुर्जच्या लढाईतही या तुकडीने आपला बोलबोला केला. दुसऱ्या मराठा लाइट इन्फंट्रीला ('काली पंचविन') युद्धाच्या सुरुवातीला पूर्व पाकिस्तानातून पश्चिमेला एअरलिफ्ट करण्यात आलं होतं. त्यांना पंजाब सेक्टरमध्ये तैनात करण्यात आलं होतं, जिथे लाइन ऑफ कम्युनिकेशन राखण्यात जीवाची बाजी लावली होती.

मराठा लाइट इन्फंट्रीची शौर्य-परंपरा फार मोठी असून हैदराबाद आणि जुनागढ यांच्या विलीनीकरणासह, गोवा मुक्तिसंग्राम, सियाचीनमधील संघर्ष, बंडखोरीविरोधी मोहिमा आणि कारगिल युद्धादरम्यान तोलोलिंग येथील त्यांचा विजय अशी ही यादी बरीच मोठी आहे.

आज या रेजिमेंटची 'बोला श्री छत्रपती शिवाजी महाराज की जय' हा जयघोष नुसत्या शब्दांपेक्षा खूप अधिक आहे. प्रत्येक मराठा सैनिकाकडे महाराष्ट्राच्या महान राजाचा वारसा आहे, याची ती आठवण करून देते. 'ड्युटी, ऑनर, करेज' हे जणू मराठा लाइट इन्फन्ट्रीचं ब्रीदवाक्य आहे.

प्रत्येक मराठी माणसाने, मराठा लाइट इन्फंट्रीचा हा इतिहास अगदी डोक्यावर घेऊन मिरवाव इतका तेजस्वी आहे.

✪






एका मृत्युपंथाला लागलेल्या राजाच्या शेकडो मुलांची
रहस्यमय कथा आणि एका डायरीचं गुपित
यांची अनोखी सांगड असलेली रंगतदार कादंबरी

ebook available

**बाळांच्या नावांची अनोखी डायरी**

अनीस सलिम । अनु. मुग्धा गोखले
किंमत : ₹ ३६०




ड्रायव्हर-क्लीनरचे बेभरवशी जीवन, त्यांतील संघर्ष, मानवी मनोवृत्ती प्रवृत्ती-विकृती यांचे मिश्रदर्शन घडविणारी कादंबरी...

ebook available

## लाइन

महादेव मोरे
किंमत : ₹ २८०





हुंडाबळी या ज्वलंत सामाजिक प्रनावरील कादंबरी...

ebook available

## चितेवरच्या कळ्या

वसंत गायकवाड
किंमत : ₹ ३५०





कोपलेला देव अन् संकट बनून आलेला दुस्काळ एका कुटुंबाला काय काय दिस दाखवतो त्याची मन हेलावून टाकणारी कादंबरी...

ebook available

## दुस्काळ

दादासाहेब मोरे
किंमत : ₹ १६०





एका राजचिन्हावरून सुरू झालेल्या
जीवघेण्या पाठलागाची थरारक, उत्कंठावर्धक कथा

ebook available

## अ मॅटर ऑफ ऑनर

जेफ्री आर्चर । अनु. सविता दामले
किंमत : ₹ ७००





मास्टर स्टोरी टेलर जेफ्री आर्चर यांच्या
अफाट कल्पनाशक्तीचा अचाट नमुना...

ebook available

## फर्स्ट अमंग इक्वल्स

जेफ्री आर्चर । अनु. मोहन गोखले
किंमत : ₹ १०९९




रुढींपेक्षा उंच आणि नियमांपेक्षा बळकट...
ही कहाणी आहे तिच्या स्वातंत्र्याची
आणि जगण्याच्या धडपडीची!

ebook available

## वृक्षसंगिनी

स्मृती रवींद्र । अनु. मुग्धा गोखले
किंमत : ₹ ६९५

# द डिफ्युज
## (विज्ञानकथा)

**डॉ. संजय ढोले**



काश्मीर पुन्हा एकदा हादरलं होतं... अनुषंगाने सर्व भारत ढवळून निघाला होता.

काश्मीर-गुलमर्ग भागातील खोऱ्यात कामावरून येताना सेहेचाळीस तगड्या भारतीय सैनिकांच्या ट्रकवर सुसायडल बॉम्बरने हल्ला केला होता. संपूर्ण स्फोटकांनी भरलेला ट्रकच आदळवला गेला आणि प्रचंड मोठा स्फोट होऊन आसमंतात धुराचे व आगीचे लोळ उसळले.आजूबाजूच्या ट्रक्सनाही इजा झाली... आणि शेकडो सैनिक जखमी झाले होते.

सेहेचाळीस सैनिक जागच्याजागी मृत पावले होते. त्यांची शरीरं उधळून चिंधड्या झाल्या होत्या. इतर सैनिकांनी पोझिशन घेऊन लागलीच मदतकार्याला सुरुवात केली होती. लष्कराचा कॅम्प जवळच होता आणि नेमका त्याजवळच स्फोट झाला होता.

सर्व भारतीय यंत्रणा हादरली होती. लष्कराचा हा सर्वांत मोठा व भीषण हल्ला होता.. गुप्तचरयंत्रणा हवालदिल झाली होती. रॉ सक्रिय झाली होती आणि पाळंमुळं शोधण्याच्या तयारीला लागले होते. हा अनभावित हल्ला म्हणजे गुप्तचरयंत्रणेलाही आव्हान होतं.

साऱ्या जगात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली होती. विविध माध्यमांनी धाव घेतली होती; पण लष्कराने त्या परिसरालाच वेढा घातला होता. बऱ्याच वाहिन्या लाइव्ह प्रसारण करीत होत्या. तिथेही चढाओढ लागली होती. सर्व देशच ढवळून निघत होता. अतिरेक्यांविषयीची चीड निघत होती.

दिल्लीचं तख्तही हललं होतं. संरक्षणमंत्र्यांनी व गृहमत्र्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. राष्ट्रीय सुरक्षा दलाचे संचालक भगवान भार्गवही सोबत होते. क्षणोक्षणी पंतप्रधान कार्यालयाला अपडेट्स देण्यात येत होते. पंतप्रधान कार्यालयातच बसून आढावा घेत होते. भारतीय लोकांमध्ये पुन्हा संतापाची लाट निर्माण झाली होती.

गुप्तचरयंत्रणेने तासाभरातच माहिती मिळविली होती. पाकिस्तानस्थित अल्-निहाल नावाच्या जहाल अतिरेकी संघटनेने त्याची जबाबदारी घेतली असली, तरी हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृत होता, हे सिद्ध झालं होतं. पाकिस्तान लष्कराचा सहभाग या निर्घृण हल्ल्यात होता, हे एव्हाना सिद्ध झालं होतं आणि पाकिस्तानने नेहमीप्रमाणे हात झटकले होते.

पंतप्रधानांनी लागलीच राष्ट्रीय सुरक्षेची बैठक बोलावली होती. त्यासाठी पंतप्रधान, संरक्षणमंत्री, गृहमंत्री, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे संचालक, तिन्ही दलांचे प्रमुख, सर्व सचिव, डीआरडीओचे संचालक सर्वच उपस्थित होते. गंभीर चर्चा होऊ लागली. राष्ट्रीय सुरक्षा दलाचे संचालक भगवान भार्गव यांनी परिस्थितीचं निवेदन केलं आणि म्हणाले, ''महोदय!.. हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृत आहे. त्यात पाकिस्तान लष्कराचा सहभाग आहे हे आपल्या गुप्तचरयंत्रणेने सिद्ध केलं आहे.''

''मला वाटतं, आपल्याला आता कठोर पावलं उचलावी लागतील.. जशास तसं उत्तर देणं गरजेचं आहे.'' संरक्षणमंत्री उत्तरले.

''पाकिस्तानला धडा शिकवायलाच हवा. दिवसेंदिवस त्यांची मुजोरी वाढत चालली आहे.. मला वाटतं, आपण प्रतिउत्तर द्यायला हवं. सेहेचाळीस सैनिकांची हत्या हा भारतीय सार्वभौमत्व, एकता व अखंडता यांवर घाला आहे. आपण लढायला हवं.'' गृहमंत्री त्वेषाने उत्तरले होते.

भगवान भार्गव यांनीही त्याला दुजोरा दिला होता. आपण शांत राहता कामा नये असंच त्यांचं मत होतं.. याशिवाय तीनही दलांच्या प्रमुखांचंही म्हणणं ऐकून घेण्यात आलं. लष्करप्रमुख म्हणाले, ''सर!.. आमची या क्षणालाही तयारी आहे.. वुई कॅन फाइट बॅक.'' हवाई व वायू या दलप्रमुखांनीही तयारी असल्याचा दुजोरा दिला. डीआरडीओचे संचालक डॉ. मोहन कापसे म्हणाले, ''सर!.. आपली सर्व प्रकारची क्षेपणास्त्र-सज्जता आहे. हवाई, वायू, आणि पायदळ... सर्व क्षेपणास्त्रं उपलब्ध आहेत... आणि गरज भासलीच, तर रात्रीतून क्षेपणास्त्रं निर्माण करण्यासाठी संपूर्ण यंत्रणाही तयार आहे.'' डॉ. मोहन कापसेंनी नुसतीच माहिती सांगितली नाही; तर आश्वासितही केलं. अजून बरीच गंभीर चर्चा झाली. एकमेकांची मतं जाणून घेण्यात आली. या वेळी सर्वच अतिशय आग्रही व परखड होते. प्रत्येकाच्या मनात चीड दिसत होती.

शेवटी, पंतप्रधानांनी सर्वांकडे कटाक्ष टाकला आणि म्हणाले, ''मित्रहो!.. भारताची एकता, अखंडता, सुरक्षा आणि सार्वभौम हे प्रथम प्राधान्य आहे. त्यामुळे जशास तसं उत्तर दिलं जाईल. सर्व पाकिस्तान बॉर्डरवर आपले सैनिक सतर्क ठेवा... आणि तिकडून गोळीबार होताच ठेचून काढा. या वेळी कुठलीही तडजोड नाही. गो अहेड.'' पंतप्रधानांनी अतिशय शांत स्वरात; पण धीरगंभीरपणे सांगितलं होतं. त्यांच्या बोलण्यात प्रेरणा होती म्हणून सर्वांच्यात उत्स्फूर्तता संचारली होती.

अंतिमतः, 'प्रतिउत्तर द्यायचं' असं ठरवून बैठक संपली होती.

प्रसारमाध्यमातील सर्व वाहिन्यांवर याच हल्ल्याची चर्चा होती. भारत काय भूमिका घेणार याकडे सर्वांचं लक्ष होतं. तर्कवितर्क मांडले जात होते. तज्ज्ञांची मतं घेतली जात होती.

जगभरातून या हल्ल्याचा निषेध झाला होता आणि कुठल्याही कृतीला भारताला बहुसंख्य राष्ट्रांनी पाठिंबा दर्शविला होता. पाकिस्तानला बऱ्याच राष्ट्रांनी धारेवर धरलं होतं. पाकिस्तान कोंडीत सापडला होता.

भारतीय डिप्लोमॅटनी भारताची बाजू भक्कमपणे मांडली होती. जगाला ती पटतही होती. त्यामुळे पाकिस्तानचा जास्तच तिळपापड होत होता.

पाकिस्ताननेही लष्कराची जुळवाजुळव सीमेवर करायला सुरुवात केली. सीमेवर मोठाच ताण निर्माण झाला होता. अमेरिकेसारखी राष्ट्रं दोघांनाही सबुरीचा सल्ला देऊ लागली होती.

एकूण, पाकिस्तान व भारत दरम्यान युद्धजन्य परिस्थितीच निर्माण झाली होती.

पाकिस्तानला मात्र चीन आणि तुर्कस्तान यांचा पाठिंबा मिळाला होता आणि चीनने सर्व मदतीचंही आश्वासन दिलं होतं; पण बहुसंख्य मुस्लीम राष्ट्रं ही भारताच्या बाजूने होती. पाकिस्तानचा दुट्टप्पीपणा सर्वांच्याच लक्षात आला होता.

दिवसेंदिवस सीमेवर ताण वाढतच चालला होता. या ताणाचा महास्फोट कधी होईल सांगता येत नव्हतं.

आणि पाकिस्तानकडून प्रथम गोळी चालताच, भारतीय सैनिकांनी जोरदार प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली होती. दोघांकडून मोठ्या धुमश्चक्रीला सुरुवात झाली. भारतीय हवाई दल व नौदलही सज्ज होते. पाकिस्तानने हवाईचा वापर करताच भारतीय हवाईदल तुटून पडलं होतं. एक-एक करून त्यांची विमानं पाडली जात होती. ड्रोन पाडले जात होते आणि क्षेपणास्त्रंही डागली जात होती.

नौदलानेही समुद्रमार्गाने हल्ला चढवायला सुरुवात केली होती. तिन्हीही दलं सक्रिय झाली होती. खऱ्या अर्थाने पाकिस्तान व भारत यांच्यात युद्धाला सुरुवात झाली होती.

भारतात प्रत्येक शहरात, राज्यात, जिल्ह्यात, तसंच तालुक्याच्या ठिकाणीही युद्ध सुरू झाल्याचे सायरन वाजू लागले. लोकांना युद्धजन्य परिस्थितीचं प्रशिक्षण दिलं जाऊ लागलं.

भारतीय सैन्य दल इंचाइंचाने पुढे सरकत होतं. पाकिस्तानचा प्रतिकार तिन्हीही प्रकारांत कमकुवत होत होता.

पाकिस्तानच्या हे लक्षात येताच ते हादरले होते. प्रथमच त्यांनी अणुबॉम्ब वापरण्याची धमकी दिली. दर्पोक्ती केली... चीनचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता, किंबहुना चीनच्या मदतीने त्यांनी अणुबॉम्बसारख्या अण्वस्त्राची निर्मिती केली होती.. आणि आताही चीनी तंत्रज्ञ तिथेच होते... पाकिस्तानच्या मदतीला.. म्हणूनच पाकिस्तानला बळ आलं होतं.

सातत्याने पाकिस्तानचे पंतप्रधान अणुबॉम्ब वापरण्याची धमकी देऊ लागले होते. त्यांना नैराश्य येत होतं, कारण भारतीय सैन्य सर्व बाजूंनी आगेकूच करीत होतं. पाकिस्तानी सैन्य मागे मागे जातं होतं.

पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी अणुबॉम्ब वापराची धमकी दिल्यानंतर पंतप्रधानांनी तातडीने मंत्री, सचिव, सुरक्षा संचालक, डीआरडीओचे संचालक व इतर काही प्रमुख शास्त्रज्ञांची बैठक घेतली होती. ही बैठक अतिशय गुप्त होती. पंतप्रधानांनी अणुबॉम्बसंबंधी विचारताच डीआरडीओचे संचालक डॉ. मोहन कापसे म्हणाले, ''सर!.. आपली अणुबॉम्ब अण्वस्त्र सज्जता पूर्ण आहे, किंबहुना आपल्या शास्त्रज्ञांनी थर्मोन्युक्लीअर अणुबॉम्बही विकसित केला आहे. त्याची विध्वसंक क्षमता सर्वसाधारण अणुबॉम्बपेक्षा शंभर पटींनी आहे.. अणुबॉम्ब निर्मिती ही आपली स्वयंनिर्मिती आहे.. जर का पाकिस्तानने आगळाईकी केलीच, तर काही मिनिटांतच पाकिस्तान हे राष्ट्रच जगाच्या नकाशावरून नाहीसे होऊन जाईल.''

डॉ. मोहन कापसे बरच बोलत होते. भारतीय क्षमतेची त्यांनी सर्वांना जाणीव करून दिली व आत्मविश्वासही दिला. सगळ्यांच्या




चेहऱ्यावर समाधान होतं. तेवढ्यात, शेवटी पंतप्रधान म्हणाले, ''मला तुम्हा सर्व शास्त्रज्ञांचा अभिमान आहे. आपली अण्वस्त्र-सज्जता ही आपली ताकद आहे.. एक मात्र निश्चित... आपण स्वतःहून पहिल्यांदा अणुबॉम्बचा वापर करणार नाही. जर का पाकिस्तानने केलाच, तर मग आपण सर्व प्रकारची अण्वस्त्रं वापरणार.''

पंतप्रधान अजून बरंच काही बोलले. भारताची आपली जगातली शांतता म्हणून भूमिका तसूभरही कमी होऊ दिली नाही.

बैठक संपली होती...

भारतीय पंतप्रधानांनी जगाला आश्वस्त केलं होतं की, ते प्रथम कुठल्याही परिस्थितीतही अणुबॉम्ब वापरणार नाहीत; पण जर कुणी आमच्यावर टाकलाच, तर मग मात्र आम्ही सोडणार नाही.

पंतप्रधानांनी बॉल अतिशय हळुवारपणे पाकिस्तानच्या कोर्टात ढकलला होता. आता आंतर समुदायाचा दबाव पाकिस्तानवर होता. पंतप्रधानांनी आपली शांततेची भूमिका सोडली नव्हती.

भारत व पाकिस्तान यांच्यात सीमेवर तुंबळ युद्ध सुरू होतं आणि पाकिस्तानच्या नागरिकांना त्याची झळ पोहोचायला लागली होती.


पाकिस्तानमध्येही समांतरपणे त्यांच्या पंतप्रधानांच्या असंख्य बैठकी होत होत्या. सर्व प्रमुख त्याला उपस्थित राहत होते.. महत्त्वाचं म्हणजे, आएसआय संचालकांचा वावर मोठा होता. त्यांच्या बैठकीस काही चीनी डिप्लोमॅटही हजर राहत असल्याची माहिती मिळाली होती... आणि हीच खरी गंभीर बाब होती.

भारतीय गुप्तचरयंत्रणा रात्रंदिवस सतर्क होती. क्षणाक्षणाला ते माहिती मिळवत होते. वेगवेगळ्या स्रोतांचा वापरही करत होते.

तुंबळ युद्ध चालूच होतं... कुणीही मागे हटायला तयार नव्हता.

...आणि शेवटी गुप्तचरयंत्रणेला ती माहिती मिळालीच होती.

पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी बोलवलेल्या अतिशय टॉप सिक्रेट मीटिंगमधील माहिती मिळवण्यास भारतीय गुप्तचरयंत्रणेतील हेरांना यश आलचं होतं... आणि सर्वच कमालीचे अस्वस्थ झाले होते.


विज्ञानप्रेमी राजूच्या चातुर्यकथांची
रंगतदार, सचित्र मालिका

ebook
available

**झाडाचं गुपित**

डॉ. संजय ढोले
किंमत : ₹ २७५

गुप्तचरयंत्रणेच्या संचालकांनी राष्ट्रीय सुरक्षा दलाचे संचालक भगवान भार्गव यांना प्रत्यक्ष भेटून.. 'येत्या काही दिवसांत पाकिस्तान भारतावर अणुबॉम्ब टाकणार आहे' ही गुप्त माहिती पुरवली होती. भार्गव यांनी लागलीच हालचाल केल्या होत्या.

भार्गव यांनी पंतप्रधान, संरक्षणमंत्री आणि तिन्ही दलांच्या प्रमुखांना ही माहिती कळवताच सर्वच सुन्न झाले होते. पंतप्रधानांनी विचारलं, ''भारतातलं कुठलं शहर त्यांचं लक्ष्य आहे?''

''सर!.. मुंबई..ऽऽ...'' भार्गव यांनी सांगताच पुढे म्हणाले, ''आपली भारताची आर्थिक राजधानीच त्यांनी प्रथम लक्ष्य करण्याचं ठरवलं आहे.''

''कुठली तारीख कळली आहे का?''

''नाही सर!.. येत्या काही दिवसांत त्याचं नियोजन आहे.'' भार्गव उत्तरले.

''ठीक आहे.. आपणही तयारीत राहा; पण पहिल्यांदा आपण अणुबॉम्ब वापरणार नाही यावर आजही ठाम आहोत. हवेतच अणुबॉम्ब निकामी कसा करता येईल त्याकडे बघा.''

पंतप्रधानांनी पुनरुच्चार केला. अशा भूमिकेत एखादं शहर बळी पडणार याची सर्वांना कल्पना होतीच; पण मुंबईची निवड तशी तीही अभिप्रेतच होती.

भारतातील सर्व सुरक्षा अधिकारी आणि शास्त्रज्ञ कामाला लागले होते. महत्त्वाचं म्हणजे, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना विश्वासात घेऊन सांगण्यात आलं होतं आणि उपाययोजनाही करायला सांगितली होती. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी हे आव्हान पेलण्याचं ठरवलं. शेवटी शिवरायांचा महाराष्ट्र होता... तो सहजासहजी हरणार नव्हता...

पाकिस्तान मुंबईवर अणुबॉम्ब कधी टाकणार, त्याचीही तारीख गुप्तचरयंत्रणेने मिळविली.. ती होती- १६ ऑक्टोबर, पहाटे चार वाजता... म्हणजे, आजपासून फक्त तीनच दिवस राहिले होते.

भारतातील ही यंत्रणा आता वेगाने कामाला लागली. एव्हाना पाकिस्तान अणुबॉम्बचा वापर करेल याची जगात मोठी चर्चा सुरू झाली होती... आणि अंदाजाने मुंबई शहरच प्रथम लक्ष्य राहील, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला होता, कारण मुंबई आर्थिक राजधानी सोबतच अणुऊर्जा प्रकल्पाचं मोठं केंद्र होतं. भाभा अणुसंशोधन केंद्र इथेच होतं. बीएआरसीतील प्रत्येक शास्त्रज्ञ आता पूर्ण क्षमतेने कामाला लागला होता.

डीआरडीओचे संचालक डॉ. मोहन कापसेही लक्ष ठेवून होते. प्रत्येक रात्र ही आता वैऱ्याचीच राहणार होती.

डॉ. मोहन कापसे आपल्या दिल्लीतील हेडक्वार्टर्सच्या केबिनमध्ये पुनश्च एकदा सर्व क्षेपणास्त्रं, अणुबॉम्ब, थर्मोन्युक्लीअर बॉम्ब यांचा आढावा घेत होते. त्यांनी दीर्घ श्वास सोडला आणि स्वतःशीच म्हणाले, 'आय होप!... इट विल गो वेल...'

...आणि तेवढ्यात त्यांचा मोबाईल वाजला.. आणि त्यांनी अधीरतेने कानाला लावला...


''हॅलोऽऽ.. कापसे हिअर..''

''हॅलोऽऽ... सर... डॉ. श्यामल कणसे हिअर... फिजिक्स प्रोफेसर फ्रॉम पुणे युनिव्हर्सिटी..'' पलीकडून आवाज आला.

क्षणभर शांतता... आणि चेहऱ्यावर स्मित आणत डॉ. कापसे उत्तरले, ''एस.. प्रोफेसर कणसे.. वेलनोन नॅनो-टॅक्नॉलॉजिस्ट.. सर, तुम्ही संशोधनाच्या माध्यमातून संरक्षण विभागाला खूप मदत केलीत.. बोला सर!''

''सर!.. मला तुम्हाला अर्जंट भेटायचंय.. काम आहे.'' डॉ. कणसेंनी आग्रह केला.

''सर!.. सॉरी.. पण भारतातील टेन्शन्स तुम्हाला माहीत आहेत... क्षणाक्षणाला मला अपडेट राहावं लागत आहे. त्यात पाकिस्तानने धमकी दिलीय, म्हणून संरक्षण विभागाची खूप मोठी


विज्ञानप्रेमी राजूच्या चातुर्यकथांची
रंगतदार, सचित्र मालिका

ebook
available

**दूरचे प्रवासी**

डॉ. संजय ढोले
किंमत : ₹ २७५

जबाबदारी आहे. हे काही दिवस गेल्यानंतर भेटलं तर चालेल का?'' डॉ. कापसेंनी आर्जवी केली.

''मला माहीत आहे सर... त्या संदर्भातच मला चर्चा करायचीय. यू आर दी मेन नोडल पर्सन... माध्यमांतून जी माहिती येतीय, ती खूपच भयावह आहे. मला त्याविषयीच चर्चा करायचीय... नाही म्हणू नका, कदाचित तुम्हाला हवा असलेला मार्ग माझ्या माध्यमातून मिळेल.'' डॉ. कणसे काकुळतीने व तेवढ्याच काळजीने बोलत होते. ते पुढे म्हणाले, ''सर.. भारताची काळजी एक शास्त्रज्ञ म्हणून मलाही आहे.. माझीही जबाबदारी आहे.'' डॉ. कणसे क्षणभर स्तब्ध राहिले. डॉ. कणसेंबद्दल त्यांना माहीत होतं. भारतातीलच नव्हे; तर आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांचा नॅनोपदार्थ व नॅनोघटकांमध्ये मोठं कार्य होतं. कदाचित, काहीतरी मार्ग सांगत असतील. शेवटच्या वाक्याने ते हेलावले व म्हणाले, ''सर!.. कुठे आणि कसं भेटायचं?''

''सर!.. मी आत्ताच रात्रीच्या आठच्या फ्लाइटने येतो.. आणि रात्री भेट घेऊन पुन्हा परत येतो.. कारण मला ठाऊक आहे- वेळ कमी आहे..'' डॉ. कणसे क्षणात उत्तरले.

''ठीक आहे डॉ. कणसे.. या. मी वाट पाहतो...''

आणि त्यांनी मोबाईल बंद केला. डॉ. कणसे लागलीच बाहेर पडले होते... दिल्लीला जाण्यासाठी.

रात्री अकरा वाजताच डॉ. कणसेंनी डॉ. कापसेंच्या केबिनमध्ये प्रवेश केला. डॉ. कापसेंनी स्वागत करताच डॉ. कणसे म्हणाले, ''सर!.. मी जास्त वेळ न घेता सरळ विषयालाच हात घालतो.'' खुर्चीत स्वतःला सावरीत पुढे म्हणाले, ''सर, गेले चार महिने मी एका प्रकल्पावर काम करत आहे. अतिसूक्ष्म मानवनिर्मितीच्या.. म्हणजेच नॅनोब्ज. अतिशय परिश्रमाने मी त्याचा एक समूह तयार केला आहे. ते डोळ्यांना दिसत नाहीत. त्याला पाहण्यासाठी नॅनोस्कोपच लागतो; पण त्याची प्रतिमा आपण संगणक पडद्यावर पाहू शकतो. नुकतीच त्याची मी चाचणीही घेतली. हजारो मैल तो प्रवास करू शकेल आणि कामही करेल, अशी त्यात क्षमता आहे.'' डॉ. कणसेंनी सांगितलं.

''तुमचं काम उत्तमच आहे सर!.. पण आता या परिस्थितीत त्याचा उपयोग कसा करता येईल?'' डॉ. कापसेंनी शंका विचारली.

''त्यासाठीच मी इथे आलोय. पाकिस्तान भारतावर अणुबॉम्ब टाकण्याची वल्गना करतोय.. किंवा तो तसं करेलही. कारण तो देशच माथेफिरू आहे. या पाकिस्तानचा अणुबॉम्बच माझ्या या नॅनोब्जच्या साहाय्याने निकामी करायचा, डिफ्युज करायचा. म्हणजे अणुबॉम्ब उत्पात होणार नाही.. आणि पाकिस्तानचीही नाचक्की होईल.'' डॉ. कणसेंनी सरळ सांगितलं होतं.

डॉ. कापसे आता उत्साही झाले आणि खुर्चीत सावरून बसले व म्हणाले, ''प्रोफेसर, जर का हे असं झालं तर आपण जिंकलोच; पण हे सर्व कुठून करायचं?''

''अगदी इथून... तुमच्या हेडक्वार्टर्समधून किंवा कुठूनही.'' डॉ. कणसेंनी आशादायी सांगितलं.

''आपण कधी हा प्रयोग करू शकतो? वेळ खूप कमी आहे.''

''अगदी उद्यासुद्धा. कारण विषाची परीक्षा नको घ्यायला. शक्य तेवढ्या लवकर पाकिस्तानचा अणुबॉम्ब निकामी करणं हे उत्तम.'' डॉ. कणसेंनी गांभीर्य दाखवलं.

''निश्चित डॉ. कणसे. पण मला पंतप्रधान, संरक्षणमंत्री, तिन्ही दलांचे प्रमुख यांच्यापुढे सरळ प्रयोग करण्याआधी, मला वाटतं... मी बघून खात्री करून घ्यायला हवी. तुमच्यावर विश्वास आहेच सर; पण प्रमुख या नात्यानं ही माझी जबाबदारी आहे.. तुम्ही तयार आहात?'' डॉ. कापसेंनी सांगितलं.

''जरूर सर! खात्री करायलाच हवी. मी तयार आहे. शक्य असेल, तर आत्ताच माझ्यासोबत पुण्याला यावं. सकाळीच आपण प्रयोग करू. आणि रात्री या नॅनोब्जंना अणुबॉम्ब मोहिमेवर पाठवू. चालेल!'' डॉ. कणसे म्हणाले.

''चालेल. मी तयार आहे. चला... तुम्ही फ्रेश व्हा. जेवण घेऊ आणि रात्रीच्या विमानाने निघू.''

दोघेही उठले आणि केबिनबाहेर पडले. डॉ. कणसेंच्या चेहऱ्यावर समाधान होतं, तर डॉ. कापसेंच्या चेहऱ्यावर उत्सुकता होती.

रात्री प्रवास करून सकाळीच डॉ. कणसे व डॉ. कापसे पुणे विद्यापीठातील प्रयोगशाळेत हजर झाले होते.

डॉ. कणसेंची प्रयोगशाळा अतिशय प्रशस्त होती.. त्यांनी डॉ. कापसेंना नॅनोपदार्थ तयार करण्याच्या विविध पद्धती, तक्षणाकृती (Lithography), क्लीन रूम, स्कॅनिंग व ट्रॉन्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप, नॅनोस्कोप, नॅनोब्ज तयार करण्याची यंत्रणा सर्व दाखवलं होतं. नॅनोस्कोपजवळ येताच डॉ. कणसे म्हणाले, ''सर!.. सी अंडर धिस नॅनोस्कोप.. तुम्हाला मी तयार केलेले अतिसूक्ष्म नॅनोब्ज दिसतील.. प्लीज...''

डॉ. कापसेंनी नॅनोस्कोपमध्ये पाहिलं आणि तिथे त्यांना छोट्या सूक्ष्म यंत्रमानवांची फौज दिसली. ते उत्साहाने उद्गारले, ''सर! मार्व्हलस... उत्कृष्ट... कसं तयार केलं तुम्ही? हे तर कुणालाच दिसणार नाहीत, कारण यांचा आकारच दृश्यापलीकडे आहे.'' डॉ. कापसेंनी विचारलं.

''होय!.. सर... अगदी... तक्षणाकृतीचा उपयोग करून एक एक अणू जोडून मी हा नॅनोब्ज तयार केलायं.. आणि त्याची फौज.. हे नॅनोब्जमध्ये खूप चांगले को-ऑर्डिनेशन आहे तर ते सोबत आसमंतात वेगाने प्रवास करतात...'' डॉ. कणसेंनी प्रयोगाचा गाभाच सांगितला..

''सर, आता बघू शकतो.'' डॉ. कापसेंची उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

''होय सर!.. चला...''

आणि दोघेही भव्य कॉम्प्युटर पडद्याजवळ येऊन बसले. डॉ. कणसेंनी लागलीच लॅपटॉप हातात घेतला. क्षणात पडद्यावर त्या नॅनोब्जची हालचाल होत होती..

नॅनोस्कोपच्या बाहेर येऊन ते विभागात विहार करीत होते आणि डॉ. कणसे त्यांच्याकडून हवं ते करवून घेत होते.. डॉ. कापसे आनंदाने उद्गारले, ''सिम्प्ली... फॅब्युलस...'' पुढे म्हणाले, ''डॉ. कणसे, आज रात्रीच हा प्रयोग करायचा. मी सर्व तयारी करतो आणि हा प्रयोग अमृतसरच्या लष्करी हेडक्वार्टर्समध्ये होईल.. तुमच्या सर्व सामग्रीसोबत आपण निघणार आहोत. सरळ अमृतसर. आता वेळ घालवून चालणार नाही.'' आणि मोबाईल काढून त्यांनी कानाला लावला, ''हॅलो कापसे हिअर...''

''हं!.. भार्गव हिअर..''

...आणि डॉ. कापसेंनी राष्ट्रीय सुरक्षा दलाचे संचालक भगवान भार्गव यांना सर्व कथन केलं होतं. डॉ. कणसे व त्यांच्या संशोधनाविषयीही सांगितलं होतं.. भार्गव उत्साहित झालेले दिसले. ते म्हणाले, ''डॉ. कापसे, तुमची खात्री असेल, तर मी रात्रीच अमृतसरच्या हेडक्वार्टर्समध्ये या प्रयोगाची व्यवस्था करतो.. डोन्ट वरी... यू कम.. मी पंतप्रधान, संरक्षणमंत्री व गृहमंत्री यांच्याही कानावर घालतो आणि त्यांनाही या प्रयोगात सामील करून घेतो.. इट विल बी अ टॉप सिक्रेट.. आणि हा प्रयोग रात्री बारानंतरच सुरू होईल.'' भार्गव यांनी संपूर्ण नियोजनाची जबाबदारी घेतली होती.

डॉ. कापसेंनी निःश्वास सोडला आणि खिशात मोबाईल ठेवला. डॉ. कापसे प्रयोगाविषयी अजून माहिती घेऊन जाणून घेत होते.

रात्रीच दोघेही अमृतसरला रवाना झाले होते.. डॉ. कणसेंनी नॅनोब्जच्या फौजेसोबतच इतर लागणारी यंत्रणाही घेतली होती.

दरम्यान, भार्गव यांनी इस्रोच्या संचालकांच्या व तंत्रज्ञानाच्या मदतीने व हेरगिरी करणाऱ्या उपग्रहाच्या साहाय्याने पाकिस्तानच्या अणुबॉम्बचं लोकेशन शोधून काढलं होतं. ते रावळपिंडी येथील अणुभट्टीच्या पूर्वेकडील शंभर कि.मी. अंतरावर असणाऱ्या लष्कराच्या छावणीतील एका कडक बंदोबस्तात अणुबॉम्ब होते. साधारण ते तीन होते. मोठ्या प्रमाणात तिथे लगबग सुरू होती. लोकेशन सापडलं होतं. आता फक्त प्रयोग करायचा होता. भार्गव यांनी पंतप्रधान, संरक्षणमंत्री, गृहमंत्री, सचिव यांच्या कानावर टाकून प्रयोगाची वेळ रात्री एक वाजताची ठरली होती. या सर्वांसाठी पंतप्रधानगृहातच पडद्याची सोय करण्यात आली होती.

...आणि अमृतसरला प्रयोगात डॉ. कणसे, डॉ. कापसे, भार्गव व तिन्ही दलांचे प्रमुख उपस्थित राहणार होते; पण खरं आकर्षण डॉ. कणसे होते. त्यांची खऱ्या अर्थाने परीक्षा होती, किंबहुना भारताचं भविष्यच त्यांच्या हाती होतं. बरोबर रात्री एक वाजता प्रयोगाला सुरुवात झाली होती. समोर संगणकाचा मोठा स्क्रिन होता. त्यावर स्पष्ट दिसत होतं.


डॉ. कणसेंनी नॅनोब्जना आदेश दिले होते आणि ते बाहेर पडताच कॉम्प्युटर पडद्यावर त्यांचं दृश्य दिसू लागलं. डॉ. कणसेंनी


२५ वर्षांची परंपरा

द. मा. मिरासदार

यांची साहित्यसंपदा













ebook available

पाकिस्तानच्या अणुबॉम्बचं लोकेशन फिड करताच, नॅनोब्जनी वेगाने प्रवास करायला सुरुवात केली. त्या नॅनोब्जमधलं को-ऑर्डिनेशन अजब होतं.

भार्गव, डॉ. कापसे आणि तिन्ही दलांचे प्रमुख श्वास रोखून बसले होते. पंतप्रधानगृहातही सर्व मंत्री व सचिव हा नॅनोब्जचा प्रवास पाहत होते... न भूतो न भविष्य.

काही क्षणांत नॅनोब्जंनी सीमा पार करून पाकिस्तानमध्ये प्रवेश केला होता. डोंगरदऱ्या तुडवत ते रावळपिंडीत येऊन दाखल झाले.

पाकिस्तानच्या कुठल्याही रडार यंत्रणेला या अतिसूक्ष्म नॅनोब्जचं अस्तित्व पकडता आलं नव्हतं. ती क्षमताच नव्हती म्हणून नॅनोब्ज सहजपणे विहार करीत होते.

नॅनोब्जनी थोडा वेळ पाकिस्तानच्या अणुभट्टीचं अवलोकन केलं आणि त्यांनी पूर्वेकडे जंगलातील लष्कराच्या छावणीकडे मोर्चा वळवला.

आता पहाटेचे तीन वाजले होते. नॅनोब्जनी कडक बंदोबस्तात असलेल्या अणुबॉम्बमध्ये प्रवेश केला होता. तेथील उपस्थित चीनी शास्त्रज्ञ व तंत्रज्ञांच्या लेखी नॅनोब्ज कुठेच नव्हते.

पंतप्रधानगृहात सर्वांनीच श्वास रोखून धरला होता. अमृतसरमध्ये लष्करप्रमुख बघतच राहिले होते. भार्गव आश्चर्यचकित झाले होते, तर डॉ. कणसे व डॉ. कापसे यांच्या चेहऱ्यावर स्मित होतं.

नॅनोब्ज अतिशय हुशार होते. डॉ. कणसे येथून नियंत्रण करीत होते.. नॅनोब्जनी स्वतःच विभागणी करून तिन्हीही अणुबॉम्ब्जचा ताबा घेतला होता.. आणि पुढचं काम नॅनोब्ज अफलातून करीत होते. अर्ध्या तासातच पाकिस्तानचे तिन्हीही अणुबॉम्ब नॅनोब्जनी निकामी केले होते. तसा संकेत मिळताच टाळ्यांचा गजर झाला. पंतप्रधानगृहात व अमृतसरमध्ये सर्वांचेच चेहरे उजळून निघाले. अत्यानंद झाला. सर्व जण डॉ. कणसेंचं अभिनंदन करीत होते.

पण डॉ. कणसे वेगळ्याच चिंतेत होते. नॅनोब्ज त्यांचा परतीचा आदेश मात्र पाळत नव्हते. ते हादरले. नॅनोब्ज स्वतंत्र झाले होते. ते सहाच होते; पण त्यांनी कार्य मात्र पार पाडलं होतं. डॉ. कणसे त्यांना परत आणण्याचा प्रयत्न करीत होते; पण ते पडद्याच्या पटलाबाहेर गेले होते. डॉ. कणसेंच्या लक्षातच येत नव्हतं.

प्रत्येक जण डॉ. कणसेंशी हातमिळवणी करीत होते. भेट घेत होते. डॉ. कणसे कृत्रिम हास्य फेकत भेट घेत होते. कारण त्यांच्या डोळ्यांत आता फक्त नॅनोब्ज होते आणि त्यांनी त्यांचा परतीचा आदेश डावलला होता, एवढं मात्र निश्चित. हे सगळेच वेगळ्याच आनंदात असल्याने यापासून अनभिज्ञ होते.


नॅनोब्ज मोहीम फत्ते झाली होती. पाकिस्तानचे तिन्हीही अणुबॉम्ब निकामी झाले होते. कारण त्यांनी अणुबॉम्ब उत्पात करण्याची तारीख टळून गेली होती.. अणुबॉम्ब निकामी कसे झाले याने पाकिस्तानातील शास्त्रज्ञच नव्हे; तर चीनमधील शास्त्रज्ञ व तंत्रज्ञही चक्रावले होते. तिन्हीही अणुबॉम्ब डेड झाले होते.

या वेळी भारतीय सैन्यांनी लाहोरमध्ये प्रवेश केला होता. अणुबॉम्ब फसल्यानंतर पाकिस्तानची भाषा बदलली होती. ते शरणागती पत्करून युद्ध थांबवण्यास तयार झाले होते. त्यांचा मुजोरपणा शमला होता. त्यांचे अणुबॉम्ब निकामी का झाले, हे ते जगाला सांगू शकत नव्हते.

भारतानेही शेवटी शांततेसाठी युद्ध थांबवण्याचा निर्णय घेतला. हा एक वेगळा विजय होता.

सगळ्या जगात चर्चा होती. भारताच्या भूमिकेचं स्वागत करण्यात आलं.

पण तीन-चारच दिवसांत पाकिस्तानमध्ये हाहाकार माजला होता. सगळे नागरिक आजारी पडत होते. श्वसनाला त्रास होऊन काही जण मृत्युमुखीही पडत होते. एक वेगळं आव्हान पाकिस्तानपुढे




विज्ञानप्रेमी राजूच्या चातुर्यकथांची
रंगतदार, सचित्र मालिका

ebook
available

**पाठलाग**

डॉ. संजय ढोले
किंमत : ₹ २७५

निर्माण झालं. आता याला भारताला जबाबदार धरता येत नव्हतं. हे त्यांचं दुखणं होतं.

पाकिस्तानमधला हाहाकार बघून मात्र डॉ. कणसे नखशिखान्त हादरले होते. त्यांच्या लक्षात आलं होतं; पण आता ते त्यांच्या नियंत्रणापलीकडचं होतं. तेवढ्यात डॉ. कापसेंचा मोबाईल आला.

''डॉ. कणसे! पाकिस्तानमध्ये हे काय चाललं आहे. दिवसाला हजारो लोक मृत्युमुखी पडत आहेत. याला आपले नॅनोब्ज तर कारणीभूत नाहीत ना?'' डॉ. कापसेंनी शंकेनं विचारलं.

डॉ. कणसे क्षणभर शांत झाले आणि हळुवार म्हणाले, ''होय! सर.. नॅनोब्जच कारणीभूत आहेत.''

''काय? नॅनोब्ज. मग त्यांचं नियंत्रण करा.''

''होय!.. पण ते आता माझ्या नियंत्रणाबाहेर आहेत सर!'' थोडं थांबून डॉ. कणसे पुढे म्हणाले, ''सर, मी या नॅनोब्जाची निर्मिती करताना त्यांना जैविक बुद्धिमत्ताही बहाल केली होती. मानवी स्मृतिसंचयास कारणीभूत असलेली प्रिऑन नावाची प्रथिनं मी या नॅनोब्जमध्ये इम्प्लान्ट केली होती. हीच प्रथिनं सामान्य प्रथिनांना स्वतःच्या स्थिर, विकृत स्वरूपात रूपांतर करतात आणि ही प्रथिनं स्मृती दीर्घ काळापर्यंत उपलब्ध राहतात. सर, या प्रथिनांचीच ही कमाल आहे. कारण नॅनोब्ज आता स्वतंत्र आहे आणि निर्णय घेतो आहे. कारण हे माझ्या तेव्हा लक्षात आलं, जेव्हा नॅनोब्जनी स्वतःहूनच तिन्हीही अणुबॉम्ब्ज निकामी करण्यासाठी विभागणी केली. शिवाय, सर... आता एका नॅनोब्जपासून ते दुसऱ्या नॅनोब्जची निर्मिती करीत आहेत. मला वाटतं, हा वेग एका मिनिटात लाखो असणार आहे. जी प्रथिनं आहेत, ती पाकिस्तानच्या नागरिकांचा बळी घेत आहेत. मला वाटतं, या नॅनोब्जनाही पाकिस्तानाची चीड आहे. आता यातनं मार्ग नाही. पाकिस्तानला भोगावंच लागेल.'' डॉ. कणसे असाहाय्यपणे निर्वाणीचं बोलले.

''डॉ. कणसे, एक काम करा. आपल्या हातात आता काहीही नाही. आंतरराष्ट्रीय समुदाय जे काही करेल, ते करू देत. हे फक्त आपल्या दोघांतच राहील. पाकिस्तानला शिक्षा मिळतेय. पण ती नागरिकांना. फक्त हे नॅनोब्ज आपल्यावर बुमरँग होणार नाहीत ना?'' डॉ. कापसेंनी शंका व्यक्त केली.

''नाही!. डॉ. कापसे तसं होणार नाही, याची मी शाश्वती देतो.'' आणि डॉ. कणसेंनी स्मित केलं होतं. ते गर्भित हास्य कुणालाही कळलं नव्हतं. कारण नॅनोब्जमध्ये जी प्रिऑन प्रथिनं टाकली होती, ती फक्त पाकिस्तानचा द्वेष करणारीच होती. म्हणून डॉ. कणसे गर्भित हसले होते. कारण हे सर्व त्यांनीच घडवून आणलं होतं. नियंत्रणही त्यांच्याच हातात होतं. पाकिस्तानला धडा शिकवण्याचा हाच एकमेव मार्ग होता.


डॉ. कापसेंना आश्वस्त करून डॉ. कणसेंनी मोबाईल ठेवला. ते आपल्या प्रयोगशाळेत जाऊ लागले. त्यांच्या चालण्यात आत्मविश्वास होता.

पंतप्रधानांनी खास बोलावून डॉ. कणसेंचं कौतुक केलं होतं. या वेळी सर्व हजर होते.

प्रजासत्ताक दिनानिमित्त डॉ. कणसेंना भारत सरकारचा 'पद्मभूषण नागरी पुरस्कार' जाहीर झाला होता.

भारताचं टॉप सिक्रेट म्हणून डॉ. कणसेंच्या नॅनोब्जची व प्रयोगाची कुठलीही जाहीर वाच्यता करण्यात आली नव्हती; पण या अनभिज्ञ प्रयोगाचे व यशस्वी मोहिमेचे खऱ्या अर्थाने जनक हे डॉ. कणसे होते, याची जाणीव मात्र राज्यकर्त्यांना होती. प्रत्येकानेच त्यांना नमन केलं होतं.

✪




विज्ञानप्रेमी राजूच्या चातुर्यकथांची
रंगतदार, सचित्र मालिका

ebook
available

**अवकाशातील दूत**

डॉ. संजय ढोले
किंमत : ₹ २७५





भ्रष्टाचार आणि अपहरणांसारख्या पार्श्वभूमीवर साकारलेल्या उत्कंठावर्धक, थरारक कथा.

ebook available

## एपिटाफ

प्रा. पुरुषोत्तम रामदासी
किंमत : ₹ २२०





लेखणीच्या जोरावर तत्कालीन सरकारला हादरवून सोडणाऱ्या अरुण शौरी यांच्या पत्रकारितेच्या दिवसातील कामगिरीचा लेखाजोखा

ebook available

## द कमिशनर फॉर लॉस्ट कॉझेस

अरुण शौरी । अनु. उल्का राऊत
किंमत : ₹ ८९५





छुप्या-गैर मार्गाने चाललेला वैद्यकीय व्यवसाय व सरकारचा ढिसाळ कारभार याला प्रकाशात आणणारी ही स्वानुभवाची कहाणी...

ebook available

## द एथिकल डॉक्टर

डॉ. कमल कुमार महावर । अनु. अभिजीत कुलकर्णी
किंमत : ₹ ३६०





जिथे शब्द संपतात, तिथे रुश्दींची कहाणी सुरू होते...
‘नाइफ’ एक प्रेरणादायी लढ्याची साक्ष !

ebook available

## नाइफ

सलमान रुश्दी । अनु.: उत्पल व. बा.
किंमत : ₹ ३२०



एका बालसैनिकाने स्वत: अनुभवलेली चित्तथरारक, उद्ध्वस्त करणारी युद्धकथा वाचा त्याच्याच नजरेतून...

## अ लाँग वे गॉन

ईश्माईल बाह । अनु.: शुभदा विद्वांस
किंमत : ₹ ४२०




राजेशाही घराण्याचं वास्तव दाखवणारं
इंग्लंडच्या गादीचा राखीव दावेदार प्रिन्स हॅरीचं
खळबळजनक आत्मचरित्र

ebook available

## स्पेअर

प्रिन्स हॅरी । अनु.: सुनीता कट्टी
किंमत : ₹ ९९९



# ''आई, मी सैनिक झालो!''

**भाग्येश विजय शिंदे**



रात्रीचे १ वाजून ३५ मिनिटं झाली आहेत. ढगाळ वातावरणात चंद्र कुठेही दिसत नाही आणि त्यात आजूबाजूच्या या दाट जंगलात डोळ्यांत बोटं घालावी, असा काळोख! काल बहुतेक जवळून वाहणाऱ्या नदीचं पाणी जंगलाच्या या भागात इथपर्यंत आलं असावं; कारण अजूनही घोट्याच्या वरपर्यंत चिखल-गाळ साचून आहे. बहुतेक थोड्याच वेळात मुसळधार पाऊसही येईल; पण मला त्याची पर्वा नाही. जेव्हा तुम्ही अशा जीवघेण्या ठिकाणी, रात्री-अपरात्री गस्त घालत असता, तेव्हा इथली प्रत्येक गोष्ट तुमच्या संयमाची जणू परीक्षाच घेत असते. माझ्यासोबतही असं बऱ्याचदा घडतं; पण माझा धीर मुळीच खचून जात नाही. कारण त्याच वेळी मला मी आपल्या भारत देशाच्या संविधानाला साक्षी ठेवून घेतलेली शपथ आठवते!

एव्हाना तुमच्यापैकी काही जणांना कळलं असेल की, मी एक 'सैनिक' आहे. हो, आपल्या भारत देशाच्या 'सीमा सुरक्षा दलाचा' (बॉर्डर सिक्युरिटी फोर्स - बीएसएफ) एक सैनिक! बऱ्याचदा लोक सगळ्या फोर्सेससाठी सर्रासपणे 'आर्मी' हे बिरूद वापरतात; पण खरंतर आपल्या देशाची सुरक्षा अनेक वेगवेगळ्या फोर्सेसच्या हातात आहे. त्यांतलीच एक फोर्स म्हणजे, 'बीएसएफ.' बीएसएफचे सैनिक हे नेहमी देशाच्या सीमेवर तैनात असतात. बाह्य आक्रमणांपासून देशाची सीमा सुरक्षित ठेवणं आणि त्या अर्थाने देश सुरक्षित ठेवणं हे एका बीएसएफच्या सैनिकाचं प्रथम कर्तव्य असतं. यदाकदाचित, बाह्य शक्तींकडून आपल्या देशाच्या सीमेवर हल्ला करण्यात आलाच, तर अशा हल्ल्याला सर्वप्रथम सामोरी जाते, ती बॉर्डर सिक्युरिटी फोर्स! आर्मीची कुमक 'फिल्ड'वर येऊन मोर्चा सांभाळेपर्यंत बीएसएफ 'काउन्टर फोर्स'ला देशाच्या सीमेच्या आत शिरकाव करण्यापासून झुंज देत रोखते. यात कित्येक जवान जखमी होतात, तर काही शहीदही होतात! याशिवाय, देशाच्या सीमेवरील बेकायदा कारवायांना रोखणं, प्रसंगी नागरी अधिकाऱ्यांना मदत करणं, बंडखोरीविरुद्ध कारवाया करणं यांसारखी कर्तव्यंदेखील बीएसएफचे जवान पार पाडतात. आतादेखील मी आपल्या देशाच्या सीमेवर माझ्या परिवारापासून, घरापासून, गावापासून हजारो किलोमीटर्स दूर एका घनदाट जंगलात उभा आहे. मी कुठल्या सीमेवर आहे हे सांगणं माझ्या मते तितकंसं गरजेचं नाही; कारण एका सैनिकाला कुठली एक सीमा नाही; तर त्याचा अखंड देश अधिक दिसत असतो. थोडक्यात सांगायचं झालं, तर आज या घनदाट जंगलात उभं राहून मी कुठल्या एकाच सीमेचं नाही; तर आपल्या देशाच्या अखंडतेचं संरक्षण करत आहे.

मी, कॉन्स्टेबल भाग्येश विजय शिंदे. आज या काळ्याकुट्ट अंधारात उभा राहून जेव्हा भूतकाळाच्या पडद्यावर आठवणींचा प्रकाश टाकतो, तेव्हा मला माझ्या जीवनाचा एक न् एक प्रसंग लख्ख दिसतो. मी सैनिक कसा झालो? कुठल्या गोष्टीने, कुठल्या प्रसंगाने मला सैन्यात येण्याची प्रेरणा मिळाली? त्यासाठी

मला कुठल्या दिव्यांतून जावं लागलं? वैयक्तिक जीवनाचा, वैयक्तिक आनंदाचा त्याग करून मी आणि माझ्यासारखे इतर 'जीडी सोल्जर्स' कुठल्या प्रेरणेने सैन्यातल्या या अतिशय कठीण भूमिकेवर टिकून राहिलो? भारतीय सेनेचे सशस्त्र दल कशा प्रकारे विपरीत परिस्थितीमध्येसुद्धा देशाची सुरक्षितता निश्चित करते? या सगळ्यावर मला थोडं बोलायचं आहे.

'सैन्य आणि माझं जीवन' या गोष्टीवर जेव्हा कधी चर्चा होईल, तेव्हा ज्या गोष्टीचा उल्लेख पहिल्याप्रथम यायलाच हवा, ती गोष्ट म्हणजे- जिथून मला माझ्या देशासाठी काहीतरी करून दाखवण्याची प्रेरणा मिळाली. महाराष्ट्र राज्यातल्या अहिल्यानगर जिल्ह्यात नेवासा तालुका आहे. या तालुक्यातील बेलपिंपळगाव हे माझं गाव. माझ्या गावाच्या शेजारील जैनपूर हे गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर वसलेलं एक छोटेखानी गाव आहे. २००८ साली गोदावरी नदीला महापूर आला होता. नदीचं पाणी घाट ओलांडून पात्राच्या बाहेर वाहू लागलं आणि नदीच्या किनाऱ्यावर वसलेलं जैनपूर बघताबघता जलमय झालं. निसर्गाच्या या रौद्र रूपाला आव्हान न देता गावातील लोकांनी आपला जीव वाचवण्यासाठी तिथून कसाबसा पळ काढला; पण गावातली शेकडो गुरं या महापुरात वाहून गेली. तेव्हा मी इयत्ता सातवीच्या वर्गात शिकत होतो. या आपत्तीजनक कारणामुळे आमच्या शाळेला सुटी होती. जैनपूर गावातल्या लोकांनी आमच्या गावातल्या याच शाळेत येऊन आश्रय घेतला होता. जैनपूर गावाचे दोन भाग आहेत- एक नवीन जैनपूर आणि दुसरं जुनं जैनपूर. जुनं जैनपूर तुलनेनं नदीच्या जवळ असल्यामुळे तो भाग एव्हाना पूर्णपणे पाण्याच्या खाली गेला होता; पण नवीन जैनपूरमध्ये अजून पाणी शिरलं नव्हतं. पाण्याची पातळी वाढत चालल्याने जैनपूर गावाच्या या भागातल्या लोकांची चिंता वाढू लागली होती. रात्र कशीबशी पार पडली; पण पहाटे पाचच्या सुमाराला पाण्याच्या पातळीमध्ये प्रचंड वाढ झाली. पाणी आता नवीन जैनपूरमध्ये शिरायला लागलं होतं. खरंतर, गावाच्या या भागातून लोकांनी आधीच बाहेर पडायला हवं होतं; पण आता उशीर झाला होता. कारण रात्री वाढलेल्या पाण्याच्या प्रचंड वेगामुळे नदीवरचा पूल कोसळला होता. गावात जवळपास शे-दोनशे माणसं फसली होती. त्यांचा बचाव करण्यासाठी आता गावात मिलिटरी येणार असल्याची चर्चा सुरू झाली. काही तासांत मिलिटरीचे टाट्रा ट्रक्स आमच्या शाळेच्या मैदानावर दाखल झाले आणि त्यातून सैनिक भराभर खाली उतरले. त्यांच्याजवळ स्पीड-बोट, दोरखंड, लाइफ जॅकेट्स यांसारखं बचाव-साहित्य होतं. त्यांनी जैनपूर गावातून लोकांना सुखरूपपणे बाहेर काढायला सुरुवात केली. दिवसभर मिलिटरीचे ट्रक्स जैनपूर गावाच्या दिशेने जात होते. रात्र होईपर्यंत गावातल्या सगळ्या लोकांना आणि वाचवता आलं तेवढ्या सगळ्या गाई-गुरांना मिलिटरीने शाळेच्या मैदानावर सुखरूप आणलं होतं. शाळेच्या मैदानावर आता राहुट्या पडल्या होत्या. मिलिटरीचे लोक इकडून तिकडे फिरत होते. माझ्या सुदैवाने ही शाळा माझ्या घरासमोरच असल्यामुळे मी दिवसभरातून बराच वेळ शाळेच्या मैदानावर असायचो. मला मिलिटरी, त्यांचं कामकाज, त्यांची शिस्त, त्यांची गती या सगळ्यांबद्दल आकर्षण वाटू लागलं होत. एका सायंकाळी मी आईला विचारलं, ''आई, हे लोक कोण आहेत?'' तेव्हा माझ्या आईने मला सांगितलं, ''हेच आपल्या देशाचे खरे हिरो आहेत! आपल्या देशाचे सैनिक!'' तेव्हा माझ्या मनात किती उत्साह होता हे मी शब्दांत सांगू शकत नाही; पण मी आईला म्हणालो, ''आई, एक दिवस मीपण यांच्यासारखाच सैनिक बनणार!'' या प्रसंगातून मला माझ्या जीवनाचं ध्येय मिळालं होतं.

माझ्या वाढत्या वयासोबत माझं ध्येयदेखील प्रबळ होतं गेलं. 'मी मिलिटरीत जाणार' हाच एकमेव विचार माझ्या मनाला आनंद देत होता. शारीरिक तयारी जोरदार सुरू होती; पण अभ्यासाच्या बाबतीत मात्र मी कामचुकारपणा करत होतो. वयाच्या १८व्या वर्षी मी 'स्टाफ सिलेक्शन कमिशन'द्वारा घेतल्या जाणाऱ्या बीएसएफच्या 'जीडी सोल्जर' या पदासाठी अर्ज भरला. या भरतीसाठी 'मैदानी चाचणी' (ग्राउन्ड टेस्ट), 'लेखी चाचणी' (रिटन टेस्ट) आणि 'वैद्यकीय तपासणी' (मेडिकल टेस्ट) अशा एकूण तीन चाचण्या होणार होत्या. मैदानी चाचणीसाठी हजारो मुलं उपस्थित होती. एका वेळी ३०० मुलं याप्रमाणे धावण्याची चाचणी घेतली जाणार होती. आम्हाला धावपट्टीवर नेण्यात आलं. एका वेळी धावणाऱ्या ३०० मुलांपैकी जेवढी मुलं पाच किलोमीटर्स अंतर २४ मिनिटांच्या आत धावून पार करतील, तेवढीच मुलं पुढील चाचणीसाठी पात्र ठरणार होती. माझी मैदानी तयारी चांगली असल्यामुळे हे अंतर मी १६ मिनिटं आणि ५० सेकंद एवढ्या वेळात पार केलं. एकाच वेळी धावणाऱ्या तीनशे मुलांपैकी हे अंतर कमी वेळात पार करून मी पहिला आलो होतो! सर्व मैदानी चाचण्या होऊन पुढील लेखी चाचणीसाठी मी पात्र ठरलो असल्यामुळे माझा आनंद गगनात मावत नव्हता; पण लेखी चाचणीला मी कमी महत्त्व दिलं होतं. काही महिन्यांच्या अवधीनंतर घेण्यात आलेल्या एकूण १०० गुणांच्या लेखी चाचणीमध्ये मला केवळ ४१ गुण मिळाले आणि संपूर्ण प्रक्रिया झाल्यानंतर शेवटच्या अंतिम यादीतून मला बाहेर काढण्यात आलं. माझं स्वप्न सत्यात उतरवण्यात मी कमी पडलो होतो. या काळात माझ्या वडिलांनी मला फार धीर दिला. मी निराश झालो होतो. माझा उत्साह मावळला होता; पण त्याच वेळी माझ्या आईने मला एक गोष्ट सांगितली, जी मी मरेपर्यंत विसरू शकत नाही. आई म्हणाली, 'फुलपाखरू जन्मतःच सुंदर नसतं. सुरुवातीला ती एक छोटीशी अळी असते, जी आपल्याभोवती कोश विणून स्वतःला त्या कोशामध्ये बंद करून घेते आणि जेव्हा ती अळी कोशातून बाहेर पडते, तेव्हा स्वतःच्या सौंदर्याने समस्त जगाला भुरळ पडण्याची

ताकद तिच्यात असते. ती एक सुंदर फुलपाखरू बनून बाहेर पडते. कधीकधी स्वतःला सिद्ध करण्यासाठी हे करावं लागतं!' आईच्या या बोलण्याने माझा हरवलेला उत्साह परत आला. पत्र्याच्या दोन खोल्या म्हणजेच आमचं घर! त्यांपैकी एका खोलीत मी स्वतःला अक्षरशः डांबून घेतलं. भरपूर अभ्यास केला. भरपूर तयारी केली. मैदानी तयारीदेखील सुरू होती. पुढील वर्षी पुन्हा अर्ज भरला आणि मैदानी चाचणीच्या यशानंतर घेण्यात आलेल्या लेखी चाचणीमध्येही मी यशस्वी झालो. १००पैकी एकूण ७४ गुण मिळवून महाराष्ट्रातल्या लाखो कॅन्डिडेट्समधून मी आठव्या नंबरवर यशस्वी झालो होतो. काही महिन्यांच्या अवधीनंतर या भरतीचा तिसरा टप्पा, म्हणजेच वैद्यकीय तपासणीदेखील पार पडली. तीनही चाचण्या मी यशस्वीपणे पार केल्या होत्या. दिवस मजेत जात होते. शेतातल्या विहिरीत तास न् तास पोहण्याची माझी आवड मी मनसोक्त पूर्ण करत होतो. एके दिवशी असाच विहिरीत पोहत असताना माझ्या भावाने मला विहिरीच्या काठावरून आवाज दिला आणि गावातला पोस्टमन माझं नाव असलेलं लेटर घरी देऊन गेल्याचं सांगितलं. काय कळायचं, ते मला कळून चुकलं होतं! मी विहिरीतून वर येऊन कपडे घातले आणि आनंदाने धावतच घराकडे निघालो. हो, ते माझं जॉइनिंग लेटर होतं! वयाच्या १९व्या वर्षी 'बीएसएफ'मध्ये 'जीडी कॉन्स्टेबल' या पदावर माझी निवड झाली होती. माझ्यासाठी, तसंच माझे आई-वडील आणि माझा लहान भाऊ, आम्हा सर्वांसाठी हा दिवस दिवाळीपेक्षा कमी नव्हता! माझं स्वप्न सत्यात उतरलं होतं.

राजस्थानच्या वाळवंटात असलेल्या एका बीएसएफ युनिटच्या गेटबाहेर हातात जॉइनिंग लेटर घेऊन मी आणि माझ्यासारखे अजून बरेच 'ट्रेनीज' (सैनिकी प्रशिक्षणासाठी आलेली मुलं) घोळक्या-घोळक्याने उभे होतो. आम्ही सर्व जण आनंदात मोठमोठ्याने गप्पा मारत होतो. कुणीच कुणाच्या परिचयाचं नव्हतं. खरंतर, कधीकधी माणूस अनोळखी व्यक्तीजवळच आनंदाने मन मोकळं करतो, असं मला वाटलं. आम्ही सर्व ट्रेनीज खुशीत होतो; पण आमच्या हसण्याच्या, खिदळण्याच्या आवाजाने जणू त्या युनिटच्या शिस्तप्रिय वातावरणाला आम्ही गालबोट लावलं होतं. थोड्याच वेळात गेटमधून एक 'कमान्डिंग ऑफिसर' आमच्याजवळ आले आणि जणू आभाळ गर्जावं, तसं आमच्यावर ओरडले, 'बिलकुल चुप हो जाओ। पूरा मच्छी बाज़ार बना दिया है यहां पर।' त्यानंतर आमचं ज्या प्रकारे स्वागत करण्यात आलं, ते आम्ही मरेपर्यंत विसरू शकणार नाही! आम्हाला आमच्या भल्यामोठ्या जड बॅग्स डोक्यावर घेऊन पळायला सांगितलं. आम्ही बराच वेळ त्या दुपारच्या रणरणत्या उन्हातून पळत होतो. शेवटी, जेव्हा आमच्यातले काही ट्रेनी चक्कर येऊन पडले, तेव्हा कुठे आम्हाला कमान्डिंग ऑफिसरने थांबायला सांगितलं. त्या दिवसानंतर आम्ही रात्री आमच्या बिछान्यावरदेखील मोठ्याने बोलायला घाबरायचो! राजस्थानच्या ट्रेनिंग युनिटमध्ये आम्ही जवळपास दोन महिने होतो. इथे आल्यापासून साधारण पाचव्या दिवसापासून आम्हाला भर दुपारी वाळवंटातली रेती खोदून खड्डा करायला सांगितलं. सगळे ट्रेनीज सहा-सहाच्या ग्रूप्समध्ये विभागले गेले. पाट्या आणि फावडे घेऊन आम्ही सलग दहा दिवस वाळवंटात रेती खोदून खड्डा करत होतो. हा खड्डा नेमका कशासाठी करायचा? असं कमान्डिंग ऑफिसरला विचारणं म्हणजे 'आ बैल मुझे मार' असं केल्यासारखं होतं; म्हणून आम्ही रोज निमूटपणे खड्डा खोदत राहिलो. अकराव्या दिवशी आमचे कमान्डिंग ऑफिसर तिथे आले. आम्ही सर्व ग्रूप्सनी त्या उजाड वाळवंटात भलेमोठे खड्डे केले होते. आमच्या तळहातावर गट्टे पडले होते; पण चेहऱ्यावर मात्र आम्ही काहीतरी फार मोठी कामगिरी केल्याचा अविर्भाव होता. आता नक्कीच आमचे कमान्डिंग ऑफिसर आमच्यावर खूश होऊन आमच्या कामाची प्रशंसा करतील असं आम्हाला वाटलं; पण कमान्डिंग ऑफिसर काहीच बोलले नाहीत. त्यांनी केवळ सर्व ट्रेनीजकडे एक नजर टाकली आणि 'अब इन सभी गड्डों को फिर से भर दो।' एवढं बोलून तिथून निघून गेले.

राजस्थानच्या ट्रेनिंग युनिटमध्ये 'डॉक्युमेन्ट व्हेरिफिकेशन' केल्यानंतर दोन महिन्यांनी आम्हाला मणिपूरच्या बीएसएफ ट्रेनिंग सेन्टरमध्ये पाठवण्यात आलं. मणिपूरच्या ट्रेनिंग सेन्टरने आमच्या आयुष्याला कलाटणी दिली. आता खऱ्या अर्थाने 'सैनिक' बनण्याच्या दिशेने आमचं ट्रेनिंग सुरू झालं होतं. कदाचित, हा सूर अहंकाराचा वाटेल; पण मला खरंच वाटतं की, सैन्याचं ट्रेनिंग करणं सगळ्यांनाच जमतं असं नाही. पहाटे सूर्य उगवण्याच्या आधी उठल्यापासून रात्री पुन्हा अंथरुणावर जाईपर्यंत अंगतोड मेहनत! यात काही चूक झालीच, तर पाठीवर ३० ते ४० किलो वजनाची वाळूने भरलेली 'बोरी' लादून आणि हातात रायफल घेऊन कधी एक तास, तर कधी दोन तास धावण्याची शिक्षा मिळायची. कधीकधी वाटायचं हे सगळं सोडून येथून पळून जावं; पण तेव्हा माझ्या आई-वडिलांचा चेहरा मला आठवायचा! येथून पळून गेल्यानंतर मी कुठल्या मानेनं त्यांच्यासमोर उभा राहू? हा प्रश्न मनात यायचा आणि अंगात पुन्हा नवीन ऊर्जा भरल्यासारखं वाटायचं. मणिपूरच्या ट्रेनिंगदरम्यान नेहमी राजस्थानच्या वाळवंटात केलेल्या खड्ड्यांचा प्रसंग आठवायचा. त्या वेळी केलेल्या त्या प्रचंड मेहनतीमुळे आमचं शरीर मणिपूरच्या त्या अत्यंत कठीण ट्रेनिंगसाठी तयार झालं होतं. राजस्थानच्या ट्रेनिंग युनिटमधील आमच्या कमान्डिंग ऑफिसरबद्दल माझ्या मनातील असलेला द्वेष नाहीसा झाला होता आणि आता त्याची जागा आदराने घेतली होती. मी मनोमन आमच्या राजस्थानच्या कमान्डिंग ऑफिसरला धन्यवाद दिले!

या सेन्टरवर आम्ही एकूण १७० ट्रेनीज आलो होतो; पण ट्रेनिंगचा अर्धा टप्पा पूर्ण होण्याच्या आधीच त्यातून काही जणांनी

माघार घेतली आणि आम्ही एकूण १४५ ट्रेनीज शेवटपर्यंत टिकून राहिलो. ट्रेनिंगचा अर्धा टप्पा संपल्यानंतर सर्व ट्रेनीजना 'मिड टर्म ब्रेक' म्हणजेच सात दिवसांची सुटी दिली जाते; पण ही सुटी मिळण्याच्या आधी एका थरारक दिव्यातून जावं लागतं! ते म्हणजे, सात दिवसांचा 'जंगल कॅम्प!' आजही जंगल कॅम्प ट्रेनिंगची आठवण आली, तर माझ्या सर्वांगावर शहारे उठतात. या सात दिवसांच्या ट्रेनिंगसाठी आम्हाला एका उंच डोंगरावर नेण्यात आलं. या डोंगरावर आणि डोंगराच्या आजूबाजूला घनदाट जंगल होतं. डोंगराच्या माथ्यावर पोहोचताच आमच्या 'उस्ताद'ने सांगितल्याप्रमाणे आम्ही टेन्ट उभारले. त्यांनतर कॅम्पच्या चारही दिशांना 'मोर्चा' लावण्यासाठी जमिनीत खड्डे करायला सुरुवात केली. मोर्चा लावण्यासाठी सर्व ट्रेनीजना चार-चारच्या ग्रूप्समध्ये विभागण्यात आलं. हे ग्रूप्स आळीपाळीने कॅम्पची सुरक्षा करणार होते. मणिपूरचा हा भाग नक्षलवादी भाग आहे. यापूर्वी अशाच एका बीएसएफच्या जंगल कॅम्पवर काही नक्षलवाद्यांनी हल्ला केला होता आणि अत्यंत बिकट प्रसंग उभा राहिला होता. त्यामुळे आम्हा सर्व ट्रेनीजना 'अलर्ट' राहण्याची सूचना करण्यात आली आणि त्या रात्री आमच्या ट्रेनिंगचा सर्वांत थरारक अध्याय सुरू झाला! रात्री अचानक मुसळधार पाऊस आला. पावसाचा जोर एवढा प्रचंड होता की, काही मिनिटांच्या आत आमच्या आजूबाजूला पाण्याचं जणू तळंच साचलं. आमच्या खाटेखालून पाणी वाहू लागलं. एक बूट किंवा एकही कपडा असा उरला नव्हता, जो चिखल-गाळाने रडबडीत झाला नसेल! एकही टेन्ट किंवा एकही रेनकोट असा नव्हता, जो आम्हाला रात्रभर कोसळणाऱ्या या मुसळधार पावसापासून वाचवू शकेल. दिवस उगवला, तरीही पाऊस काही थांबण्याचं नाव घेत नव्हता. सलग पाच दिवस आणि पाच रात्री हा पाऊस सुरू होता! ना मोबाइल ना चार्जिंगची कुठली व्यवस्था; बाहेरच्या दुनियेपासून आम्ही पूर्णपणे तुटलो होतो. आमच्या ट्रेनिंग ऑफिसरची कडक आज्ञा होती की, भले काहीही होऊ दे; पण ट्रेनिंग थांबता कामा नये! आम्ही मुसळधार पावसामध्ये त्या घनदाट जंगलात ट्रेनिंग करत राहिलो. पावसामुळे मुख्य कॅम्पसोबत संपर्क तुटला होता. पिण्याचे पाणी आणि 'राशन' ही गंभीर समस्या बनत चालली होती. टेन्टच्या छतावरून पडणारं पाणी आम्ही पिण्यासाठी बादली आणि ड्रममध्ये साठवत होतो. त्याच पाण्यात आम्ही अन्नदेखील शिजवायचो. ओले बूट दिवसभर पायात ठेवल्याने तळपायांची त्वचा खराब झाली होती. पायांतून मोजे उतरवताना त्यांसोबत तळपायांची त्वचादेखील निघत होती. येथून निघून जाण्याचा कुठलाही पर्याय नसतो. आमच्यापैकी जवळपास सर्व जण आजारी पडले होते. या दरम्यान काही जण जखमीदेखील झाले होते. सहाव्या दिवशी पाऊस थांबला आणि ट्रेनिंग ऑफिसरने आम्हा सर्व ट्रेनीजना 'फॉलन' केले. आम्ही जवळपास अर्धमेले झालो होतो. त्या वेळी आमच्या ट्रेनिंग ऑफिसरने दिलेलं भाषण मला आजही आठवतं. 'सोल्जर्स! हा, तुम्हीच! इतकं सोपं नसतं सोल्जर बनणं. कितीतरी लाख प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकून तुम्ही इथपर्यंत पोहोचला आहात. तुम्ही तर या 'वर्दी'ला स्वीकारलं; पण आता या वर्दीची वेळ आहे तुम्हाला स्वीकारण्याची! आणि या वर्दीकडून स्वीकार त्याचाच होईल, जो हे सगळं सहन करू शकेल. इथे तुम्ही केवळ प्रकृतीचं भयावह रूप पाहिलं; पण जर या मुसळधार पावसात हल्लेखोरांनी हल्ला केला असता, तर तुम्ही त्यांच्याशी लढला असता काय? हो! तुम्ही लढला असता! तुम्ही तुमच्या शेवटच्या श्वासापर्यंत लढाल आणि तेव्हाच तुम्ही स्वतःला 'सोल्जर' म्हणवून घेण्याचे हकदार बनाल. आज तुम्ही इथे जेवढा घाम गाळाल, तेवढं युद्धभूमीवर तुमचं कमी रक्त सांडेल! जय हिन्द!' यानंतर सर्व ट्रेनीज जोरजोरात घोषणा देत होते आणि त्या घोषणांनी ते संपूर्ण जंगल दुमदुमून गेलं होतं.

जंगल कॅम्प संपल्यानंतर मिळालेल्या सात दिवसांच्या सुटीसाठी सर्व ट्रेनीज आपापल्या घरी गेले. सात दिवसांनंतर आम्ही सर्व जण पुन्हा ट्रेनिंग सेन्टरवर पोहोचलो आणि आमचं राहिलेलं अर्ध ट्रेनिंग सुरू झालं. आता आम्ही राहिलेलं ट्रेनिंग केवळ पूर्ण करावं म्हणून करत नव्हतो, तर आम्ही स्वतःला परिपूर्ण बनविण्यासाठी हे ट्रेनिंग करत होतो. ट्रेनिंग संपल्यानंतर आमच्या शपथविधीचा सुवर्ण दिवस उगवला. मी शपथ घेतली, ''मी भारताच्या संविधानाला साक्षी ठेवून शपथ घेतो की, मी भारत देशाची अखंडता, सार्वभौमता, एकता सुरक्षित ठेवेन. भारताचे राष्ट्रपती आणि माझ्या वर नियुक्त केल्या गेलेल्या इतर उच्च अधिकाऱ्यांच्या अनुज्ञेचं पालन करेन. देशाच्या संरक्षणाकरिता पाणी, भूमी आणि आकाश यांपैकी कुठल्याही मार्गावर पाठवल्यास मी जाईन. देशाच्या संरक्षणासाठी मला माझ्या प्राणांची आहुती द्यावी लागली तरीही मी मागे हटणार नाही.''

सर्व ट्रेनिंग आणि शपथविधीनंतर आम्हाला काही दिवसांची सुटी मिळाली. आम्ही सर्व ट्रेनीज एकमेकांना कडकडून भेटलो. सर्वांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले होते. मी घरी गेलो, तेव्हा माझ्या अंगावर सैनिकाची वर्दी होती. मी दारात उभा होतो. माझी आई मला औक्षण करत होती. माझा भाऊ आणि माझे वडील माझ्याकडे कौतुकाने पाहत होते. आम्हा सर्वांच्या डोळ्यांत पाणी होतं. तो खरंच आनंदाचा क्षण होता! मी आईकडे डोळे भरून पाहिलं आणि म्हणालो, ''आई, मी सैनिक झालो.''

**भाग्येश विजय शिंदे**
बॉर्डर सिक्युरिटी फोर्स
कॉन्स्टेबल (जीडी)
**शब्दांकन : अक्षय विजय शिंदे**

नवनवीन पुस्तकांच्या
अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत


२५ वर्षांची परंपरा


| | | | |
|---|---|---|---|
| तीन वर्षांची वर्गणी | ₹ ४५० | ₹ ६०० | पाच वर्षांची वर्गणी |
| | **मेहता मराठी ग्रंथजगत डिजिटल अंक** | | |
| तीन वर्षांची वर्गणी | ₹ ३०० | ₹ ४०० | पाच वर्षांची वर्गणी |


**तीन वर्षांना २५ % ◆ वर्गणीदारांसाठी सवलत ◆ पाच वर्षांना ३० %**


## ‘मेहता मराठी ग्रंथजगत’ दिवाळी अंकास मिळालेले पुरस्कार


महाराष्ट्र साहित्य परिषद अ. स. गोखले स्मृत्यर्थ **‘रत्नाकर पुरस्कार’ २००९**
मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांच्या वतीने **‘उत्कृष्ट अंक पारितोषिक’ २००९**
**‘उत्कृष्ट अंक पारितोषिक’ २०११**
रोटरी क्लब ऑफ पुणे, पर्वती आणि लोकमान्य नगरतर्फे
**‘रोटरी लोकमान्य पुरस्कार’ दिवाळी अंक स्पर्धा २०१०**
**‘रोटरी लोकमान्य पुरस्कार’ दिवाळी अंक स्पर्धा २०११**
नंदा फाउंडेशनचा राज्यस्तरीय **‘नविवा दर्जेदार दिवाळी अंक पुरस्कार २०१०’**
दिनमार्क पब्लिकेशनतर्फे **‘छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१७’**
दिनमार्क पब्लिकेशनतर्फे **‘छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१८’**















| ICICI Bank Ltd. | Account No. 777705292807 | IFSC/RTGS Code ICIC0006240 | SWIFT Code ICICINBBCTS | G Pay +91 94223 23039 |
|---|---|---|---|---|

Available on : Google Play Books | amazon kindle





बुद्धिचातुर्याच्या अभावामुळं फसवल्या जाणाऱ्या
एका भोळ्या मुलाची
अस्वस्थ करणारी कथा

ebook available

## हरकाम्या

अनीस सलिम । अनु.: डॉ. शुचिता नांदापूरकर फडके
किंमत : ₹ २९५





प्रतिकूल परिस्थितीशी झुंजत
शिक्षणाची कास धरणाऱ्या तरुणाची
अंतर्मुख करणारी कादंबरी

ebook available

## दाही दिशा

डॉ. रवींद्र ठाकूर
किंमत : ₹ ४९५




जातीवादाच्या विखारात होरपळलेल्या युवतीची
हृदय पिळवटून टाकणारी कहाणी

ebook available

## सरण

पेरुमाल मुरुगन । अनु. डॉ. मानसी केळकर
किंमत : ₹ २९५

# अधिकारी म्हणून भारतीय सैन्यातील जीवनप्रवास


कर्नल संजोग शिंदे

**अनु. : प्रीता कानिटकर, विशाखा बेके**




भारतीय सैन्यातील एका अधिकाऱ्याचं जीवन हे साहस, वैयक्तिक सर्वांगिण विकास, कठोर प्रशिक्षण आणि आव्हानात्मक पोस्टिंग्ज यांनी युक्त असतं. त्यामध्ये प्रत्येक क्षणी ज्ञानार्जनाच्या दशेत आणि अखंड कर्तव्यदक्ष असं राहावं लागतं. जेणेकरून, राष्ट्रसेवा करण्याची हीच योग्य संधी; तसंच भारताप्रति प्रचंड अभिमान, सन्मान आणि दृढ उद्दिष्टांची जाणीव सतत होत असते.

छ. संभाजी नगर(औरंगाबाद) इथल्या 'सर्व्हिसेस प्रिपरेटरी इन्स्टिट्यूट (एसपीआय)' नावाच्या एका प्रतिष्ठित संस्थेची जाहिरात माझ्या काकांनी वृत्तपत्रात पाहिली; तिथून माझ्या आयुष्याची सुरुवात झाली. त्या वेळी माझं वय १५वर्षांचं होतं. एसपीआय ही संस्था महाराष्ट्रातील तरुणांना भारतीय संरक्षण दलात दाखल होण्याच्या दृष्टीनं घडवते. अशा क्षेत्रात पाऊल ठेवण्यासाठी संगमनेर या लहान शहरातील एका लहान मुलासाठी- जो शेतीप्रधान भागातून आला आहे- ही एक प्रांजळ सुरुवात होती. ज्यांनी कधीही त्यांच्या सर्वांत लहान मुलाला स्वतःपासून वेगळं केलं नाही, त्या पालकांसाठी स्वतःच्या मुलाला सशस्त्र दलात पाठवणं हा एक कठीण निर्णय होता; कारण हे क्षेत्र जोखीम आणि साहसांनी भरलेलं आहे.

सन २०००मध्ये, एसपीआयमध्ये निवड होण्यापासून हा प्रवास सुरू झाला. निवडप्रक्रियेत इतर ३४ अत्यंत सक्षम कॅडेट्सपैकी मीसुद्धा एक होतो. प्रशिक्षणाची सुरुवात शैक्षणिक तसंच शारीरिक प्रशिक्षणावर भर देऊन झाली. तथापि, एसपीआयचे दूरदर्शी संचालक कर्नल. डी. एच. परब(निवृत्त) यांनी नेहमीच नावीन्यपूर्ण दृष्टिकोन आणि पद्धती यांद्वारे आम्हाला उत्कृष्ट अधिकारी आणि माणूस बनवण्यावर भर दिला. आम्हा सर्वांचे 'मार्गदर्शक' म्हणून मार्गदर्शन करताना सशस्त्र दलात सामील होण्यासाठी त्यांनी आम्हाला कठोर परिश्रम करायला भाग पाडलं. जेणेकरून, आम्हाला आमच्या अंतिम ध्येयाकडे वाटचाल करणं सुलभ झालं. या संस्थेमधून जवळजवळ ६०-७०% उमेदवारांची निवड ही सैन्यदलाकरता झाली. उर्वरित कॅडेट्स नौदल व हवाईदलासाठी निवडले गेले. ही एक मोठी कामगिरी ठरली होती.


'राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए)'मधील प्रशिक्षण कठोर आणि कडक शिस्तीचं होतं. मला भारतीय सैन्यात भविष्यातील नेता बनवण्याचं लक्ष्य माझ्यासमोर ठेवणारा तो परिवर्तनकारी प्रवास होता. संपूर्ण जग एनडीएला 'लष्कराचं उत्कृष्ट प्रशिक्षण देणारी संस्था' म्हणून पाहतं. परंतु, इथलं माझं जीवन तितकंच समृद्ध, सौहार्द, साहस आणि वैयक्तिक विकास यांनी भरलेलं होतं. माझ्या सहकारी कॅडेट्समधील मैत्री, शिस्तबद्ध दिनचर्या आणि परेडचा माझ्या व्यक्तिमत्त्वावर खूप सकारात्मक परिणाम झाला. एनडीएच्या प्रत्येक कानाकोपऱ्याची स्वतःची एक वेगळी कहाणी असलेल्या, भारताच्या या सर्वांत प्रतिष्ठित संस्थेचा भाग होण्याचं स्वप्न पूर्णत्वास आलं. एनडीएनं मला केवळ शारीरिकदृष्ट्या सक्षम आणि लष्करी नेता बनवलं नाही; तर परिपूर्ण माणूस म्हणून घडवलं. एनडीएमधल्या माझ्या संघर्षात्मक अशा कठीण काळामध्ये, भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्व सहकाऱ्यांशी माझं अतूट नातं निर्माण झालं. सर्वोत्तम संस्थेत शिकणारा विद्यार्थी अनुभवू शकणार नाही, अशा उत्तमोत्तम संधी एनडीएनं मला दिल्या. एनडीएमधले अनेक अनुभव जसे की, घोडेस्वारी करण्यापासून ते बर्फाळ पर्वत चढण्यापर्यंत; तसंच पॅराशूटसह विमानातून उडी मारण्यापर्यंत आणि मेसमधील जेवणापर्यंत असं सगळंच विलक्षण होतं. एनडीएमध्ये दाखल झाल्यानंतर आम्ही आमच्या सर्व प्रादेशिक व

भाषिक सीमा ओलांडून पुढे आलो होतो आणि *'फक्त भारतीय'* हीच आमची खरी ओळख झाली होती.

हा प्रवास उत्तराखंडच्या सुंदर राज्यातील देहरादून येथील भारतीय लष्करी अकादमीपर्यंत सुरू राहिला. मला सक्षम सैनिक बनवण्याची प्रक्रिया तिथं वर्षभर सुरू होती. त्यामध्ये प्रत्यक्ष गोळीबारासह, रात्रीची शिबिरं यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे, आरामदायी वातानुकूलित गाडीतून पर्यटक म्हणून नव्हे; तर प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून २० किलो वजन घेऊन मसुरीच्या उंच पर्वतांवर चढाई करणं याचाही समावेश होता. इतक्या जड वजनासह अतिशय अवघड परिस्थितीत शिखरावर सहकाऱ्यांसोबत पोहोचण्याच्या त्या आनंदाची तुलना इतर कशाशीही होऊ शकत नाही. त्यानंतर 'पासिंग आउट परेड (पीओपी)'चा संस्मरणीय दिवस आला. एसपीआयसाठी अर्ज भरण्यापासूनची सहा वर्षं इतका प्रदीर्घ काळ मी या क्षणाची वाट पाहत होतो. पीओपी दरम्यान घेतलेले अंतिम पग हे प्रशिक्षणार्थीपासून ते लेफ्टनन्ट म्हणून सैन्यातील कमिशन्ड अधिकारी इथपर्यंतचं औपचारिकरीत्या पडलेलं पाऊल आहे. या परेडचं पुनरावलोकन भारताचे सर्वांत लोकप्रिय, तत्कालीन राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी केलं. तो अनुभव दीर्घकाळ स्मरणात राहणारा होता. त्यानंतर भारताच्या राष्ट्रपतींनी देशाच्या कोणत्याही प्रदेशात पूर्ण समर्पण आणि उत्कटतेने सदैव राष्ट्रसेवा करत राहण्याची शपथ आम्हाला दिली.

जेव्हा मी हैदराबादमधील माझ्या युनिटमध्ये 'अधिकारी' म्हणून सामील झालो, तेव्हा एका गोष्टीची प्रकर्षाने जाणीव झाली. ती म्हणजे, सैन्यदल हा फक्त व्यवसायाचा भाग नाही; तर ते ग्लॅमर, शौर्य आणि नोकरीतून मिळणारं समाधानयुक्त जीवन जगण्याची एक पद्धत आहे. युनिटमध्ये सामील झाल्यावर मला हेही लक्षात आलं, की सैन्य हे कमकुवत मनाच्या लोकांसाठी नाही. तिथं कार्यरत असणं म्हणजे त्याच्या सर्व सुखसोयींसह, मानसिक, शारीरिक आणि भावनिक क्षमतांची आयुष्यभराची परीक्षा असते. विशेषकरून, एका क्षणी तुम्ही १८,००० फूट उंचीच्या बर्फाळ शिखरावर बसलेले असाल आणि दुसऱ्या क्षणी, राजस्थानच्या जंगलात किंवा वाळवंटात खोलवर बसलेले असाल. या वेळी हे निश्चित जाणवतं. मला विविध शस्त्रं आणि दारूगोळा यांचा परिचय झाला. तसंच येणाऱ्या अडचणींवर कशी मात करायची आणि एक नेता म्हणून प्रत्येक मोहिमेत उत्कृष्ट पुरुषांचं नेतृत्व कसं करायचं याची ओळख झाली; मग ते विविध व्यावसायिक किंवा क्रीडा स्पर्धाही असोत. त्याच कार्यकाळात मी बेळगाव येथे कमांडो कोर्स पूर्ण केला. माझी अत्यंत शारीरिक कसोटी पाहणारा तो कार्यकाळ होता. झोप किंवा अन्नाची कमतरता अशा प्रतिकूल अवस्थेतही आपल्या शरीरातील सुप्त क्षमतेची जाणीव त्या वेळी होत गेली. आज जेव्हा  लोक दिवसातून १०,००० पावलं पूर्ण करण्याचं ध्येय ठेवतात, तेव्हा मला आश्चर्य वाटतं. कारण, त्या वेळी किमान ५०,००० पावलं मी प्रतिदिनी निश्चितच टाकली असती, असा माझा अंदाज आहे.

त्यानंतर जेव्हा मला जम्मू आणि काश्मीरमधील नियंत्रण-रेषेवर तैनात करण्यात आलं, तेव्हा तो माझ्या लष्करी कारकिर्दीतील सर्वात रोमांचक काळ ठरला. शत्रूकडून होणाऱ्या अनिश्चित गोळीबाराच्या धोक्यामुळे बंकरच्या आत एका वेगळ्या चौकीत राहणं आवश्यकच होतं. अशा वेळेस तिथली रात्र ही झोपण्यासाठी नसून, दहशतवाद्यांची आपल्या देशातली घुसखोरी रोखण्यासाठी असते. अशा परिस्थिती रात्रभर जागं राहणं आणि जंगलात शांतपणे बसणं हे सुरुवातीला कठीण जात होतं. मात्र, कुठल्याही दहशतवाद्याने आपल्या हद्दीत प्रवेश करू नये याची खात्री करत राहण्यासाठी जागं राहणं गरजेचंच होतं आणि नंतर तो जीवनाचा भाग बनला. परंतु, वन्य प्राण्यांनी आणि सरपटणाऱ्या प्राण्यांनी भरलेल्या त्या जंगलात अशा जागून काढलेल्या रात्रींविषयी माझ्या घरच्यांना काहीच कल्पना नव्हती; जरी हे मिशन प्राथमिक असलं, तरीही. आज वाघा बॉर्डरवरील सेरेमोनियल परेड, संगीत आणि नृत्य हे कुठल्याही सामान्य भारतीयासाठी खूप रोमांचक वाटू शकतं; परंतु माझ्यासाठी हा अनुभव नेहमीच प्रेरणादायी राहिला आहे. विशेषत: पावलोपावली भू-सुरुंग आणि शत्रूकडून होणाऱ्या अनिश्चित गोळीबाराच्या धोक्यामुळे, कठीण ऑपरेशन्सदरम्यान मी माझ्या सहकाऱ्यांशी अतूट नातं निर्माण केलं. तिथले आयुष्य सोपं नव्हतं. वीजपुरवठा आणि फोन कनेक्टिव्हिटी यांच्या अभावामुळे घरच्यांशी संवाद आणि संपर्क साधला जात नव्हता. ईमेल,


प्रसंग छोटेच; पण कधी हास्य, कधी भय,
कधी मनोवेदना यांचा प्रत्यय देणाऱ्या गोष्टी

ebook available

## शिळोप्याच्या गोष्टी

भा. द. खेर
किंमत : ₹ ३५०

फेसबुक आणि इतर सोशल मीडिया साइट्सद्वारे जग ऑनलाइन होत असतानासुद्धा पत्र लिहिण्याचेच जुने दिवस त्या वेळी तिथे क्रमप्राप्त होते.


त्यानंतर माझ्या सैन्यदलाच्या कारकिर्दीत मी 'आर्मी एव्हिएशन'मध्ये हेलिकॉप्टर पायलट म्हणून सामील होण्याचा विचार केला. हे माझ्यासाठी वेगळं क्षेत्र होतं. मला जगातील १% पेक्षा कमी लोकसंख्येमध्ये मशीन स्वहस्ते हवेत उडवण्याची ही अनोखी संधी मिळेल याचा मी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता. कार कशी चालवायची हे माहीत नसतानाही मी हेलिकॉप्टर कसं उडवायचं हे शिकलो, याचं अनेकांना आश्चर्य वाटलं. सशस्त्र दलात सेवा करणाऱ्या व्यक्तीलाच मिळू शकणारा हा एक विशेषाधिकार आहे. कोणत्याही परिस्थितीत उड्डाण करणं सोपं काम नाही; कारण त्यासाठी भौतिकशास्त्र, गणित आणि इतर गुंतागुंतीच्या विषयांकडे परत जावं लागतं. खरंतर ते विषय मी शाळेत खूप आधीच सोडले होते. त्यामुळे मी आता पदवीधर असल्याने माझा आता अभ्यास होऊ शकणार नाही असं अनेकांना वाटत होतं. तथापि, २०१०मध्ये मी अखेर पायलटचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी परीक्षा आणि प्रत्यक्ष उड्डाण चाचण्या दिल्या; तेव्हाचा अनुभव विलक्षण होता.

सैन्यात 'पायलट' म्हणून माझं आयुष्य माझ्या पूर्वीच्या इन्फन्ट्रीच्या भूमिकेपेक्षा पूर्णपणे बदललं होतं. आता मी त्याच भागातून प्रवास करू शकत होतो, जे काही मिनिटांत पार करण्यासाठी मला तास न् तास लागायचे. पक्षी आणि ढगांमध्ये हेलिकॉप्टर उडवणं हा एक वेगळा अनुभव होता. उड्डाणामुळे मला देशातील जवळजवळ प्रत्येक राज्यात प्रवास करण्याची संधी मिळाली. प्रत्येक प्रदेशातून प्रवास केल्यानं मला संस्कृती अनुभवण्याची, लोकांना जाणून घेण्याची आणि भरपूर मित्र बनवण्याची संधी मिळाली; कारण मी राजस्थानच्या वाळवंटांपासून जम्मू-काश्मीर आणि ईशान्येकडील बर्फाळ शिखरांवर आणि जंगलांपर्यंत उड्डाण केलं. सैन्यात माझं पद वधारलं आणि जबाबदाऱ्याही वाढल्या. मी प्रशिक्षकांसाठीचा कोर्स केला आणि तरुण प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना हेलिकॉप्टर उडवण्याचं प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. हेलिकॉप्टरमुळे मला नेहमीच माझ्या सहकाऱ्यांना मदत करण्याची अतिरिक्त संधी मिळाली, जिथं थेट दहशतवादविरोधी ऑपरेशन्स दरम्यान जखमी सैनिकाला बाहेर काढणं किंवा वाहने हलू शकत नसलेल्या अग्रभागी असलेल्या चौक्यांमधून आजारी सैनिकाला बाहेर काढणं यांसारख्या मोहिमांमध्ये मी सहभागी झालो होतो. आमच्या भागातून दहशतवाद्यांना हटवण्यात सहभागी असलेल्या सैनिकांना पाठिंबा देण्यासाठी मी विविध सक्रिय ऑपरेशन्समध्ये सहभागी झालो होतो. मौल्यवान जीव वाचवण्याचा हा माझ्यासाठी रोमांचक अनुभव होता. २०२५मध्ये पंजाब आणि जम्मू-काश्मीरमध्ये आलेल्या भीषण पुरात आंतरराष्ट्रीय सीमेजवळील निर्जन ठिकाणी २७ व्यक्तींना वाचवण्याची संधी मला मिळाली.

जरी लष्करातील जीवन अनेक संधी आणि साहस देत असलं, तरी कौटुंबिक जीवनाच्या बाबतीत त्याचे काही तोटेही आहेत. माझ्या कुटुंबाला वारंवार स्थलांतर करावं लागलं, तैनातीमुळे दीर्घकाळ वेगळं राहावं लागलं आणि नवीन वातावरण आणि समुदायांशी सतत जुळवून घेण्याची गरज भासली. 'बालाकोट हल्ल्यां'दरम्यान किंवा 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान काश्मीरमध्ये सैनिक म्हणून माझ्यासह माझ्या कुटुंबानेही तितकाच संघर्षपूर्ण सामना केला. सामान्य भारतीयांना माहिती नसलेल्या ठिकाणी कुटुंबापासून दूर राहिल्याने माझ्या अडचणी त्यांच्या अडचणी बनल्या; परंतु नंतर त्यांनी देशाच्या आणि जगाच्या वेगवेगळ्या भागांचा अनुभव घेण्याची, इतर लष्करी कुटुंबांसह एक मजबूत समुदाय निर्माण करण्याची आणि वैयक्तिक लवचीकता आणि समृद्ध सामाजिक जीवन विकसित करण्याची संधी म्हणून ती घेतली.

जरी लष्करी जीवन मला काही अडचणी देत असलं, तरी माझ्या व्यवसायाने मला जे काही समाधान दिलं आहे, ते इतरत्र कुठेही मिळू शकत नाही. जेव्हा मला कधीही संबोधित केलं जातं, तेव्हा माझ्या नावापुढे 'कर्नल' असं कायमचं लिहिलं जाणं हा नेहमीच माझ्यासाठी भाग्याचा क्षण असतो. आज मी माझं सर्व यश आणि आनंद भारतीय सैन्याच्या अद्भुत संघटनेला समर्पित करतो. जय हिंद!

✪


'अबीरमाती' म्हणजे धगधगत्या भावनिक निखाऱ्यांवर पोळणाऱ्या वास्तविक कथा...

ebook available


**अबीरमाती**


आप्पासाहेब खोत

किंमत : ₹ २४०

## २५ वर्षांची परंपरा

# सुधा मूर्ती
यांचे बालसाहित्य























ebook available


## २५ वर्षांची परंपरा

# राजीव तांबे
यांची साहित्यसंपदा

















# ‘पपेट’वाला

**फारूक एस.काझी**



उबदार उन्हाची दुलई पांघरून थंडी हळूहळू हवेत भरू लागली होती. सूर्य अस्ताला जाऊन बराच उशीर झाला होता. पण अंधूक प्रकाश अजूनही वावरत होता. ऑक्टोबरची सुरुवात होऊन आठवडा उलटला होता. शमूचाचा हातात पुठ्ठ्यांचं बंडल घेऊन चालत होते. आज जरा उशीरच झाला होता त्यांना परत यायला. झपझप पाय उचलत ते चालत होते.

शमशुद्दीन नाव त्यांचं. सगळे त्यांना ‘शमूचाचा’ असंच म्हणायचे. आयुष्यभर चित्रकला आणि क्राफ्ट शिकवत आले. निवृत्त झाले, तरी छंद काही कमी झाला नाही. मूलबाळ नव्हतं. पण ते आणि त्यांची पत्नी फातिमा सुखी होते. पण हे सुख फार काळ टिकलं नाही.

छोटंसं घर... चार खोल्यांचं. एक बैठकखोली, एक स्वयंपाकघर, एक झोपण्याची खोली आणि एक स्टुडिओ. तिथे सगळे रंग, कागद, माती, पुठ्ठे पडलेले होते. भिंती चित्रांनी सजल्या होत्या. खिडकीला लावलेले छोटेछोटे घुंगरू वाऱ्याबरोबर मंद रुणझुणत होते. खिडकीला पडदा होता, तो बायकोच्या दुपट्ट्याचा. तिची आठवण म्हणून लावलेला. कोरोना काळात फातिमाबी आजारी पडल्या आणि अल्लाहला प्याऱ्या झाल्या. शमूचाचा एकाकी झाले. खूप एकटे पडले.

पुठ्ठ्यांचे पपेट्स तयार करण्याची कल्पना त्यांच्या एका मित्राने त्यांना दिली. प्रयत्न करून पाहू असं ठरवून त्यांनी त्यासाठी लागणारा पुठ्ठा आणि इतर साहित्य शहरातून विकत आणलं. तेच साहित्य घेऊन ते परतत होते. पाय दुखत होते. घर जवळ आलं आणि त्यांनी कुलूप काढून बैठकखोलीतच बैठक मारली. पडल्यापडल्या झोप लागली. पहाटे कधीतरी त्यांना थंडी वाजू लागल्याने जाग आली. ते उठले. आणलेलं साहित्य तसंच पडून होतं. त्यांनी ते उचललं, स्टुडिओत आणून ठेवलं. तोंड धुऊन गरम-गरम चहा घेतला. एव्हाना पहाट झाली होती. फजरची नमाज पढून त्यांनी पुठ्ठे बाजूला काढले. काही आकार आखून घेतले. कात्रीने ते कापून त्यांना जोडून पाहिलं. उंदीर तर तयार झाला होता. हवी तशी हालचाल करणारा. थोडं काम बाकी होतं. ते सकाळी करू असं ठरवून ते झोपायला गेले.

नऊ वाजून गेले, तरी चाचा उठले नाहीत. बिना-शेपटीच्या उंदराने दोन-तीन चकरा मारल्याच. अखेर चाचा स्टुडिओत आले. पाहतात, तर उंदीर जागेवर नाही. ‘असं कसं झालं?’ त्यांनी इकडे-तिकडे पाहिलं. बरीच शोधाशोध केल्यावर शेवटी टेबलाच्या मागे निवांत बसलेला दिसला. ‘हा इथं कसा आला?’ माथ्यावर आठ्या पाडत त्यांनी स्वत:लाच विचारलं. शेवटी, उंदराला टेबलावर घेऊन त्यांनी उरलेलं काम पूर्ण केलं. उंदराला शेपटी लावली. थोडी रंगरंगोटी केली. आता खराखुरा उंदीर दिसू लागला होता.

उंदीर खूश झाला. त्याला शेपटी मिळाली. सकाळी मोठा बोका खिडकीतून आत आला होता. त्याला घाबरून आपण टेबलामागे लपलो होतो, हे चाचांना कसं सांगणार? इथे एकही बीळ नाही. मग टेबल आला कामाला. उंदीर शेल्फवर ठेवून चाचा बाहेर गेले.

अंघोळ, न्याहरी उरकून पुन्हा स्टुडिओत आले. आता मांजर तयार करू, असा विचार करून ते कामाला लागले. संध्याकाळ होईतोवर मांजर तयार झालं. त्यांनी मित्राला बोलावलं आणि काम दाखवलं. मित्र खूश झाला. ‘आता तू यांचे कार्यक्रम सुरू कर. पपेट शो. तुझा वेळही जाईल आणि आवडीचं कामही करायला मिळेल.’ चाचांना सल्ला आवडला. दोघं नमाजासाठी बाहेर पडले.

इकडे मांजराने उंदराचा पाठलाग सुरू केला. उंदीर जीव मुठीत घेऊन पळत होता. लपून बसावं, तर अशी जागा सापडेना. अखेर, चाचा बाहेरून आले आणि मांजर जागीच खिळून गेलं. उंदराने सुटकेचा श्वास घेतला. चाचा आत आले, तेव्हा घरतल्या वस्तू इकडे-तिकडे विस्कटलेल्या दिसल्या. ‘आता हे कुणी केलं?’ त्यांना प्रश्न पडला. वैतागत का होईना; सगळं साहित्य व्यवस्थित लावून चाचा स्टुडिओत आले. मांजरासाठी ठेवलेल्या जागेवर ते नव्हतं. त्यांनी वैतागून ते जागेवर ठेवलं. त्यावर थोडं काम केलं आणि झोपायला गेले. इकडे मांजर पुन्हा उंदराला पकडायला धावू लागलं. उंदराने एक शक्कल लढवली. तो सरळ चाचांच्या खोलीत गेला. मांजराने तिकडे जायचं काही धाडस केलं नाही. उंदीर शांतपणे चाचांच्या रजईत घुसून झोपी गेला.

सकाळी चाचा उठले, तेव्हा ‘उंदीर रजईत कसा आला?’ हा प्रश्न त्यांना पडला. गेल्या एक-दोन दिवसांत घरात चित्रविचित्र घटना घडत होत्या. चाचा कोड्यात पडले होते. इतक्यात, त्यांना दारात मांजर दिसलं आणि त्यांचे डोळे पुरते विस्फारले! आपण पुठ्ठ्याचं केलेलं मांजर? आणि चालत इथवर आलंय? म्हणजे, हा उंदीर त्याला घाबरून इथे येऊन झोपलाय तर? बापरे! हा काय प्रकार! जादूटोणा तर नाही?

‘‘नाही, जादू वगैरे काही नाही. तुम्ही आम्हाला जीवन दिलंय.’’ उंदीर खाली उतरत बोलला.

‘‘मी? पण मी तर पुठ्ठ्यांचा वापर केलाय. निर्जीव वस्तू सजीव कशा होतील?’’ चाचांचा अजूनही गोंधळ उडालेला होता.

‘‘हा हा हा, कलाकाराची कला निर्जीव कशी असेल? तुम्ही आम्हाला जीवन दिलंय. तुम्ही एकटे होता. आता आम्ही आलो. आता आपण सोबत राहायचं.’’ उंदीर बोलला आणि उड्या मारत बाहेर निघून गेला. चाचा अजून गोंधळलेलेच होते. त्यांनी आवराआवर केली आणि एका शाळेत पपेटचा कार्यक्रम करण्यासाठी गेले. त्यांनी उंदीर आणि मांजराची गोष्ट सांगितली. मुलांना धम्माल मजा आली.

‘‘चाचा, आता कुत्रा, ससा आणि सापपण तयार करा. आम्हाला त्यांची गोष्ट ऐकायची आहे.’’ मुलांनी आग्रह केला. चाचा तयार झाले. पण उंदीर आणि मांजर मात्र पुरते हादरून गेले.

‘‘चाचा, ते कुत्रा आणि साप नाही तयार केला, तर चालणार नाही का?’’ उंदराने दबकत-दबकत विचारलं.


‘‘का रे? काय हरकत आहे?’’

‘‘नाही; पण कुत्रा या मांजराला आणि साप मला खाऊन टाकेल ना! म्हणून.’’ चाचा यावर खूप हसले.

‘‘म्हणजे तुझ्यात आणि मांजरात तह झाला तर?’’ चाचा हसले. मांजर आणि उंदीरही हसले.

चाचांनी एक ससा तयार केला आणि कासवही तयार केलं. ते त्यांची गोष्ट सांगू लागले. मासे तयार केले आणि ‘अत्तू-फत्तूची’ गोष्ट सांगू लागले. चाचा आता एकटे नव्हते. त्यांच्या सोबतीला भरपूर प्राणी आणि पक्षीही आले होते. त्यांच्या पपेट-शोमुळे मुलं त्यांना ‘पपेटवाले चाचा’ असं म्हणू लागली होती. चाचा खूश होते. आवडतं काम आणि सर्व जीवांची सोबत.

एकदा गोष्ट सांगताना उंदीर रडू लागला. मुलांना नवल वाटलं. पुठ्ठ्याचा उंदीर रडला कसा? पण चाचांनी सर्वांना शांत केलं, ‘‘मुक्या जीवांना काही कळो ना कळो, प्रेम आणि राग खूप लवकर कळतो.




लक्ष्मण माने यांनी अनिल अवचट यांचं रेखाटलेलं भावपूर्ण व्यक्तिचित्र

ebook available

**अनिल**


लक्ष्मण माने
किंमत : ₹ २८०

## रामदास भटकळ पुरस्कार


### मटा-पॉप्युलर लोकप्रिय पुस्तके स्पर्धा

### मेहता पब्लिशिंग हाऊस

स्वातंत्र्योत्तर प्रकाशित पुस्तकांमध्ये सर्वाधिक वाचली जात असलेली
आणि वाचकांच्या पसंतीला उतरलेली पुस्तके




**मृत्युंजय**
शिवाजी सावंत
द्वितीय क्रमांक




**स्वामी**
रणजित देसाई
तृतीय क्रमांक

आपण ठरवायचं प्रेम द्यायचं की वेदना? प्रेम दिलं, तर पुठ्ठ्याचा उंदीरही रडतो.'' यावर मुलं गोडसं हसली. चाचांनी उंदराला छातीशी धरलं.

चाचा आता साप तयार करण्याच्या विचारात होते. काय घडेल ते पाहू तरी... असं त्यांना वाटत होतं. रात्री सगळे प्राणी आपआपसांत चर्चा करू लागले. कासव आणि मासे गहन चर्चा करत होते. इतक्यात उंदीर तिथे आला.

''काय भाई लोग, काय एवढा सिरीयस विषय सुरू आहे?''

कासवाने संथपणे उंदराकडे पाहून घेतलं आणि हळूहळू बोलू लागलं, ''चाचा आता साप तयार करणार आहेत. त्यांना साप आणि उंदराची गोष्ट सुचलीय.'' हे ऐकताच उंदराने टुणकन उडीच मारली. आता आपली खैर नाही. तो तडक चाचांच्या खोलीत गेला. चाचा झोपलेले होते.

''तुम्ही साप तयार करणारेय का?'' उंदीर फुगऱ्या आवाजात बोलला.

''विचार करतोय. पण नक्की नाही. माझी तब्येत बरी नाही.''

''काय झालं?'' उंदीर जवळ आला. ताप पाहिला. अंग भाजत होतं, ''डॉक्टरांना फोन करू का? का दवाखान्यात घेऊन जाऊ?''

चाचा यावर मलूल हसले. एक निर्जीव जीव... त्याने एवढी माया करावी?

''काळजी करू नको. औषध घेतलंय. तुम्ही लोक निश्चिंत राहा. मी साप नाही तयार करणार. तुमचा आनंद तो माझा आनंद.''

उंदीर खूश होऊन परत गेला. सगळे जण काळजीत होते. सकाळी चाचा स्टुडिओत आले नाहीत. तेव्हा काळजीत पडलेले सगळे पुठ्ठ्यांचे जीव चाचांच्या खोलीत आले. पण चाचा तिथेही नव्हते. त्यांना इकडे-तिकडे पाहिलं. उंदराने सगळा परिसर पिंजून काढला. पण ते कुठेच दिसले नाहीत. डॉक्टरकडे गेले असतील असं वाटून ते शांत झाले. आणि बैठकीच्या खोलीतच बसून राहिले.

दार वाजलं, तसे सर्व उठून बसले. चाचांचे मित्र आले होते. सगळ्यांना काळजीत बघून ते म्हणाले, ''काळजी करू नका. तो आता ठीक आहे. तुमचं प्रेम मिळालं आणि तो नव्याने जगायला शिकला. तुमचा आनंद त्याने आपला आनंद मानला.'' सर्वांना थोडं बरं वाटलं.

चाचांच्या मित्राला जेव्हा सगळे निर्जीव जीव बोलतात, फिरतात, हसतात, रडतात हे कळलं होतं, तेव्हा त्यांना आश्चर्याचा खूपच जोरदार धक्का बसला होता. पण चाचा आणि त्यांचं नातं पाहून ते खूश झाले होते. आपला मित्र आता एकटा नाही, याचा त्यांना जास्त आनंद वाटत होता. आणि तेपण सर्वांचे मित्र झाले होते.

दोन-तीन दिवसांनी चाचा परत आले. त्यांची तब्येत बरीच खालावली होती. ते खूप अशक्त झाले होते. उंदीर धावतच आला. सश्याने गळ्याला हात लावून पाहिलं. ताप नव्हता. आता सगळे जण कामाला लागले. सर्वांनी आपापली कामं वाटून घेतली आणि चाचांची सेवा सुरू केली. हळूहळू त्यांना बरं वाटू लागलं. चाचा आता ठणठणीत बरे झाले. ''तुम्ही सर्वांनी माझी खूप सेवा केली. तुमचं प्रेम खूप मोलाचं आहे माझ्यासाठी. तुमचे आभार कसे मानू तेच कळेना.'' चाचा गहिवरून म्हणाले.

''चाचा, आभार कशासाठी मानता? आम्ही काय परके आहोत का? आम्ही तुमचं स्वप्न आहोत. कुणीतरी तुमच्याजवळ पाहिजे होतं. तुम्ही आम्हाला जन्म दिला. आम्ही जिवंत होऊन तुमचं स्वप्न पूर्ण करतोय. तुम्ही आमचं स्वप्न पूर्ण केलं. आम्हाला आकार दिला. तुम्ही आहात तोवर आम्ही आहोत. तुम्ही नाही, तर आम्हीही नाही.'' असं म्हणून उंदीर चाचांच्या गळ्यात पडून रडू लागला. बाकी सर्व जण भोवती जमा झाले. चाचांच्या डोळ्यांत पाणी होतं आणि चेहऱ्यावर हसू.

✪




The thrilling story of Chhatrapati Sambhaji Maharaj's bravery, achievement and sacrifice...

ebook available


CHHAAVA


Shivaji Sawant | Translation: Kadambini Dharap


Price: ₹ 899


# डॅन ब्राऊन
## यांचे अनुवादित साहित्य


२५ वर्षांची परंपरा


















ebook available


सात लोकप्रिय अनुवादांनंतर डॅन ब्राऊन यांचे
'द सीक्रेट ऑफ सिक्रेट्स' हे आठवे पुस्तक लवकरच वाचकांच्या भेटीला...





# सुधा मूर्ती
## यांचे अनुवादित साहित्य


२५ वर्षांची परंपरा


ebook available
























# ते देशासाठी लढले...

**एकनाथ आव्हाड**



आई सकाळचं वर्तमानपत्र शांतपणे वाचत बसली होती. तेवढ्यात, बाळू त्याचा स्काऊटचा शर्ट हातात घेऊन आईपाशी आला. घाईघाईनेच त्याने आईला विचारलं, ''ए आई, सुई-दोऱ्याचा डबा कुठाय गं? नेहमीच्या जागी दिसत नाही. कुठे ठेवलाय सांगशील का?'' वर्तमानपत्रात घातलेली मान वरती न करताच आई म्हणाली, ''अरे, असेल तिथेच कुठेतरी. नीट शोध म्हणजे सापडेल.

''अगं नीटच शोधलं. पण नाही सापडत. सांग ना पटकन.'' आईने आता पेपरमध्ये घातलेली मान वर केली आणि जरा वैतागूनच विचारलं, ''आता सकाळीच कशाला हवाय सुई-दोरा तुला? आत्ताच बसलेय ना पेपर वाचायला. आधी महत्त्वाच्या बातम्या तरी वाचू दे मला.'' असं म्हणून पुन्हा आपली मान पेपरमध्ये घालून ती पेपर वाचू लागली. बाळू काहीशा नाराजीच्या सुरातच म्हणाला, ''अगं हे बघ, माझ्या स्काऊटच्या शर्टाची दोन बटणं तुटलीयंत.'' आईने पेपरमध्ये घातलेली आपली मान पुन्हा वर करून एकवार त्याच्याकडे आणि त्याच्या स्काऊटच्या शर्टाकडे पाहिलं आणि ती म्हणाली,''दे तो शर्ट इकडे. मी देते पटकन लावून बटणं.'' बाळू म्हणाला, ''अगं, तू वर्तमानपत्र वाचायला आत्ताच बसलीस ना? तू वाच. त्यात माझा व्यत्यय नको. मला फक्त सुई-दोऱ्याचा डबा कुठे आहे तेवढं सांग. मग मी करतो माझं काम. अगं, आमच्या स्काऊटचं ब्रीदवाक्यच आहे- 'सदैव तय्यार' आणि आम्ही प्रत्येक स्काऊट असतो स्वावलंबी. स्वतःचं काम स्वतःच करणार आणि मला येतात बरं शर्टाला बटणं लावायला. स्काऊटमध्ये शिकवलंय आम्हाला. तुला आज दाखवतो बघ शर्टाला छान बटणं लावून.'' आई म्हणाली, ''हे तर भारीच झालं! पण मला सांग, तुझा स्काऊटचा कॅम्प वगैरे जाणार आहे का काय?'' बाळू उत्साहाने म्हणाला, ''कॅम्प नाही गं, आता पंधरा ऑगस्ट जवळ आलाय ना. स्वातंत्र्यदिनाला आमच्या शाळेत स्काऊट पथकाचं संचलन आहे. मी स्काऊट पथकाचा कप्तान आहे ना, म्हणून मीच या संचलनाचं नेतृत्व करणार आहे.'' आई म्हणाली, ''वाह बाळू! फारच छान! अभिमान वाटतो मला तुझा. काल ना, शमीनेच घेतला होता बघ सुई-दोऱ्याचा डबा. तिनेच तो पुस्तकांच्या रॅकवर किंवा तिथेच आजूबाजूला कुठेतरी घाईने ठेवला असेल. थांब, मीच शोधून देते तुला सुई-दोऱ्याचा डबा.''

''तू बस बरं इथेच. मी पाहतो.'' बाळू लगेच आतल्या खोलीत पळाला. थोड्याच वेळात, 'युरेका-युरेका' असं शोध लागल्यासारखं बडबडावं तसा तो, 'मिळाला-मिळाला' असं म्हणतच सुई-दोऱ्याचा डबा घेऊन बाहेर आला. आईजवळच बसून तो सुई-दोऱ्याने शर्टाला बटण लावत होता. आईने पाहिलं, बाळूचे हात सराईतपणे शर्टाला बटण लावत होते. तिला आनंद झाला. पेपर वाचनात ती पुन्हा गढून गेली. पेपर वाचतावाचता एका बातमीने तिचं लक्ष वेधून घेतलं.

'अतिरेक्यांशी लढताना कौस्तुभ राणे शहीद... उत्तर काश्मीरच्या बांदीपोरा जिल्ह्यातील गुरेज सेक्टरमध्ये, भारतीय लष्कराने

दहशतवाद्यांविरोधात केलेल्या मोठ्या कारवाईत महाराष्ट्राचे सुपुत्र मेजर कौस्तुभ राणे यांना वीरमरण आले.' आईने संपूर्ण बातमी वाचली. बातमी वाचतावाचता तिचे डोळे पाणावले. बाळूच्या लक्षात आलं, की आईचे डोळे भरून आलेत. त्याने विचारलं आईला, ''काय झालं गं आई?'' आईने मग बाळूला संपूर्ण बातमी वाचून दाखवली. आई-वडिलांचा एकुलताएक मुलगा. सैनिक होऊन देशाची सेवा करण्यासाठी तत्पर असलेला. आई-वडिलांनी मग ठरवूनच मुलाला देशसेवेसाठी सैन्यात पाठवलं आणि आज त्याला लढतालढता वीरमरण आलं. बाळूही या बातमीने आतून हळहळला. तेवढ्यात, दुकानातून वाणसामान आणण्यासाठी गेलेली शमी घरी आली. सामानाची पिशवी टेबलावर ठेवून ती बाळू आणि आईच्या संवादात सामील झाली. तिलाही ही बातमी ऐकून खूप वाईट वाटलं.

आई म्हणाली, ''बाळू; शमू, ही बातमी वाचून कविवर्य वि.म.कुलकर्णी यांच्या कवितेच्या ओळी आठवल्या मला...

'ते देशासाठी लढले, ते अमर हुतात्मे झाले
सोडिले सर्व घरदार, त्यागिला मधुर संसार
ज्योतीसम जीवन जगले, ते देशासाठी लढले...'



तुम्हाला माहीत आहे का बाळांनो, आपण आता स्वातंत्र्यदिन मोठ्या आनंदात साजरा करतो. पण लक्षात ठेवा, आपल्याला हे स्वातंत्र्य सहजासहजी इंग्रजांच्या तावडीतून मिळालं नाही. त्यासाठी माझं सांत्वन करण्याची काहीच गरज नाही. उलट, आता माझा मधला मुलगा इंग्रजांशी लढा देईल. त्याच्या मोठ्या भावाची अपूर्ण राहिलेली कामगिरी आता तो पूर्ण करील. व्यर्थ न हो बलिदान.''


बायका आल्या, तशा त्या निघून गेल्या. त्या माउलीचे देशाविषयीचे विचार त्यांच्या मनात घर करून राहिले. आता त्या आईचा मधला मुलगा इंग्रजांविरुद्धच्या क्रांतिकारक लढ्यात सामील झाला. नंतरच्या काही महिन्यांतच हा मधला मुलगा इंग्रजांच्या बेछूट गोळीबारात मृत्युमुखी पडला. देशासाठी शहीद झाला. आजूबाजूच्या बायका पुन्हा त्या मातेचं सांत्वन करण्यासाठी घरी आल्या. ती माता पुन्हा म्हणाली, ''माझ्या दोन पुत्रांना भारतमातेला स्वतंत्र करताना वीरमरण आलं. शेवटच्या श्वासापर्यंत ते लढले; पण इंग्रजांना शरण गेले नाहीत, याचा मला अपार आनंद आणि अभिमान वाटतो. मी धन्य झाले. अजून माझा धाकटा मुलगा आहे की! आता तो उडी घेईल या स्वातंत्र्य-संग्रामात. माझं आताही सांत्वन करण्याची खरंच गरज नाही.'' बायका काहीबाही बोलत, कुजबुजत निघून गेल्या.



त्या आईचा आता सर्वांत धाकटा मुलगा इंग्रजांविरुद्धच्या लढ्यात सामील झाला. मात्र वर्षभरातच तो इंग्रजांच्या हाती लागला. गुप्त क्रांतिकारक संघटनेत होता तो. 'जयहिंद', 'वंदे मातरम्'चा जयघोष करत हसतहसत तो फासावर चढला. त्या मातेला ही गोष्ट कळली. तशी शेजाऱ्यांनाही कळली. आता पुन्हा त्या शेजारच्या


२५ वर्षांची परंपरा

व्यंकटेश माडगूळकर
यांची साहित्यसंपदा







ebook available

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!




ebook **available on :**

amazonkindle

Get it on Apple Books

Google Play Books

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

# टी बुक क्लब ३६

**सभासद फी ५० रु.**

सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा! या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

## टी बुक क्लब ३६मधून प्रकाशित होणारी पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| **द लिटिगेटर्स** | जॉन ग्रिशॅम | अनु. अशोक पाथरकर | ₹ ८०० |
| **स्पाय मास्टर** | ब्रॅड थॉर | अनु. माधव कर्वे | -- |
| **कोड टू झिरो** | केन फोलेट | अनु. प्रसाददत्त गाडगीळ | -- |
| **ललबाय टाऊन** | रॉबर्ट क्रेझ | अनु. सुरेश देशपांडे | -- |
| **टर्न अ ब्लाइंड आय** | जेफ्री आर्चर | अनु. सविता दामले | -- |
| **द सीक्रेट ऑफ सीक्रेट्स** | डॅन ब्राऊन | अनु. निखिलेश चित्रे | -- |


अनेक लहान-थोर, स्त्री-पुरुष सर्वांनीच इंग्रजांविरुद्ध निकराचा लढा दिला. तन-मन-धन अर्पून देशसेवा केली. प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती दिली. मला ना, माझ्या लहानपणी वाचलेली एक घटना आज लख्ख आठवतेय. 'देश हाच देव' मानणाऱ्या एका बाईची. स्वातंत्र्यपूर्व काळातील ही हकिकत. त्या बाईचं नाव-गाव ठाऊक नाही. घटना खरी-खोटी माहीत नाही. पण त्या घटनेतील तपशील मात्र मला खूप महत्त्वाचा वाटतो. ती बाई एक आईच होती. तीन मुलं पदरात तिच्या. तिचे पती अकाली वारले. त्या माउलीने आपल्या तिन्ही मुलांचा सांभाळ मोठ्या जिद्दीने आणि हिमतीने केला. मुलांना चांगलं शिकवलं. उत्तम संस्कार दिले आणि महत्त्वाचं म्हणजे, इंग्रजांची जुलमी राजवट उलथवून टाकण्याचं बाळकडूही पाजलं. मुलं मोठी झाली. कर्तबगार झाली. आईचे कष्ट मुलांनी जाणले. आता आपल्या आईला आपण सुखात ठेवू हीच अभिलाषा त्यांच्या मनी. त्या माउलीला हे कळताच ती मुलांना म्हणाली, ''मला सुखात ठेवण्यापेक्षा, आपल्या सर्वांचीच जी आई आहे, ती आपली भारतमाता, तिला सुखात ठेवणं, पारतंत्र्याच्या जोखडातून तिला मुक्त करणं, हे अधिक गरजेचं आहे मुलांनो.'' मोठा मुलगा म्हणाला, ''आई, मी स्वातंत्र्य-संग्रामात सामील होतो.'' आईने त्याची आनंदाने पाठवणी केली. सशस्त्र क्रांतिकारी संघटनेत मोठा मुलगा सामील झाला. इंग्रजांवर हल्ले करणं, त्यांच्या योजना उद्ध्वस्त करणं यांसारख्या अनेक गोष्टी त्याने निडरपणे केल्या. एका कटात मात्र तो इंग्रजांच्या हाती लागला. इंग्रजांनी त्याला फासावर चढवलं. ही बातमी वाऱ्यासारखी जिकडे-तिकडे पसरली. त्या मातेपर्यंत पोहोचली. आजूबाजूच्या बायका त्या मातेचं सांत्वन करण्यासाठी घरी आल्या. तेव्हा ती माता म्हणाली, ''देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी माझा मुलगा इंग्रजांशी लढला. हुतात्मा झाला. याचं मला दुःख नाही. उलट, मनात समाधानच आहे. तेव्हा बायका आल्या आणि त्या मातेला म्हणाल्या, ''आता आम्ही आपल्या सांत्वनासाठी आलोय, हे तरी ठीक आहे ना?''

यावर ती वीरमाता उसासा टाकून म्हणाली,''बायांनो, या वेळी मात्र तुम्ही माझं सांत्वन कराच. कारण या वेळी मला खरोखरच खूप दुःख झालंय. पण माझा तिसरा मुलगाही देशासाठी शहीद झाला म्हणून नाही, तर आता यापुढे देशासाठी कामी यायला माझ्याकडे मुलगाच शिल्लक राहिलेला नाही, याचं मला खूप दुःख वाटतंय, म्हणून माझं सांत्वन तुम्ही कराच.'' आता मात्र त्या बायका एकदम अवाक् झाल्या. एकमेकींकडे पाहत राहिल्या. त्या मातेशी काय बोलावं- त्यांना उमगेचना. आलेल्या बायांनी त्या वीरमातेला वंदन केलं.

शेवटी, ती माताच धीराने आणि निश्चयाने म्हणाली, ''मी हातावर हात ठेवून आता गप्प बसणार नाही. कारण आता तर मला कसलीच अडचण नाही. आता मीच भारतमातेला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्याच्या आंदोलनात उडी घेणार. देशासाठी काही करण्याची संधी मला मिळतेय हे माझं परमभाग्य!'' एवढं बोलून ती वीरमाता निश्चयाने कमरेला पदर खोचून तडक घराबाहेर पडली.''

त्या थोर मातेची आणि तिची सुपुत्रांची कहाणी आई मनोभावे सांगत होती आणि बाळू व शमी जिवाचा कान करून ती कहाणी ऐकत होते. ऐकताऐकता ती कहाणी हृदयात साठवत होते. त्यांना वाटलं, 'खरंच धन्य ती वीरमाता आणि धन्य तिचे ते वीर सुपुत्र.'

✪


बाबासाहेबांच्या उमेदीच्या वर्षांचा सखोल पट मांडणारं
आणि बाबासाहेबांच्या जीवनातील अज्ञात घटकांवर
प्रकाश टाकणारं चरित्र

ebook available

**'बाबासाहेब' घडताना**

आकाश सिंग राठौर । अनु. उत्पल व. बा.
किंमत : ₹ ४५०



# डॉ. एस. एल. भैरप्पा

(२० ऑगस्ट १९३१ - २४ सप्टेंबर २०२५)

## समाजभान जपणारे संवेदनशील साहित्यिक

**डॉ. उमा विरुपाक्ष कुलकर्णी**

भैरप्पा आणि आमची १९८४ सालापासूनची ओळख. त्याला आता ४१ वर्षं झालीत. हे नातं टप्प्याटप्प्यावर सावकाशपणे बदलत गेलं. आमच्यातील स्नेह, मैत्रीचे संबंध या सगळ्यांतून हे नातं फुलत गेलं. या नात्यामध्ये खरंतर दोन टप्पे महत्त्वाचे मानता येतील- विरुपाक्ष गेल्यानंतरचा एक आणि विरुपाक्ष असतानाचा एक टप्पा. विरुपाक्ष असताना ज्या ज्या वेळेस भैरप्पा पुण्यात यायचे, त्या वेळेस नोकरीत असताना रजा घेऊन विरुपाक्ष घरी थांबायचे. आणि मलाही बरं पडत असे.

विरुपाक्ष गेल्यानंतर नागपूरचा एक कार्यक्रम होता. ही घटना २०२२मधली, नुकतेच सुनिलभाई गेले होते आणि त्यामुळे पुण्याचा दौरा भैरप्पा यांनी ठरवला होता. खरंतर, भैरप्पा बंगळूरवरून थेट नागपूरला जाऊ शकले असते, मात्र तसं न करता ते 'पुण्याला येतो' म्हणाले; मग 'पुढे आपण नागपूरला जाऊ या' असं म्हणाले. खऱ्या अर्थाने त्या वेळेस भैरप्पा भाणि माझ्यात समोरासमोर संवाद झाला. भैरप्पांना आम्ही आपल्या घरातील एक व्यक्ती, मोठा भाऊ असंच मानत होतो. आम्ही त्यांना आमच्या सर्वच गोष्टी शेअर करायचो. या वेळेस त्यांनी सगळे भावनिक चढ-उतार समजून घेतले. त्याकडे कसं बघितलं पाहिजे, हेही त्यांनी सांगितलं. खरंतर, आमच्या स्नेहपूर्ण नात्याला एक वळण या निमित्ताने मिळालं. याच वेळेस भैरप्पा यांनी मला 'मंद्र' कादंबरीच्या उडिया भाषेत झालेल्या अनुवादाचं मानधनही दिलं. तसं पाहायला गेलं, तर पुस्तकाचे कॉपीराइट होल्डर तेच होते.अनुवादकाचा त्यात काही विशेष असा संबंध येत नाही, तरीही 'मराठी कादंबरीवरून अनुवाद केला आहे, तर तुम्हाला मानधन दिलं पाहिजे' ही त्यांची भूमिका खूप काही सांगून गेली. हा त्यांच्यातील एक व्यक्तिविशेष म्हणावा लागेल.

आमचा नागपूरचा प्रवास कायम स्मरणात राहील, अशा स्वरूपाचा होता. त्या एकत्रित प्रवासात भैरप्पा, मी आणि माझी भावजय मंजिरी असे होतो. आमच्या त्यादरम्यान खूप गप्पा झाल्या. नागपुरात त्यांची मी मुलाखत घेतली. त्या मुलाखतीला नाटककार महेश एलकुंचवार आवर्जून उपस्थित होते. त्यासोबत डॉ. रविंद्र शोभणे व महेश एलकुंचवार या दोघांच्या घरी भैरप्पांनी भेट दिली. विरुपाक्ष असताना भैरप्पांच्या सोबत ते असायचे, तेच सर्व पाहायचे. या वेळेस पहिल्यांदा मी हे सर्व करत होते. हॉटेलवर आलेल्या वाचकांना, चाहत्यांना भैरप्पांसोबत संवाद साधण्यासाठी अनुवादिकेचं काम करणं. त्यांची आणि वाचकांची भेट घालून देणं. हे सर्व भैरप्पा पाहत होते. या सगळ्या गोष्टींना सहृदयपणे त्यांचा पाठिंबा होता.

पुण्यात 'मेहता पब्लिशिंग हाऊस'मध्ये 'गृहभंग' कादंबरीच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमासाठी भैरप्पा आले होते. त्यानंतर आमचा फोनवर बऱ्याचदा संपर्क होत असे. मात्र, या संपर्कावर मर्यादा होत्या- भैरप्पांचं वय, वार्धक्याचे प्रश्न, शारिरिक मर्यादा इत्यादी. मात्र, भैरप्पांचा आपणहून एखादवेळेस फोन आला, तर तो संवाद नेहमी चांगल्या स्वरूपाचा होत असे. भैरप्पा 'माणूस' म्हणून किती ग्रेट आहेत, याचा प्रत्यय कायम येत असे.

मागच्या वर्षी, जुलै २०२४मध्ये भैरप्पा पुण्यात आले होते. त्यांचे पुण्यात दोन कार्यक्रम, मुंबईला एक कार्यक्रम आणि मेहता पब्लिशिंग हाऊसमध्ये भेट असे कार्यक्रम ठरलेले होते. त्या वेळेस भैरप्पांसोबत सहना विजयकुमार आल्या होत्या. भैरप्पांचं वय पाहता; त्यांचं

पथ्यपाणी, औषधं सगळ्याच गोष्टी त्या पाहत होत्या. या टप्प्यावर बुद्धी तल्लख असते, मात्र शारीरिक मर्यादेमुळे काही प्रश्न निर्माण होतात. पूर्वी भैरप्पा पुण्यात आले, की रोज सकाळी चित्तरंजन वाटिकेत फिरायला जात असत. या वेळीही भैरप्पा पहाटे फिरायला गेले, सोबत सहना विजयकुमार होत्या. भैरप्पा सहनासोबत चित्तरंजन वाटिकेत फिरून आले. भैरप्पांना पुणे शहर, इथला परिसर, मेहता पब्लिशिंग हाऊस, सुनील मेहता गेल्याचं दुःख सारं काही आठवत होतं.

भैरप्पांच्या या वेळेसच्या सगळ्या कार्यक्रमांना उत्तम असा प्रतिसाद मिळाला. मुलाखत घेताना मी आणि सहना दोघीही सोबत होतो. मुलाखत घेत असताना सहना विजयकुमार यांची खूप मदत झाली. पुस्तकांबाबत बोलताना मला काही वाटत नसे. इतर संदर्भांसाठी म्हणजेच व्यक्तींची नावं, समकालीन संदर्भ यांसाठी सहना विजयकुमार होत्या. या सर्वच कार्यक्रमांची महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी चांगली दखल घेतली. भैरप्पांची महाराष्ट्रात असणारी लोकप्रियता पुन्हा एकदा अधोरेखित झाली. याकरता महाराष्ट्रातील भैरप्पांच्या वाचकांचे, चाहत्यांचे खरंतर विशेष आभार मानावे लागतील.

'डॉ. एस.एल. भैरप्पा फाऊंडेशन'कडून दिला जाणारा साहित्यसेवेतील योगदानाबद्दलचा पुरस्कार आम्हाला जाहीर करण्यात आला. बंगळुरू येथे २१ जानेवारी २०२५ रोजी पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम झाला. तो पुरस्कार विरुपाक्ष आणि मी असा दोघांसाठी पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. साहित्यक्षेत्रातील अनुवादाच्या योगदानाबद्दल हा पुरस्कार होता. फक्त भैरप्पांचीच पुस्तकं अनुवादित केली म्हणून नव्हे; तर इतर कन्नडसाहित्यातील साहित्य अनुवादित केलं, त्या सगळ्यांचा विचार करून हा पुरस्कार देण्यात आला. आम्हा दोघांबद्दल असलेला स्नेह, आदर व्यक्त करण्यासाठी हा पुरस्कार फाऊंडेशनने जाहीर केला. हा खूप मोठा भावनिक असा क्षण होता.

मागच्या वर्षी हा पुरस्कार डॉ. शांतकुमारी यांना देण्यात आला होता. या वर्षी आम्हा दोघांना देण्यात झाला. या पुरस्काराचं स्वरूप एक लाख रुपये रोख, मानपत्र व मोठं सन्मानचिन्ह न देता म्हैसूर सिल्कची भारीपैकी साडी असं पुरस्काराचं स्वरूप होतं. या कार्यक्रमात माझ्या साहित्यिक योगदानावर बोलण्यासाठी डॉ. अंजली जोशी यांना मुंबईहून खास विमानाने बोलावलं होतं. त्या उत्तम इंग्रजीत बोलणाऱ्या आणि चांगल्या वाचकही, त्यांनी 'काठ' आणि 'माझं नाव भैरप्पा' यांवर लिहिलेली परीक्षणं भैरप्पांनाही भावली होती. कार्यक्रमात देण्यासाठी जे मानपत्र तयार केलं गेलं, त्याचाही एक किस्सा सांगावासा वाटतो.



कार्यक्रमात जे मानपत्र दिलं गेलं, त्यावर असणारा मजकूर कन्नड आणि इंग्रजी यांमध्ये असावा, अशी योजना संयोजकांची होती. मात्र, त्या मानपत्रावर कन्नड आणि इंग्रजी यांसोबतच मराठी मजकूरही असावा हा व्यक्तिगत आग्रह नव्हे; तर हट्टच भैरप्पांचा होता. मराठी भाषेतपण मजकूर घेतला, तर सन्मानपर मजकूर जास्त लिहिता येणार नाही, अशी भूमिका संयोजक मांडत होते. मजकूर कमी असला तरी चालेल, मात्र मराठी भाषेत मजकूर यायलाच हवा, यासाठी भैरप्पा आग्रही होते. कार्यक्रमात दिलेल्या त्या मानपत्रावर तिन्ही भाषांतील मजकूर आहे.

भैरप्पांबद्दल अजून एक आठवण सांगावीशी वाटते. संतेशिवर हे भैरप्पा यांचं मूळ गाव. संतेशिवर गाव आणि आजूबाजूच्या पंचक्रोशीत पाण्याचं खूप दुर्भिक्ष्य निर्माण झालं होतं. त्या पाण्याच्या प्रश्नासाठी भैरप्पांनी 'लेखक' म्हणून असलेलं त्यांचं सगळं वजन सरकारदरबारी वापरलं. तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे मुख्यमंत्री व संबंधित अधिकाऱ्यांना भेटत राहून त्या पाणी-प्रश्नाचा पाठपुरावा केला. सगळ्या प्रयत्नानंतर संतेशिवर गावात आणि पंचक्रोशीमध्ये पाणी आलं. ही घटना फेब्रुवारी २०२५मधली.

त्यानंतर संतेशिवर गावात भैरप्पांचा मोठा सत्कार करण्यात आला. गावच्या तळ्यात नौकाविहार केला. त्या दिवशी सबंध गावात ते फिरले. त्यांना जुनी लोकं, त्यांची नावं, रस्ते सगळं आठवत होतं, त्या-त्या घरात असणारी सून, नातू यांना ते भेटले. सर्वसामान्यपणे क्लेशच वाट्याला





यायचा; त्या काळात ज्या लोकांनी आधार दिला, त्या प्रत्येक घरासमोर जाऊन त्या घरात असणाऱ्या प्रत्येकाशी भैरप्पा बोलत होते. जुन्या लोकांची नावानिशी आठवण करत ते बोलत होते. तुमच्या सासऱ्यांनी, आजोबांनी त्या काळात आधार दिला, मदत केली. कृतज्ञता भावनेने ते संवाद साधत होते. सोबत असणाऱ्या सहना विजयकुमार यांना ते सांगत होते, गावातील जुनी घरं, गोष्टी दाखवत होते. त्यांच्यासोबत बोलले. जन्मगावाबद्दल मनात असणारी आपुलकी, ममत्व व्यक्त करत होते. सहना विजयकुमार यांच्यासोबत ते संतेशिवर गावात त्या दिवशी फिरले.

'कुटुंबप्रमुख' म्हणून कुटुंबासाठी जी कर्तव्यं करायची असतात, ती भैरप्पांनी त्यांच्या नोकरीतून येणाऱ्या उत्पन्नातून केली. मुलांना चांगलं शिक्षण, त्यांची लग्नं, स्थिरावण्यात मदत ही सगळी कर्तव्यं त्यांनी पार पाडली. पुस्तकांच्या येणाऱ्या मानधनातून त्यांनी 'डॉ. एस.एल. भैरप्पा फाऊंडेशन'ची स्थापना केली. त्यामार्फत साहित्यसेवेसाठी एक पुरस्कार, गरजू विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षणापर्यंतची सोय या गोष्टी फाऊंडेशनमार्फत केल्या जातात. त्याचसोबत, कर्नाटकात जिल्हा पातळीवर साहित्यिक कार्यक्रमासाठी कुठली संस्था उत्सुक असेल, तर त्यांना मदतही दिली जाते. लेखक हा त्याने लिहिलेल्या साहित्यातून सांस्कृतिक, भान जसं जपत असतो, तसंच 'सामाजिक भान जपणारा संवेदनशील साहित्यिक' म्हणून डॉ. एस. एल. भैरप्पा या सर्व गोष्टींतून भेटत राहतात. या फाऊंडेशनला कुटुंबीयांचा विरोध असतानाही भैरप्पा यांनी 'समाजाचं आपण काहीतरी देणं लागतो' या भावनेतून स्थापन केलेल्या फाउंडेशनच्या माध्यमातून नवा आदर्श समाजासमोर घालून दिला आहे.

भैरप्पांचा अजून एक महत्त्वाचा व्यक्तिविशेष इथे नमूद करावासा वाटतो. भैरप्पा कुठल्याही साहित्यिक गटातटात सामील झाले नाहीत. स्वतःच्या वैयक्तिक फायद्याचा विचार न करता, प्रसंगी विरोध पत्करत वैयक्तिक मूल्य जपत आले. घनदाट जंगलात अजस्र सुळे असणारा मोठा हत्ती ज्या प्रकारे एकांडा वावरत असतो, त्या प्रकारे भैरप्पांचा साहित्यव्यवहारात वावर होता. भैरप्पा नैतिक विचाराने अखेरपर्यंत जगले, त्यांनी शिकवलेलं तत्त्वज्ञान, आणि तात्त्विक विचार यांचा तो भाग असावा. नैतिकता जपत व्यक्तिगत आयुष्य कसं जगता येऊ शकतं, याचा मोठा आदर्श यामधून घेता येईल. भैरप्पा त्यांचं आयुष्य वैयक्तिक नैतिकता जपत अखेरपर्यंत जगले. व्यक्तिगत नैतिकता जपणारा एक साहित्यिक आदर्श म्हणून भैरप्पा यांचं संपूर्ण जीवन माझ्या मनावर ठसलं आहे. हाच आदर्श एक साहित्यिक-अनुवादक म्हणून यातून घ्यावा, असं मला वाटतं.

✪


# डॉ. एस. एल. भैरप्पा


## यांची साहित्यसंपदा





### मराठीतील साहित्यपर्व अस्तंगत...

भैरप्पा हे मराठी लेखक आहेत, मात्र ते कन्नडमध्ये लिहितात अशी कर्नाटकात ओळख असणारे ज्येष्ठ साहित्यिक, पद्मभूषण डॉ. एस. एल. भैरप्पा यांना भावपूर्ण श्रद्धांजली










ebook
available




















# सु.ल. खुटवड यांची पुस्तके

ebook available


२५ वर्षांची परंपरा





किंमत : ₹ २६०





किंमत : ₹ २४०




किंमत : ₹ २६०





किंमत : ₹ ३००





किंमत : ₹ ३६०


# पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक युद्धावर आधारित पुस्तके



अडोल्फ हिटलरची भाषणे





'एआय'चा जनक अलन ट्युरिंग





ऑशविट्झचा फोटोवाला



ऑशविट्झच्या लहानग्या पोरी





डेझर्टर





पहिले जागतिक महायुद्ध





दुसरे जागतिक महायुद्ध





हिटलर आणि भारत




इनसाइड द गसचेंबर्स




लेनिनग्राडचा वेढा





नागासाकी





नाइट




शिंडलर्स लिस्ट



द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज



वॉर्सा ते हिरोशिमा




# पंचगंगेच्या तीरावरून

डॉ. जयसिंगराव पवार

या आत्मचरित्रातून जयसिंगराव पवार यांचं शालेय, महाविद्यालयीन, कौटुंबिक जीवन उलगडतं. त्यांचा संशोधनाचा, लेखनाचा, प्राध्यापकीचा प्रवास तपशिलाने उद्धृत केलेला दिसतो. त्या-त्या वेळच्या महत्त्वाच्या घटना (उदा. जेम्स लेन प्रकरण, दादाजी कोंडदेव प्रकरण इ.) काही ठिकाणी तपशिलाने तर काही ठिकाणी संक्षिप्तपणे नोंदवल्या आहेत. फुले-शाहू-आंबेडकर विचारसरणीने प्रेरित या व्यक्तिमत्त्वाच्या या आत्मचरित्रातून त्या-त्या वेळची राजकीय-सामाजिक उलगडते. त्यामुळे हे आत्मचरित्र एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरावा.

# २१. मी शाहूचरित्राकडे कसा वळलो!

राजर्षी शाहू महाराजांच्या चरित्राच्या अभ्यासाची सुरुवात एप्रिल १९८२ मध्ये झाली. एका स्थानिक संघटनेने शाहू महाराजांच्या कामगिरीवर माझं एक व्याख्यान आयोजित केलं होतं. व्याख्यान शाहू पुण्यतिथीनिमित्त (६ मे) होणार होतं. त्याची पूर्वतयारी म्हणून ॲड. पी. बी. साळुंखे यांनी संपादित केलेल्या 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथा'चं वाचन व त्यावरची टिपणं काढण्यास मी सुरुवात केली. आमचे मित्र डॉ. एस. एस. भोसले यांनी शाहू महाराजांची भाषणं 'क्रांतिसूक्ते' या नावाने संपादित केली होती. त्याही पुस्तकाचं वाचन मी सुरू केलं. बऱ्यापैकी तयारी झाल्यावर मी सुमारे तासभर भाषण केलं. हे माझ्या आयुष्यातील शाहू महाराजांवरील पहिलं भाषण होय.

कोल्हापुरातील जुन्या राजवाड्याच्या आतील भवानी मंडपात परंपरेने तिथीप्रमाणे शाहू जयंती साजरी होत असे. त्या वर्षी ३ जुलै रोजी शाहू जयंती आली. त्या प्रसंगी आयोजकांनी माझं भाषण ठरवलं होतं. हे माझं शाहू महाराजांवरील दुसरं भाषण.

आणि तिसरा प्रसंग आला तो शाहू महाराजांवरील व्याख्यानमालेचा (२१, २२, २३ जानेवारी, १९८५). मराठवाडा विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक असणारे डॉ. एस. एस. भोसले यांनी मला त्या वर्षीची मराठवाडा विद्यापीठाची 'राजर्षी शाहू व्याख्यानमाला' गुंफण्याचं निमंत्रण दिलं. विद्यापीठ स्तरावरची ही व्याख्यानमाला असल्याने मी ती स्वीकारावी, असं अनेक स्नेह्यांचं मत पडलं. त्याप्रमाणे मी डॉ. भोसल्यांना माझा होकार कळविला आणि मी शाहूचरित्राच्या अभ्यासाची कसून तयारी केली. या वेळी धनंजय कीरांचं 'शाहूचरित्र' मला फार मार्गदर्शक ठरलं.

गावामधील 'सरस्वती भवन' या ठिकाणी व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षपदी ख्यातनाम साहित्यिक डॉ. यु. म. पठाण होते, तर श्रोत्यांमध्ये प्रा. भगवंतराव देशमुखांसारखी जाणकार व प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. शाहूचरित्राचा एक अभ्यासक म्हणून मी व्याख्यानास उभा राहिलो. माझ्या पहिल्या व्याख्यानाचा विषय होता, 'राजर्षिंचे वेदोक्त प्रकरण : एक सामाजिक संगर.' यामध्ये मी कोल्हापुरात उद्भवलेल्या वेदोक्त प्रसंगाची पार्श्वभूमी प्रो. विजापूरकर-लो. टिळक यांच्याशी झालेला शाहूराजांचा संघर्ष, वेदोक्ताचे साद-पडसाद, क्षात्रजगद्गुरुपदाची निर्मिती इत्यादींचा ऊहापोह केला.

दुसरं व्याख्यान 'राजर्षी शाहू : दलितांचा राजा' यावर होतं. त्यामध्ये महाराजांनी दलितांच्या उद्धारासाठी उचललेल्या क्रांतिकारी




*मराठवाडा विद्यापीठाच्या 'राजर्षी शाहू महाराज व्याख्यानमाले'त प्रथम पुष्प गुंफताना :*
*या व्याख्यानमालेपासूनच मी शाहू चरित्राच्या अभ्यासाकडे वळलो. व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून ख्यातनाम साहित्यिक डॉ. यु. म. पठाण व वृत्तविद्या विभागाचे प्राध्यापक डॉ. सुधाकर पवार (२१ जानेवारी, १९८५)*

पावलांचं विवेचन केलं होतं. दलित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, महार वतन बरखास्ती, हजेरी माफी, अस्पृश्यता निवारणाचे हुकूम, सरकारी व खासगी खात्यांत नोकऱ्या, माहूत, कार ड्रायव्हर, हुलेस्वार, पोलीस, सुरक्षारक्षक, तलाठी म्हणून नेमणुका ही क्रांतिकारी पावलं होती.

तिसरं व्याख्यान 'राजर्षी शाहू : एक समाजक्रांतिकारक' या नावाने झालं. यामध्ये महाराजांच्या पुरोगामी धोरणांचा व कार्याचा वेध घेतला होता. विशेषत:, 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' हे जाणून महाराजांनी आपल्या राज्यात मोफत व सक्तीचं प्राथमिक शिक्षण सुरू केलं. उच्च शिक्षण संपादण्यासाठी कोल्हापुरात यण्र्येाााा विद्यार्थ्यांसाठी जातिनिहाय वसतिगृहं स्थापन केली. जातिभेद निर्मूलनासाठी आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला इत्यादी सुधारणांचं परिशीलन या व्याख्यानात झालं. शाहू महाराज खऱ्या अर्थाने राष्ट्रपुरुष होते; कारण त्यांनी धर्म, पंथ, प्रांत यांपेक्षा 'राष्ट्र' मोठं मानलं. धर्मनिरपेक्षतेचा पुकारा केला. अशा प्रकारे त्यांनी उच्च कोटीच्या राष्ट्रवादाचा पुरस्कार करून एक प्रकारे स्वातंत्र्य चळवळीला पूरक अशी भूमिका घेतली.

खरं सांगायचं, तर या व्याख्यानमालेच्या निमित्ताने मी राजर्षी शाहूंच्या अभ्यासाकडे वळलो. त्या वेळी कोणी मला सांगितलं असतं की, पुढच्या आयुष्यात 'शाहू' हा तुमच्या अभ्यासाचा, संशोधनाचा व लिखाणाचा एक मुख्य विषय राहील, तर मी त्यावर विश्वास ठेवला नसता. पुढे चार वर्षांनी या व्याख्यानमालेची पुस्तिका 'राजर्षी शाहू : एक दृष्टिक्षेप' या नावाने प्रसिद्ध केली. ती हातोहात संपली. ही पुस्तिका म्हणजे माझ्या राजर्षी शाहूंवरील अभ्यासाचं पहिलं फलित!- (१९८२-८५).

## २२. क्रांतिसिंह नाना पाटील स्मृतिग्रंथ

१९८२ सालच्या मे महिन्याची संध्याकाळ. मी व सुधा घराच्या व्हरांड्यात बसलो होतो. आमच्यासमोर जोतिबा व दिनकर ही नुकतीच एम. ए. झालेली गावाकडची मुलं बसली होती. गावाकडच्या गोष्टी निघाल्या. दिनकर, नाना पाटलांचे सहकारी तांबटकाकांच्या कूंडलच्या वसतिगृहात मॅट्रिकपर्यंत शिकलेला. तेव्हा या गप्पागोष्टींची गाडी नाना पाटील, प्रतिसरकार, जी. डी. बापू, कूंडल इथपर्यंत केव्हा पोहोचली हे समजलंच नाही. प्रतिसरकारची राजधानी कूंडल आमच्याच परिसरातील. लहानपणापासून क्रांतिसिंहांच्या अद्भुत कहाण्या कानांवर पडलेल्या. स्वाभाविकच त्यांचं चरित्र हा आमच्या जिव्हाळ्याचा विषय होता.

गप्पागोष्टी ऐन रंगात आल्या असताना एखादी विघुल्लता चमकावी, त्याप्रमाणे माझ्या डोक्यात क्रांतिसिंहांच्या स्मृतिग्रंथाची कल्पना येऊन गेली. क्रांतिसिंहांना दिवंगत होऊन फार काळ लोटला नव्हता. त्यांच्या हयातीत अप्पासाहेब लाड व डॉ. उत्तमराव पाटील यांनी लिहिलेल्या एका लहानशा चरित्राशिवाय त्यांचं दुसरं चरित्र कोणी लिहिलेलं नव्हतं. त्यांच्या चरित्राची साधनंही आता दुर्मिळ होत चालली होती. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे सहकारी, त्यांचे समकालीन विचारवंत व त्यांना पाहिलेली पिढी आता अस्तमानाकडे कलली होती. सुदैवाने त्यांचे अनेक सहकारी व विचारवंत अघापि हयात होते. त्यांची क्रांतिसिंहांच्या कामगिरीविषयीची मतं, निरीक्षणं व मूल्यमापनं आताच ग्रथित करणं आवश्यक आहे, हा क्षणा सुटला तर काळ आम्हास क्षमा करणार नाही, अशी भावना या वेळी माझ्या मनात निर्माण झाली.

खरंतर स्मृतिग्रंथाच्या निर्मितीचं हेच प्रयोजन होतं. या विचाराने उल्लसित होऊन मी ठरवलं की, आपण क्रांतिसिंहांचं समग्र




सभोवतालची चराचर सृष्टी, भेटलेली माणसे, भाषा, आयुष्याची लय यातून उलगडत गेलेल्या जीवनाचा, घडत गेलेल्या माणसाचा आणि साकारत गेलेल्या लेखकाचा स्मृतिपट

**डाव मांडला...**

ध्रुव भट्ट । अनु. सुषमा शाळिग्राम
किंमत : ₹ ३९५

ebook available

दर्शन घडविणारा महाग्रंथ तयार करायचा. असा ग्रंथ की, ज्यात त्यांचं चरित्र, त्यांची कामगिरी, तिचं समकालीन मूल्यमापन, त्यांच्या आठवणी व त्यांच्या चरित्राची साधनं, अशा बहुविध सामग्रीचा संग्रह असेल आणि जो केवळ चरित्रग्रंथ न राहता तो एक क्रांतिसिंहांच्या चरित्राचा साधनग्रंथ बनेल. ज्यात भविष्यातील कोणाही इतिहासकाराला क्रांतिसिंहांचं चरित्रलेखन करताना अथवा प्रतिसरकारचं इतिहासलेखन करताना या ग्रंथाला नमस्कार करूनच पुढे जावं लागेल. त्यासाठी कितीही कष्ट पडोत, कितीही पैसा लागो, आपण कुठेच कमी पडायचं नाही, असा निग्रहही मी त्या क्षणी केला. मग 'शुभस्य शीघ्रम्' या उक्तीप्रमाणे ग्रंथनिर्मितीच्या कार्यास लगेच दुसऱ्या आठवड्यात प्रारंभही केला.


स्मृतिग्रंथातील लेखक म्हणून आम्ही च्या१२५ वर मान्यवर व्यक्तींशी संपर्क साधला. त्यात क्रांतिसिंहांचे केवळ सहकारीच होते असं नाही, तर त्यात विविध पक्षांचे नेते, समकालीन विचारवंत, अभ्यासक व साहित्यिकही होते. या सर्वांच्या दृष्टिकोनांतून क्रांतिसिंहांच्या कार्याचं मूल्यमापन व्हावं, असा त्यामागील हेतू होता. या लेखांबरोबर विविध पुस्तकांतून व नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या क्रांतिसिंहांच्या आठवणी, त्यांचा पत्रव्यवहार वगैरे साहित्यासाठी दुसरा खंड योजला होता.

हळूहळू लेख जमा होऊ लागले. लेखांबरोबरच हा उपक्रम हाती घ्णों ही काळाची गरज असल्याचं अनेकांनी कळविलं. अनेकांनी, विशेषत: क्रांतिसिंहांच्या सहकाऱ्यांनी आपणांस या स्मृतिग्रंथाच्या वार्तेनेच मोठा आनंद झाल्याचं सांगितलं. क्रांतिसिंहांचे मेहुणे स्वातंत्र्यसेनानी नाथाजीराव लाड यांनी आपल्याकडील सर्व छायाचित्रं दिली. क्रांतिसिंहांचे नातू, कन्या क्रांतिवीरांगना हौशाताईंचे चिरंजीव प्रा. व्ही. बी. पाटील यांनी आपल्याकडील सर्व दस्तऐवज माझ्या हाती सुपूर्द केला. त्यात क्रांतिसिंहांची दुर्मिळ पत्रं, मानपत्रं, भाषणं, रोजनिशीतील टिपणं इत्यादी सामग्री होती. क्रांतिसिंह खासदार असताना त्यांनी लोकसभेत केलेल्या मराठी भाषणाचं त्यांच्या हस्ताक्षरामधील टिपण त्याच ठिकाणी मिळालं. या- शिवाय कोणी दुर्मिळ लेखांची व आठवणींची कात्रणं आणून दिली. कोणी आपल्याकडे घरी जपून ठेवलेले क्रांतिसिंहांसमवेतचे फोटो आणून दिले, तर कोणी शे-पाचशेची देणगी पाठवून दिली.

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या चरित्राच्या साधनसामग्रीत सर्वांत मोठी उपलब्धी झाली, ती त्यांच्या एका दुर्मिळातील दुर्मिळ अशा ध्वनिमुद्रित भाषणाची. २१ सप्टेंबर, १९७६ रोजी मोराळे, ता. तासगाव, जि. सांगली या गावी क्रांतिसिंहांच्या हस्ते व थोर स्वातंत्र्यसेनानी वसंतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ झाला. या ठिकाणी क्रांतिसिंहांनी केलेलं हे शेवटचं भाषण होय. हे भाषण म्हणजे गरिबांविषयीची त्यांची तळमळ आणि शरीर विकलांग झालेलं असतानासुद्धा प्रस्थापितांविरुद्ध लढा देण्याची ऊर्मी यांचं यथार्थ दर्शन घडविणारं आहे. ते आणीबाणीचे दिवस होते. भलेभले नेते व विचारवंत मूग गिळून बसले होते. अशा वेळी क्रांतिसिंहांनी गरिबांच्या बाजूने आणीबाणीविरुद्ध उठविलेला आवाज हा भावी पिढ्यांनाही प्रेरणादायी ठरावा असा आहे. क्रांतिसिंहांच्या चरित्राचं हे अनमोल साधन आहे. हे सर्व भाषण आम्ही स्मृतिग्रंथात दिलं आहे.

क्रांतिसिंहांच्या जीवनकार्याचा वेध घेणारे एकूण एकसष्ट लेख पहिल्या खंडात अंतर्भूत केले गेले आहेत. पुढे वीस वर्षांनी दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली, तेव्हा लेखांची संख्या एकाहत्तर झाली. लेखांची वर्गवारीच करायची म्हटलं तर अशी करता येईल -

**क्रांतिसिंहांचे सहकारी :** कासेगावकर वैघ ऊर्फ धन्वंतरी, जी. डी. लाड, एस. एम. जोशी, अच्युतराव पटवर्धन, शाहीर शंकरराव निकम, इंदुताई पाटणकर, भाई माधवराव बागल, तुळशीदास जाधव,


अमानुषतेच्या रिंगणात गुरफटलेल्या
'दर्फुर'ची हृदयद्रावक कहाणी!

**अमानुष**

उमेश कदम
किंमत : ₹ ३२०

ebook available

कॉ. शेख काका, दत्ता देशमुख, कॉ. डांगे, डॉ. उत्तमराव/लीलाताई पाटील, नाथाजी लाड, रंगरावदादा पाटील, भगवानराव पाटील ऊर्फ बप्पा, काशिनाथ देशमुख, बॅ. अप्पा पंत इत्यादी.

**साहित्यिक :** आचार्य अत्रे, प्रा. ग. प्र. प्रधान, शंकरराव खरात, 'शिवनेर'कार विश्वनाथराव वाबळे, डॉ. सरोजिनी बाबर, वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज, ग. दि. माडगूळकर, शिवाजीराव सावंत, धो. म. मोहिते इत्यादी.

**विचारवंत :** आचार्य जावडेकर, कॉ. सरदेसाई, बॅ. पी. जी. पाटील, वि. स. पागे, कॉ. कमल भागवत इत्यादी.

**राजकीय नेते :** यशवंतराव चव्हाण, दादासाहेब अळतेकर, बाबूराव गोखले, एन. डी. पाटील, संभाजीरावबाबा थोरात, भारत पाटणकर इत्यादी.

**अभ्यासक :** डॉ. एस. एस. भोसले, डॉ. वा. ना. कुबेर, डॉ. अरुण भोसले, आचार्य शांताराम गरूड, डॉ. गेल ओमवेट, डॉ. बाबूराव गुरव, कॉ. प्रभाकर वैघ, डॉ.बा. ह. कल्याणकर, डॉ. टी. एस. पाटील इत्यादी.

जोतिबा व दिनकर या दोघांची लेख व इतर चरित्रसामग्री मिळविण्यासाठी मोठी मदत झाली. म्हणून या दोघांचीही नावं संपादन सहायक म्हणून मी पहिल्या पानांवर घेतली. याचा उपयोग त्यांच्या पुढच्या करिअरसाठीही होईल, असं मला वाटत होतं. (ही दोन्ही मुलं पीएच.डी. होऊन पुढे कॉलेजचे प्राचार्य झाली).

स्मृतिग्रंथ पाच-सहाशे पानांचा होईल व त्यासाठी सुमारे ४० ते ४५ हजार रुपयांचा खर्च येईल, असा प्राथमिक अंदाज होता आणि तो खराही ठरला. माझं हे मोठं धाडसच होतं. सांगलीचे नाथाजी लाड, टी. डी. लाड प्रभृती तसेच क्रांतिसिंहांच्या परिवारातील मंडळींनी थोडंबहुत आर्थिक सहकार्य केलं. डॉ. सरोजिनी बाबर ऊर्फ अक्का या कामी मदतीस धावून आल्या. त्यांनी डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांच्या 'साहित्य आणि संस्कृती मंडळा'तून स्पेशल केस म्हणून दहा हजारांचं अनुदान मिळवून दिलं. राहिलेले पंचवीस हजार सुधाचे दागिने कोल्हापूरच्या 'मराठा बँके'त गहाण टाकून उभे केले आणि ग्रंथ सिद्धीस नेला.

'क्रांतिसिंह नाना पाटील' या स्मृतिग्रंथाचं महाराष्ट्रात सर्व स्तरांतून, विशेषत: क्रांतिसिंहप्रेमी लोकांकडून मोठं स्वागत झालं. १९४२ च्या लढ्यातील स्वातंत्र्यसेनानी आणि विचारवंत यांनीही या ग्रंथाचं तोंड भरून कौतुक केलं. अनेकांनी खास पत्रं पाठवून आपल्या प्रतिक्रिया कळविल्या. त्यापैकी मोजक्या अशा होत्या -

**भाई माधवराव बागल :** 'क्रांतिसिंह नाना पाटील' हा ग्रंथ म्हणजे बहुजन समाजाची गीता आहे. संपादकांना सहस्र धन्यवाद!'

**क्रांतिअग्रणी जी. डी. लाड :** 'आपण एक उत्कृष्ट काम केले आहे. क्रांतिसिंहांच्या धगधगत्या जीवनातील चैतन्याचे दर्शन होणे आवश्यक होते. ते काम पार पाडण्याचा प्रयत्न आपण केलात. क्रांतिसिंहांचा राजकीय छावा म्हणून मी त्यांनी दिलेल्या प्रेरणा जोपासत आहे.'

**ॲड. शंकरराव खरात :** 'क्रांतिसिंह नाना पाटलांचे एक चिरंतन स्मारक केल्याचे तुम्हाला मोठे श्रेय मिळेल. क्रांतिसिंह एक कालखंड घेऊन पुढे चालले होते. त्या दृष्टीने या ग्रंथाला मोठे महत्त्व आहे.'

**यदुनाथ थत्ते :** 'आपण ग्रंथाचे संपादन अतिशय कष्टाने केले आहे. आपण हा ग्रंथ संपादित करून मराठी माणसांवर मोठेच उपकार केले आहेत आणि त्याबद्दल सर्व मंडळी आपले कृतज्ञ राहतील.'

**ग. स. ऊर्फ दादासाहेब अळतेकर :** 'आपला ग्रंथ अंतरंगाने अनेक विद्वानांच्या व क्रांतिसिंहांच्या सहकाऱ्यांच्या लेखांनी जसा समृद्ध केला आहे, तसा बाह्यांगानेही आकर्षक आणि क्रांतिसिंहांच्या कार्यास साजेसा आहे. ग्रंथाच्या निर्मितीस आपण किती परिश्रम घेतलेत, याचा अचंबा वाटतो!'

**डॉ. वा. ना. कुबेर :** 'हा अंतर्बाह्य देखणा ग्रंथ सिद्ध करून आपले कार्यकुशलत्व सिद्ध केलेच; पण एका मोठ्या आवश्यक अशा (विलंबित) कार्यासाठी अनेकांना एकत्र आणले, ही फार मोठी जमेची बाजू. याबद्दल अवघा महाराष्ट्र आपला ऋणी राहील.'

**शाहीर आत्माराम पाटील :** '१९४२ च्या क्रांतीतील अनेक धगधगायमान क्रांतिवीरांच्या करणीतून व अनेक साहित्यिकांच्या झरणीतून प्रकट झालेला हा अंतर्बाह्य अप्रतिम ग्रंथ पंचतत्त्वविलीन पू. अण्णांच्या प्रचंड व प्रदीर्घ जीवितकार्याची महाराष्ट्राला व राष्ट्राला आचंद्र-सूर्य प्रेरणा देणारा ठरला आहे.'

**डॉ. उत्तमराव पाटील :** 'शिवछत्रपतींनंतर त्यांच्या कार्याची पुनरावृत्ती करणारा, महाराष्ट्राच्या नव्या इतिहासाचा हा दस्तऐवज आपण जनतेसमोर आणण्याचे ऐतिहासिक कार्य केले आहे, त्याला तोड नाही. क्रां. नाना पाटील व त्यांच्या साथीदारांनी स्थापलेल्या प्रतिसरकारच्या ऐतिहासिक कार्यावर आपण शिक्कामोर्तब करण्याचे हक्कदार झालात, हे विशेष होय. ज्यांना क्रांतिसिंहांच्या कार्याचेच काय, पण नावाचेही वावडे होते आणि आहे; त्यांच्यासाठी आपले हे पुस्तक झणझणीत अंजनच आहे.'

सदर ग्रंथाच्या निर्मितिप्रक्रियेत अनेक दिग्गज व्यक्तींशी संवाद साधण्याची मला संधी मिळाली. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, अच्युतराव पटवर्धन, बॅ. अप्पा पंत, अटलबिहारी वाजपेयी, पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज प्रभृतींचा समावेश आहे.

स्व. अटलबिहारी वाजपेयी त्या वेळी भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष होते. ते मला लिहितात,

*'प्रिय श्री. पवार,*

*आपका ११ अक्टूबर का पत्र मेरे सामने है यह जानकर प्रसन्नता हुई कि, आप श्री. नाना पाटिल के सम्बन्ध में एक स्मृतिग्रंथ प्रकाशित कर रहे हैं श्री. पाटिल को निकट से देखने का अवसर मुझे उस समय मिला, जब वे लोकसभा के सदस्य निर्वाचित हुए वे बातों के वीर नहीं, कर्म के धनी*

*थे १९४२ अगस्त क्रांति में उनका योगदान हमेशा स्मरण किया जाएगा श्री. नाना पाटील की स्मृति में मेरी विनम्र श्रद्धांजलि स्वीकार करें*

*भवदीय*

*अटल बिहारी वाजपेयी'*

थोर मराठी साहित्यिक (स्व.) पु. ल. देशपांडे यांचं पत्र खूप बोलकं आहे. ते लिहितात,

*'डॉ. जयसिंगराव पवार यांना स. न.*

*आपले पत्र मिळाले. क्रांतिसिंह नाना पाटील यांचा स्मृतिग्रंथ आपण प्रकाशित करीत असल्याचं वाचून आनंद झाला. दुर्दैवाने त्यांच्याशी परिचय होण्याचं भाग्य मला लाभलं नाही. फक्त चाळीस एक वर्षांपूर्वी कोल्हापूरच्या खासबागेत त्यांचं एक भाषण मी ऐकलं होतं. त्यांच्या भेटीचा योग आला असता, तर ते क्षणा मी आयुष्यभर जपले असते. सामान्य माणसांच्या हितासाठी सारं आयुष्य झोकून दिलेली ही माणसं. पारतंत्र्य जाऊन स्वातंत्र्य आलं, तरी त्यांच्या जीवनातली अन्यायाविरुद्धची झुंज संपलीच नाही. स्मृतिग्रंथाच्या रूपाने त्यांच्या समर्पित जीवनाचा आलेख तुम्ही उभा करीत आहात. तुमचं मन:पूर्वक अभिनंदन करतो.*

*तुमचा*

*पु. ल. देशपांडे'*

जून १९८२ मध्ये 'क्रांतिसिंह नाना पाटील' या ग्रंथाच्या कामाची सुरुवात झाली. डिसेंबर १९८२ मध्ये स्वातंत्र्यसैनिक नामदेवराव कराडकरांच्या हस्ते त्याचा मुद्रण प्रारंभ झाला आणि २५ फेब्रुवारा,ी १९८३ रोजी ग्रंथ तयार होऊन तो क्रांतिसिंहप्रेमींच्या हाती सुपूर्द केला.

या ग्रंथाचं प्रकाशन च्या१९४२ चळवळीतील थोर सेनानी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या हस्ते योजिलं होतं; पण दादांची तारीख व वेळ ठरविण्यासाठी ज्यांच्यावर मी विसंबून राहिलो, त्यांनी मला झुलवत ठेवलं व हा ग्रंथ प्रकाशनसोहळ्याविनाच सर्वत्र वितरित झाला, ही खंत मात्र माझ्या मनात कायम वास करून राहिली.

तथापि, इतिहासातील एका तेजस्वी पुरुषाची कालौघात धूसर होत चाललेली प्रतिमा लख्ख प्रकाशमान करून चालू पिढीसमोर ठेवल्याचं मोठं समाधान मला या ग्रंथाने दिलं. यानंतर क्रांतिसिंहांच्या चरित्रावर अनेक लहान-मोठी पुस्तकं आली. त्या सर्वांना प्रस्तुतचा ग्रंथ एक साधनग्रंथ म्हणून उपयोगी ठरला, याचंही मोठं समाधान लाभलं- (१९८२-८३).

# २३. सेनापती संताजी घोरपडे

### एका महान सेनानीचे पहिले चरित्र

माझ्या पीएच.डी. प्रबंधासाठी मी प्रारंभी 'सेनापती संताजी घोरपडे' हा विषय घेतला आणि त्या अनुषंगाने काही अभ्यासही केला; पण प्रबंधाइतकी संदर्भ-सामग्री मला मिळू शकली नाही. म्हणून मी तो विषय सोडून 'छत्रपती राजाराम महाराज' हा विषय घेतला व त्यामध्येच माझी पीएच.डी. पूर्ण केली, हा वृत्तान्त यापूर्वी येऊन गेलाच आहे.

तथापि, दरम्यानच्या कालखंडात पं. सेतुमाधवराव पगडी यांनी फारसीमधील मराठ्यांच्या इतिहासाची अनेक साधनं, विशेषत:, 'मोगल दरबाराची बातमीपत्रे' मराठीत आणल्यामुळे संताजीचरित्राच्या संदर्भ-साधनांत मोलाची भर पडून ते समृद्ध झालं होतं. त्यामुळे दीर्घ काळ मनामध्ये रेंगाळलेला हा विषय हातावेगळा करावा, या दृष्टीने मी संताजीचरित्राच्या संशोधन-लेखनास १९८५ साली मार्चमध्ये पुनश्च प्रारंभ केला आणि तीन वर्षांच्या प्रयासाने हे चरित्र मार्च १९८७मध्ये प्रसिद्ध केलं.

### संताजी घोरपडे : गनिमी काव्याचा महान सेनापती

मराठ्यांच्या इतिहासात संताजीसारखा गनिमी काव्याने मैदानी प्रदेशात लढणारा अन्य कोणी सेनानी झाला नाही. गनिमी काव्याची व्यूहरचना करून त्याने मोगलांच्या नामांकित सेनानींची फजिती केली. मोगलांचा इतिहासकार खाफीखान संताजीस 'नालायक, हलकट, कुत्रा' अशा शेलक्या शिव्या देतो; पण त्च्याा पराक्रमाचे गोडवेही तेवढ्या तीव्रतेने गातो. तो म्हणतो, 'ज्याला- ज्याला म्हणून संताजीशी मुकाबला करण्याचा आणि लढण्याचा प्रसंग आला, त्याच्या-त्याच्या नशिबी खालील तीनपैकी एक परिणाम ठरलेला असे - एकतर तो मारला जाई किंवा संताजीच्या कैदेत सापडे किंवा त्याचा पराजय होई आणि त्याचे सैन्य व बाजारबुणगे कैद होत. आपण जिवानिशी सुटलो हाच आपला पुनर्जन्म झाला, असे त्यास वाटे.'

'याचा उपाय कुणालाच सुचेना. युद्ध करण्यासाठी जिकडे-जिकडे म्हणून तो नालायक आणि हलकट कुत्रा तयार होऊन जाई, तिकडे-तिकडे त्याचा मुकाबला करण्यास बादशहाच्या प्रतिष्ठित सरदारांपैकी एकही तयार होत नसे. जगात धडकी भरून सोडणारी फौज घेऊन तो कोठेही पोहोचला की नरव्याघ्राप्रमाणे असलेल्या अनुभवी योद्ध्यांची हृदये कंपायमान होत.'

अशा या महान सेनानीचं चरित्र अघापि कोणी लिहिलं नव्हतं, ही खंत माझ्या मनात कित्येक वर्षं वास करीत होती आणि काही झालं तरी आपण संताजीचरित्र आयुष्यात पुरं करायचंच, असाही ध्यास त्याच वेळी मी घेतला होता. एकाच वेळी खंत व ध्यास या भावना माझ्या ठिकाणी निर्माण झाल्या होत्या.

### दोड्डेरीची लढाई : संताजीच्या पराक्रमाचे शिखर

संताजीने खानदेशापासून तंजावरपर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशात २५-२५ हजारांच्या फौजा नाचवून अनेक लढाया जिंकल्या; पण या सर्वांत महत्त्वाची ठरली ती १६९५ ची दोड्डेरीची लढाई. त्या वर्षी आपल्या मोठ्या फौजेनिशी महाराष्ट्रातून कर्नाटकात जात असता त्याच्याशी लढून त्यास नेस्तनाबूद करण्याचा हुकूम कर्नाटकचा फौजदार कासीमखान यास औरंगजेबाने दिला आणि आपल्या ब्रह्मपुरीच्या छावणीतून खानाजादखान, सफशिकनखान, सय्यद असालतखान, महंमद मुरादखान इत्यादी नामांकित सेनानींना आपल्या निवडक सैन्यासह कासीमखानाच्या मदतीला पाठविलं. दोन्ही सैन्यं चित्रदुर्गजवळ एकत्र आली. ती संताजीवर चालून जाणार, एवढ्यात संताजीनेच या सर्व खानांवर गनिमी काव्याने हल्ला चढवला. संताजीच्या एका सैन्यतुकडीने खानाच्या पेशखान्यावर (आघाडीच्या छावणीवर) हल्ला करून ती लुटून घेतली. ही वार्ता झोपेत असलेल्या कासीमखानास समजताच तो आपलं सैन्य घेऊन आपल्या छावणीबाहेर पडला. लवकरच इतर खानही त्याला येऊन मिळाले. संताजीच्या दुसऱ्या तुकडीने खानांचा मार्ग अडवून त्यावर हल्ला चढवला. लढाईची धुमश्चक्री उडाली असतानाच खानांना बातमी कळली की, मराठ्यांच्या तिसऱ्या तुकडीने खानांच्या छावणीवर हल्ला करून ती पूर्ण लुटून घेतली आहे. या धक्कादायक खबरीने सर्व खानांचं अवसान गळालं आणि त्यांनी आपापसांत सल्लामसलत करून जवळच असणाऱ्या दोड्डेरी नावाच्या गढीकडे कूच करून त्या गढीत आश्रय घेण्याचं ठरवून तिकडे माघार घ्यावयास सुरुवात केली. मराठ्यांशी लढतलढतच मोगली सैन्य दोड्डेरीच्या गढीजवळ पोहोचलं; पण त्यांची संख्या पाहता गढीच्या किल्लेदाराने दरवाजा उघडण्यास नकार दिला. तेव्हा सर्व खान आपल्या सैन्यासह गढीच्या पायथ्याशी बसून राहिले. मराठ्यांनी सर्व बाजूंनी वेढा दिला होता. मोगलांनी तीन दिवस उपाशी काढले. गढीच्या पायथ्याशी असणाऱ्या तलावाचं पाणी मात्र त्यांना मिळत होतं. चौथ्या दिवशी चित्रदुर्गचा नायक आपल्या मोठ्या पायदळानिशी मराठ्यांना येऊन मिळाला. अशा प्रकारे मराठ्यांचं बळ दिवसेंदिवस वाढत असताना खान मंडळींनी आपलं सैन्य बाहेर ठेवून गुपचूपपणे गढीत प्रवेश केला. हे जेव्हा त्यांच्या सैन्यास समजलं, तेव्हा त्यांनी जबरदस्तीने त्यांना दरवाजे उघडण्यास भाग पाडलं. ते आत आले खरे; पण गढीतील धान्य व चारा एक-दोन दिवसांतच संपून गेला आणि मग पुन्हा उपासमार सुरू झाली. एवढ्यात कासीमखानाने झालेल्या बेअब्रूपोटी विष प्राशन करून आत्महत्या केली! या बातमीने गढीबाहेरचे मराठे शेर बनले तर गढीतील मोगल निराशेच्या खोल गर्तेत ढकलले गेले. त्यांच्या सेनानींचं नीतिधैर्य पार खचून गेलं होतं. अशा परिस्थितीत खानाजादखानाच्या नेतृत्वाखाली सर्व सेनानी (खान) संताजीला शरण गेले. त्यांनी जीवदानाची याचना केली. संताजीने त्यांच्यावर बसवलेली दोन लाख होनांची खंडणी त्यांनी कबूल केली. तेवढ्या रकमेचे मुचलके लिहून घेऊन व त्यांचे जवळचे आप्त ओलीस ठेवून संताजीने सर्वांना गढीबाहेर जाऊ दिलं. जाताना प्रत्येकाच्या हातावर भाकर ठेवण्यास मात्र तो विसरला नाही; कारण तो सच्चा सैनिक होता!

### दोड्डेरीच्या लढाईची कर्नाटकातील शोधमोहीम

बादशहाने पाठविलेल्या या सैन्याच्या झालेल्या प्रचंड पराभवाने मोगलांची दक्षिणेत मोठी बेइज्जती झाली. स्वातंत्र्ययुद्धाच्या कालखंडातील (सन १६८१-१७०७) ही गनिमी काव्याच्या लढायांतील एक महान लढाई मानली जाते. अशा या लढाईच्या ठिकाणांचा प्रत्यक्ष जाऊन अभ्यास करावा, प्रत्यक्ष दोड्डेरीच्या गढीचा शोध घ्यावा, या उद्देशाने मी मार्च १९८५मध्ये चित्रदुर्ग भागाचा अभ्यासदौरा करण्याचं ठरवलं. आमच्याबरोबर माझी पुतणी व तिचे मिस्टर सोबतीसाठी घेतले.

माझे मेहुणे गडहिंग्लजचे आमदार ॲड. श्रीपतराव शिंदे यांनी माझ्या या दौऱ्यासाठी जीप दिली होती. आमचा पहिला मुक्काम चित्रदुर्गला पडला. चित्रदुर्ग हे त्या काळचं उत्तर कर्नाटकातील महत्त्वाचं ठाणं होतं. तेथील नायक भरमाप्पा हा मराठ्यांना अनुकूल होता. संताजीच्या अनेक मोहिमांत हा सामील असे. सध्याचं चित्रदुर्ग गाव किल्ल्याच्या पायथ्याशीच वसलेलं आहे. किल्ला बराच उंच आहे. तो सकाळीच पाहून आम्ही दोड्डेरीच्या दिशेने रवाना झालो. दोड्डेरीची गढी चित्रदुर्गच्या पूर्वेस २० मैलांवर आहे, असं वाचलं होतं. प्रत्यक्षात महाराष्ट्रातील कोणी संशोधक तिथे गेला नव्हता. त्यामुळे नावाव्यतिरिक्त या गढीची माहिती उपलब्ध नव्हती.

दोड्डेरीकडे प्रवास करताना शेजारून भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकच्या टायरखालून उडून एक दगड आमच्या जीपच्या काचेवर धडकला अन् तिचा क्षणार्धात चुराडा झाला; पण आम्ही न थांबता तसेच पुढे निघालो. अनेक लहानलहान गावं पार करून आम्ही दोड्डेरी गावी पोहोचलो. गावच्या वेशीजवळच एक पुरातन दगडमातीचा बुरूज उभा होता. त्याला पाहून गढी सापडल्याचा आनंद झाला. आम्ही वेस ओलांडून गावात गेलो. कर्नाटकात ग्रामपंचायतीच्या सरपंचाला 'चेअरमन व्हिलेज पंचायत' असं म्हणतात. आम्ही त्यांची चौकशी केली. ते कार्यालयातच होते. बी. वीरण्णा असं त्यांचं नाव होतं. आमचं संभाषण निम्मं मोडक्यातोडक्या हिंदीत व निम्मं इंग्रजीत झालं.

मी म्हणालो, "दोड्डेरीची गढी हीच का?"

"होय, हीच."

"मग गढीच्या जवळचा तलाव कुठे आहे?"

"कुठला तलाव? इथे तलाव वगैरे काही नाही."

गढीच्या पायथ्याशी तलाव होता व त्या तलावाचं पाणी पिऊन तीन दिवस मोगल सैन्याने आपली भूक भागविली, असं तर साकी मुस्तैदखान या मोगलांच्या इतिहासकारानं लिहून ठेवलं आहे. तो

असं खोटंच कसं लिहील? शेवटी अधिक खोलात जाऊन चौकशी केली, त्या वेळी चेअरमन म्हणाले, “हां, तलाव आहे; पण इथून दोनेक मैल दूर आहे. तिथं पूर्वी वसती होती. नंतर आमचे लोक इथे आले.”

आता थोडाफार उलगडा होऊ लागला. मी त्यांना अधीरतेने म्हणालो, “बसा जीपमध्ये. चला, जाऊ या त्या तलावाकडे!”

आमची जीप तलावाजवळ थांबली. आम्ही खाली उतरलो. एक मोठा विस्तीर्ण तलाव होता; पण गढीचा पत्ता नव्हता. थोड्या बारकाईने परिसर न्याहाळला, तेव्हा लक्षात आलं की, आता जे उंचवटे दिसताहेत, ती पूर्वीची तटबंदी व बुरूज होते. तटबंदीच्या आत व बाहेर आता लोक शेतीभाती करत होते (एव्हाना आता ते उंचवटेपण भुईसपाट झाले असतील). चेअरमन त्या गढीच्या अस्तमानास चाललेल्या अवशेषांकडे हात दाखवून म्हणाले, “इथं आमचे पूर्वज राहत होते. नंतर आम्ही सध्याच्या ठिकाणी गाव वसवलं.”

आता मला इतिहासाची संगती लागली. सतराव्या शतकात व अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत गढी अस्तित्वात होती. कालौघात ती नामशेष झाल्यावर तेथील रहिवाशांनी त्या गढीच्या नावाने जवळच नवं गाव वसवलं; तेच आधुनिक दोड्डेरी. जुन्या गढीचं स्थानमाहात्म्य मराठ्यांच्या इतिहासात किती आहे, इथे मराठ्यांच्या एका महान सेनापतीने केवढा मोठा विजय संपादन केला होता, मोगल सम्राटाच्या दक्षिणेच्या मोहिमेतील सर्वांत मोठ्या मानहानीची ही गढी साक्षीदार होती, हे मी पोटतिडकीने चेअरमनला सांगत होतो; पण बिचाऱ्याला ना औरंगजेब माहीत, ना संताजी! महाराष्ट्र शासनाने त्या ठिकाणी कर्नाटक शासनाच्या परवानगीने एखादं युद्धस्मारक उभारावयास काय हरकत आहे? पानिपतच्या भूमीवर जर मराठ्यांच्या हौतात्म्याचं स्मारक होतं, तर कर्नाटकात मराठ्यांच्या या अतुल पराक्रमाचं शौर्यस्मारक का होऊ नये? पण हे सर्व होण्यापूर्वी आजच्या मराठी माणसांना तरी दोड्डेरीच्या विजयाचं ज्ञान व भान असायला हवं!

**बंगळुरात दंगलीत सापडलो...**

चेअरमन बी. वीरण्णा यांना पुन्हा दोड्डेरी गावी सोडून आम्ही चित्रदुर्ग मुक्कामी आलो. दुसऱ्या दिवशी गाडीची काच बसवून आम्ही बंगळूरुच्या दिशेने रस्त्याला लागलो. मार्गात सिरा किल्ला पाहून टूमकूरला मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी बंगळूरुला पोहोचलो. बंगळुरात आम्ही पाहण्यासारखं काही नव्हतं. विधान मंडळासारखी एक-दोन ठिकाणं पाहून आम्ही म्हैसूरला निघालो. वृंदावन गार्डनला पोहोचलो, तेव्हा संध्याकाळ झालेली होती. गार्डनची रचना, तेथील रंगीबेरंगी कारंजी, शेजारचं कावेरी नदीवरचं भव्य ‘कृष्णराजसागर’ हे धरण हा सर्व नजारा डोळ्यांत साठवत आम्ही बाहेर पडलो, तेव्हा सूर्यास्त होऊन अंधार पडला होता. आम्ही म्हैसूरच्या रस्त्याला लागलो, तेव्हा रस्त्यावरची रहदारी अगदीच तुरळक जाणवली. थोडंसं खटकलंसुद्धा की, एवढं मोठं शहर आणि एवढी तुरळक रहदारी! आम्ही शहरात शिरलो तर सर्व दुकानं बंद, रस्त्यांवर शुकशुकाट! एका चौकात पोलिसांचा जथा उभा होता. मी ड्रायव्हरला तिथं गाडी उभी करायला सांगितलं. आमची गाडी तिथे पोहोचताच दोन पोलीस पुढे आले आणि त्यांनी आम्हाला कन्नडमध्येच ‘कुठून आलात? कुठे जाणार?’ म्हणून विचारलं. आमच्यापैकी सुधाला तिचं माहेर सीमाभागात असल्याने थोडंबहुत कानडी येत होतं. तिने त्यांना कन्नडमध्येच उत्तर दिलं, “कोल्हापूर, कोल्हापूर.”

बंगळूरु पोलिसांच्या लक्षात आलं की, हे टूरिस्ट असून बिचाऱ्यांना परिस्थितीची काहीच कल्पना नाही. त्यांनी सांगितलं, “इथे शहरात कर्फ्यू आहे. थांबा. तुम्ही एकटे जाऊ नका. आमचा माणूस तुमच्याबरोबर देतो. तो तुम्हाला हॉटेलपर्यंत पोहोचवील. काळजी करू नका.” आता एकूण मामला गंभीर असल्याचं आमच्या लक्षात आलं. त्या पोलिसाने आम्हाला एका लॉजवर आणलं. तेथील नोकरांना आम्हाला जागा देण्यास बजावून तो निघून गेला. तो जाताना आम्ही त्यांचे वारंवार आभार मानून त्यास निरोप दिला. लॉजवाल्यांनी आम्हास माडीवर एक मोठा हॉल दिला आणि गाडी पार्किंगसाठी ड्रायव्हरला ते घेऊन गेले. गाडी पार्क करून परत येताच ड्रायव्हरला भीतीने हुडहुडी भरली. रस्त्यात त्याने दुकानांची जाळपोळ व प्रेतं पाहिली होती. त्याला कसाबसा धीर देऊन आम्ही शांत केलं. बाहेर कुठे जेवण मिळणं शक्यच नव्हतं. तेव्हा येताना सोबत आणलेल्या शिदोरीचे दोन घास घेऊन आम्ही देवाची प्रार्थना करीत झोपी गेलो. कुठून बुद्धी झाली अन् म्हैसूरला आलो, असं होऊन गेलं.

दुसऱ्या दिवशी उडतउडत दंगलीचं कारण कानांवर आलं. ते असं की, युरोपात (बहुधा फ्रान्समध्ये) पैगंबरसाहेबांविषयी काही आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध झाला. त्याचे पडसाद फ्रान्स व इतर युरोपियन देशांत उमटले. याचाच एक परिणाम म्हणून बंगळुरू आणि म्हैसूरमध्ये दंगल उसळली. आम्ही जेव्हा बंगळुरूमध्ये फिरत होतो, त्याच वेळी काही भागांत दंगल चालू होती; पण आम्हाला तिची झळ लागली नाही. तेव्हा आम्ही बाहेर पडून म्हैसूरच्या मार्गाला लागलो होतो. म्हैसूरमध्ये आल्यावर मात्र अडकून राहिलो.

आता आम्हास परतीचे वेध लागले होते. केव्हा एकदा या दंगलग्रस्त भागातून बाहेर पडतोय, असं आम्हास होऊन गेलं होतं. परतीचा मार्ग म्हणून पुन्हा बंगळुरूला जाण्याऐवजी आम्ही श्रीरंगपट्टणवरून मधल्या मार्गाने पुणे-बंगळूर हायवेला जावं, असं नकाशावरून ठरवलं. त्याप्रमाणे प्रथम श्रीरंगपट्टणला आलो. तिथे शांतता दिसली. तेव्हा थोडा वेळ खर्चून श्रीरंगपट्टणचा किल्ला, टिपूचा राजवाडा, स्मारक इत्यादी स्थळं पाहून आम्ही पुढचा प्रवास सुरू केला. श्रीरंगपट्टण-हसन-चिक्कमंगलूर-शिमोगा-राणीबेन्नूर असा प्रवास करीत आम्ही धारवाड गाठलं. या संपूर्ण प्रवासात आम्ही

कुठे दंगलीत सापडू की काय, ही भीती आमच्या मनात सातत्याने राहिली. धारवाडला आल्यानंतर मात्र आपण आपल्या मुलखात आल्याची भावना झाली. दुसऱ्या दिवशी आम्ही कोल्हापुरास पोहोचलो. एक थरारक अनुभव देणारी ही आमची शोधमोहीम पक्की आठवणीत राहिली- (१९८६).

**संताजीची हत्या : महादेव डोंगरातील शोधमोहीम**

याच वर्षी मी आणखी एक शोधमोहीम केली. संताजीची हत्या ज्या महादेव डोंगराच्या दरीत झाली, तिचा शोध मला घ्यायचा होता. दोड्डेरीच्या महान विजयानंतर संताजी राजाराम महाराजांच्या भेटीला जिंजीला गेला; पण दुर्दैवाने दरबारात त्याचं वागणं औद्धत्याचं होऊन महाराजांशी त्याचा बिघाड झाला. परिणामी, मराठ्यांच्या बाजूवर यादवी सुरू झाली. धनाजीशी त्य्च्याा लढाया झाल्या. धनाजीने युक्तीने संताजीच्या फौजेला आपल्या बाजूने वळविल्यामुळे त्याला महाराष्ट्रात परतावं लागलं. धनाजीही त्याचा पाठलाग करीत महाराष्ट्रात आला. औरंगजेबास ही बातमी समजताच त्याने आपला गाजिउद्दीनखान फिरोजजंग हा सरदार संताजीच्या पाठलागावर धाडला.

सातारा जिल्ह्यातील महादेवाचा डोंगर हे संताजीच्या छावणीचं ठिकाण होतं. इथूनच मोठमोठ्या फौजा घेऊन तो बादशाही मुलखावर धाडी घालण्यासाठी मोहिमा काढत असे. आता शेवटीही त्याने इथेच आश्रय घेतला; पण संताजीच्या पाठीमागचा ससेमिरा सुटला नव्हता. म्हसवडचा मोगल ठाणेदार नागोजी माने हा त्याचा कट्टर शत्रू होता. त्याचा मेहुणा अमृतराव निंबाळकर हा यादवी युद्धात संताजीकडून मारला गेला होता. त्याचा सूड नागोजी व त्याची बायको राधाबाई यांना घ्यायचा होता. संताजी महादेव डोंगरात आश्रयास आल्याचं समजताच त्याची हत्या करण्याचा कट त्याने रचला आणि संधी साधून संताजीवर हल्ला करून त्यास ठार केलं! असं म्हणतात की, दरीतील ओढ्यात अंघोळ करून हातांत पाणी घेऊन सूर्याला अर्घ्य देत असताना नागोजीने मागून दावा साधला आणि संताजीचं शिर कापून त्याने गाजिउद्दीनखानाची छावणी गाठली व त्याच्याकडे ते शिर सुपूर्द केलं मला महादेव डोंगरातील संताजीचं निवासस्थान व हत्येचं ठिकाण आणि त्याची म्हणून दाखविली जाणारी माळरानावरील समाधी ही ठिकाणं शोधून काढायची होती.

सातारा-पंढरपूर रस्त्यावर साताऱ्यापासून ६० मैल अंतरावर पूर्वेस म्हसवड हे पुरातन गाव आहे. त्या काळी या भागातील खटाव, रहिमतपूर, म्हसवड ही गावे प्रमुख ठाणी म्हणून प्रसिद्ध होती. म्हसवडला जाताना पुसेगाव हे देवस्थानचं गाव लागतं. तिथे रसाळ नावाचे एक गृहस्थ माझ्या परिचयाचे होते. त्यांना प्रथम भेटायचं मी ठरवलं होतं. त्यांना भेटून माझ्या येण्याचं कारण सांगितलं. तेव्हा ते म्हणाले की, "म्हसवडला बाळासाहेब माने हे एक इतिहासप्रेमी असून त्यांना संताजीची हत्या, समाधी वगैरेंविषयी बरीच माहिती आहे." थोडक्यात, ती त्या भागातील एक माहीतगार व्यक्ती होती. मी रसाळांना घेऊन म्हसवडकडे निघालो. म्हसवडात चौकशी केली त्या वेळी समजलं की ते गावाबाहेर आपल्या शेतात राहतात. तिथे आम्ही पोहोचलो. सुदैवाने ते घरीच होते. त्यांनी आमचं स्वागत करून येण्याचं प्रयोजन विचारलं. त्यांना मी सांगितलं की, "मी संताजी घोरपड्याचं चरित्र लिहीत आहे. त्यासाठी मला महादेव डोंगरातील संताजीच्या हत्येच्या ठिकाणाचा शोध घ्यायचा आहे. तुमचं सहकार्य पाहिजे." त्यावर ते म्हणाले, "अहो, सहकार्य करायला मला आनंदच आहे. चला, आपण निघू या." कोल्हापूरहून कोणीतरी संताजीच्या संदर्भात शोध घेण्यासाठी आपल्या भागात आलेलं आहे, याचाच त्यांना मोठा आनंद झाला होता. मोठ्या उत्साहाने ते आमच्याबरोबर निघाले.

प्रथम आम्ही कारखेलच्या माळरानावर आलो (कारखेल म्हसवडच्या उत्तरेस पाच-सहा मैलांवर आहे). इथे संताजीची समाधी होती. समाधी कसली, तो एक दगडांचा ढिगारा होता. त्यावर दोन पताका असणारे भगवे झेंडे रोवलेले होते. बाळासाहेब सांगत होते, स्थानिक लोक संतोबाची समाधी म्हणतात, नवससायासही करतात. त्यांना संतोबादेव पावतोय म्हणे!

शेजारीच संताजीचं स्मारक म्हणून जिल्हा परिषदेने एक हॉल बांधला होता. तिथे आता शेळ्या-मेंढ्यांचा व कुत्र्यांचा वावर दिसत होता. ज्याचं केवळ नाव ऐकताच नरव्याघ्राप्रमाणे पराक्रमी असणाऱ्या सेनानींची हृदयं कंपायमान होत, ज्याने मोगल सेनानींनाच नव्हे तर खुद्द औरंगजेब बादशहाला दहशत लावली होती, अशा असामान्य सेनापतीची समाधी म्हणजे दगडधोंड्यांचा एक ढिगारा! आपल्या पराक्रमी पूर्वजांबद्दल आपण एवढे कृतघ्न झाल्याबद्दल माझी मलाच लाज वाटायला लागली! छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, संताजी-धनाजी, महाराणी ताराबाई, हे आमचे पूर्वज. हाच आमचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा आहे, याची जाण महाराष्ट्राला, मराठी माणसाला केव्हा येणार? संताजीच्या या समाधीच्या ठिकाणी त्याचं भव्य स्मारक का बरं उभं राहू नये? अशा प्रकारचे विचार डोक्यात थैमान घालत असतानाच संताजीच्या समाधीसमोर नतमस्तक होऊन आम्ही महादेव डोंगराकडे कूच केले.

तो सर्व प्रदेश बाळासाहेबांनी पायांखाली घातलेला होता. कारखेलच्या समाधीपासून दीड-दोन मैलांवर आम्ही प्रथम महादेव डोंगराच्या पायथ्याशी असणाऱ्या हवालदारवाडी या गावी पोहोचलो. त्या गावचे मुकुटराव सावंत हे बाळासाहेबांच्या परिचयाचे होते. त्यांच्याकडे आम्ही प्रथम गेलो आणि येण्याचं प्रयोजनही सांगितलं. त्यांना घेऊनच संताजीच्या निवासस्थानी जाण्याची योजना सांगितली. तेही आनंदाने सोबत यायला तयार झाले. त्यांनी त्यांच्याबरोबर आणखी एक ग्रामस्थ घेतला. जीप हवालदारवाडीतच लावून आम्ही डोंगराच्या दिशेने निघालो.

महादेव डोंगर म्हणजे उघडेबोडके डोंगर. दरीत कुठेतरी करवंदांच्या

जाळ्या नि एखाददुसरं सावरीचं झाड. सारा प्रदेश दुष्काळी. उन्हं कलली होती, तरी त्यांची तिरीप चांगलीच लागत होती. घामाघूम अवस्थेत आम्ही दोन डोंगर चढलो अन् उतरलो. शेवटी ती अस्वल दरी लागली. दरीच्या मधून वाहणारा तो ओढा आता कोरडा पडला होता. त्या पात्रातून पुढे-पुढे जात असता बाळासाहेब ओढ्याच्या काठावर असलेल्या एका खडकावर थांबले. समोर कोरडा पडलेला डोह होता. बाळासाहेब सांगू लागले, "इथं अंघोळ करून सूर्याला अर्घ्य देताना पाठीमागून वार करून संताजीचा खून करण्यात आला."

मी म्हणालो, "याच खडकावर कशावरून? याला पुरावा काय?"

त्यावर ते म्हणाले, "आता आपण संताजीचं निवासस्थान बघायला जाणार आहोत. तिथंही हा ओढा आणि खडक आहेत; पण त्या खडकावरून समोर उंच डोंगर असल्याने सूर्योदय दिसत नाही. इथं डोंगर बसका आहे. त्याचा सूर्योदयास फारसा अडथळा होत नाही. त्या दृष्टीने हीच जागा अधिक सोयीची होती." बाळासाहेबांचा तर्क थोडाबहुत पटणारा होता.


ओढ्यातून पुढे जात असता शेवटी एका ठिकाणी आम्ही थांबलो. आमच्या सोबत आलेले हवालदारवाडीकर म्हणाले, "सायब, त्या बघा संताजीबाबाच्या गुहा!" मी पाहिलं तर माझ्या समोरच्या डोंगराच्या माथ्याच्या थोडं खाली दोन गुहा दिसत होत्या. दगडमातीने त्या निम्म्या-अर्ध्या भरलेल्या होत्या. इथेच विजनावस्थेत संताजी आपल्या सोबत्यांनिशी राहत होता. आम्ही जवळ जाऊन न्याहाळण्याचा प्रयत्न केला; पण आत काहीच नव्हतं. केवळ दगडगोटे व माती. थोडा वेळ थांबून गुहेचे फोटो काढून आम्ही परतीच्या वाटेला लागलो. महादेव डोंगरातून बाहेर पडेपर्यंत संताजीच्या जीवनातील अखेरचे दिवस माझ्या नजरेसमोर उभे राहत होते!

**संताजीच्या प्रेमप्रकरणाची कहाणी**

परतीच्या प्रवासात बाळासाहेबांनी संताजीच्या प्रेमप्रकरणाची एक मोठी रोमॅन्टिक कथा ऐकवली. त्यांनी सुरुवात केली, "साहेब, तुम्ही इतिहासकार सांगता त्याप्रमाणे म्हसवडच्या नागोजीने संताजीचा खून केलेला नव्हता. तो त्या वेळी वऱ्हाडात होता. राधाबाई ही नागोजीची बायको. तिने आमचा पूर्वज सूरसिंग माने य्च्याा हाताखाली दोन-तीनशेचा जमाव देऊन महादेवाच्या डोंगरात संताजीवर छापा टाकण्यास पाठविलं. एका लढाईत राधाबाईचा भाऊ अमृतराव निंबाळकर यास संताजीने बेभान होऊन हत्तीच्या पायी देऊन ठार केलं होतं, त्याचा सूड तिला घ्यायचा होता, हे तर खरंच; पण त्याबरोबर आणखी एक नाजूक कारण होतं."

मी अधीरतेने विचारलं, "नाजूक कारण?"

तेव्हा ते म्हणाले, "थांबा, आता सगळंच मुळापासून सांगतो. अमृतरावाला तीन बहिणी. पहिली राधाबाई, दुसरी हौसाबाई व तिसरी



*माणदेशातील म्हसवडचे इतिहास संशोधक बाळासाहेब माने : यांनी मला संताजी घोरपडे यांच्या महादेव डोंगरातील लपण्याच्या गुहा व कारखेलच्या माळावरचे त्यांचे समाधी-स्थान दाखवले.*

पुतळाबाई. राधाबाई नागोजीस दिली होती. दुसऱ्या हौसाबाईबद्दल अमृतरावाने म्हाळोजी घोरपड्यांना संताजीसाठी विचारलं; पण संताजीचं लग्न अगोदरच ठरलं आहे असं सांगून म्हाळोजींनी प्रश्नाला बगल दिली. हौसाबाईचं लग्न कुठे जमेना. म्हणून अमृतरावाला तिचं लग्न शेवटी एका सामान्य बारगिराशी करून द्यावं लागलं. घोरपड्यांनी केलेला अपमान अमृतराव विसरला नाही.

"पुतळाबाईचं लग्नच करायचं नाही, असं अमृतरावाने ठरवलं होतं. तिला त्याने लढाईचं सर्व शिक्षण देऊन भाऊ म्हणून वाढविलं. कपडेसुद्धा ती पुरुषांचेच करत असे. घोडसवारी अन् तलवारबाजी यात तिने उत्कृष्ट प्रगती केली होती. ती अठरा-एकोणीस वर्षांची असताना शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी रायगडावर जाण्याचा योग आला. राज्याभिषेकासाठी अनेक मराठा कुटुंबं आली होती. त्यात निंबाळकरही होते.

"रायगडावर या वेळी घोडसवारी, भालाफेक, तलवारबाजी यांसारख्या युद्धकलांचं प्रात्यक्षिक आयोजित केलं होतं. त्यात तरुण संताजीने दाखविलेल्या लाजवाब कौशल्यामुळे तो सर्वांच्या कौतुकाचा विषय झाला होता. त्य्च्याा हातांत सेनापती हंबीररावांनी सोन्याचं कडं घालून सत्कार केला.

"एवढ्यात पुरुष वेशात असणाऱ्या पुतळाबाईने आखाड्यात उडी घेतली. घोड्यावर स्वार होऊन लगाम तोंडात धरून दोन दांडपट्टे घेऊन आपल्या अंगी असणाऱ्या कसरतीची तिने कमाल केली. सर्वांनी तिचं जंगी कौतुक केलं. संताजीही खूश झाला, इतका

की त्याने आखाड्यात उडी घेतली अन् आपल्या हातातील सोन्याचं कडं तिच्या हातात घातलं! त्च्च्याा हातांचा स्पर्श होताच तिचं स्त्रीत्व जागं झालं. ती प्रथमच अशी लाजली, लव्ह अॅट फर्स्ट साइट म्हणतात ना तसं.

"आता संताजीनेच आपली माणसं अमृतरावाकडे पाठवून पुतळाबाईस मागणी घातली; पण अमृतराव आपला अपमान विसरला नव्हता. त्याने संताजीस आपला नकार कळविला. एवढंच नव्हे तर घाईघाईने पुतळाबाईचं लग्न चंदनवंदनचा किल्लेदार महादजी नाईक-पानसंबळे याच्याशी लावून दिलं. महादजीचं वय झालं होतं. पुतळाबाई ही त्याची तिसरी बायको होती. तिच्या मनाविरुद्ध अमृतरावाने ही लग्नाची गाठ बांधली होती. पुतळाबाई करारी बाई होती. तिने आपला जीव संताजीत गुंतवला होता. महादजीला ती नवरा म्हणून मानावयासच तयार नव्हती. पुढे महादजी मृत्यू पावला, तेव्हा पुतळाबाई आपल्या थोरल्या बहिणीकडे-राधाबाईकडे येऊन म्हसवडमध्ये राहू लागली.

"एवढ्यात शत्रूकडून पराभूत होऊन संताजी महादेव डोंगरातील भांब दऱ्यात आल्याची वार्ता म्हसवडात आली. पुतळाबाईच्या कानांवर ती पडली. आता तिच्या जिवाची घालमेल सुरू झाली. रायगडावरील प्रसंग तिला सतावू लागला. कोणत्याही परिस्थितीत मनाने वरिलेल्या आपल्या प्रियकरास भेटण्यास ती अधीर झाली. आणि एके रात्री घोड्यावर स्वार होऊन बुरुजावरून तिने घोडा उडविला अन् ती भांब दऱ्याच्या दिशेने दौडली! संताजीसमोर हजर होताच त्यालाही मोठं कौतुक वाटलं. त्याने तिला आपल्या राहुटीत जागा दिली.

"संताजीसोबत आता फार थोडे सहकारी राहिले होते. त्या सर्वांनी संताजीस सल्ला दिला की पुतळाबाईस आश्रय देऊ नये; पण संताजीने तो मानला नाही. तेव्हा ते त्याला सोडून निघून गेले. आता संताजी व पुतळाबाई असे दोघेच भांबदऱ्यात राहिले. इथे फार काळ थांबणं धोक्याचं वाटून ते अस्वलदऱ्यातील गुहांच्या गुप्तनिवासाकडे आले. तिथेच त्यांनी आता मुक्काम केला.

दरम्यान, पुतळाबाई घोड्यावर स्वार होऊन गढीतून निसटून संताजीकडे गेल्याचं राधाबाईच्या ध्यानात येताच तिने सूरसिंग माने याच्यासोबत २००-३०० सैन्याची तुकडी संताजीचा व पुतळाबाईचा शोध घेण्यासाठी पाठविली. सोबत वाठार-फलटणच्या निंबाळकरांचीही काही माणसं होती. महादेव डोंगराच्या दऱ्याखोऱ्यांचा शोध घेता संताजी-पुतळाबाई अस्वलदऱ्यात असल्याचं त्यांना समजलं. तेव्हा त्यांच्यावर पाळत ठेवून सूर्योदयाच्या वेळी संताजी स्नान करीत असता छापा घालण्याचं सूरसिंग मानेने ठरवलं. त्यानुसार संताजीवर मागून हल्ला झाला. आपली तलवार घेण्याचीही सवड त्यास मिळाली नाही. जखमी अवस्थेतच तो गुहेकडे पळाला. बाहेरचा आरडाओरडा ऐकून पुतळाबाई हातात तलवार घेऊन बाहेर आली अन् चवताळलेल्या वाघिणीप्रमाणे तलवार फिरवून तिने संताजीस संरक्षण दिलं. निंबाळकरांच्या लोकांनी केलेल्या वारांनी संताजी जबर जखमी झाला होता. तशाही अवस्थेत त्याला आधार देत ती अस्वलदऱ्यातून बाहेर पडून कारखेलच्या माळावर आली. मान्यांच्या लोकांनी त्यांचा पिच्छा सोडला नाही. पुतळाबाई तलवार खाली ठेवण्यास नकार देत होती. तेव्हा सूरसिंगच्या सांगण्यावरून मान्यांच्या लोकांनी तिच्यावर दगड-गोट्यांचा लांबून मारा केला व त्यात तिला घायाळ करून जमिनीवर कोसळवलं. काही अंतरावर संताजी पडला होता. शरीरातून मोठा रक्तस्राव झाल्याने त्याने शेवटी त्या माळावरच आपला प्राण सोडला.

"दरम्यान, छाप्याची वार्ता राधाबाईस समजताच ती पाच-पंचवीस स्वारांसह महादेव डोंगराकडे निघाली होती. ती कारखेलच्या माळावर पोहोचली, त्या वेळी संताजी गतप्राण झाला होता आणि पुतळाबाई अंतिम घटका मोजत होती. तिला पाहताच राधाबाईला भडभडून आलं. तिचं डोकं मांडीवर घेऊन तिने तिला पाणी पाजलं. शुद्धीवर येताच तिने शापवाणी उच्चारली, 'बिनहत्यारी संताजीवर ज्यांनी तलवारी चालविल्या, त्यांचा निर्वंश होईल!' आणि लगेचच तिने जगाचा निरोप घेतला. राधाबाईने त्या दोघांचं पार्थिव एकत्र आणून अग्निसंस्कार केले. त्या ठिकाणीच आज तुम्ही पाहिलेली दगडधोंड्यांची समाधी आहे."

बाळासाहेब पुढे सांगत होते, "पुतळाबाईचा शाप खरा ठरला. ज्यांनी- ज्यांनी या छाप्यात भाग घेतला होता, त्यांचा निर्वंश झाला. खुद्द सूरसिंग माने यास मात्र थोडी सूट मिळाली, असं दिसतं. त्च्च्याा म्हणजे आमच्या घराण्यात कितीही मुलगे झाले तरी त्यातील एकच मुलगा टिकू लागला. कित्येक पिढ्या हे चालू आहे."

बाळासाहेबांची कहाणी जेव्हा सांगून संपली, त्या वेळी आम्ही त्यांच्या वाड्यासमोर उभे होतो. मी निरोप घेताना म्हणालो, "तुम्ही आता संताजीचं नवीन चरित्र लिहा. त्यात ही कहाणी घाला. रोमॅन्टिक आहे!"

महादेव डोंगरातील संताजीच्या निवासस्थानाचा व हत्येच्या स्थळाचा शोध घ्ण्येाा या यात्रेत संताजीच्या प्रेमकहाणीच्या लोककथेचाही शोध लागला. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोककथा मौखिक कथेच्या रूपाने वाहत राहते. प्रत्येक पिढीत तिच्यात भर टाकली जाते. तिला कागदोपत्री पुरावा असेलच असं नाही. बहुधा तसा तो नसतोच; पण सत्याचा काही अंश त्यामध्ये असण्याची शक्यता असते. बाळासाहेब माने यांनी समाजातील बुजुर्ग व्यक्तींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ही लोककथा (ते स्वत: इतिहासप्रेमी असल्याने) साजिवंत उभी केली होती.

**इतिहास अभ्यासक बाळासाहेब माने**

बाळासाहेब माने हे अत्यंत सरळ स्वभावाचे सज्जन गृहस्थ होते. पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये (जन. अरुणकुमार वैघांच्याबरोबर) शिकत असताना च्या१९४२ स्वातंत्र्य चळवळीत

त्यांनी उडी घेतली. क्रांतिकारकांना शस्त्रं पुरविण्याचं काम त्यांनी केलं. इंजिनिअर होता-होता थांबले. शेती करू लागले. महाराष्ट्र शासनाने देऊ केलेला स्वातंत्र्य सैनिकांचा गौरव करणारा ताम्रपट आणि पेन्शन घेण्यास मात्र त्यांनी नकार दिला! असा नकार देणारे (माझ्या माहितीप्रमाणे) क्रांतिसिंह नाना पाटलांनंतरचे हे दुसरे स्वातंत्र्ययोद्धे!

बाळासाहेबांशी झालेली मैत्री पुढे वाढत गेली. मी त्यांच्या इतिहास जिज्ञासेला प्रोत्साहन देऊन माणदेशातील ऐतिहासिक ठिकाणांचं संशोधन करण्यास प्रोत्साहन दिलं. पुढे माझ्या सांगण्यानुसार ते 'अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदे'च्या अधिवेशनाला हजर राहून ऐतिहासिक स्थळांवर निबंध वाचू लागले. पांढराशुभ्र सदरा, विजार, डोईवर गांधी टोपी, पायी साध्या वहाणा अशा परिवेशातील (शेतकरी) बाळासाहेब इतिहास-संशोधक म्हणून परिषदेच्या व्यासपीठावर शोधनिबंध वाचायला उभे राहत, तेव्हा जमलेल्या प्रतिनिधींचा तो एक कौतुकाचा विषय असे.

सेनापती संताजी घोरपडे हा त्यांच्या-माझ्या चर्चेचा विषय असायचा. महादेव डोंगररांगांतील संताजीचं लष्करी तळ, तिथून निघालेल्या मोहिमा, संताजीने लुटीमध्ये मिळविलेली व कल्याणगडावर ठेवलेली अब्जावधींची संपत्ती, याच संपत्तीच्या जोरावर वाठारकर निंबाळकरांनी बांधलेले एकूण दहा बुरुजबंद भुईकोट किल्ले, वाठारकरांची सावकारी असे अनेक विषय या चर्चेत येत. दरम्यान, त्यांनी माझ्या सततच्या प्रोत्साहनाने संताजीचं चरित्र लिहावयास सुरुवात केली होती. जसजसं लिखाण होई, तसतसं ते माझ्याकडे तपासण्यासाठी पाठवीत. त्यांचं हे काम चार-पाच वर्षं तरी चालू होतं. त्यांचा धाकटा मुलगा प्रताप हा क्लास वन वनाधिकारी होता. त्याने आपल्या वडिलांच्या पुस्तकात मोठा रस घेतला होता. वडिलांच्या इतिहास संशोधनाचा त्याला मोठा अभिमान असे. बाळासाहेबांचं हे संताजीचरित्र २००० साली प्रसिद्ध झालं; पण त्यांचं दुर्दैव असं की, त्यांचा हा मुलगा कार ॲक्सिडेन्टमध्ये १९९८ सालीच ठार झाला. आपल्या पुस्तकात त्यांनी लिहिलं आहे, "सूरसिंग मानेच्या वंशात एकच मुलगा टिकतो, ही परंपरा आजपर्यंत आठ पिढ्या चालू आहे. नवव्या पिढीत पुढे काय होईल परमेश्वर जाणे! पुतळाबाईचा शाप खरा म्हणायचा काय?"

### सेनापती संताजी घोरपडे ग्रंथाचे प्रकाशन

शेवटी संताजीचे चरित्र माझ्या हातून पूर्ण झाले. हा ग्रंथ कोणाला अर्पण करायचा हे मी अगोदरच योजून ठेवले होते. संताजीसारख्या महान सेनापतीचं चरित्र तशाच प्रकारचा पराक्रम गाजविणाऱ्या महान सेनानीस अर्पण करण्याचा माझा मानस होता आणि या ॲकेडेमिक सन्मानासाठी कोल्हापूरचे थोर सुपुत्र जनरल एस. पी. पी. थोरात यांच्याशिवाय अन्य कोणी व्यक्ती माझ्या नजरेसमोर नव्हती.

दुसऱ्या महायुद्धात ब्रह्मदेश आघाडीवर जपानी फौजांशी




*'सेनापती संताजी घोरपडे' चरित्रग्रंथाच्या प्रकाशन प्रसंगी.*
*व्यासपीठावर प्राचार्य एम.आर.देसाई, ले.जनरल एस.पी.पी.थोरात, गो.नी.दांडेकर, श्रीपतराव बोंद्रेदादा व वसंतराव शिंदे*




*'सेनापती संताजी घोरपडे' या चरित्रग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी गो. नी. दांडेकर म्हणाले, 'संताजीचे चरित्र लिहून जयसिंगराव पूर्वजांच्या ऋणातून मुक्त झाले आहेत. त्यांच्या रूपाने एक सच्चा इतिहासकार प्रस्तुत झाला आहे.'*

लढण्यात त्यांनी असामान्य शौर्य दाखविलं होतं. तसंच युद्धोत्तर कोरियन शांतिसेनेचं नेतृत्व करून रणनीती व राजनीती यांमधील कौशल्य त्यांनी सिद्ध केलं होतं.

संताजीचा चरित्रग्रंथ हातांत घेऊन मी जनरलसाहेबांची भेट घेतली आणि त्यांना हा ग्रंथ प्रेमादरापोटी अर्पण केल्याचं सांगितलं. तसंच लवकरच होणाऱ्या प्रकाशन-सोहळ्यास आपण उपस्थित राहून हा ग्रंथ सन्मानपूर्वक स्वीकारावा, अशी विनंतीही त्यांना केली. जनरलसाहेबांनी मोठ्या अगत्याने माझं स्वागत केलं आणि आपण या सोहळ्यास निश्चित उपस्थित राहू, असं आश्वासनही दिलं.

३ मार्च, १९८७ रोजी 'शाहू शिक्षण संस्थे'च्या सभागृहात 'संताजी चरित्रा'चा प्रकाशन सोहळा श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या अध्यक्षतेखाली, सुप्रसिद्ध साहित्यिक दुर्गमहर्षी गो. नी. दांडेकर यांच्या हस्ते पार पडला. माझ्यावर पुत्रवत् प्रेम करणारे प्राचार्य एम. आर. देसाई यांना मी खास पाचारण करून व्यासपीठावर सन्मानाने बसविलं होतं.

लेखक म्हणून मी माझं मनोगत व्यक्त केल्यानंतर गोनीदांच्या हस्ते 'संताजी चरित्रा'चं प्रकाशन झालं. आपल्या भाषणात जनरलसाहेबांनी संताजीच्या गनिमी काव्याच्या युद्धनीतीचा युद्धशास्त्रीय दृष्टीने गौरव करून, त्याच्यासारखा मोहरा मराठ्यांच्या यादवीत बळी पडावा, याची खंत व्यक्त केली. प्राचार्य देसाईसाहेबांनीही मराठ्यांच्या ठिकाणी असणारी स्वार्थभावना, एकीचा व दूरदृष्टीचा अभाव इत्यादी अवगुणांवर बोट ठेवलं आणि आजही आम्ही कोणत्याही चांगल्या गोष्टीच्या साध्यासाठी एकजूट करू शकत नसल्याचं सांगितलं.

त्यांच्या भाषणातील हेच सूत्र पकडून बोंद्रेदादांनी देसाईसाहेबांवर पलटवार केला. त्याला पार्श्वभूमी होती. १९६७ सालच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने जनरलसाहेबांना तिकीट देऊन उभं केलं होतं. कोल्हापूर हा डाव्या पक्षांचा बालेकिल्ला समजला जात असे. तेव्हा या पक्षांनी कोल्हापूरच्या लोकांना आदरणीय असणाऱ्या विजयमाला राणीसाहेबांना उभं केलं. छत्रपती घराण्याविषयी वाटणाऱ्या आस्थेपोटी लोकांनी राणीसाहेबांना निवडून दिलं व जनरलसाहेबांना पाडलं! त्या वेळी जर ते निवडून आले असते, तर काँग्रेस त्यांना संरक्षणमंत्री करणार होते, अशी चर्चा होती. बोंद्रेदादा काँग्रेसचे निस्सीम कार्यकर्ते. त्यांना हा काँग्रेसचा पराभव जिव्हारी लागला होता. 'संताजीचरित्रा'च्या प्रकाशनाच्या निमित्ताने जनरलसाहेब व्यासपीठावर असताना दादांनी विरोधी पक्षाचं उट्टं काढलं. त्या वेळी तुमचं एकीचं तत्त्वज्ञान कुठं गेलं होतं? असा सवाल त्यांनी केला. सारं सभागृह अवाक् झालं. वाटलं की देसाईसाहेब आता दादांना प्रत्युत्तर देणार! पण, तसं झालं नाही. त्यांनी दादांच्या टीकेचा हसत-हसत स्वीकार केला. त्यामुळे सभेचा औचित्यभंग न होता कार्यक्रम पुढे चालू राहिला.

सर्वांत शेवटी गोनीदां बोलले. 'संताजी घोरपडे हा शिवछत्रपतींच्या रणनीतीमधील खरा वारसदार व गनिमी काव्याचा असामान्य सेनानी' असा त्याचा गौरव त्यांनी केला. चरित्रलेखनासाठी मी घेतलेल्या कष्टाचा उल्लेख करून हे

'संताजीचरित्र' म्हणजे ऐतिहासिक सत्याच्या गोफात कागदोपत्रींचे पुरावे गुंफून केलेला फुलांचा एक सुंदर हार असल्याचं त्यांनी सांगितलं. आपल्या भाषणात पुढे ते म्हणाले, "मराठेशाहीतील पराक्रमी व्यक्तींची चरित्रं लिहून जयसिंगराव पवारांनी एक गोष्ट केली आहे, ती म्हणजे ते आपल्या पूर्वजांच्या ऋणातून मुक्त झाले आहेत. मराठ्यांवर त्यांनी अत्यंत मोठा उपकार करून ठेवला आहे. आम्ही मराठे म्हणजे आम्ही सर्व मराठे; मग मी बामण असो, कोकणस्थ असो किंवा आणि कोणी. आम्हा सर्वांवर त्यांनी अत्यंत मोठा उपकार करून ठेवला आहे. आणि तेही एका आदर्श इतिहासकाराला साजेशी चरित्रं त्यांनी लिहिली आहेत.

जयसिंगरावांच्या रूपाने एक सच्चा इतिहासकार प्रस्तुत झाला आहे. माझी जयसिंगरावांना प्रार्थना आहे की, त्यांनी नेताजी पालकर, धनाजी जाधव व तानाजी मालुसरे यांचीही चरित्रे लिहावीत.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी असे म्हटले आहे की, खलाटीतून व वलाटीतून असा दोन वेळा मी सह्याद्री तुडवला आहे. मी असे म्हणेन की जयसिंगराव पवारांनी त्या तोडीचे काम केले आहे!"

### 'संताजीचरित्रा'वरील तज्ज्ञांचे अभिप्राय

माझा हा चरित्रग्रंथ म्हणजे ऐतिहासिक साहित्यामधील पहिले 'संताजी- चरित्र' होते. याचं महाराष्ट्रात मोठं स्वागत झालं. गुरुवर्य पं. सेतुमाधवराव पगडींनी ग्रंथाची पोच देताना म्हटलं की, 'आपण संताजीचे चरित्र मोठ्या जिव्हाळ्याने आणि तितक्याच समतोलपणे लिहिले आहे. मन:पूर्वक अभिनंदन!' संताजीबरोबर आता धनाजी जाधवांचंही चरित्र लिहा, अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली. लवकरच महाराष्ट्र साहित्य परिषदेने सन १९८७ सालचं पहिलंच 'म. म. द. वा. पोतदार पारितोषिक' संताजीचरित्रास दिल्याचं जाहीर केलं. तसं परिषदेचे कार्यवाह राजेंद्र बनहट्टी यांचं मला पत्र आलं. पारितोषिक स्वीकारण्यासाठी आम्ही उभयता पुण्यास गेलो. आमच्याबरोबर डॉ. सरोजिनी बाबरही आल्या होत्या. पुण्यातील इतिहासाची जाणकार मंडळी व साहित्यिकही मोठ्या प्रमाणावर आले होते. डॉ. अ. रा. कुलकर्णींच्या हस्ते मला हा पुरस्कार दिला गेला. याच समारंभात डॉ. राजा दीक्षित यांचं अभ्यासपूर्ण असं भाषण झालं. त्या वेळी ते फार तरुण होते. त्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे, असं मला त्याच वेळी वाटून गेलं आणि पुढे ते खरंही ठरलं.

मुंबईचे ए. बी. घोरपडे लिहितात, 'खरोखरच आपला ग्रंथ हृद्य व माहितीपूर्ण झाला आहे. त्या काळातील इतिहास साद्यंत देताना आपण तो अशा आकर्षक शैलीत मांडला आहे की, ग्रंथ संपेपर्यंत तो हातातून खाली ठेववत नाही. आपण हा ग्रंथ लिहून संशोधनाच्या क्षेत्रात महनीय कामगिरी केली आहे. संताजी हा महान पराक्रमी सेनानी होता, हे सर्वज्ञात होतेच; पण त्याची गनिमी काव्याची असामान्य रणनीती कशी होती, हे जगाला फारसे माहीत नव्हते. ते आपण समकालीन कागदपत्रांच्या आधारे प्रकाशात आणण्याची मोठी कामगिरी केली आहे'- (२८ ऑक्टोबर, १९८७).

'संताजीचरित्रा'वर 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसत्ता', 'सकाळ' इत्यादी महाराष्ट्रातील प्रतिष्ठित वृत्तपत्रांत समीक्षकांची परीक्षणं येऊन गेली. अस्सल समकालीन मराठी व फारसी साधनांवर आधारलेलं संशोधनात्मक चरित्रग्रंथ म्हणून त्या सर्वांनी गौरव केला. ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतरही बराच काळ अभ्यासकांची पत्रं येत राहिली (आजही ती येत असतात). अशाच एका पत्रात डोंबिवली येथील इतिहासाभ्यासक अ. द. मराठे लिहितात, 'संताजीवरील तुमचे पुस्तक अशा स्वरूपात प्रथमच असले तरी ते इतके पूर्ण वाटते की, सध्या तरी त्यावर काही वाद, आक्षेप येणार नाहीत आणि आले तरी ते सामान्य दर्जाचे असतील. तुमच्या नेहमीच्या पद्धतीने 'नामूलं लिख्यते किंचित्' असेच (तुमचे) लेखन आहे. जो भाग स्वप्रतिभेने लिहावा लागतो, तिथे अभिनिवेश नाही तर तर्क आहे आणि संताजीची शोकांतिका अशी उतरली आहे की, वाचनाच्या अखेरीला मन सुन्न होते...'

आणखी एका पत्रात माझ्या 'मराठेशाहीचा मागोवा' या लेखसंग्रहाच्या संदर्भात मराठे म्हणतात, 'तुमची प्रकर्षाने आठवण व्हावी असा प्रसंग घडला. पुणे येथील डॉ“ या रसायनतंत्रशास्त्रातील पदवीधराने ”' हे एक सुंदर पुस्तक लिहिले आहे. पुस्तक शुद्ध व बरेचसे पटणारे निष्कर्ष काढते. त्यांच्या लेखनात शिवाजी, औरंगजेब, मिर्झाराजा यांच्या स्वभाववैशिष्ट्यांचे विश्लेषण करून प्रसंगांचा वेध घेण्याचा प्रयत्न आहे. मात्र ऐतिहासिक व्यक्तीच्या स्वभावाचा नेमका आणि अचूक वेध घेण्याचे तुमचे कौशल्य इथे दिसत नाही. खरे म्हणजे हा गुण तुमच्याशिवाय अन्य कोणत्याही लेखकात मला दिसला नाही. तुम्ही ताराबाई हिकमती व हुकमती म्हणता, तेव्हा नेमके चित्र पुढे येते. संताजीच्या शोकांतिकेला त्याचा स्वभाव कसा कारण ठरला, हे तुमचे विश्लेषण साहित्यिक विश्लेषणाकडे कलते आणि एखादी ट्-जेडी वाचून अस्वस्थ व्हावे तसे अस्वस्थ वाटते. सूर्याजी पिसाळाचे तुम्ही रेखाटलेले चित्र माझ्या मनात असे उमटले आहे की, आजच्या राजकारणातील“ आणि” यांच्यावर जेव्हा वर्तमानपत्रात टीका येते, तेव्हा मला या दोघांची चीड येत नाही. उलट थोडी सहानुभूती वाटते; कारण त्यांचे दुर्गुण उघड असले तरी शेवटी त्यांचाही काही उपयोग असतो, असे मला वाटते'- (२३ जुलै, १९९७).

माझं सर्वांत आवडतं असं माझं पुस्तक कोणतं, असा जेव्हा मला प्रश्न विचारला जातो, त्या वेळी क्षणाचाही विलंब न लावता मी म्हणतो, "अर्थातच सेनापती संताजी घोरपडे!" आणि या पुस्तकाच्या यशाचं सारं श्रेय मी तीनशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या त्या महान सेनानायकास - संताजीस देतो.

✪

२५ वर्षांची परंपरा

# अक्षत गुप्ता

यांची पुस्तके


देशभरातील वाचकांवर मोहिनी घालणारी,
अल्पावधीत बेस्टसेलर ठरलेली

# द हिडन हिंदू


मालिका आता मराठीत...




## अनुवाद : मुक्ता देशपांडे




किंमत : ₹ २३०





किंमत : ₹ २८०




किंमत : ₹ ३००

ebook available





कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संकल्पनेची पायाभरणी करणारा विलक्षण प्रतिभावान ब्रिटिश गणितज्ञ - अॅलन ट्युरिंग

ebook available

## अॅलन ट्युरिंग

अतुल कहाते
किंमत : ₹ २९५





अमली पदार्थांच्या दुनियेतली सगळ्यात गूढ 'राणी', खबरी ते 'ड्रग क्वीन', बेबी पाटणकरची थरकाप उडवणारी कहाणी

ebook available

## म्याव म्याव


श्रीनाथ राव । अनु.: रेश्मा कुलकर्णी पाठारे
किंमत : ₹ ४७०




एक श्वेतवर्णीय गणितज्ञ आणि
एक कृष्णवर्णीय मोलकरीण...
या दोघांमधील अकृत्रिम स्नेहबंध

## जेनिमा आणि जेम्स

ब्रूक न्यूमन । अनु.: दुलारी देशपांडे
किंमत : ₹ ४२०




# ऑपरेशन सिंदूर

## ले.ज. सुदर्शन हसबनीस

**अनु. : डॉ.शुचिता नांदापूरकर फडके**

बैसरन खोऱ्यातील दहशतवादी हल्ल्यानं केवळ काश्मीरवर हल्ला केला नाही; तर पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्नही उभा केला. या हल्ल्यानं जगभर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. या हल्ल्याचं चोख प्रत्युत्तर भारतीय सैन्यानं दिलंच; पण या अनुषंगानं काश्मीरच्या सुरक्षेचा विषय पुन्हा ऐरणीवर आला. यामुळे या प्रश्नाच्या चर्चेची पुन्हा नवी गरज निर्माण झाली आहे. अशाच मुद्द्यांवर मेहता पब्लिशिंग हाऊसच्या आगामी पुस्तकातून प्रकाश टाकण्यात आला आहे. ले.ज. सुदर्शन हसबनीस यांच्या अनुभवातून साकारलेलं हे पुस्तक इंग्रजी आणि मराठी दोन्ही भाषांमधून प्रकाशित होत आहे. या आगामी पुस्तकाची ही झलक...

**भारत-पाकिस्तान तणाव - इतिहासात खोल रुजलेला संघर्ष**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात काश्मीरसाठी तीन युद्धं (१९४७, १९६५, १९९९) झाली असून, छोट्या-मोठ्या चकमकी तर सातत्याने होत असतात. जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण-रेषा 'एलओसी' निश्चित केलेली असली, तरी पाकिस्तान वारंवार शस्त्रसंधीचं उल्लंघन करून दहशतवाद्यांना भारतात घुसवण्याचा प्रयत्न करतो. सन २०१६मधील उरी हल्ला आणि २०१९मधील पुलवामा आत्मघातकी हल्ला हे दोन्ही हल्ले पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनांनी घडवले होते. त्यानंतर भारताने सर्जिकल स्ट्राइक आणि बालाकोट एअर स्ट्राइक यांसारखी ठोस सैनिकी

कारवाई केली.

लष्कर-ए-तोयबा (एलईटी) आणि जैश-ए-मोहम्मद (जेएएम) यांसारख्या संघटनांना पाठिंबा देत काश्मीरमधील दहशतवादाला खतपाणी घालण्याचं काम पाकिस्तान नेटाने करते. 'काश्मिरी स्वातंत्र्य संग्रामा'ला आधार देण्याचा दावा करणाऱ्या पाकिस्तानकडून दिली जाणारी आर्थिक मदत आणि सर्व प्रकारचा रसद पुरवठा यांतून त्यांच्या मुत्सद्दीपणाविषयी शंकेला वाव असून, त्यांचं धोरण संशयास्पद ठरतं.

### भारत-चीन तणाव

आशियामधली शेजारी राष्ट्रं असणारे भारत आणि चीन यांच्यात व्यापार संबंध जरी मजबूत असले, तरी प्रत्यक्ष ताबा रेषेच्या (लाइन ऑफ ॲक्च्युअल कंट्रोल- एलएसी) नियंत्रणाच्या मुद्द्यावरून आजही सीमावादाचा प्रश्न सतत पेटलेला आहे. गलवान खोऱ्यात २०२०मध्ये झालेल्या संघर्षाने या प्रश्नाला ठळक कलाटणी मिळाली. चार दशकांत पहिल्यांदाच या चकमकीत दोन्ही बाजूंना अनेकांना गमवावं लागलं. चीनचा अक्साई चीनवर दावा आणि लडाखमधील पायाभूत सुविधांना होणारा विरोध प्रकल्पांना विरोध, यामुळे सीमा भागात लष्करी तणाव वाढतो आहे.

भारताला प्रतिरोध करण्यासाठी चीनने जाणीवपूर्वक पाकिस्तानशी संबंध जोपासले आहेत. बिजिंगने चीन-पाकिस्तान आर्थिक टापू (सीपीईसी – चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरच्या माध्यमातून पाकव्याप्त काश्मीरमध्ये गुंतवणूक केली आहे. इस्लामाबादशी लष्करी आणि तांत्रिक सहकार्यदेखील वाढत आहे. यामुळे, भारताला धोरणनिश्चिती करताना दोन आघाड्यांवर आव्हानाशी सामना करावा लागत आहे.

### सीमापार दहशतवाद आणि बंडखोरी

घुसखोरी होत असल्याचं कितीही अमान्य केलं, तरी आजही काश्मीरमध्ये सातत्याने सीमापार दहशतवादाचा धोका आहे. काश्मीरचा वापर 'बदली युद्धभूमी' म्हणून करत, भारतीय भूप्रदेशात घुसता येण्याच्या दृष्टीने जिहादींच्या गटांना प्रशिक्षण देण्यासाठी पाकिस्तानने छावण्या उभारल्या आहेत. भारतीय रक्षक दलाने जरी 'हायब्रीड मिलिटंट' ('झुंजार लढवय्ये' - हे स्थानिक युवक असतात, जे फारशा प्रशिक्षणाविना छोट्या-मोठ्या हल्ल्यांत सहभागी होतात) आणि 'लोन वुल्फ ॲटॅकर' (एकेकट्याने केलेले हल्ले) या बदलत्या तंत्रांशी जुळवून घेतलं असलं, तरी 'एन्क्रिप्टेड मेसेजिंग' आणि ड्रोनच्या साहाय्याने शस्त्रपुरवठा अशा नव्या तंत्रज्ञानांमुळे दहशतवादविरोधी कारवायांमध्ये अडचण येत आहे.

काश्मीरमधील घुसखोरी ही केवळ लष्करातल्या तरुणांपुरती मर्यादित राहिलेली नाही. सोशल मीडिया आणि ऑनलाइन कट्टर प्रचार यांमुळे प्रेरित होऊन वैयक्तिकरीत्या हल्ले करण्याची नवी पद्धत तरुणांमध्ये उदयाला आली आहे. परिणामतः, दहशतवादविरोधी कारवाया कितीही मोठ्या प्रमाणावर सुरू असल्या, तरी खोऱ्यात सतत अस्थिरता जाणवते.

### पाकिस्तानी दहशतवाद्यांना सीमापार मदत करण्याचा इतिहास १९४७–४८मध्ये सुरुवात

काश्मीरसाठीचं पहिलं युद्ध १९४७–४८मध्ये झालं. पाकिस्तानी लष्कराचं पाठबळ असणाऱ्या आदिवासी टोळ्यांनी काश्मीरमध्ये (बहुसंख्य मुस्लीम असणारं राज्य) आक्रमण करून या संघर्षाची सुरुवात केली. काश्मीरमधील मुस्लीम उठावाला मदत देण्याच्या नावाखाली त्यांनी हे आक्रमण केलं. मात्र, मार्गक्रमण करताना लुटालूट आणि अत्याचार करणाऱ्या या टोळ्यांना स्थानिक काश्मिरी लोकांनी पाठिंबा दिला नाही. भारतीय सैन्याच्या बाजूने ठामपणे उभे राहत समस्त काश्मीरवासियांनी पाकिस्तानी आक्रमणाला प्रतिकार करत त्यांना श्रीनगरच्या अलीकडेच रोखलं. काश्मीरचे महाराज हरिसिंग (जे हिंदू होते) यांनी ते राज्य भारतात विलीन करण्याचा निर्णय घेतला आणि संयुक्त राष्ट्रांच्या हस्तक्षेपातून १९४९मध्ये युद्धविराम झाला. ही घटना भविष्यातील पाकिस्तानी हस्तक्षेपांची बीजं रोवणारी ठरली.

काश्मीरच्या संदर्भात हजार जखमा देऊन भारताला रक्तबंबाळ करण्याच्या पाकिस्तानच्या धोरणाची निर्मिती आणि परिणाम

'ब्लीड इंडिया विथ अ थाउजंड कट्स' – 'हजार जखमा देऊन भारताला रक्तबंबाळ करणे' ही पाकिस्तानी गुप्तचर संस्थेने (आयएसआय) आणि लष्करी अधिकाऱ्यांनी विकसित केलेली आणि व्यापकपणे स्वीकारली गेलेली अनौपचारिक रणनीती आहे. या धोरणाची रचना १९७०च्या उत्तरार्धात आणि १९८०च्या पूर्वार्धात करण्यात आली. समोरासमोरील युद्धात भारताचा सामना आपण करू शकत नाही, हे १९७१च्या युद्धात झालेल्या पराभवामुळे पाकिस्तानच्या लक्षात आल्याने त्यांनी हे धोरण आखलं. या युद्धात बांगलादेशाची निर्मिती झाली.

या असममितीय धोरणाचा संपूर्ण भर हा थेट लष्करी युद्ध टाळण्यावर होता. आर्थिक आणि सामरिकदृष्ट्या ते पाकिस्तानला परवडणारं नव्हतं. भारताच्या, विशेषतः काश्मीर आणि पंजाबमधील, अंतर्गत कमकुवतपणाचा फायदा करून घेणं, ही या धोरणामागील कल्पना होती. उघड युद्ध न करता, गुप्त कारवाया, दहशतवाद, बंडखोरी आणि प्रचारयंत्रणा वापरून भारताला राजकीय, आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या थकवणं हे या धोरणाचं वैशिष्ट्य होतं. या धोरणाचे मुख्य शिल्पकार जनरल झिया-उल्-हक होते. त्यांच्या कारकिर्दीत पाकिस्तानने पंजाबमध्ये (खलिस्तानी चळवळीच्या माध्यमातून) आणि नंतर काश्मीरमध्ये बंडखोरीला आक्रमक पाठबळ दिलं.

ही रणनीती प्रत्यक्षात आणण्यासाठी पाकिस्तानमध्ये आणि

पाकव्याप्त काश्मीरमध्ये दहशतवाद्यांना आणि बंडखोरांना प्रशिक्षण देत शस्त्रास्त्रं पुरवली गेली. हे प्रशिक्षित दहशतवादी काश्मीरमध्ये ‘छुप्या युद्धाचा भाग’ म्हणून पाठवले गेले. हिजबुल मुजाहिदीन, लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद यांसारख्या दहशतवादी गटांना नैतिक पाठिंबा दिला गेला, साहित्यसामग्रीचा पुरवठा करण्यात आला आणि आर्थिक मदतही करण्यात आली. पाकिस्तानी लष्कराने सीमापार गोळीबाराच्या आडून काश्मीरमध्ये घुसखोरीस मदत केली. कट्टर इस्लामी विचारसरणी पसरवून स्थानिक तरुणांना दहशतवादी विचारांकडे वळवण्यासाठी काश्मीरमधील आधीपासून असलेल्या सामाजिक आणि राजकीय तणावाचा फायदा घेतला गेला. समन्वित माहिती युद्धाच्या मोहिमेअंतर्गत या सर्व कारवाया चालवण्यात आल्या. काश्मीरचा मुद्दा हा दहशतवाद नसून स्वातंत्र्यलढा आहे, असं आंतरराष्ट्रीय स्तरावर दाखवण्यात आलं. काश्मीर खोऱ्यात सतत अस्थिरतेचं वातावरण ठेवण्यासाठी पाकिस्तानने सतत लहान-मोठ्या चकमकी सुरू ठेवल्या. भारताच्या सहनशीलतेच्या मर्यादेपलीकडे हे जाणार नाही, याची काळजी घेण्यात आली. या संघर्षात भारताने आक्रमकता दाखवलीच, तर पाकिस्तान लगेच अण्वस्त्रांचा धाक दाखवे; जेणेकरून आंतरराष्ट्रीय दबाव येऊन भारताकडून परिस्थिती विकोपाला जाऊ नये.


काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणावर अस्थिरता निर्माण करण्यात ही नीती यशस्वी ठरली. भारताचा दृष्टिकोन आणि परिस्थितीची हाताळणी यांतील अंतर्गत विसंगतीमुळे त्यात भर पडली. त्यामुळे काश्मीरमध्ये गेल्या तीन दशकांहून अधिक काळ हिंसाचार सुरू आहे. यात हजारो निष्पाप नागरिक आणि सुरक्षादलांचे जवान मारले गेले. पायाभूत सुविधांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. नागरी जीवनावर लष्करी छाया पडली. त्यामुळे दुरावल्याची भावना वाढीला लागत मोठ्या प्रमाणावर स्थलांतर (विशेषतः काश्मिरी पंडितांसारख्या अल्पसंख्याकांचं) झालं. मागच्या-पुढच्या पिढ्या त्यात भरडल्या गेल्या. वारंवार उसळणारी आंदोलनं, बंद, दगडफेक या बाबी दैनंदिन जीवनाचा भाग झाल्या.

राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर सुरक्षितता राखण्याचा ताण आणि पर्यायाने आर्थिक भार अति वाढला. भारताला जम्मू-काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात सुरक्षा दल तैनात ठेवावं लागतं. बंडखोरीविरोधी कारवायांचा खर्च, पायाभूत सुविधा पुन्हा उभारणं आणि पर्यटनातून मिळणारं उत्पन्न बंद झाल्याने सोसावा लागलेला तोटा यापायी आर्थिकदृष्ट्या मोठं नुकसान झालं. विकासासाठी वापरता येऊ शकणारे स्रोत अंतर्गत सुरक्षेच्या धोक्यांमुळे इतरत्र वळवावे लागले.

या धोरणाचा परिणामस्वरूप, काश्मीरचा मुद्दा आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आणि भारताला आपल्या अंतर्गत धोरणांचं समर्थन जागतिक स्तरावर सातत्याने करणं भाग पडलं. भारतातही या धोरणामुळे, विशेषतः काश्मीर आणि पाकिस्तान यांसंदर्भातील, राजकीय ध्रुवीकरण वाढलं. या सततच्या धोक्यामुळे केंद्र सरकारचा प्रतिसाद संवादापासून कठोर लष्करी कारवाई (सर्जिकल स्ट्राइक, बालाकोट) करण्यापर्यंत बदलत गेला आहे.

या धोरणामुळे स्थानिक पातळीवर दहशतवाद वाढला आणि काश्मीरचा राजकीय प्रश्न लष्करी प्रश्नात रूपांतरित झाला. मशिदी, शाळा यांमधून आणि समाजमाध्यमांतून - यांपैकी अनेक पाकिस्तानी संस्थांकडून प्रायोजित आहेत - पसरवलेल्या कट्टर विचारसरणीमुळे काश्मिरी तरुणांवर दीर्घकालीन मानसिक परिणाम झाला.

‘हजार जखमा’ या पाकिस्तानच्या धोरणामुळे भारतात, विशेषतः जम्मू-काश्मीरमध्ये, मोठ्या प्रमाणावर हानी झाली असली, तरी पाकिस्तानचं अंतिम धोरणात्मक उद्दिष्ट साध्य झालं नाही. भारताने काश्मीर सोडलं तर नाहीच; उलट आपली भूमिका अधिक कठोर केली आहे. शिवाय, पाकिस्तानलाच या धोरणाचा

स्वातंत्र्यप्राप्तीच्या निकटचा कालखंड...
स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे एक वर्ष...
या कालखंडातील घटनांचा, व्यक्तींचा घेतलेला वेध

ebook available

**फ्रीडम ॲट मिडनाइट**

डॉमिनिक लॅपिए, लॅरी कॉलिन्स
अनु. माधव मोर्डेकर
किंमत : ₹ ४५०

फटका आंतरराष्ट्रीय स्तरावर बसला आहे. 'दहशतवाद्यांना आश्रय देणारा देश' म्हणून पाकिस्तानकडे आता बोट दाखवलं जातं. जिहादी संघटना उलटल्यामुळे पाकिस्तानचं अंतर्गत राजकारण आणि अर्थव्यवस्था अस्थिर झाली आहे. दरम्यान, या धोरणामुळे तणाव कायम राहिला असला, तरी काश्मीर प्रश्न सुटलेला नाही किंवा पाकिस्तानची रणनीतिक स्थिती सुधारलेली नाही. या धोरणाचे रेंगाळणारे परिणाम दूर करण्यासाठी भारताला लष्करी कठोरता, राजकीय संवाद आणि काश्मीरमध्ये सामाजिक-आर्थिक विकास यांचा संतुलित वापर आवश्यक आहे.

**पाकिस्तानमधील दहशतवादी प्रशिक्षण शिबिरं आणि भारतात दहशतवाद भडकवण्यात आयएसआयची भूमिका**

'दहशतवादाला राज्याश्रय देणारा देश' म्हणून पाकिस्तानचा सुस्पष्ट उल्लेख इतिहासात गेली कित्येक दशकं केला जात आहे. दहशतवादी प्रशिक्षण शिबिरांचं खोलवर जाळं हा पाकिस्तानच्या 'प्रॉक्सी वॉरफेअर स्ट्रॅटेजी'चा (बदली युद्ध धोरण) गाभा होय. पाकव्याप्त काश्मीर, खैबर पख्तुनख्वा आणि बलुचिस्तान या भागांत ते मुख्यतः पसरलेलं आहे. या साऱ्या छावण्यांची निर्मिती, पाठिंबा आणि प्रत्यक्ष कारवाईचं नियोजन यांमध्ये आयएसआयची भूमिका मुख्य आहे. या प्रशिक्षण शिबिरांमध्ये दहशतवाद्यांना प्रशिक्षण देऊन, शस्त्रं पुरवून, भारतात, विशेषतः काश्मीरमध्ये, घुसवलं जातं. 'वरकरणी नकार' (प्लॉझिबल डिनायबिलिटी) देत असममित युद्ध छेडण्याच्या पाकिस्तानच्या व्यापक धोरणाचा हा भाग आहे.

पाकव्याप्त काश्मीरमधील मुजफ्फराबाद, कोटली, बालाकोट आणि मन्सेहरा येथे दहशतवादी छावण्या असल्याचं भारतीय सुरक्षायंत्रणेच्या लक्षात आलं आहे. पाकिस्तानी पंजाबमधील बहावलपूर येथे 'जैश-ए-मोहम्मद' या दहशतवादी संघटनेचं मुख्यालय आहे. मुरिदके येथे 'लष्कर-ए-तोयबाचं मुख्यालय' आहे. मीरानशाह आणि उत्तर वझिरिस्तानच्या आदिवासी भागात, तसंच पंजाब प्रांतातील दुर्गम भागांत — विशेषतः लाहोर आणि फैसलाबादच्या आसपास दहशतवादी प्रशिक्षण शिबिरं आहेत. या छावण्या लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद, हिजबुल मुजाहिदीन, अल-बद्र, हरकत-उल्-मुजाहिदीन ह्या आणि इतर गटांकडून चालवल्या जातात.

दहशतवाद्यांना लहान शस्त्रास्त्रं, ग्रेनेड्स, स्फोटकं हाताळणं, गनिमी कावा (गुरिला वॉरफेअर) आणि सापळा रचणं (ॲम्बुश) या तंत्रांचं प्रशिक्षण दिलं जातं. प्रशिक्षणादरम्यानच त्यांची मानसिक तयारी केली जाते. त्यांचा बुद्धिभ्रंश करत त्याच्यावर कट्टर विचारसरणी बिंबवली जाते. निवडक तरुणांना इम्प्रोव्हाइझ्ड एक्स्प्लोझिव्ह डिव्हायसेस (IED - स्फोटकं) कशी वापरायची, नागरी युद्धं कशी







२५ वर्षांची परंपरा

रसिक वाचकांसाठी

अमेरिकन क्लासिक्स

आता मराठीत...





ebook available


छेडायची आणि आत्मघातकी हल्ले कसे करायचे यांचं प्रशिक्षण दिलं जातं. फिदायीन मिशनसाठी या प्रशिक्षणाचा कालावधी काही आठवड्यांचा, तर प्रगत मार्गांनी घुसखोरी आणि विध्वंसक कारवायांसाठी अनेक महिन्यांचा असतो.

**प्रशिक्षण, निधी आणि समन्वय यांत आयएसआयची भूमिका**

इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजन्स (आयएसआय) ही पाकिस्तानची प्रमुख गुप्तचर संस्था असून, काश्मीरमधील दहशतवादाला खतपाणी घालण्यात तिची भूमिका अत्यंत निर्णायक आहे. दहशतवादी भरतीसाठी आयएसआय प्रामुख्याने कट्टरपंथी मदरसे, निर्वासित छावण्या किंवा नियंत्रणरेषेच्या दोन्ही बाजूंवरील गरीब भागांतील तरुणांना निवडते. या भरतीनंतर प्रशिक्षण शिबिरांमध्ये सुरक्षितपणे ने-आण, शस्त्रास्त्र पुरवठा आणि आर्थिक मदत यांची जबाबदारी आयएसआय घेते. भारतातील लक्ष्यांची निवड, कारवायांचं नियंत्रण (कधी प्रत्यक्ष, तर कधी दूरस्थपणे) आणि घुसखोरीचं नियोजन यांमध्ये आयएसआय अधिकारी थेट सहभागी असतात. कुठून सीमा ओलांडायची, पाकिस्तानी रेंजर्स/आर्मीचे कव्हर फायर, बोगदे किंवा ड्रोनद्वारे घुसखोरी अशा सर्व बाबींचं नियोजन आयएसआय करते. पाकिस्तानी कायद्यांतर्गत अंमलबजावणी किंवा आंतरराष्ट्रीय तपास यापासून या छावण्यांचं संरक्षण करण्याचीही काळजी आयएसआय घेते. दहशतवादी गटांशी आयएसआयचे संबंध दीर्घकालीन आणि रणनीतिक आहेत. भारताला मोठ्या प्रमाणावर नुकसान पोहोचवत सतत जखमा देण्यासाठीच्या विविध पद्धती पाकिस्तानला कमी खर्चात पुरवण्याचं काम आयएसआयचंच असतं. अधिकृत पातळीवर मात्र आयएसआय आपला सहभाग नाकारते.

अनेक गुप्तचर अहवाल आणि पकडलेल्या दहशतवाद्यांच्या कबुलीजबाबांमधून भारतात अशांतता पसरवण्यात आयएसआयचा थेट हात असल्याचं स्पष्टपणे सिद्ध झालं आहे. 'आपण एलईटीच्या छावणीत आयएसआय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण घेत होतो,' असं सन २००८मध्ये मुंबईवर झालेल्या हल्ल्यानंतर जिवंत पकडण्यात आलेल्या अजमल कसाब या एकमेव दहशतवाद्याने कबूल केलं आहे. एलईटीमधली आयएसआयची गुंतवणूक आणि समन्वयातील भूमिका यासंदर्भात मुंबईत हेरगिरी करण्यात गुंतलेल्या डेव्हिड हेडली या पाकिस्तानी-अमेरिकी नागरिकाने अमेरिकन न्यायालयात साक्ष दिली. आयएसआयकडून हाफिज सईद (एलईटी) आणि मसूद अझहर (जेईएम) यांना निधी आणि संरक्षण मिळत असल्याचे दाखले भारताने आंतरराष्ट्रीय संस्थांना दिलेल्या कागदोपत्रीच्या पुराव्यांमध्ये आहेत. पुलवामा इथे झालेल्या आत्मघाती हल्ल्याचं नियोजन जेईएमच्या सदस्यांनी आयएसआयच्या देखरेखीखाली केलं, त्यासाठी निधीही प्राप्त केला, असं पुलवामावर हल्ला करणाऱ्या आदिल डार याच्या व्हिडिओमधून आणि एनआयए यांच्या तपासातून स्पष्ट झालं आहे. आंतरराष्ट्रीय दबाव असूनही, दहशतवादी गट पाकिस्तानमध्ये नवनवीन नावांनी किंवा 'धर्मादाय संस्था' म्हणून खुलेआम कार्यरत असतात; ते आयएसआयचा वरदहस्त असल्यानेच.

भारताने २०१६मध्ये केलेले सर्जिकल स्ट्राइक्स आणि २०१९च्या बालाकोट एअर स्ट्राइकनंतर पाकिस्तानने आपली रणनीती बदलली आहे. आता हल्ल्यांपासून वाचवण्यासाठी दहशतवादी छावण्या पाकिस्तानच्या मुख्य भूभागात खोलवर हलवण्यात आल्या आहेत. पंजाब आणि जम्मू भागात शस्त्रांची तस्करी करण्यासाठी आयएसआयने ड्रोनचा वापर केला आहे. सुरक्षायंत्रणांना माग काढता येऊ नये, यासाठी 'हायब्रिड दहशतवादी' म्हणजेच ज्यांच्याविरुद्ध कोणत्याही गुन्ह्याची नोंद नाही, अशा तरुणांकडून ही कामं करून घेतली जात आहेत. ऑनलाइनच्या


मास्टर स्टोरी टेलर जेफ्री आर्चर यांची
विल्यम वॉरिक मालिकेतील नवी अफलातून कादंबरी...

ebook available

**हिडन इन प्लेन साइट**

जेफ्री आर्चर । अनु.: सविता दामले
किंमत : ₹ ५५०

माध्यमातून तरुणांना कट्टरपंथाची दीक्षा दिली जात आहे. त्यामुळे प्रत्यक्ष छावणीत आणून प्रशिक्षणाची गरज कमी झाली आहे. तरीही, नियंत्रणरेषेजवळील छावण्या अजूनही कार्यरत आहेत. याच छावण्यांचा वापर 'आरंभबिंदू' (लाँचपॅड) म्हणून केला जात असून, इथे घुसखोर एकत्र येतात. त्यानंतर, पाकिस्तानच्या लष्करी ठाण्यांकडून केल्या जाणाऱ्या गोळीबाराचा लाभ घेत (कव्हर) ते भारतात घुसतात.

सातत्याने वाढत जाणारे पुरावे असूनही प्रशिक्षण छावण्यांचे अस्तित्व किंवा आयएसआयचा सहभाग पाकिस्तान मात्र नाकारते. जागतिक दबाव टाळण्यासाठी पाकिस्तानने केवळ मामुली उपाय (उदा. तात्पुरती नजरकैद, एफएटीएफ संदर्भातील छापे) केले आहेत. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत चीनने दिलेल्या पाठिंब्याने पाकिस्तानला मदत झाली आहे. मसूद अझहरसारख्यांना 'कुख्यात दहशतवादी' म्हणून घोषित न करणं त्यांना शक्य झालं, ते त्यामुळेच. जागतिक स्तरावर प्रचंड एकमत झाल्यावरच त्यांना तसं करावं लागलं.

एफएटीएफसारख्या (फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स) आंतरराष्ट्रीय संस्थांनी पाकिस्तानला वारंवार 'काळ्या यादी'त टाकलं आहे. 'यूएन सँक्शन्स कमिटी'ने लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद यांना 'दहशतवादी संघटना' म्हणून घोषित केलं आहे. 'यूएस डिपार्टमेंट ऑफ स्टेट्स'ने दहशतवादाला पाठिंबा देणारा देश म्हणून पाकिस्तानची नोंद केली आहे.


भारताच्या दहशतवादविरोधी रणनीतीची भूमिका आता केवळ प्रतिक्रियात्मक संरक्षण करणं अशी राहिली नसून, आक्रमक आणि शिक्षा करणारी झाली आहे. नियंत्रणरेषेपलीकडील लाँचपॅड्स, दहशतवादी छावण्यांचे पायाभूत ढाचे आणि दहशतवादी नियंत्रक यांना थेट लक्ष्य केलं जात आहे. पाकिस्तानमधील दहशतवादी प्रशिक्षण छावण्या आणि आयएसआयचा थेट सहभाग या भारताविरुद्धच्या जाणीवपूर्वक, दीर्घकालीन प्रॉक्सी युद्धाचा भाग आहे. पाकिस्तानच्या राजनैतिक नकारांनंतरही, तिथले दहशतवादाचं जाळं अजूनही टिकून असून, ते प्रादेशिक शांततेला तो गंभीर धोका आहे. खऱ्या अर्थाने शांती साधायची असेल, तर आंतरराष्ट्रीय दबाव आणि पाकिस्तानचं अंतर्गत उत्तरदायित्व यांद्वारे या दहशतवादी व्यवस्थेचं उच्चाटन करणं अत्यावश्यक आहे. तोपर्यंत, भारताने सतर्क, आक्रमक आणि धोका नष्ट करण्यासाठी सामरिक व तांत्रिक स्तरावर सज्ज राहणं आवश्यक आहे.

**सन १९९०चं दशक - वाढती दहशत आणि कारगिल युद्ध**

१९९०च्या दशकात सीमापार दहशतवाद चांगलाच बोकाळला. सामान्य नागरिक, राजकारणी, काश्मिरी पंडित आणि सुरक्षादलांचे जवान यांना दहशतवाद्यांनी लक्ष्य केलं होतं. सन १९९०च्या सुरुवातीस झालेल्या वंशविच्छेदनामुळे तीन लाखांहून अधिक काश्मिरी पंडितांना स्थलांतर करावं लागलं. या बंडखोरीमागे पाकिस्तानचा सक्रिय हस्तक्षेप तर स्पष्टपणे दिसून आलाच, शिवाय १९९९मध्ये कारगिल येथे झालेल्या घुसखोरीतही तो दिसून आला. या युद्धात पाकिस्तानी सैनिकांनी दहशतवाद्यांचा वेष घेत नियंत्रण-रेषा ओलांडली होती. दहशतवादाचा आणि अनियमित युद्धपद्धतीचा वापर 'शासकीय धोरण' म्हणून पाकिस्तान कसा करते, याचं उघड-उघड प्रदर्शन कारगिल युद्धामुळे झालं. यापायी आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांचा तीव्र निषेध केला गेला. राजनैतिकदृष्ट्या त्याला एकटं पाडण्यात आलं.

**सन २०००ते आजपावेतो - अधिक कौशल्य आणि युद्धतंत्राची विविधता**

सन २००१नंतर, विशेषतः अमेरिकेने पाकिस्तानपुरस्कृत


लाखो लोकांना मारण्याची आखली घातक योजना...
तिच्या तपासाची रंगलेली उत्कंठावर्धक कथा

ebook available

**व्हेक्टर**

रॉबिन कुक । अनु.: डॉ. प्रमोद जोगळेकर
किंमत : ₹ ६५०

अनेक संघटनांना दहशतवादी संघटना घोषित केल्यावर, पाकिस्तानवर आंतरराष्ट्रीय दबाव वाढला. तरीही या दहशतवादी गटांना पाकिस्तानकडून गुप्तपणे पाठिंबा मिळत राहिला. सन २००८मधील मुंबईवरील हल्ला हा एक निर्णायक क्षण ठरला — लष्कर-ए-तोयबाने राबवलेली ही अत्यंत नियोजित आणि कमांडो शैलीतील नागरी हल्ल्याची मोहीम होती. संघटना किती अत्याधुनिक पद्धतीने काम करते, हे त्यातून अधोरेखित झालं.

अलीकडच्या काळात पाकिस्तानने 'मिश्र युद्धतंत्र (हायब्रिड वॉरफेअर)' अंगीकारलं आहे. पारंपरिक दहशतवादाच्या जोडीने सायबर-हल्ले, चुकीची माहिती पसरवणं आणि ड्रोनच्या साहाय्याने हेरगिरी केली जाते. अशा 'ओळख पटवता न येण्याजोग्या कृतींमधला सहभाग पाकिस्तान नाकारत असल्यामुळे पारंपरिक लष्करी साधनांनी प्रत्युत्तर देणं भारतासाठी अधिक कठीण झालं आहे.

**काश्मीरमधील दहशतवादाची वाढ - १९८९–२०२५**

**सन १९८९–२००० - पहिली लाट**

काश्मीरमधील बंडखोरीची खरी सुरुवात १९८९मध्ये झाली. निवडणुका आणि प्रशासनावरील आरंभीच्या निदर्शनांनी हळूहळू हिंसक बंडाचं रूप घेतलं. पाकिस्तानमधील गटांनी या आंदोलनाचा ताबा घेतला. शेकडो काश्मिरी तरुणांनी शस्त्र प्रशिक्षणासाठी सीमा ओलांडली. सन १९९०च्या दशकाच्या मध्यापर्यंत, या चळवळीवर परकीय दहशतवादी — मुख्यतः अफगाणी आणि पाकिस्तानी — वर्चस्व गाजवत होते. या वाढत्या बंडखोरीला उत्तर म्हणून भारताने काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणावर सुरक्षादलं तैनात केली. सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा (एएफएसपीए) लागू करण्यात आला. त्यामुळे लष्कराला व्यापक अधिकार मिळाले. मात्र, या काळात मानवी हक्कांचं उल्लंघन, बेपत्ता होणं, खोट्या चकमकी या घटना घडल्या, ज्यामुळे स्थानिक लोकांमध्ये खोल नाराजी आणि असंतोष निर्माण झाला.


**सन २००१–२०१० - घट आणि बदल**

सन २०००च्या दशकाच्या सुरुवातीला, प्रभावी दहशतवादविरोधी कारवाया आणि लोकांमधील वाढती अस्वस्थता यामुळे हिंसाचारात लक्षणीय घट झाली. राजकीय प्रक्रिया पुन्हा सुरू होऊन २००२ व २००८मधील निवडणुका तुलनेने शांततेत पार पडल्या. मात्र, २००८मध्ये अमरनाथ जमीन हस्तांतरणावरून निर्माण झालेल्या असंतोषाने आणि त्यानंतरच्या कठोर कारवायांमुळे जनतेचा संताप पुन्हा जागा झाला. याच काळात दहशतवादी भरती पद्धतीमध्येही बदल झाला. पूर्वी ही चळवळ प्रामुख्याने पाकिस्तानप्रायोजित होती; पण आता दुरावालेपण आणि अन्यायाची भावना वाढल्याने अधिकाधिक स्थानिक तरुण दहशतवादी गटांत सहभागी होऊ लागले.

सन २०१०–२०१९ - पुनरुत्थान आणि कट्टरता

सन २०१६मध्ये सोशल मीडियावर लोकप्रिय झालेल्या तरुण हिजबुल कमांडर बुरहान वानी याला मारल्यानंतर काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणावर निदर्शनं झाली. बंद पाळण्यात आला. तो अनेक महिने चालला. त्याच्या मृत्यूने एक नवा टप्पा गाठला — दहशतवाद केवळ भौगोलिक राजकारणापुरता मर्यादित न राहता अस्मिता आणि विचारधारा यांच्याशीही जोडला गेला.

या काळात 'हायब्रिड दहशतवादी' मोठ्या प्रमाणावर दिसू लागले. पूर्वी कोणत्याही पोलिसी नोंदी नसलेले, शांतपणे दहशतवादी गटांत सामील होणारे तरुण होते ते. भरती आणि प्रचारासाठी दहशतवादी संघटनांनी सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू केला.




शिवशाहीपूर्व काळापासून ते राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतरच्या कालखंडावर प्रकाश टाकणारा खंड

ebook available

**मराठ्यांचा इतिहास - खंड १ शिवशाही**

डॉ. जयसिंगराव पवार

किंमत : ₹ ७५०

चकमकीदरम्यान सामान्य नागरिकांनी अडकलेल्या दहशतवाद्यांना मदत करण्यासाठी गर्दी करणं, हे नव्या रणनीतीचं लक्षण ठरलं. राजकीय कार्यकर्ते आणि सुरक्षादल यांना लक्ष्य करून ठार करण्याचा प्रकार सुरूच राहिला.

**सन २०१९-२०२५ - अनुच्छेद ३७०नंतरचे बदल आणि नवे नमुने**

ऑगस्ट २०१९मध्ये, अनुच्छेद ३७० रद्द करणं ही काश्मीरच्या राजकारणातील भूकंपासम घडामोड म्हणावी लागेल. सुरुवातीला कडक सुरक्षा उपायांमुळे दहशतवादी कारवायांमध्ये तात्पुरती घट झाली; पण त्यानंतर दहशतवादाने आपलं स्वरूप बदललं. आता मोठ्या प्रमाणावरचे हल्ले कमी झाले असले, तरी लक्ष्य ठरवून हत्या करणं, ग्रेनेड्स फेकणं आणि एकेकट्या दहशतवाद्यांनी (लोन-वुल्फ) हल्ले करणे, हे प्रकार वाढले आहेत. दक्षिण काश्मीर अजूनही संघर्षाचा केंद्रबिंदू आहे. पुलवामा, शोपियां आणि कुलगाम हे जिल्हे भरती आणि हिंसाचारात आघाडीवर आहेत. अल्पसंख्याक समुदाय, विशेषतः काश्मिरी पंडित आणि स्थलांतरित कामगार, पुन्हा एकदा सहज लक्ष्य होत आहेत. सुरक्षादलांनी अनेक उच्चपदस्थ सेनाधिकाऱ्यांना ठार केलं असलं, तरी नवीन भरतीची साखळी कायम आहे. गुप्तचर अहवालानुसार, जम्मूमध्ये ड्रोनवर चालणाऱ्या शस्त्रांची तस्करी होत असून, त्याचा फायदा दक्षिण काश्मीरमधील दहशतवादी गट घेत आहेत. शाळा आणि कॉलेज यांमधील तरुणांमध्ये ऑनलाइन कट्टरतेचं प्रमाणही वाढलं आहे.

**राजकीय भ्रमनिरास**


कधी काळी दिल्ली आणि काश्मीर खोऱ्यातील दुवा मानले जाणारे मुख्य प्रवाहातील राजकीय पक्ष आजच्या तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदनाम झाले आहेत. निवडून आलेल्या नेत्यांना सन २०१९नंतर झालेली अटक आणि प्रदेशाला पुन्हा राज्याचा दर्जा बहाल करण्यात होणारा विलंब यामुळे राजकीय नकारात्मकता आणि निराशा अधिक खोल झाली आहे. दिल्लीच्या पाठबळावर झालेल्या जिल्हा विकास परिषद (डीडीसी) निवडणुकांना व्यापक लोकमान्यता मिळाली नाही. या राजकीय पोकळीचा फायदा फुटीरतावादी आणि कट्टरपंथीय गट घेत आहेत. पारंपरिक राजकारणापासून दूर झालेल्या तरुणांना अतिरेकी विचारसरणी सहजपणे आकर्षित करते.

**गुप्तचर यंत्रणांचे इशारे**

गुप्तचर यंत्रणांनी अनेक चिंताजनक प्रवृत्ती नोंदवल्या आहेत. भरती आणि समन्वयासाठी एन्क्रिप्टेड मेसेजिंग ॲप्सचा वापर वाढला आहे. दहशतवादासाठी आखाती देशांतून हवालामार्गे येणारा पैसा वाढला आहे. शहरी दहशतवादी कारवायांमध्ये गुन्हेगारी टोळ्या आणि दहशतवादी यांच्यातील संगनमत वाढले आहे. ड्रोनच्या माध्यमातून, तसंच दहशतवादी छावण्यांमधून आधुनिक शस्त्रं मिळत आहेत. राजौरी आणि पूंछमधील सुरक्षादलांवरील लक्षित हल्ल्यांमुळे अनेक गटांमध्ये घनिष्ठ समन्वय असल्याचं स्पष्ट होत आहे.

**समाजपातळीवरील भीती**

दहशतवादी आणि राज्य यांच्यापायी सामान्य काश्मिरी नागरिक सतत भीतीच्या सावटाखाली जगत आहेत. तरुण मुलांना भरती करून घेतलं जाण्याच्या किंवा संशयाच्या छायेत राहावं लागतं आहे. सूडापायी होणाऱ्या हल्ल्यांची किंवा चुकून अटक होण्याची भीती कुटुंबांना आहे. अल्पसंख्याकांना लक्ष्य करून केलेल्या सन २०२१-२०२३मधील हत्या १९९०च्या दशकातील दहशतीची आठवण करून देतात. वारंवार होणारे बंद, देखरेख, तसंच घेराबंदी


पेशवाई कालखंडाचं अभ्यासपूर्ण, ससंदर्भ दर्शन

ebook available

**मराठ्यांचा इतिहास - खंड २ पेशवाई**

डॉ. जयसिंगराव पवार

किंमत : ₹ ६५०

आणि शोधमोहिमा (सीएएसओ) यांमुळे शिक्षण, आरोग्यसेवा आणि व्यापार यांवर मोठा परिणाम झाला आहे. भीतीमुळे खुला संवाद होऊ शकत नसल्याने नागरी समाज संकुचित झाला आहे.

**काश्मीरमधील दहशतवादी संघटना - रचना, मुख्यालय, नावांत बदल, नेतृत्व, उत्क्रांती आणि संघटनात्मक बांधणी**

काश्मीरमधील दहशतवाद हे एक सतत बदलत राहणारं आणि गुंतागुंतीचं संकट आहे, जे स्थानिक तक्रारी आणि सीमापार हस्तक्षेप यांच्यामुळे अधिक गंभीर झालं आहे. गेल्या काही दशकांत, अनेक दहशतवादी संघटना उदयास आल्या, विभागल्या गेल्या, नव्या नावाने पुन्हा उभ्या राहिल्या. सुरक्षेच्या आणि राजकारणाच्या बदलत्या स्वरूपाला अनुसरून त्यांनी आपल्या रणनीती बदलल्या आहेत. पूर्वी या संघटनांमध्ये पाकिस्तान आणि अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांचं वर्चस्व होतं. मात्र गेल्या दशकात, स्थानिक काश्मिरी तरुणांची भरती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. धर्म, अन्याय झाल्याची भावना आणि सोशल मीडियाद्वारे पसरवल्या जाणाऱ्या प्रचारामुळे त्यांना प्रेरणा मिळत आहे.

**लष्कर-ए-तोयबा (एलईटी) -**

लष्कर-ए-तोयबा, म्हणजेच 'धार्मिक सैनिकांची सेना.' ही संघटना १९८०च्या उत्तरार्धात हाफिज सईद आणि झफर इक्बाल यांनी स्थापन केली. ती मर्कज दावाह-व-अरशद या पाकिस्तानातील संघटनेची दहशतवादी शाखा आहे. तिचं मुख्यालय लाहोरजवळील मुरिदके येथे आहे. जम्मू आणि काश्मीरमधील भारतीय नियंत्रण संपवणं आणि या प्रदेशाला पाकिस्तानमध्ये विलीन करणं हे तिचं मुख्य उद्दिष्ट आहे.

**नेतृत्व -**

हाफिज मोहम्मद सईद हा लष्कर-ए-तोयबाचा संस्थापक आणि विचारप्रणालीचा प्रमुख आहे. पाकिस्तानने सईदवर २००२मध्ये बंदी घातली असून, संयुक्त राष्ट्र, अमेरिका, ब्रिटन ह्यांनी आणि इतरांनीही त्याला 'दहशतवादी' घोषित केलं आहे, तरीही सईदने 'जमात-उद-दावा' या धर्मादाय संस्थेच्या आडून आपला प्रभाव टिकवला आहे. झकी-उर-रहमान लखवी हा ऑपरेशनल कमांडर असून, २६/११च्या मुंबई हल्ल्यात तो सहभागी झाला होता. सन २०२३मध्ये ज्याला 'जागतिक दहशतवादी' घोषित करण्यात आलं, तो अब्दुल रहमान मक्की, हा वरिष्ठ नेता आणि विचारवंत आहे. काश्मीरमध्ये लष्कर-ए-तोयबाची नेतृत्वरचना 'सेल्युलर' स्वरूपाची आहे. वेगवेगळ्या भागांसाठी स्वतंत्र कमांडर नेमले जातात.

**नावातील बदल -**

बंदी घातल्यानंतर लष्कर-ए-तोयबाने 'जमात-उद-दावा' या नावाने वरचेवर काम केलं. आंतरराष्ट्रीय चौकशी आणि निर्बंध टाळण्यासाठी, अलीकडच्या काळात लष्कर-ए-तोयबाने 'द रेसिस्टन्स फ्रन्ट' (टीआरएफ) आणि 'पीपल्स ॲन्टि-फॅसिस्ट फ्रन्ट' (पीएएफएफ)सारख्या काश्मीरमधील दहशतवादाला स्थानिक व धर्मनिरपेक्ष चेहरा देणाऱ्या नव्या प्रॉक्सी गटांचा वापर केला.

**विदेशी आणि स्थानिक सहभाग -**

लष्कर-ए-तोयबा ऐतिहासिकदृष्ट्या पाकिस्तानी कार्यकर्त्यांवर आणि पाकिस्तान, अफगाणिस्तान व इतर देशांतील विदेशी दहशतवाद्यांवर (विशेषतः १९९० व २०००च्या दशकात) मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहिली आहे. मात्र, २०१५नंतर दक्षिण काश्मीरमधील स्थानिक भरतीत वाढ झाली आहे, कारण स्थानिक लोकांमध्ये मिसळण्याचा प्रयत्न करत त्यायोगे पकडलं जाण्याचं टाळण्याचा समूहाचा प्रयत्न आहे. टीआरएफ अधिक स्थानिक वाटत असला, तरी अहवालानुसार नियंत्रण-रेषेपलीकडील एलईटी





फ्रेंच राज्यक्रांती आणि नेपोलियनचं चरित्र
यावर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकणारं वाचनीय पुस्तक

ebook available

**फ्रेंच राज्यक्रांती आणि बादशहा नेपोलियन**

डॉ. जयसिंगराव पवार
किंमत : ₹ २५०

नियंत्रकांकडून मार्गदर्शन मिळत असल्याचे पक्के अहवाल आहेत.

**कारवाया आणि डावपेच -**

भारतातील काही सर्वांत घातक हल्ल्यांसाठी एलईटी जबाबदार आहे. त्यामध्ये २००१मधील संसदेवरील हल्ला आणि २००८मधील मुंबईवरील हल्ले यांचा समावेश आहे. हा गट पाकिस्तानमध्ये पंथीय हिंसा टाळतो आणि भारतावर, विशेषतः जम्मू आणि काश्मीरमधील बारामुल्ला, कुपवाडा, अनंतनाग, पुलवामा आणि शोपियां या जिल्ह्यांमध्ये अधिकतर सक्रिय असतो. सहसा नियंत्रण-रेषेवरील उरी, टंगधार आणि माछिल या मार्गांचा वापर एलईटी घुसखोरीसाठी करतो.

**हिजबुल मुजाहिदीन (एचएम)**

**मूळ आणि ठिकाण -**

सन १९८९मध्ये स्थापन झालेला हिजबुल मुजाहिदीन हा पहिला प्रमुख स्थानिक काश्मिरी दहशतवादी गट मानला जातो. या गटाचे पाकिस्तानस्थित जमात-ए-इस्लामीशी घनिष्ठ संबंध असून तो मुख्यत्वे काश्मीरमध्ये कार्यरत आहे. तसंच पाकव्याप्त काश्मीरमध्ये त्याला पाठबळ मिळतं आणि सुरक्षित आश्रयही मिळतो. जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रन्टच्या (जेकेएलएफ) धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनाला उत्तर म्हणून हा गट तयार झाला. एचएमचं मुख्यालय पाकव्याप्त काश्मीरमधील मुजफ्फराबाद येथे आहे.

**नेतृत्व -**

पाकिस्तानमध्ये राहणारा सय्यद सलाहुद्दीन हा या गटाचा सुरुवातीपासूनचा सर्वोच्च कमांडर आहे. भारतीय सुरक्षादलाने ठरवून केलेल्या (टार्गेटेड) हत्यांमुळे या गटाच्या स्थानिक नेतृत्वात वारंवार बदल झाले आहेत. सन २०१६मध्ये ठार होण्यापूर्वी बुरहान वानी हा एक प्रभावी स्थानिक कमांडर, नव्या पिढीच्या दहशतवाद्यांचे प्रतीक झाला होता. त्याच्या मृत्यूनंतर काश्मिरी तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष पसरून त्यांचं भरतीचं प्रमाण वाढलं. सबजार भट, रियाज नायकू आणि इतरांनीही या गटाचं नेतृत्व केलं आहे.

**नावातील बदल -**

एचएमने आपलं मूळ नाव बहुतांश वेळा कायम ठेवलं आहे; पण अंतर्गत मतभेदांमुळे आणि नवीन गटांच्या उदयानंतर फूट पडणे आणि फितुरीचे (गद्दारीचे) प्रकार घडले आहेत.

**विदेशी आणि स्थानिक सहभाग -**

हिजबुल मुजाहिदीनची सुरुवातीची संघटना जवळजवळ पूर्णपणे काश्मिरी सदस्यांची होती, त्यामुळे तो पाकिस्तानस्थित गटांपेक्षा वेगळा ठरला. मात्र, कालांतराने, विशेषतः नेतृत्व आणि प्रशिक्षणाच्या भूमिकेत, या गटात पाकिस्तानी दहशतवाद्यांचा समावेश झाला. तरीही, या गटातील बहुतांश सदस्य स्थानिकच आहेत. अलीकडच्या काळात या गटाचा प्रभाव मात्र कमी झाला आहे.


**कारवाया आणि डावपेच -**

गनिमी कावा, ठरवून केलेल्या (टार्गेटेड) हत्या आणि सुरक्षादलांवर हल्ले अशा विविध तंत्रांचा वापर हिजबुल मुजाहिदीनने केला आहे. काश्मीरला भारतीय नियंत्रणातून 'मुक्त' करणं हा या गटाचा मुख्य उद्देश असून साधारणपणे काश्मीरच्या बाहेर हल्ले करण्याचं या गटाने टाळलं आहे.

**जैश-ए-मोहम्मद (जेईएम)**

**मूळ आणि ठिकाण -**

सन २०००मध्ये, मसूद अझहर या कट्टर मौलवीने स्थापन केलेला जेईएम हा एक प्रमुख पाकिस्तानस्थित दहशतवादी गट आहे. मसूद अझहरला भारतीय विमान कंपनीच्या 'आयसी-८१४' अपहरण प्रकरणातील बंदिवानांच्या बदल्यात भारताने सोडलं होतं.


ब्रिटिश साम्राज्याच्या पायाखालची जमीन हलवणारी लढत,
स्वातंत्र्याच्या शेवटच्या नौदल उठावाचा रणसंग्राम

ebook available

**१९४६ स्वातंत्र्याचं अंतिम युद्ध**

प्रमोद कपूर । अनु.: जी. बी. देशमुख
किंमत : ₹ ६५०

या गटाचं मुख्यालय पाकिस्तानमधील बहावलपूर येथे आहे.

**नेतृत्व -**

मसूद अझहर हा आजही जेईएमचा निर्विवाद नेता असून, संयुक्त राष्ट्रं (यूएन), अमेरिका (यूएस) आणि इतर देशांनी त्याला 'दहशतवादी' घोषित केलेलं असतानाही तो पाकिस्तानमध्ये निर्धोकपणे कार्यरत आहे. मुफ्ती असगर आणि अब्दुल रऊफ अझहर हे कमांड आणि प्रशिक्षणातील महत्त्वाचे सदस्य आहेत. सुरक्षा कारवाया सुरू असल्याने यांचे स्थानिक कमांडर सतत बदलत असतात.

नावातील बदल -

बंदी टाळण्यासाठी जेईएमने 'खुद्दाम-उल-इस्लाम', 'अल-रहमत ट्रस्ट' या आणि अशा विविध नावांनी काम केलं आहे. अलीकडेच, आपल्या कारवाया दडवत स्थानिक स्तरावर स्वतःची धर्मनिरपेक्ष प्रतिमा निर्माण करण्यासाठी या गटाने पीपल्स ॲण्टि-फासिस्ट फ्रन्टसारख्या (पीएएफएफ) बदली (प्रॉक्सी) गटांचा वापर केला आहे. तसंच, 'अल-कलाम' आणि 'काश्मीर टायगर्स' ही नावंही या गटाकडून वापरली जातात.

**विदेशी आणि स्थानिक सहभाग -**

जेईएममध्ये पाकिस्तानी नागरिक, अफगाण युद्धातील अनुभवी आणि स्थानिक काश्मिरी यांचा समावेश आहे. गटाचे नेतृत्व आणि मुख्य लढवय्ये बहुतेक पाकिस्तानी असतात; पण असंतुष्ट काश्मिरी तरुणांची भरतीही मोठ्या प्रमाणावर केली जाते. या गटात अफगाण युद्धातील अनुभवी सदस्य मोठ्या प्रमाणावर आहेत. आत्मघाती हल्लेखोरांचा (विशेषतः पुलवामा २०१९) वापर ही त्यांची प्रमुख शैली आहे.

**कारवाया आणि डावपेच -**

जेईएमने काश्मीरमध्ये 'फिदायीन' (आत्मघाती) हल्ल्यांची सुरुवात केली. सन २००१मध्ये जम्मू-काश्मीर विधानसभेत बॉम्बस्फोट आणि २०१९मध्ये पुलवामा इथे झालेला हल्ला, ज्यात ४० भारतीय निमलष्करी सैनिक ठार झाले, अशा महत्त्वाच्या आत्मघाती हल्ल्यांसाठी हा गट ओळखला जातो. एलईटी, तालिबान आणि अल्-कायदा यांच्याशी या गटाचे कार्यसंबंध (ऑपरेशनल) आहेत. हा गट पुलवामा, त्राल, कुलगाम आणि बडगाममध्ये सक्रिय असून प्रामुख्याने पूंछ-राजौरी आणि सांबा क्षेत्रांचा वापर घुसखोरीसाठी करण्याकडे त्याचा कल आहे.

## द रेसिस्टन्स फ्रन्ट (टीआरएफ)

**मूळ आणि ठिकाण -**

सन २०१९मध्ये, अनुच्छेद ३७० रद्द झाल्यानंतर लगेचच टीआरएफ हा गट समोर आला. 'एलईटीचा बदली गट' म्हणून तो ओळखला जातो. तो मुख्यत्वे काश्मीर खोऱ्यात कार्यरत असून, प्रचार आणि भरती यांसाठी एन्क्रिप्टेड सोशल मीडिया चॅनेल्सचा वापर करतो.

**नेतृत्व -**

टीआरएफचं नेतृत्व गुप्त आहे; बहुतेक सार्वजनिक निवेदनं अनामिक किंवा टोपणनावाने दिली जातात. भारतीय गुप्तचर संस्थांच्या मते, या गटाचं ऑपरेशनल नियंत्रण पाकिस्तानमधील एलईटी नियंत्रकांशी दृढपणे जोडलेलं आहे.

**नावातील बदल -**

दहशतवाद म्हणजे इस्लामी जिहादी गट नसून ती 'प्रतिरोध' (रेझिस्टन्स) चळवळ आहे, हे दर्शवण्यासाठी आणि त्यायोगे व्यापक समर्थन मिळवत आंतरराष्ट्रीय छाननी टाळता यावी, यासाठी 'टीआरएफ' हे नाव मुद्दाम निवडलं गेलं आहे.

**विदेशी आणि स्थानिक सहभाग -**

टीआरएफमध्ये स्थानिक काश्मिरी आणि पाकिस्तानी नियंत्रक यांचा संमिश्र सहभाग आहे. सन २०१९नंतरच्या असंतोषाचा फायदा घेत या गटाने स्थानिक तरुणांची भरती आक्रमकपणे केली आहे.

**कारवाया आणि डावपेच -**

टीआरएफने सुरक्षादल, अल्पसंख्याक समुदाय आणि बाहेरील कामगार यांच्यावरील अनेक हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली आहे. या गटाचा प्रचार धर्मनिरपेक्ष आणि राजकीय तक्रारींवर भर देत असला, तरीही त्यांच्या कारवायांचं स्वरूप एलईटीप्रमाणेच आहे.

## पीपल्स ॲन्टि-फॅसिस्ट फ्रन्ट (पीएएफएफ)

पीएएफएफ हा गट २०१९मध्ये समोर आला. तो जेईएमचा मुखवटा (प्रॉक्सी) मानला जातो. जेईएमची मूळ जिहादी विचारसरणी लपवून धर्मनिरपेक्ष, स्थानिक प्रतिमा निर्माण करण्यासाठी तो निर्माण तयार करण्यात आला आहे. त्याच्या कारवाया मुख्यत्वे काश्मीर खोऱ्यात केंद्रित आहेत. टीआरएफप्रमाणेच याचंही नेतृत्व संदिग्ध असून, बहुतेक संदेश एन्क्रिप्टेड चॅनेल्सद्वारे प्रसारित केले जातात. भारतीय अधिकाऱ्यांच्या मते, या गटावर पाकिस्तानस्थित जेईएमच्या नेत्यांचं धोरणात्मक नियंत्रण आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीला (विशेषतः अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतर) प्रतिसाद म्हणून दहशतवादी गटांनी नाव बदलण्याच्या प्रवृत्तीचं पीएएफएफ हे नाव उदाहरण आहे. जागतिक स्तरावरील प्रतिरोधाशी जुळवून घेत इस्लामी कट्टरतेची बदनामी टाळणं, हा यांचा उद्देश आहे. स्थानिक काश्मिरी आणि विदेशी अशा दोन्ही प्रकारच्या दहशतवाद्यांची भरती करत, स्थानिक तरुणांचं कट्टरपंथीकरण आणि शस्त्रसज्जता यांवर पीएएफएफ भर देतो. धमक्या देणं, भरती करणं, तसंच सुरक्षादल, सामान्य नागरिक, बाहेरील कामगार आणि राजकीय नेते यांच्यावर हल्ले करणं अशा कारवायांमध्ये हा गट सहभागी आहे.

## जम्मू ॲन्ड काश्मीर गझनवी फोर्स (जेकेजीएफ)

जेकेजीएफ हा गट २०२०मध्ये नवीन प्रॉक्सी म्हणून समोर आला. एलईटी, जेईएम, तहरीक-उल्-मुजाहिदीन आणि हरकत-

उल्-जेहाद-ए-इस्लामी यांसारख्या बंदी घातलेल्या संघटनांमधील सदस्यांचा समावेश या गटात आहे. या गटाच्या कारवाया पाकव्याप्त काश्मीर आणि नियंत्रणरेषेच्या भारतीय बाजूवर केंद्रित आहेत. जेकेजीएफचं नेतृत्व लवचीक असून, वेगवेगळ्या गटांतील अनुभवी सदस्य त्यात आहेत. या गटाचं नियंत्रण पाकिस्तानमधील नियंत्रकांकडून समन्वयित केलं जातं, असं मानलं जातं. जेकेजीएफचा उदय हा बंदी आणि निर्बंध टाळण्यासाठी दहशतवादी गटांमध्ये सुरू असलेल्या 'नाव बदल आणि पुनर्गटबांधणी'च्या व्यापक प्रवृत्तीचा भाग आहे. या गटात विदेशी दहशतवादी आणि स्थानिक भरतीचा समावेश आहे. घुसखोरी, अमली पदार्थांची तस्करी आणि शस्त्रांची तस्करी यांत जेकेजीएफ सक्रिय असून, त्या जोरावर तो निधी गोळा करत कारवाया करतो.

### हरकत-उल्-मुजाहिदीन (एचयूएम) आणि इतर गट

एचयूएम हा गट पूर्वी 'हरकत-उल-अन्सार' म्हणून ओळखला जात होता. अमेरिकेने १९९७मध्ये त्याला 'दहशतवादी गट' म्हणून घोषित केल्यानंतर त्याने नाव बदललं. हा गट पाकिस्तानमध्ये स्थित असून पूर्वी अफगाणिस्तान आणि काश्मीर या दोन्ही ठिकाणी तो कार्यरत राहिला आहे. एचयूएमच्या नेतृत्वात अफगाण युद्धातील अनुभवी आणि पाकिस्तानी जिहादींचा समावेश आहे. अलीकडच्या काळात या गटाचा प्रभाव कमी झाला असला, तरी तो अजूनही काही प्रमाणात घुसखोरी आणि साहाय्यक भूमिकांमध्ये सक्रिय आहे. आंतरराष्ट्रीय बंदी टाळण्यासाठी या गटाने वेळोवेळी नाव बदलले असून आता तो मर्यादित स्वरूपात कार्यरत आहे. सुरुवातीला या गटात अधिकतर विदेशी दहशतवाद्यांचा समावेश होता; पण नंतर त्यात काश्मिरी लोकांचीही भरती झाली.

### इतर गट आणि प्रवृत्ती

- तहरीक-उल्-मुजाहिदीन, अल-बद्र, इस्लामिक स्टेट जम्मू ॲन्ड काश्मीर (आयएसजेके), अन्सार गझवत-उल्-हिंद (एजीयूएच) आणि इतर गट – हे गट अधूनमधून बंडखोरी करतात. अनेकदा ते एलईटी आणि जेईएमसारख्या मोठ्या संघटनांमध्ये विलीन होतात किंवा त्यांना कार्यकर्ते पुरवतात.
- खलिस्तान टायगर फोर्स (केटीएफ) - हा मुख्यत्वे पंजाबवर लक्ष केंद्रित करणारा गट असून काश्मीरमधील असंतोषाचा फायदा घेण्याचा त्याचा प्रयत्न आहे. त्याला परदेशी नियंत्रकांकडून साहाय्य प्राप्त झालं आहे.

### नावात बदल आणि नव्याने ओळख प्रस्थापित करण्याची प्रवृत्ती

दहशतवादी गटांनी स्वतःला सादर करण्याच्या पद्धतीत गेल्या दशकात मोठा बदल केला आहे. अनुच्छेद ३७० रद्द झाल्यानंतर, टीआरएफ आणि पीएएएफसारखे गट निर्माण करण्यात आले. दहशतवाद ही धर्मनिरपेक्ष आणि स्थानिक प्रतिकार चळवळ आहे असे दाखवत उघडपणे इस्लामी किंवा पाकिस्तानी असणाऱ्यांपासून स्वतःला ते वेगळे दाखवतात. स्थानिक पाठिंबा मिळवणं, आंतरराष्ट्रीय छाननी टाळणं आणि दहशतवादविरोधी कारवाया गुंतागुंतीच्या करणं या रणनीतीचाच एक भाग म्हणजे, ओळख प्रस्थापित करण्याची (ब्रॅण्डिंग) प्रवृत्ती आहे. स्थानिक कार्यकर्ते हाताळायला सोपे असतात आणि ते सामान्य लोकांमध्ये सहजतेने मिसळू शकतात; म्हणून गटांनी स्थानिक भरतीवर भर दिला आहे. तरीही, प्रशिक्षण व कारवायांसाठी, विशेषतः एलईटी आणि जेईएमसारख्या गटांमध्ये, विदेशी दहशतवाद्यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे.


गटांनी नवीन नावं स्वीकारून, लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला; जेणेकरून जनतेचा पाठिंबा टिकून राहील. या युक्तीमुळे, नवीन मुजाहिदींना कुणाच्या नजरेत न येता वावरता येईल, पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय दंड टाळता येतील आणि संशय न येता कूट कारवाया सुरू ठेवता येतील, अशी त्यांची अटकळ होती. ऑनलाइन माध्यमांवर या आघाड्या हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारतात; जेणेकरून मूळ गटांना सहभाग नाकारता येईल. डिजिटल माध्यमांमुळे भरतीचं प्रमाण वाढलं आहे. शहीद झालेल्यांचे व्हिडिओज, एन्क्रिप्टेड चॅट्स आणि टेलिग्राम चॅनेल्सचा मोठ्या प्रमाणावर वापर करून तरुणांना प्रेरित केलं जातं.

### नेतृत्वातील बदल

अफगाण जिहादचे विदेशी अनुभवी आणि पाकिस्तानी नियंत्रक यांच्या हातात प्रारंभिक काळात नेतृत्व होतं. सन २०००मध्ये करिश्मा असणारे स्थानिक नेते (उदा. एचएमसाठी बुरहान वानी) उदयास आले, त्यांनी सोशल मीडियाचा वापर भरतीसाठी आणि प्रेरणा देण्यासाठी केला. अलीकडे नेतृत्व अधिक विकेंद्रित आणि गुप्त स्वरूपाचं झालं असून, अनेक गट सामूहिक किंवा अनामिक नेतृत्वाखाली काम करतात; जेणेकरून सुरक्षादलांच्या लक्ष्यापासून बचाव करता येईल.

### विदेशी विरुद्ध स्थानिक सहभाग

सन १९९० ते २०००च्या सुरुवातीपर्यंत पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधून आलेल्या विदेशी लढवय्यांवर मोठ्या प्रमाणावर भिस्त होती. सन २०००च्या मध्यापासून सीमाव्यवस्थापन सुधारलं आणि घुसखोरी धोकादायक झाली, त्यामुळे स्थानिक भरतीकडे स्पष्ट कल दिसून आला. सध्या बहुतेक गट स्थानिक काश्मिरी तरुण आणि अनुभवी विदेशी नियंत्रक व प्रशिक्षक यांची सांगड घालतात आणि पाकिस्तानस्थित नेतृत्वाशी ऑपरेशनल संबंध कायम ठेवतात.




शासनाला साथ विज्ञान शास्त्राची -
प्रत्येक केसच्या साक्षीने उलगडणार कहाणी
अजब वैज्ञानिक संशोधनाची

ebook available

## दा विन्चीचं कोडं

डॉ. बाळ फोंडके
किंमत : ₹ ३५०

---





मनाला साद घालणाऱ्या साध्या सोप्या घटना
आणि वैदर्भीय भाषेचा गोडवा असणारा
जी. बी. देशमुख यांचा अनोख्या गोष्टुल्यांचा संग्रह

ebook available

## छाटितो गप्पा

जी. बी. देशमुख
किंमत : ₹ २५०

---





एक प्रलयकारी वादळ ज्या आवेगानं आलं, त्याच आवेगानं
शमलंही – याच वादळाचा प्रत्यय स्पीचेसमधून
आजही घडवणारा – एकमेव 'ॲडॉल्फ हिटलर..!'

ebook available

## ॲडॉल्फ हिटलरची भाषणे : भाग १

नॉर्मन ह्येबर्न बेयन्स । अनु. प्रा. पुरुषोत्तम देशमुख
किंमत : ₹ ७२०





उत्तम योद्धा, महान प्रशासक, अनेकतत्त्ववादाचा
पुरस्कर्ता असलेल्या अकबराच्या समग्र जीवनकालाचा
यथासांग पट मांडणारे चरित्र

ebook available

## अकबर ऑफ हिंदुस्थान

पार्वती शर्मा । अनु.: प्रशांत तळणीकर
किंमत : ₹ ६६०





मुघल सम्राटांपैकी सर्वात आकर्षक आणि
कला व निसर्गसाधनेचा परिपाठ गिरवणारा
संवेदनशील राजकुमार सलीम अर्थात जहांगीरची जीवनगाथा

ebook available

## जहांगीर

पार्वती शर्मा । अनु.: प्रशांत तळणीकर
किंमत : ₹ ३७०




मध्ययुगीन काल्पनिक गाथा, पारंपरिक भयकथा
ते खोडकर नीतीविषयक दंतकथा
अशा विविध आस्वादांचा मिलाफ असणारा कथासंग्रह

ebook available

## आंधळी कोशिंबीर

चेतन जोशी । अनु.: मंजिरी धामणकर
किंमत : ₹ ४९९




# छोटा जवान

व्यंकटेश माडगूळकर

## २

आता दिवाळीचा सण जवळ येत होता. दिवाळीला सुट्टी लागणार होती. दिवाळी-सारखा सण बाजीराव नसल्यामुळे सुनासुना जाणार होता.

बाजीरावाने यावे असे सर्वांना फार वाटत होते. मंजुळाबाईंनी, शिवाजीने, तुळोजीरावांनी पत्रातून त्याला तसे कळविले होते. पण रजेचा प्रश्न होता. ती मिळाली तरच बाजीराव येणार होता.

मंजुळाबाईंची पापणी कधी लवे. कधी जेवता जेवता जीभ चावली जाई आणि त्यांना वाटे, धन्याने माझी आठवण केली. रजा मिळते आहे असे वाटते. खटपट करून मिळवतीलदेखील. त्यांनाही यावेसे वाटत असेल, की नाही वाटणार? कुठे परदेशी दूर आहेत, तिथे ना आपली मायेची माणसे, ना घरचं अन्न. काही दुखलं-खुपलं, जिवाला जडभारी वाटलं तर मायेचा हात नाही, शब्दसुद्धा नाहीत. मी जशी इकडे झुरझुर झुरते, प्रत्येक श्वास त्यांच्याबरोबर जगते, तसेच त्यांचेही तिकडे होत असेल. पुरुष माणूस असले म्हणून काय झाले? मनं ही इथून-तिथून सारखीच. कामाधामात त्यांचा दिवस जात असेल. पण रात्री अंथरुणावर पडल्यावर मात्र मन इकडेच धावत असेल. मी जशी रात्री त्यांच्याशी इथे बोलते, हाका मारते, तसेच तेही माझ्याशी बोलत असतील – 'मंजुळे, तू आनंदी सुखी आहेस ना? सगळे खुशाल आहात ना? मला तुमची आठवण येते.' असे

तेही म्हणत असतील. नक्की म्हणत असतील. दिवाळसण जवळ आला. त्या दिवसांत आले तर बरे होईल. माझा तर बाई, आनंदाने जीवच जाईल. मरून जाईन त्यांना बघताच.

जसजसे दिवस जाऊ लागले, दिवाळी जवळ येऊ लागली तसतशी मंजुळाबाईंची उत्कंठा वाढीला लागली; पण चिठ्ठीचपाटी आली नाही. 'येतो' असे पत्र आले नाही. स्टेशनावरून येणारी एस.टी. मोटार इतके लोक घेऊन येई, पण तिने बाजीरावाला आणले नाही. रोज गावात इतके टपाल येई, पण त्यातून बाजीरावाचे पत्र आले नाही. तेव्हा वाट पाहून-पाहून रोज निराशा सोसून सोसून मंजुळाबाई म्हणू लागल्या, ''आता नाहीच येणार. उगीच वेड्यापिशाला आशा वाटते इतकीच. नाहीच येणार हे धरूनच चालावे. नाहीतच येणार. खूप दूरवर आहेत. रजा मिळत नसेल. महत्त्वाची कामे असतील. आपण उगीच आशा करू नये. सारखे घोकत बसू नये. अशाने त्यांच्या जिवाला तिकडे दुःख होईल. कामाधामात लक्ष नाही लागायचे. बरे का, नाही येणे झाले तर राहू दे. पुढील वर्षी या.''

असे मनाशी म्हणता-म्हणता मंजुळाबाईंचे डोळे भरून येत. मग हातातील काम तसेच टाकून त्या कुठेतरी बाजूला जाऊन उभ्या राहत. मी अशी सारखी डोळे गाळते आहे, हे सासऱ्याने, मुलाने पाहता उपयोगी नाही. मी वीरपत्नी आहे. मनातले दुःख मनात जपले पाहिजे. ते उघडे केले, तर माझे सारे घर असुखी होईल. असे म्हणून त्या मन आवरीत. डोळे पुसून तोंडावरून पाण्याचा हात फिरवीत आणि कामाला लागत.

अप्पालाही फार आशा होती. लवकर-लवकर घरकाम उरकून तो संध्याकाळी येणाऱ्या एस.टी.कडे जाई. तेथे वाट पाहत राही. अनेक दिवस त्याने ही निराशा सोसली आणि मग एस.टी.कडे जाणे सोडून दिले.

मंजुळाबाईंनी कधी विचारले, ''का? आज नाही रे गेलास मोटारीकडे?''

तर अप्पा म्हणे, ''कशाला जायचं उगीच. आपलं कुणी येत नाही नि जात नाही.''

तुळोजीरावही वाट पाहत होते, पण त्यांचे हे वाट पाहणे वर कधी दिसत नव्हते. ते खोल-खोल होते. शिवाजीचा वेळ तर खेळण्याबागडण्यात जात होता. वाट पाहणे, सारखी आठवण काढणे, मनाला लावून घेणे, यासारखे त्याचे वयच नव्हते.

असा काळ चालला होता आणि एके दिवशी अगदी अचानक बाजीराव सुट्टीवर आला.

संध्याकाळची वेळ होती. तुळोजीराव, अप्पा, शिवाजी, मंजुळाबाई सगळे घरीच होते आणि वाड्याच्या अंगणातून खाड्ऽ खाड्ऽ बूट वाजवीत, उंचापुरा, रुबाबदार बाजीराव आला.

तुळोजीराव बैठकीला बसले होते. समोर मुलगा उभा पाहताच ते क्षणभर थक्क झाले. त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. वडिलांना नमस्कार करण्यासाठी बाजीराव पायांतील बूट काढू लागला तेव्हा मात्र तुळोजीराव बसल्या जागचे आवेगाने उठले आणि पुढे होऊन त्यांनी मुलाला घट्ट कवटाळले. त्याचे दोन्ही दंड धरून पाहिले. पाठीवरून, गालावरून हात फिरविला आणि उंच आवाजात हाळी दिली, ''शिवाजी, अरे कोण आलंय बघा –''

शिवाजी धावत आला. बापाला बघताच थांबला आणि मग आवेगाने येऊन बापाच्या दोन्ही गुडघ्यांना त्याने मिठी मारली. त्याची पाठ थोपटून बाजीरावांनी गुडघे टेकले आणि शिवाजीचे मुके घेतले.

शराफी विजार आणि सदरा घातलेले तुळोजीराव लहान मुलाच्या उत्साहाने धावत आत गेले आणि त्यांनी मंजुळाबाईंना सांगितलं, ''अगं, बाजीराव आला–''

मंजुळाबाई बसल्या होत्या त्या तटकन उभ्या राहिल्या. डोईवरून पदर घेत म्हणाल्या, ''खरंच का?''

''वेडे, मी थट्टेने काही सांगेन तुला? आटप, तबक तयार कर, दारात ओवाळ. मग आत येऊ दे त्याला.''

मंजुळाबाई पार गोंधळून गेल्या. आधी धावत जाऊन त्यांनी माजघराच्या जाळीतून बाहेर पाहिले. अंगावर लष्करी पोशाख असलेला बाजीराव खुर्चीवर बसलेला होता आणि अप्पा त्याच्या पायांतले बूट काढीत होता. तुळोजीराव काही बोलत होते. शिवाजीच्या हातात बापाने आणलेले खेळणे होते. इतक्या लांबून पाहूनही मंजुळाबाईंना वाटले, आपल्या नवऱ्याचा तांबूस गोरा रंग काळपटला आहे. तब्येतीत फारसा फरक नव्हता. तेच रुंद खांदे, बसण्याची तीच खानदानी ढब, एक पाय पुढे, उजवी मूठ मांडीवर ठेवलेली असेच जाऊन अप्पाला दूर हो म्हणावे. ते राठ, मोठे बूट-मोजे आपण आपल्या हातांनी काढावेत आणि त्या पायांवर डोके ठेवावे, अशी मंजुळाबाईंना इच्छा झाली.

डोळ्यांतले पाणी पुसून त्या आत आल्या.

शिवाजीसाठी बाजीरावाने लहानसा रेडिओ आणला होता. अगदी तळहाताएवढा; पण त्याचा आवाज कितीतरी गोड होता. हे नवे खेळणे मिळाल्यामुळे शिवाजी मात्र गुंग होता. बापाला आणि आजोबांना काहीबाही विचारीत होता.

तुळोजीराव सारखे खोदून विचारीत होते, ''झालं का रे अप्पा? किती वेळ?''

अंगावरची साडी बदलून आणि हातात तबक घेऊन मंजुळाबाई बाहेर आल्या. दरवाज्याबाहेर राहून बाजीरावाने ओवाळून घेतले. दोघांनाही कसे गलबलून आले.

घरात येता-येता बाजीरावाने विचारले, ''बरे नाही का?''

''छे, चांगली आहे की तब्येत. असं का वाटलं?''

''मला वाटत होतं – एकदम चकित होशील, फूल उमलावे तशी उमलशील!''

घाबरून मंजुळाबाई म्हणाल्या, ''नाही दिसलं काही तसं?''

''दिसलं गं. पण –''

''खरं सांगू का, तुम्ही फार वाट पाहायला लावलीत.''

‘‘माझा अजून विश्वासच बसत नाही की, तुम्ही आला आहात. राहणार आहात. इतकं मन सारखं मारलंय मी की, आनंदसुद्धा उतू जात नाही.’’

‘‘वेडाबाई रे! चल माझे कपडे काढून घे, अप्पाकडून आणि काहीतरी खायला दे. भूक लागलीय.’’

आवंढा गिळीत मंजुळाबाई म्हणाल्या, ‘‘हो!’’

तुळोजीरावांनी घरात फारच गडबड उडवून दिली. आपला मुलगा आला आहे ही वार्ता त्यांना सगळ्यांना कळायला हवी होती. अगदी वाड्याच्या भिंतींनासुद्धा. स्वयंपाकघरात येऊन त्यांनी हुकूम दिला, ‘‘हे बघा, रात्रीच्या जेवणात काहीतरी गोडधोड करा. पुरणाच्या पोळ्या, झणझणीत शाक करा. काय रे बाजीराव, चालेल का?’’

‘‘न चालायला काय झालं नाना?’’

‘‘चालेल रे; पण तुला आवडतं काय? मटणमुर्गी काय तिकडे रोजच मिळत असेल. आं?’’

‘‘होय की. पुरणपोळी फार दिवसांत खाल्ली नाही मी.’’

‘‘आणि हे करा गं, भजी, वांग्याची भाजी, तळण तळा – उत्तम जेवण झालं पाहिजे. पण उशीर नका करू. लवकर आटपायचं. काय अप्पा?’’

‘‘जी.’’

बाजीराव आला आणि मोहित्यांचा वाडा आनंदाने हलूडोलू लागला. आता महिनाभर सुट्टी होती. तेवढ्यात काय-काय करायचे याविषयी बेत झाले. सत्यनारायण करायचा, तुळजापूरला जाऊन यायचे, जेजुरीला जाऊन यायचे असे बेत पक्के झाले; पण दिवाळी अगदी तोंडावर आली होती. काही पै-पाहुण्यांना निमंत्रणे पाठविणे आवश्यक होते. मग एके दिवशी तुळोजीरावांनी शिवाजीला धरून बसविला आणि सगळ्यांना पत्रे लिहिली. पहिले पत्र ग्वालेरास असलेल्या आक्काताईस गेले. आक्काताई ही एकच बहीण बाजीरावाला होती. दिवाळसणासाठी तिने यावे, अशी तुळोजीरावांची फार इच्छा होती. तुळोजीरावांनी मजकूर सांगितला. जिभेचा शेंडा बाहेर काढून शिवाजीने तो कागदावर उतरविला –

चि. सौ. आक्काताईस, झुंजारपूरहून तुळोजीराव सर्फोजीराव मोहिते यांचे अनेक आशीर्वाद. पत्रास कारण की, चि. बाजीराव हा फार दिवसांनी रजेवर आला आहे. मुक्काम अगदी थोडा आहे. तुम्हा उभयता भावंडांची भेट होऊन बरीच वर्षे झाली. मलाही तुला बघावे असे फार वाटते. तेव्हा पत्रदेखत तुम्ही उभयता आणि मुलेबाळे घेऊन यावे. रावसाहेबजी यांना आग्रहाने मी बोलावले आहे असे सांगणे.

बाकी विशेष भेटीअंती.

आपला

तुळोजीराव मोहिते

मंजुळाबाईंची आई कोल्हापुरास होती. जावई आले म्हणजे मला कळवा, उभाउभी येऊन पाहून जाईन असे त्यांनी कळविले होते. त्यामुळे त्यांनाही पत्र गेले.

गावातील लोकांची ये-जा सुरू झाली. बरेच लोक भेटून गेले. बाजीरावाने एकवार सगळीकडे फिरून शेतीवाडी पाहिली. घरात रोज काहीतरी गोडधोड होऊ लागले.

ज्यांना ज्यांना पत्रे गेली होती त्यांची उत्तरे आली. बाजीराव परत आल्याचा आनंद सर्वांना झाला होता. विशेषत: आक्काताईना. तिने छान-छान पत्र लिहिले होते. बंधुप्रेमाच्या ओव्या लिहिल्या होत्या. आपल्या राजसगुणी भावाला कधी एकवार पाहीन असे तिला झाले होते. कोल्हापुराहून मंजुळाबाईंची आईही येणार होती. कोणत्या वारी, कोणत्या तारखेला, कोणत्या गाडीने निघतो आहोत, हेसुद्धा त्यांनी कळविले होते.

एवढे पाहुणेरावळे जमणार म्हणून वाड्यात गडबड सुरू झाली. चार रंगारी लावून, तुळोजीरावांनी वाडा आतून रंगवून घेतला. नवारीचे पलंग ठाकठीक करून घेतले. गाद्या, उशा, पांघरुणे नीटनेटकी करून घेतली. वाड्यात काही कमी नव्हते. पण नित्य चार-दोन लोकांचाच वावर होता. त्यामुळे बरेच सामनसुमान वापरात नव्हते. अप्पा, तुळोजीराव, मंजुळाबाई जातीने खपत होती. ही सारी गडबड बघून बाजीराव हसून म्हणालासुद्धा, ‘‘भलतीच टापटीप चाललीय बुवा. एवढा थाट माझ्या लग्नातसुद्धा नव्हता.’’

अशी सारी तयारी झाली. झाडलोट, रंगरंगोटी झाली. फराळाची भाजणे भाजून झाली. काही पदार्थ तयारही झाले. आता पाहुणे येण्याचाच काय तो अवकाश होता.

आणि ध्यानीमनी नसताना अचानक सरकारी तार आली की, बाजीरावाने ताबडतोब कामावर रुजू व्हावे. सगळ्या आनंदावर विरजण पडले. मंजुळाबाईंचे तोंड वाळून चिमणीसारखे झाले. तुळोजीरावांनी मोठ्या कष्टाने मनातील निराशा चेहऱ्यावर दाखविली नाही. धीरगंभीरपणे बाजीराव निघण्याच्या तयारीला लागला. दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या एस.टी.ने पाहुणे येणार होते, आणि लगेच दोन तासांनी दुसऱ्या एस.टी.ने बाजीराव जाणार होता. सगळे बेत जिथल्या तिथे राहिले. बाजीरावाच्या सामानाची बांधाबांध झाली. सर्वांचे चेहरे उतरून गेले.

रेडिओवरून बातमी आली की, भारताच्या उत्तर सीमेवर चीनने हल्ला केला आहे.

दुसऱ्या दिवशी गणवेश चढवून बाजीराव तयार होता. त्याचे सामानसुमान वाड्याच्या मोठ्या दालनात बांधून तयार होते आणि पहिल्या एस.टी.ने आक्काताई आपल्या मुलांना घेऊन उतरली. तिचे यजमान उतरले. वाड्यात शिरताच सर्वांचे उतरलेले चेहरे पाहून तिला गोंधळल्यागत झाले. आल्या-आल्या ती तुळोजीरावांच्या

पाया पडली आणि बाजीरावाला तिने पोटाशी धरले. डोळ्यांत पाणी आणून ती म्हणाली, ''किती दिवसांनी भेटलास! अलीकडे सारखा माझ्या स्वप्नात येत होतास बघ आणि हे रे काय, अंगावर हे कपडे का? सामानसुमान कुणाचं बांधलं आहे हे?''

तुळोजीराव म्हणाले, ''आक्काताई, आता घटकाभर बसून बोला. कालच तार आली हजर राहण्याबद्दल. बाजीराव निघालाय. तास, दीडतासच बाकी आहे.''

आक्काताईंना अगदी भडभडून आले. ती म्हणाली, ''वहिनी, माझी ट्रंक तरी उघड. बाजीरावाला लाडू, पुडाच्या वड्या करून आणल्यात मी. ते डबे तसेच दे आता त्याच्याबरोबर.''

बाजीरावाला हे ऐकून गलबलून आले.

तुळोजीराव म्हणाले, ''अगं अक्का, काढ तुझं फराळाचं. वेळ आहे अजून मोटारीला. नीट बसून खाऊ दे त्याला.''

आणि आता सर्वांनीच जर उदास चेहरे केले, रडारड केली तर बाजीरावाला जाताना वाईट वाटेल म्हणून ते उंच आवाजात बोलले, ''– आणि असे डोळ्यांत पाणी काय आणता रे सगळे, पोरगी सासरी निघाल्यासारखे? मर्द लढवय्या आहे, लढाईवर निघालाय, त्याला हसतमुखानं निरोप द्या. तरवार मारून ये म्हणावं. भागुबाईसारखं डोळ्यांत पाणी नाही आणायचं कुणी. काय रे शिवाजी?''

शिवाजी गंभीर चेहऱ्याने उभा होता. तो म्हणाला, ''मी कुठे रडतोय नाना?''

''शाब्बास.''

मग सर्वांनीच चेहऱ्यावर उसने अवसान आणले. हसू आणले. जणूकाही विशेष घडलेच नाही अशा पद्धतीने वागण्याचा सगळ्यांनी प्रयत्न चालविला. काहीतरी निमित्त करून बाजीराव आत गेला. आत त्याने मंजुळेला भेटून घेतले. नवऱ्याच्या छातीवर कपाळ टेकून मंजुळाबाई दोन मिनिटे स्तब्ध राहिली.

बाजीरावाने तिच्या पाठीवरून हात फिरविला, केसांवरून हात फिरविला आणि हळू आवाजात म्हटले, ''माझी काळजी करू नकोस सारखी. शिवाजीला सांभाळ. आनंदात राहा सगळे – हं!''

मंजुळाबाईंनी डोळे पुसले. तिचा खालचा पातळ ओठ थरथरत होता. क्षणभर तिने बाजीरावाच्या डोळ्याला डोळा दिला आणि हलवून म्हटले, ''हो.''

एस.टी.पाशी बरीच मंडळी जमली होती. गावातील चार-सहा सैनिकही या वेळी निघाले होते. त्यांचे पाव्हणेरावळेही पोहोचवायला आले होते. तुळोजीराव, शिवाजी यांचा निरोप घेऊन बाजीराव गाडीत चढला. एस.टी. सुरू झाली. पाहता-पाहता धुरोळा मागे ठेवून दिसेनाशी झाली.




बाजीराव निघून गेल्यापासून घरातले वातावरण पुन्हा सुन्न, ओके-बोके झाले. लढाईच्या बातम्या रोज येत होत्या. हिमालयाच्या बर्फाच्छादित प्रदेशात, कडक थंडीत जोरदार लढाई चालू होती. भारतीय सैनिक प्राणपणाने लढत होते; पण हानी सारखी भारताचीच होत होती.

सगळा देश ढवळून निघाला. देशप्रेमाला कधी नव्हती एवढी भरती आली. लोक चिडून उठले.

रेडिओ, वृत्तपत्रे यांतून सारख्या बातम्या येऊ लागल्या. पुढारी भाषणे करू लागली. सैन्यभरती सुरू झाली. युद्धफंड निघाला. जवानांना मदत म्हणून जनतेने अनंत हस्ताने पैसा दिला, दागिने दिले, वस्त्रे दिली, अन्न दिले, पुस्तके पाठविली. युद्धाच्या वातावरणाने सारा देश भारून गेला.

रेडिओवरून रोज बातम्या येत होत्या. सरशीची बातमी कमी होती, माघारीची बातमी जास्ती होती. या बातम्या ऐकून तुळोजीराव पेटून उठत होते. शिवाजी धास्तावल्या स्वरात विचारत होता, ''नाना, आपला पराभव झाला?''

तुळोजीराव मूठ उगारून म्हणत होते, ''कोण म्हणतो पराभव झाला? अरे हाट. आपला पक्ष प्रभुरामचंद्राचा आहे. आपला नित्य विजयच होणार!''

''पण केव्हा?''

''ही लढाई आहे बेटा. अचानक हल्ला करणाऱ्यांची सुरुवातीला सरशीच होते. थोडा थांब, आपल्या विजयाची बातमी कळेल.''

''पण केव्हा नाना?''

''अरे, वर्षानुवर्षे चालतात लढाया, मग?''

शिवाजीला समाधानकारक उत्तर मिळत नव्हते. तुळोजीरावांना समाधानकारक उत्तर देता येत नव्हते. ते एवढंच सारखं सांगत होते की, 'आपले सैनिक शूरवीर आहेत. कमी नाहीत. अनेक लढाया त्यांनी आजवर गाजविल्या आहेत. जगातल्या कोणत्याही सैनिकाच्या बरोबरीचे आहेत आमचे सैनिक.'

गावातले इतके लोक लढाईवर होते, पण लढाई कुठे चालली आहे, याची माहिती लोकांना नव्हती. हिमालय कुठे, नेफा कुठे आहे, चीन कुठे आहे, आपली हद्द म्हणजे कोणता भाग, सगळे अज्ञात होते. लोक लढाईबद्दल बोलत होते, ऐकत होते. पण त्यांना फारच थोडे समजत होते.

तुळोजीरावांनी एकवार अप्पाला विचारले, ''काय अप्पा, लढाई कुठे चाललीय?''

बापडा अप्पा घोड्याला चंदी घेऊन चालला होता. तो सहज म्हणाला, ''हिमालय डोंगरात!''

तुळोजीराव केवढ्याने ओरडले, ''गाढवा, हिमालय डोंगर म्हणजे काय जोतिबाचा डोंगर आहे का?''

घाबरून उभा राहून अप्पा म्हणाला, ''मला माहीत न्हाई जी.''

''माहीत करून घ्यायला नको का? अरे, असे बावळे राहून तुम्ही लढाई जिंकणार कशी? आं?''

''खरं आहे जी!''

''मूर्ख आहेस, जा! शिवाजी –''

शिवाजी पुस्तक काढून वाचीत बसला होता. तो चड्डी सावरीत धावत बाहेर आला. नाना रागावले आहेत, हे त्याला आवाजावरून कळले.

''काय नाना?''

''उद्या तुझ्या मास्तराकडून भारताचा नकाशा घेऊन ये मोठा. आहे ना शाळेत?''

''हो, पृथ्वीच्या दोन गोलांचासुद्धा आहे, नाना.''

''आण मग, म्हणावं सुभेदारांनी मागितलाय हां.''

''बरं.''

दुसऱ्या दिवशी वाड्याच्या पटांगणात खच्चून लोक जमले. भिंतीवर नकाशा लावून तुळोजीरावांनी सर्वांना माहिती दिली.

## ३

१४ नोव्हेंबर १९६२च्या अगोदर भारताच्या नकाशावर असलेल्या अनेक नावांपैकी 'वालाँग' हे फक्त एका ठिकाणचे नाव होते. 'नॉर्थ ईस्ट फ्रॉंटिअर एजन्सी' नावाने नकाशात जो भाग दाखविला आहे, त्या भागातले एक साधे ठिकाण. एक नाव; पण याच जागी भारतीय सैनिकांनी एवढे विराट शौर्य दाखविले आहे की, आता इथून पुढे हे ठिकाण म्हणजे चिरस्मरणीय असे धारातीर्थ मानले जाईल. इथे, याच जागी देशप्रेमापुढे मृत्यू य:कश्चित ठरला. शत्रूला अडविण्यासाठी हजारो सैनिकांनी आपले प्राण फेकून दिले.

जवळजवळ तीन हजार भारतीय सैनिकांनी या जागी चिनी सैनिकांच्या पंधरा जोरदार हल्ल्यांना तोंड दिले. हे पंधरा हल्ले आले ते; पंधरा हजार चिनी सैनिकांकडून. तीन दिवस आणि तीन रात्री भारतीय सैनिकांनी सात मैलांची आघाडी लढविली. चिनी सैनिकांची सर्वांत जास्त प्राणहानी या ठिकाणी झाली. पाच हजार सैनिक कामी आले.


वालाँगच्या पश्चिमेला एका ओळीत तीन पर्वतशिखरे होती. आपल्या सैनिकांनी त्यांना नावे दिली – हिरवे शिखर, पिवळे शिखर आणि जंक्शन. यांपैकी सर्वांत उंच जंक्शनची उंची साडेपंधरा हजार फूट होती. त्याखालोखाल पिवळे शिखर आणि सर्वांत कमी उंचीचे म्हणजे दहा हजार फूट हिरवे शिखर. हिमालयाच्या उत्तुंग पर्वतश्रेणीपुढे एवढ्या उंचीची शिखरे काहीच नव्हेत. पण जमिनीवर उभे राहून पाहणाऱ्याला चांगलीच उंच. शिवाय चढणीला अवघड, थेट चढाची. लोहित नदीचा धो-धो प्रवाह याच भागातून वाहत होता. त्यामुळे तो ओलांडून हालचाल करणे सैनिकांना भारी अवघड होते.

# ओशो


२५ वर्षांची परंपरा

## महावीरांचं चिंतन आणि ओशोंचं प्रवचन यांचा अपूर्व संगम


अनु.: प्रदीप निफाडकर, शशिकांत सांब




किंमत : ₹ ४२०




किंमत : ₹ ४२०




किंमत : ₹ ४२०

ebook available

या पर्वतशिखरांचा ताबा जर एकदा शत्रूला मिळाला, तर वालाँग टिकवून धरणे आपल्याला कठीण होते. शिवाय रसद पोहोचविण्यासाठी उपयोगात येणारा वालाँगचा एकमेव विमानतळही भारतीय सैनिकांच्या हातून गेला असता.

चिनी फौजा डोंगरसपाटी पार करून २१ ऑक्टोबरला किवीटू ठाण्यावर पोहोचल्या. भारतीय ठाणे एक दिवसाच्या लढाईनंतर पडले. मग शत्रूसैन्याने दोन तुकड्या केल्या. १४ नोव्हेंबरला हिरव्या शिखरावर पोहोचून त्यांनी तळ ठोकला.

इकडे १४ नोव्हेंबरलाच कुमाऊ सैनिकांची एक कंपनी पिवळ्या शिखराकडे निघाली. पिवळ्या शिखरावरून खालच्या हिरव्या शिखरावरील शत्रूला हुसकावून लावण्याचे काम तिच्याकडे होते. शत्रूसैनिक वरवरचा भाग काबीज करण्यासाठी चढाई करीत होते, तेव्हाच आपण एकदम वरच्या भागावर पोहोचून त्यांना खाली पाठविण्याचा डाव टाकीत होतो.

दिवसभर दौड करून कुमाऊ सैनिक संध्याकाळच्या वेळी पिवळ्या शिखरांच्या जवळपास पोहोचले. पिवळ्या शिखरापासून केवळ पन्नास यार्डांवर भारतीय सैनिक असतानाच शत्रूकडून प्रतिहल्ला झाला. ही धडक फार जोरदार होती. भारतीय सैनिकांना हा प्रदेश अनोळखी होता. आदल्याच दिवशी त्यांना वालाँगच्या विमानतळावर उतरविले होते. अंधार दाटलेला होता. अशात हा हल्ला झाला. शत्रूने दोन्ही बगलांनी हल्ला केला.

पहिल्या तडाख्याला कंपनी कमांडर बळी पडला. सेकंड लेफ्टनंट खत्रीने कमांडरची जागा घेतली आणि तो रोवल्यासारखा खडा राहिला. शत्रूसैनिकांच्या लाटांवर लाटा आल्या.

दोन प्रहरापर्यंत भारतीय सैनिकांनी तग धरला. या तडाखेबंद हल्ल्याने भारतीय सैनिकांची एक कंपनी पार नाहीशी झाली. त्याहीपेक्षा कितीतरी जास्त पटींनी शत्रूसैनिकांची हानी झाली.

दरम्यान डोग्रा सैनिकांची एक कंपनी वालाँग विमानतळावर आणण्यात आली. ही कंपनी जंक्शनवर पोहोचणार होती. म्हणजे शत्रूची फळी त्यांना फोडायची होती.

नऊ तास दौड मारून डोग्रा सैनिक जंक्शनवर पोहोचेपर्यंत पिवळ्या शिखरांवरील सगळा मारा, शत्रूसैनिकांनी थंड पाडला होता. त्यामुळे सर्व शक्तिनिशी शत्रूसैनिकांनी डोग्रा सैनिकांवर हल्ला केला. १६ नोव्हेंबरच्या सकाळपर्यंत जोरदार प्रतिहल्ला झाला. जादा कुमक म्हणून दोन जादा डोग्रा कंपनी पाठविल्या गेल्या; पण शत्रूने त्यांना आणि पहिल्या कंपनीला मिळू दिले नाही.

कुमाऊ, डोग्रा, शीख सारे एकत्र होऊन प्राणपणाने लढले आणि धारातीर्थी पडले. जगातील कुठल्याही सैनिकांनी चकित व्हावे, प्रत्यक्ष चिनी सैनिकांनी स्फूर्ती घ्यावी, इतकं असामान्य धैर्य काही भारतीय सैनिकांनी दाखविले. त्यांच्या शौर्याचे पोवाडे इथून पुढे अनेक शतके गायिले जातील.

शीख कंपनीचे प्रमुख लेफ्टनंट विक्रमसिंह पिवळे शिखर संभाळत होते. कुमक येत होती. वालाँगचा विमानतळ कुठल्याही परिस्थितीत सांभाळला पाहिजे होता. विक्रमसिंहने ब्रिगेडच्या मुख्य ठाण्यावर संदेश पाठविला, 'शत्रू तिन्ही बाजूंनी आम्हांला कोंडतो आहे. चौथ्या बाजूला लोहित नदी आहे. शत्रूसैनिकांची संख्या आमच्यापेक्षा एका बटॅलियनने जास्ती आहे.'

परत जबाब आला, 'शेवटपर्यंत लढा द्या.'

वालाँग विमानतळ हातचा न जाऊ देण्याच्या दृष्टीने पिवळी टेकडी ही फार महत्त्वाची होती. ती टिकवून धरायलाच पाहिजे होती. बरोबर दीड तास विक्रमसिंहाने पिवळे शिखर शत्रूच्या हाती पडू दिले नाही.

नंतर मुख्य ठाण्यावरून संदेश आला, 'काय परिस्थिती आहे?'

पण, त्यांना परत जबाब मिळाला नाही. जबाब द्यायला कोणी नव्हतेच. शत्रूसैनिकांनी पिवळे शिखर घेतले; पण जिवंत सैनिकांकडून नाही. सगळे मारले गेले होते.

डॉ. सुब्बा या वीर भारतपुत्राने यशाची काहीही आशा नसताना माघार घ्यायचे नाकारले. रणभूमीवरच मरण पत्करले. या धैर्याला तोड आहे का?

नाईक परशुराम, लान्स नाईक छत्रा, शिपाई खजूरसिंग या तिघांना शत्रूसैनिकांनी गिरफ्तार करून चालविले. पण शत्रूकैदेपेक्षा त्यांनी मरण पत्करले. जाता-जाता दोन हजार फुटांची एक दरी दिसताच तिघांपैकी एक जण पळाला आणि पाहता-पाहता त्याने आपला देह दरीत झोकून दिला. त्याच्या मागोमाग सैनिक धावले तेव्हा उरलेल्या दोघांनीही तीच दिशा पत्करली. शत्रूला चकवून त्यांनी मरणाला मिठी मारली.

शिपाई नयनसिंग. तो उखळी तोफेवर होता. शत्रूसैनिकाच्या गोळीने त्याच्या पोटातील आतडी बाहेर काढली; पण तो रणांगण सोडायला राजी नव्हता. प्राथमिक उपचार करून घेतल्यावर आपले काम दुसऱ्याला देऊन तो मशिनीवर गोळ्यांचे पट्टे चढवू लागला. पण ठाणे सोडावेच लागले. मागे फिरावे लागले. माघार घेता-घेता नयनसिंग अडखळून पडला. पडला तो पुन्हा उठला नाहीच.

२० तारखेलाच एक प्रमुख अधिकारी जखमी झाला. फिल्ड ॲम्ब्युलन्समध्ये काम करणारा शिपाई जोसेफ या अधिकाऱ्याला उचलून आणण्यासाठी धावला. शत्रूसैनिकांच्या गोळ्यांचा पाऊस पडत असताना जमिनीशी सरपटत जाऊन तो जखमी अधिकाऱ्यापाशी पोहोचला आणि त्याच ठिकाणी त्यालाही गोळी लागली. त्याला जागच्याजागी मृत्यू आला.

## ४

भरती करणाऱ्या साहेबाने झुंजारपूरला गावाबाहेर तंबू ठोकला होता. गावच्या सरपंचांना सांगितले होते की, 'पाटील, जवान पोरे गोळा करून पाठवून द्या.' तंबूपुढे रांगा लागल्या होत्या. तालमीत

जाऊन शरीरे कमावलेली पोरे साहेबापुढे जाऊन उभी राहत होती. छातीचे माप, उंची मापली जात होती. कुणाचे माप भरत होते, कुणाचे भरत नव्हते. भरती झालेली पोरे कुस्ती मारल्याच्या आनंदाने कपडे करीत होती. अंगरखा अंगात घालत होती, डोईला फेटा गुंडाळीत होती. नापास झालेली पोरे उतरल्या चेहऱ्याने कपडे खाकोटीला मारून लांब जात होती. नापास झालेल्यांना आपले शरीर कुणी बघू नये, असे वाटत होते.

भरती करणारा साहेब चांगला ठणठणीत होता. रंगाने गोरा, अंगाने गोल गरगरीत असलेल्या साहेबाने ओठावर रुबाबदार मिशा ठेवल्या होत्या. त्याचे डोळे घारे होते. डोक्यावर गोंड्याची हिरवी लोकरी टोपी होती. अंगात खाकी ड्रेस होता.

एकाएकी शिवाजी त्याच्यासमोर जाऊन उभा राहिला. साहेबाने डोळे बारीक करून पाहिले.

''काय रे बाळ?''

''मला भरती करून घ्या!''

शिवाजीच्या धिटाईचे साहेबाला फार कौतुक वाटले. टेबलावर वाकून बसला होता, तो मागे खुर्चीच्या पाठीला रेलला व म्हणाला, ''हं! काय नाव तुझं?''

''शिवाजी बाजीराव मोहिते.''

''मराठा?''

''होय साहेब.''

जास्तच गंभीर होऊन साहेबाने विचारले, ''वय?''

''तेरा पूर्ण.''

''लहान आहेस. मोठा हो आणखी मग ये.''

''पण, मला सगळं येतं. बंदूक चालविता येते. परेड करता येते. आजोबांनी सगळं शिकवलं आहे मला.''

साहेबाने हसून म्हटले, ''ठीक आहे; पण एवढी लहान मुले सैन्यात घेत नाहीत. जा तू घरी.''

शिवाजीचा फार हिरमोड झाला. साहेबाचा राग आला. अपमान झाल्यासारखे वाटले. घरी जाण्याची त्याची तयारी नव्हती. साहेबाच्या पुढून तो लवकर हलेना. तेव्हा त्याच्या खांद्यावर थोपटून साहेब म्हणाले, ''जा, शहाणा ना तू. शाळा शीक, मोठा हो, चांगले शरीर कमव आणि मग ये. मी तुला भरती करून घेईन.''

शिवाजी साहेबाच्या डोळ्यांकडे रागावून बघत होता. तेवढ्यात तुळोजीराव आले. त्यांनी नातवाला बाजूला केले आणि साहेबांना सलाम ठोकला. घसा साफ करून म्हटले, ''मला भरती करून घ्या साहेब.''

साहेबाने तुळोजीरावांना नीट न्याहाळून घेतले. त्यांचा जुनापुराणा लष्करी ड्रेस, छातीवरचे बिल्ले, फिता पाहिल्या.

''काय नाव आपलं?''

''तुळोजीराव सर्फोजीराव मोहिते.''

''जात?''

''मराठा.''

''वय?''

''सहासष्ट!''

साहेब हसून म्हणाले, ''फार वय आहे. तुम्हाला नाही घेता येत.''

''पण, मी तुमच्या कोणाही पोराला हरवेन, बघा तरी.''

''नाही. अहो, तुम्ही तर पूर्वी काम केलेले दिसतं. तुम्हाला कायदेकानून मी काय सांगायचे पोरानं?''

''कायदे माहीत आहेत; पण माझं रक्त उसळतंय ना बेटा, त्याला काय करू?''

''तुम्ही पोरांना स्फूर्ती द्या. त्यांना पटवून द्या. तेच आता तुमचं काम आहे.''





स्वराज्य, स्वधर्म आणि स्वातंत्र्य यासाठी
आपले जीवन वेचणाऱ्या मराठा राणीचा
अस्वस्थ करणारा जीवनप्रवास...

ebook available

## महाराणी येसूबाई

डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर
किंमत : ₹ ३८०

तुळोजीरावांनी विषण्णपणे खाली पाहिले आणि मग भानावर येऊन शिवाजीचा हात धरला व म्हटले, ''चल बेटा.''

घराकडे येता-येता शिवाजी वरचेवर आजोबांच्या चेहऱ्याकडे बघत होता. तुळोजीराव काही बोलत नव्हते. शेवटी एकाएकी ते बोलले, ''शिवाजी, तू मोठा होशील, लष्करात भरती होशील. माझं आता संपलं गड्या! मला काही आता पुन्हा तरुण नाही होता येणार!''

गेल्यापासून बाजीरावाचे काही पत्र नव्हते. खुशाली कळली नव्हती. रोज एक नवी बातमी समजत होती. वर्तमानपत्रातून बातम्या येत होत्या. युद्धकैद्यांची संख्या भरमसाट होती. चिनी लोक कैद्यांना नीट वागवत नाहीत, खाणे-पिणे, कपडेलत्ते देत नाहीत, नुसता वाटीभर भात खाऊन कैद्यांना सबंध दिवस काढावा लागतो, अशा अनेक गोष्टी कानांवर येत होत्या. मंजुळाबाईंचा जीव चिंतेने मुठीएवढा झाला होता.

गावातील चार सैनिक आघाडीवर कामी आले होते. सहा जण बेपत्ताच्या यादीत होते. मंजुळाबाईंच्या काळजावर मणाचा धोंडा होता. संध्याकाळ झाली, वाड्यात त्या एकट्याच आल्या की, गुदमरल्यासारखे होई. कोंडून घातल्यासारखी तगमग होई. मध्येच रात्री दचकून जाग येई आणि एकटक डोळ्यांनी अंधाराकडे बघत त्या पडून राहत.

तुळोजीराव रोज टपालाची वाट बघत होते.

शिवाजीने गावातील बरोबरीच्या पोरांची पलटण उभी केली होती. रोज संध्याकाळी गावातल्या रस्त्यातून ही पलटण परेड करी. शिवाजी कॅप्टन झाला होता. छऱ्यांची बंदूक खांद्यावर टाकून तो सर्वांच्या पुढे असे. खांद्यावर लाठ्या-काठ्या घेतलेली पोरे असत. नदीच्या पाण्यातून शिस्तीने जाणे, खोल कड्यावरून उड्या टाकणे, सरपटत पन्नास फूट जाणे – असले नाना तऱ्हेचे हुकूम शिवाजी पोरांना करी. कधीकधी अप्पाही या परेडमध्ये सामील होई.

असे दिवस चालले होते आणि एके दिवशी तुळोजीरावांच्या नावे एक टपाल आले की, बाजीराव तुळोजीराव मोहिते हा मराठा पलटणीतील सैनिक बेपत्ता आहे.

टपाल वाचताच स्वत: तुळोजीराव एखादे मोठे वडाचे झाड एकाएकी कलून भुईवर पडावे तसे खाली बसले. त्यांच्या डोळ्यांपुढे अंधार-अंधार झाला. काळीज धाडधाड उडत राहिले. कपाळावर घाम जमला. चेहऱ्याचा रंग बदलून काळवंडलेला झाला. ओठाला कोरड पडली. पायांतले बळ गेल्यासारखे झाले. हातांना कंप सुटला.

वाड्याच्या बाहेरच्या सोप्यात वेताची मोठी खुर्ची होती. तिच्यात ते बराच वेळ सुन्नपणाने बसून राहिले. आघाडीवरील सैनिकाचे जीवन म्हणजे रोज मृत्यूशी खेळ, रणांगणावर कायमची विश्रांती मिळणे हेच त्यांचे भाग्य, हीच अखेर, हाच त्याचा शेवट. हिमालयाच्या त्या भव्य परिसरात जिकडे आपले वाडवडील आजवर मन:शांतीसाठी, ईश्वरचिंतनासाठी, मुक्ती मिळविण्यासाठी, तपश्चर्येसाठी जात आले, तिथे मृत्यू येणे हीच भाग्याची गोष्ट. आपल्या सीमेचे रक्षण करीत असताना, परकीय शत्रूंनी आपली भूमी बळकावू नये म्हणून लढताना आलेल्या मरणापरते चांगलेसे आणखी मरण कोणते? बाजीरावाला स्वर्गच प्राप्त झाला. तो अमरच राहिला. मरण काय आज ना उद्या येणारच. पण म्हातारे होऊन, आजाराने गांजून मरण्यापेक्षा, जवानीत मरण येणे, हे उत्तम नव्हे का? नाहीतरी माणसाने जन्माला येऊन आणखी काय मिळवावयाचे असते बरे?

पण, खरेच बाजीराव मरण पावला का? कुणी सांगावे तो जिवंतही असेल. चिनी सैनिकांच्या कैदेत असेल. कदाचित परांगदा होऊन रानावनातून वाट काढीत आपल्या छावणीकडेही येत असेल. आज ना उद्या तो जिवंत असल्याची सुवार्ता आपल्याला कळेल. त्याच्या शौर्याने आपले डोळे निवतील. त्याचा जयजयकार आपल्या वृद्ध कानांना ऐकू येईल. दैव मोठे असले, तर असेही होईल.

होईल अथवा न होईल. बाजीराव जिवंत असेल अथवा रणभूमीवर त्याला वीरमरण आले असेल. त्याचा शोक करणे हे योग्य नाही. हा आघात आपण कणखरपणे सोसला पाहिजे. माझ्यासारख्याने या मृत्यूचा शोक केला, हाय खाल्ली, धीर सोडला, तर ते योग्य ठरणार नाही. मृत्यूला भिणे हे वीरांना लज्जास्पद आहे. असे नाना विचार तुळोजीरावांच्या मनात आले आणि हळूहळू त्यांना उभारी आली. खचून गेलेले मन सावरले.

मग ते आत जाऊन, देवापुढे उभे राहिले. पंढरीचा विठ्ठल होता, जेजुरीचा खंडोबा होता, तुळजापूरची भवानी होती, विघ्नहर्ता गणपती होता, बाळकृष्ण होता. अंगाखांद्यावर फुले घेऊन कपाळाला चंदनाचे टिळे लेवून हे सारे रक्षणकर्ते देव देव्हाऱ्यात उभे होते. त्यांच्यापुढे उभे राहून तुळोजीरावांनी हाक मारली, ''मंजुळाबाई.''

''आल्ये!''

''इकडं देवघरात ये जरा बाळ.''

मंजुळाबाईंनी पदर ठाकठीक केला, कुंकू नीट आहे का हे आरशात पाहिले. सासऱ्याने आज देवघरात का बोलविले हे तिला कळेना. गोंधळलेल्या मनानेच ती देवघरात येऊन उभी राहिली आणि प्रश्नार्थक मुद्रेने ती त्यांच्याकडे बघू लागली. तुळोजीरावांचा चेहरा गंभीर होता.

''बैस!''

तुळोजीराव स्वत:ही बसले. मंजुळाबाई बसली.

मग तुळोजीराव म्हणाले, ''तू मोठ्या घरातली आहेस, मोठ्या घरात पडली आहेस. एका वीर पुरुषाची धनीण आहेस. शिवाजीसारख्या उत्तम मुलाची आई आहेस. आजवर आलेले भलेबुरे

प्रसंग तू सोसले आहेस –''

हे ऐकता-ऐकता मंजुळाबाईंची चर्या बदलत गेली. डोळे मोठे झाले. ओठ उघडले. हात छातीवर आला.

''घाबरू नकोस. धीर सोडून नकोस.''

''काय झालं?''

''आज सरकारी टपाल आलं आहे. त्यात लिहिलं आहे का, बाजीराव बेपत्ता आहे.''

मंजुळाबाईंनी दोन्ही हातांनी तोंड झाकून मोठा हुंदका दिला. तिचे सारे शरीर, वादळातील झाडाप्रमाणे हलू लागले. मग तुळोजीरावांनी पुढे होऊन तिच्या पाठीवरून हात फिरविला. तिला पोटाशी धरले, अश्रू पुसले. नाना परीने समजावले. मघा त्यांनी ज्या विचारांनी आपले मन सावरले होते, तेच विचार तिला आठवले. पण तुळोजीराव पुरुष होते, जात्याच कणखर होते आणि मंजुळाबाई स्त्री होती, बाजीराव म्हणजे तिचे सर्वस्व होते.

मंजुळाबाईंचा दु:खाचा पूर ओसरायला बराच वेळ लागला. शेवटी ती शांत झाली. तसे तुळोजीराव म्हणाले, ''कपाळावरचं कुंकू ओघळलं आहे, नीट लाव जा. ऊठ आणि बरं का, शिवाजीपाशी तू काही बोलू नकोस. त्याला माझ्याकडे पाठव, मी सर्व सांगेन त्याला.''

पुढे काही दिवस मोहित्यांचा वाडा फार खिन्न, उदास राहिला. गावातही सगळ्यांना बातमी कळली होती. लोक समाचाराला येऊन जात होते. फार जवळची, प्रेमाची माणसे होती. ती आल्यावर तुळोजीराव चार शब्द बोलले. पण वाड्यावर रीघ लागली, तेव्हा त्यांना हे सहन झाले नाही. चारचौघांना त्यांनी सांगून टाकले की, ''मला समजविण्यासाठी येऊ नका. माझं काही भयंकर नुकसान झालं नाही. घरात काही वाईट घडलेलं नाही. आमच्यावर दैवाचा घाला पडलेला नाही. पिढ्या न् पिढ्या सैन्यात चाकरी करण्याची परंपरा आहे आमच्या घरी. असे प्रसंग येणारच. आम्ही त्याचा फार शोक करीत नाही, तुम्ही करू नका –''

काही दिवस गेले आणि मग दुसरे टपाल आले. बेपत्ता बाजीराव हा रणांगणावर कामी आला, अशी आता सरकारची खात्री पटली होती.


मंजुळाबाईंनी कुंकू लावणे बंद केले. तुळोजीराव मनोमनी फार खचून गेले. त्यांचे मन कशात लागेना. वर सगळे करीत ते घरीच वावरत राहिले.


✪



२५ वर्षांची परंपरा


ebook available

## मनोहर माळगांवकर यांची साहित्यसंपदा






# सैनिक हो, तुमच्यासाठी...

आनंद यादव

नमनाचे पडघम
स्वातंत्र्याच्या इतिहासाला
अखंड घडवी सुवर्णभूमी
दिव्य संस्कृती इथे नांदते
अनेक वंशी, अनेक धर्मी.

युरोपातुनी धावत आले
पोटासाठी अनेक वेडे
राज्य करूनी निघून गेले
भरून पोटे, भरून गाडे.

''हिंदू-मुस्लिम भिन्न धर्म हे,
भिन्न संस्कृती, भिन्नच सगळे.''
–जाता जाता सांगुन गेले
आणि जन्मली विषारी फळे.

भारतमाता अखंड होती
तिचे खंडले दोन्ही हात
तिच्याच मांडीवरी बैसुनी
जन्मा आले पापी पाक.

रक्ताने न्हाऊन निघाली
स्वातंत्र्याची अधली रात
सलत राहिला काटा पायी
अधुनीमधुनी करीत घात.

काश्मिर-भूमी मुकुट शिरीचा
हाव तयाची पाकीस्ताना
दुराग्रहाने लढत राहिले
घेत करूनी कंठस्नाना.
सीमेवरती उडत राहिली
क्षणाक्षणाला घातक गोळी
पाकीस्तानी अन् वैराची
अखंड कटकट आली भाळी.

अनेक गेली वर्षे आणिक अनेक गेल्या राती
पाक धडपडे, तरी येइना काश्मिर-भूमी हाती.

निराश झाली हुकूमशाही, निराश झाले पाक
यूनोमध्ये मागुन पाही पुन: पुन्हा अन् भीक.

परकीयांच्या तुकड्यांवती पुष्ट जाहले श्वान
भुंकत राही भारतभूवर करून ताठर मान.

चोरून नेती गुरे-माणसे, धनधान्याची शेते
उलट्या बोंबा मारत जगभर तरीहि पळती नेते.

घुसती हल्लेखोर पठाणी, भुरटे चोरहि त्यात
दंगेधोपे करू पाहती काश्मिर-भूमि अशांत.

महान मंगल देश आपुला शांतीचा जगि दूत
समजावणिचे करी बोलणे, परी न टाकी हात.

धर्मांधाला कुठली दृष्टी, कुठली नीती त्याला?
मिळेल तेथिल मदत घेउनी घालत राही घाला.

धर्माच्या वेडाने त्याची वाढे घमेंड, ताठा
सहन-शक्तिच्या तुटल्या सीमा, बुजल्या शांती-वाटा.

भारत-सीमेवरचे जाई झडून तेव्हा हीव
अशोकस्तंभावरचा उठता जबडा पसरुन सिंह.

सीमेवरची उठली झाडे, डोंगर झाले जागे
पानपान संगीन होउनी धावत गेले वेगे.

लाख पाउले पेटुन उठली लाखजणांची छाती
भारतभूच्या इतिहासाला नवीन चढली कांती.

खुडुन टाकण्या पाकिस्तानी हिंसक जहरी नांग्या
तोफांच्या गोळ्यांसह उठल्या जयघोषाच्या ठिणग्या.


गुरखे, मुस्लिम, शीख, मराठे, मद्रासी अन् जाठ;
अनेक जाती, वंश सर्वही राष्ट्र जाहले एक.

अनेक अर्जुन, अनेक बाजी, अनेक उठले सिंह
पराक्रमांचे छातीवरती मिरवत आले चिन्ह.

कैक विरांनी तानाजीसम रणी ठेविला माथा
त्या शूरांची, त्या छाव्यांची भारत गाई गाथा.


✪


# डॉ. जयसिंगराव पवार यांची साहित्यसंपदा



२५ वर्षांची परंपरा


ebook available


































# शंकर पाटील
## यांची
## साहित्यसंपदा





२५ वर्षांची परंपरा

ebook available














मराठी ग्रामीण साहित्यात
पाटीलकी करणारे
वाचकप्रिय कथाकार शंकर पाटील
यांचे जन्मशताब्दी वर्ष
८ ऑगस्ट २०२५ - ८ ऑगस्ट २०२६












## भारतीय सैनिक

### सुशांत सैनी

**अनु.: जुई कुलकर्णी**

## तो सहावा दहशतवादी

त्या दुर्दैवी दिवसाला आता एक आठवडा लोटला होता. या हल्ल्याच्या चौकशीसाठी आर्मीने पाच सीनिअर ऑफिसर्सची टीम तयार केली, ज्यात मीदेखील होतो. पोलिस हेल्पफुल होते आणि पूर्ण सहकार्य करत होते. आम्हाला क्राइम सीनचा आणि साक्षीदारांचा संपूर्ण ॲक्सेस दिलेला होता.

कारण या हल्ल्यात आर्मी ऑफिसर्स गेले होते. मॉलमधल्या सिक्युरिटी कॅमेराचं फुटेज आम्ही दहा वेळा तरी पाहिलं असेल. सगळ्या साक्षीदारांची अनेक वेळा उलटतपासणी केली असेल. आमची इच्छा होती एकही छोटीशीही बाब आमच्या नजरेतून सुटू नये. आता निश्चितपणे काय घडलं होतं ते आम्हाला समजलं होतं.

दिवसाढवळ्या स्वच्छ सूर्यप्रकाशात ते दहशतवादी फ्रंट गेटमधून आत आले. ते पाच जण होते आणि एका SUVमधून आले होते. चेकपॉइंटवर न थांबता ते थेट घुसले आणि त्यांनी फायरिंग करायला सुरुवात केली. गार्ड्सना उडवल्यावर ते मॉलमध्ये आत घुसले आणि आणि त्यांनी दिसेल त्याच्यावर गोळ्या झाडायला सुरुवात केली– लहान मुलं, म्हातारे, बायका कुणीही सुटलं नाही. त्यांचा हेतू अगदी स्वच्छ होता– जास्तीत जास्त लोकांना मारणं.

काय होतंय हे समजायला लागलं तसे लोक सैरावैरा पळायला लागले. जे मॉलबाहेर पडले होते तेही धावत सुटले. बाकीच्यांनीही

दहशतवाद्यांपासून जमेल तितकं दूर जाण्याचा प्रयत्न केला. थोडा अवधी मिळावा म्हणून काही जण दुसऱ्या, तिसऱ्या मजल्याकडे धावत सुटले. बरेचसे लोक पहिल्या मजल्यावर अडकले आणि तिथंच सर्वांत जास्त लोक मेले होते. गार्ड्ससकट पंचवीस निर्दोष माणसं पहिल्या मजल्यावर मेली होती. पंधरा आणि सात जण दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर मेली होती. हे सगळेच्या सगळे पाचही दहशतवादी २०-२५ वयाचे होते. त्यातले तिघंजण भारतातलेच होते. दोन जम्मू-काश्मीरमधले होते, एक मुंबईमधला होता.

दोन जण शेजारच्या देशातून आलेले होते. ते एक आठवड्यापूर्वी भारतात आले होते आणि तेव्हापासून भटकत होते, माग काढायला अवघड जावं म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी राहत होते. काही लोकांनी त्यांची मदत केली होती. काही जणांनी नकळत मदत केली, काही जणांसाठी हा त्यांच्या धर्माचा भाग होता, बाकीच्यांनी पैशासाठी मदत केली होती. हे दोन दहशतवादी शेजारच्या देशातले असले तरी त्यांच्या सरकारने नेहमीप्रमाणेच आपला यात काही संबंध नाही म्हणत हात वर केले होते. त्यांना त्यांच्या नागरिकांच्या डेडबॉडीजही नको होत्या. माझ्या मित्रांनी वेळीच ॲक्शन घेतली नसती तर मृतांची संख्या खूपच जास्त असती. काही व्हिजुअल क्ल्यूज, सिक्युरिटी कॅमेराजवरचं फुटेज आणि साक्षीदारांच्या जबान्या बघता तिथं नेमकं काय झालं होतं त्याचा जवळपास करेक्ट अंदाज आम्हाला लावता येत होता.

फायरिंगचा आवाज आल्यावर काय झालंय हे बघायला यावर, मनू आणि डेव्हिड बारमधून बाहेर आले. नक्की किती दहशतवादी होते ते समजणं अवघड होतं. निष्पाप लोकांवर धाडधाड गोळीबार सुरू असल्याने मनू, यावर आणि डेव्हिडनं वेगवेगळ्या मजल्यांवर जायचं ठरवलं आणि होता होईतो दहशतवाद्यांना रोखायचं ठरवलं. यावरनं सगळ्यात वरचा मजला निवडला. डेव्हिडनं पहिला मजला आणि मनूने तळमजला निवडला. मनू आणि डेव्हिड कसेबसे खाली पोहोचले. मनूनं दोन दहशतवाद्यांना फायरिंग करताना पाहिलं. त्याला वाटलं की त्यांना थांबवण्याचा सर्वांत सोपा मार्ग आहे त्यांच्यावर उडी मारणं. त्यानं तेच केलं. एका दहशतवाद्यावर झपाट्यानं उडी मारली. एक दहशतवादी त्या झटापटीत मारला पण दुसऱ्यानं मनूला छातीत गोळ्या मारल्या. तरी तशाही परिस्थितीत मनूनं पहिल्या दहशतवाद्याची गन घेऊन दुसऱ्याला गोळ्या घातल्या आणि त्याला मारलं. जमिनीवर कोसळता कोसळता त्यानं मेन गेटपाशी असलेल्या दहशतवाद्यालाही गोळ्या मारून ठार केलं. यावर आणि डेव्हिडकडं त्यांच्या मजल्यावरच्या दहशतवाद्यांना तोंड देण्याशिवाय काहीच उपाय नव्हता. त्या दहशतवाद्यांना मारायचं आणि त्यांना मारताना स्वतः मरायचं एवढंच त्या परिस्थितीत शक्य होतं.

डेव्हिड आणि यावरचे कुटुंबीय त्याच दिवशी दिल्लीत पोहोचले होते आणि माझ्या घरी उतरले होते. गेला पूर्ण आठवडाभर मी घरी जायच्या आधी बारमध्ये बसायचो आणि शांतपणे दारू पीत बसायचो. मी सहसा रात्री २ वाजेपर्यंत घरीच जायचो नाही आणि घरी पोहोचलो की थेट माझ्या रूममध्ये शिरून झोपून जायचो. मला डेव्हिड आणि यावरच्या कुटुंबीयांना तोंड दाखवायची लाज वाटत होती. ते का गेले आणि मी का नाही गेलो या प्रश्नाचं उत्तर माझ्याकडे नव्हतं. मी तिथं त्यांच्यासोबत असतो तर कदाचित वेगळं काही घडलं असतं का, कोण जाणे! मी मॉलमध्ये जायला लवकर निघालो असतो तर काय झालं असतं.

मीडियाला उन्माद चढला होता. प्रत्येक चॅनेलवर तीच एक बातमी होती. प्रत्येकाला काय घडलंय ते समजावून सांगायचं होतं. कुणाला घटनेतल्या खऱ्या डिटेल्सची पडलेली नव्हती. प्रत्येक पत्रकाराचा आता राजकारणी झाला होता, स्वतःला अनुभवी समजणाऱ्या लोकांचं वेगळंच मत होतं. काही जणांची इच्छा होती, की भारतानं शेजारच्या देशावर ताबडतोब हल्ला करावा. काही जणांचं मत होतं मॉलच्या सिक्युरिटी एजन्सीवर कारवाई व्हावी. विरोधी पक्ष गृहखात्याला दोष देण्यात बिझी होता. आपल्या गुप्तहेर खात्याचं हे संपूर्ण अपयश होतं असं म्हटलं जात होतं.

फेसबुकवरच्या जनतेचं म्हणणं होतं की पंतप्रधानांनी झटपट काहीतरी ॲक्शन घ्यायला हवी. विदेशी मीडियामध्ये हल्ला हायलाइट करून दाखवला जात होता. जगातल्या जवळपास प्रत्येक देशानं या हल्ल्याचा निषेध केला होता.

माझा माझ्या नशिबावर विश्वास बसत नव्हता. मागची सात वर्षं वनवासात घालवून मी माझ्या देशासाठी लढत राहिलो होतो आणि मी पुन्हा इथंच येऊन का पोहोचावं?

शरीरातल्या गोळ्यांच्या जखमांच्या वेदना आता या मनाच्या वेदनेपेक्षा फार कमी वाटत होत्या. मी स्वतःला विचारलं की आता मी काय करायला हवं? माझं आयुष्य नॉर्मल पद्धतीनं जगणं आता मला अशक्य वाटत होतं.

मला त्या तिघांची फार आठवण येत होती. वाटत होतं ते अचानक इथे बारमध्ये येतील आणि माझ्याबरोबर दारू पितील. मग आम्ही भरपूर गप्पा मारू, आमच्या ॲकॅडमीतल्या दिवसांच्या आठवणी आणि गोव्याच्या आठवणी काढू. मला त्या तिघांना गुडबाय म्हणायची संधीही मिळाली नाही. मला त्यांना किती, काय सांगायचं होतं ते राहून गेलं. मला यावरची माफी मागायची होती, त्याचे वडील वारले तेव्हा मी त्याच्यासोबत नव्हतो, त्याचं लग्न झालं तेव्हाही मी त्याच्यासोबत नव्हतो. यावरची मुलगी शायराला भेटायचं राहून गेलं. यावर तिच्यासोबत असताना त्याचा चेहरा कसा उजळत असेल ते बघायचं राहून गेलं.

चौघांच्या कुटुंबीयांना घेऊन मला फॅमिली व्हेकेशनवर जायचं होतं. एक मोठी बस करून सगळे जण एखाद्या शांत सुंदर ठिकाणी गेलो असतो. मीरा, माया आणि शायराला एकत्र खेळताना पाहणं किती सुखाचं झालं असतं! डेव्हिड आणि त्याच्या बायकोसोबत मी कधी डिनरला गेलो नव्हतो; रादर त्याहून वाईट म्हणजे मी तिला कधी भेटलोच नव्हतो. मला कितीतरी गोष्टी जाणून घ्यायच्या होत्या.

डेव्हिडच्या बायकोसमोर गोव्याच्या आमच्या पहिल्या ट्रिपची ती विशेष आठवण काढून मी डेव्हिडला अनकम्फर्टेबल केलं असतं आणि मग विषय बदलला असता. मला यावरला आणि मनूला सांगायचं होतं, की त्यांच्या रिटायरमेंट रेस्टॉरंटसाठी मला परफेक्ट जागा सापडलीय–सिंगापूर. आम्ही तिथंच सेटल झालो असतो, सिंगापूर भारतापासून फार दूरही नाही आणि तिथं सगळ्या वर्ल्ड क्लास ॲमिनिटीज आहेत.

रात्रीचे २ वाजले तशी घरी जायची वेळ झाली. हा बार माझ्या घरापासून फक्त पंधरा मिनिटांच्या अंतरावर होता. कुणीही झोपेतून जागं होऊ नये अशा रीतीने मी घरात शिरलो. पण मी रूममध्ये गेलो तसे लाइट लागले. सगळे जण तिथं होते; आई, बाबा, करण, मीरा आणि माया, शायरा, यावरची पत्नी आणि बहीण, डेव्हिडची पत्नी आणि त्याचे आई-बाबा. आईनं मला बसायला फर्मावलं. मी कुणाच्या डोळ्यांना डोळा देऊन बघू शकत नव्हतो. शायरा लुटूलुटू चालत माझ्याकडे आली. तिला घट्ट जवळ घेऊन मी ढसाढसा रडायला लागलो, मीरा आणि माया माझ्याकडे येऊन मला थोपटायला लागल्या.

मी रडत रडत बोलत सुटलो, ''आय ॲम सो सॉरी, मी काहीही करू शकलो नाही. मी तिथं पोहोचेपर्यंत सगळं काही संपल होतं. मी तुम्हाला काय सांगू ते मला समजत नाही. लढायला मी तिथं असतो तर बरं झालं असतं, कदाचित काहीतरी वेगळं घडलं असतं.''

डेव्हिडचे वडील म्हणाले, ''अर्जुन, तुला असं वाटत नाही का आमच्या मनातही काही विचित्र विचार येत असतील? मी डेव्हिडवर देशभक्तीचे संस्कार का केले? त्याला आर्मी का जॉइन करू दिली? आम्हा सगळ्यांच्या मनात असे विचार येतच राहणार आहेत. पण आता आपण स्वतःला दोषी मानणं थांबवायला हवंय आणि यासाठी जे खरंच जबाबदार आहेत त्यांच्यावर आरोप करायला हवेत.''

यावरची बहीण आलिया म्हणाली, ''काका बरोबर बोलतायत. इथं आरोपी आहेत ते दहशतवादी आणि त्यांना मदत करणारे लोक. अर्थात, आपल्या इंटेलिजन्स डिपार्टमेंटलापण प्रश्न विचारायला हवेतच. त्यांना या हल्ल्याचा काहीच अंदाज कसा आला नाही? त्यांना काहीच माहिती नव्हती? आणि जर माहिती होती, तर त्यांनी तो रोखायला काय काय केलं? या हरामखोरांना भारतात यायला कुणी मदत केली? ज्यांनी मदत केली त्यांनाही शिक्षा व्हायला हवी. आपले पंतप्रधान शेजारच्या देशाचं काहीतरी करणार आहेत का नाहीत?''

आई म्हणाली, ''हे बघ बेटा, तू स्वतःवर जरा दया दाखव आणि या गुन्ह्यात गुंतलेल्या प्रत्येकाला शिक्षा होईल असं बघ. डेव्हिड, यावर आणि मनूलाही असंच वाटलं असतं.''

मग तिनं विचारलं, ''तू काही खाल्लंयस का नाही?''

मी उत्तरलो, ''नाही.''

बाबा म्हणाले, ''मलाही भूक लागलीय, चला सगळे जण काहीतरी खाऊ यात.''

पुढचा अर्धा तास आम्ही सगळ्यांनी खाण्यात आणि गप्पा मारण्यात घालवला. प्रत्येकानी नॉर्मल चेहरा ठेवला आणि रडायचं नाही असं ठरवलं. आम्ही कुठल्यातरी फालतू विषयावर, फिल्म्स, खाणं अशा विषयांवर बोलायचा प्रयत्न केला. यापुढे असं काही होऊ नये म्हणून काय करता येईल याविषयीपण बोललो.

M&M आणि शायराची छान मैत्री झाली होती. त्या तिघींना एकत्र पिक्चरला जायचं होतं. मी त्यांना घेऊन जायचं प्रॉमिस केलं. दुसऱ्या दिवशी मी माझं लक्ष ठरवून दुसरीकडे वळवलं आणि सगळ्यांबरोबर वेळ घालवला. लंचनंतर मी प्रॉमिस केल्याप्रमाणे M&M आणि शायराला घेऊन फिल्म बघायला गेलो.

परत येताना एका टीव्ही चॅनेलमधून फोन आला, न्यूज ऑफ इंडिया किंवा NOI म्हणून फेमस चॅनेल होतं. डिबेट आवर होस्ट करणाऱ्या एका फेमस निवेदिकेचा फोन होता. तिचं नाव शिबानी होतं. तिचा आवाज मी न्यूजमध्ये ऐकलेला असल्यानं ओळखला. ती कॉन्फिडन्ट, ठाम आणि कमांडिंग वाटत होती. तिचा शो ती अगदी शिस्तीत सादर करत असे.

ती म्हणाली, ''हॅलो, मेजर अर्जुन, इट्स नाइस टू टॉक टू यू! तुमच्या मित्रांसोबत जे झालं ते खूप दुर्दैवी आहे. आय होप की आता तुम्ही सावरला असाल.''

मी म्हणालो, ''हॅलो, शिबानी. मी आता बराय. मी तुमचा शो काही वेळा पाहिलाय. तुम्ही अगदी कडक शिस्तीत तुमचा शो करता. तुमच्यासाठी काय करू शकतो?''

शिबानी म्हणाली, ''तर उद्याच्या डिबेटचा विषय आहे: सुपरनोवा अटॅक. तुमच्या मित्रांच्या शौर्याविषयी तर आपण बोलूच आणि इतर महत्त्वाच्या इशूजवरही बोलू या जसा इंटेलिजन्स खात्याचा रोल, मॉलची सिक्युरिटी पुरेशी नव्हती का, सध्याचं सरकार एकूण परिस्थिती व्यवस्थित हाताळतंय ना, वगैरे.''

मी म्हणालो, ''ओह! शिबानी, एका तासासाठी हा कन्टेन्ट खूप जास्त आहे. मला अशा प्रकारचे शो आवडत नाहीत, खूप सारे टॉपिक्स आणि दहा जण बोलणारे एकमेकांवर तुटून पडतात, तुम्ही अशानं कुठल्या कन्क्ल्यूजनवर पोहोचणार आहात?'' मी विचारलं.

''मी अगदीच समजू शकते सर, पण हा शोचा फॉरमॅट आणि शोचं ड्युरेशन मला ठरवता येत नाही. मी केवळ माझा जॉब करते. तुम्ही आलात तर खूप बरं होईल. जनतेला तुमच्या मित्रांविषयी आणि त्यांच्या फॅमिलीजविषयी समजेल, ते कोण होते ते समजेल आणि तुम्हाला पूर्ण वेळ शोमध्ये राहायची गरज नाही. मी तुम्हाला तुमच्या मित्रांविषयी काही प्रश्न विचारेन आणि मग तुम्ही गेलात तरी चालेल, प्लिज सर '' शिबानीनं विनवणी केली.

मी म्हणालो, ''ओके! मी केवळ तिथं येऊन केवळ माझ्या मित्रांविषयी बोलेन आणि बाकीच्या कुठल्याही विषयावर बोलणार नाही. मला कुठल्याही राजकीय डिबेटमध्ये पडण्यात रस नाहीये. ॲडमिनिस्ट्रेशनमधले लोकं त्यांच्या परीनं काम करतायत यावर माझा

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

# टी बुक क्लब

चालू बुक क्लबचे सभासदत्व **५० रु.** भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.**

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील.

## टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

१०० रु. भरून आधीच्या टी बुक क्लबमधील कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाच वेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त.




## टी बुक क्लब ३५

सभासद फी ५० रु.

सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा! या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

### टी बुक क्लब ३६मधून प्रकाशित झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| **व्हेक्टर** | रॉबिन कुक | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ₹ ६५० |
| **अॅज द क्रो फ्लाइज** | जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी | ₹ १२९९ |
| **द फोर्थ इस्टेट** | जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी | ₹ १२९९ |
| **अ मॅटर ऑफ ऑनर** | जेफ्री आर्चर | अनु. सविता दामले | ₹ ७०० |
| **फर्स्ट अमंग इक्वल्स** | जेफ्री आर्चर | अनु. मोहन गोखले | ₹ १०९९ |

### टी बुक क्लब ३६मधून प्रकाशित होणारे पुस्तक

| | | | |
|---|---|---|---|
| **द फोर्थ प्रोटोकॉल** | फ्रेडरिक फोरसाइथ | अनु. एन. के. पै | ₹ ८०० |

विश्वास आहे.''

''ठीकंय तर, तुमचा ॲड्रेस पाठवा आणि आमची माणसं कॅमेरा आणि माइक घेऊन येतील, ऑल द वे तुम्हाला इथं यायची गरज नाही. गुडबाय. उद्या बोलूच.'' असं म्हणत तिनं फोन ठेवला.

मी फोन खिशात ठेवून दिला आणि आम्ही घरी परतलो. दुसऱ्या दिवशी NOIचे लोक शोच्या एक तास आधी घरी आले. त्यांनी मला घरातली शांत रूम निवडायला सांगितली, जिथं कुठलाही व्यत्यय येणार नाही. घरातल्या प्रत्येकाला काय करायचं आणि काय करायचं नाही याविषयी थोडक्यात सूचना दिलेल्या होत्या. मोठ्यांनी लहानांवर लक्ष ठेवायचं होतं. शो पुढच्या तीस मिनिटांत लाइव्ह होणार होता. मी त्या तिघांविषयी विचार करू लागलो, मला काय शेअर करता येईल? त्यांच्यामागे असलेले प्रेमळ कुटुंबीय आणि त्यांना कसं उत्तम रीतीनं वाढवलं गेलं? का मी आमच्या ॲकॅडमीतल्या धमाल

दिवसांबद्दल बोलू, आमचं ट्रॅव्हल रिच्युअल आणि आम्ही प्रत्येक ठिकाणी जाऊन काय काय करायचो. त्या आठवणींनी माझ्या चेहऱ्यावर एका आठवड्यानं हसू आलं.

शो सुरू झाला, सहा जण सहभागी होते. तीन वेगवेगळ्या राजकीय पार्टीजचे प्रतिनिधी होते, गेल्या दशकापासून दहशतवाद्यांचा अभ्यास करणारा एक प्रोफेसर होता, आणि एक मीडिया पर्सनॅलिटी, मी आर्मीला रिप्रेझेन्ट करत होतो. शिबानीनं सगळ्यांची ओळख करून दिली आणि डिबेट सुरू झाली.

शिबानीचा पहिला प्रश्न माझ्यासाठी होता, ''मेजर अर्जुन, शोमध्ये तुमचं स्वागत आहे. सुपरनोवा मॉल अटॅकमध्ये मारले गेलेले आर्मी ऑफिसर्स तुमचे केवळ बॅचमेट्स नसून जवळचे मित्र होते आणि तुम्ही त्यांना मॉलमध्ये भेटणार होतात. नक्की काय आणि कसं झालं ते सांगू शकाल का?''

मी हे ऐकून जरासा मागे हटलो, आदल्या दिवशी तर शिबानी म्हणाली होती, की तिला मी माझ्या मित्रांच्या पर्सनल आयुष्याविषयी बोलणं अपेक्षित होतं. कदाचित ती सुरुवातीला हे बोलत असेल आणि मग त्या विषयावर बोलेल. मी सगळं एक्सप्लेन करायला सुरुवात केली. माझं बोलणं अर्धंही झालं नव्हतं तेवढ्यात तिनं मला थांबवलं, ''मेजर अर्जुन, आर्मी या प्रकरणात काही लपवाछपवी करत आहे का?''

हा प्रश्न ऐकून मला धक्का बसला, मी विचारलं, ''याचा अर्थ तरी काय आहे?''

ती बोलत राहिली, ''आमच्याकडे कन्फर्म न्यूज आहे - मारल्या गेलेल्या ऑफिसर्सपैकी यावर दहशतवाद्यांपैकी एकाला ओळखत होते.''

मी संतापून ओरडलो, ''असली कुठलीही माहिती नाहीये माझ्याकडे. तुम्हाला कुठून मिळाली ही माहिती?''

शिबानी जवळपास किंचाळत म्हणाली, ''त्याने काहीही फरक पडत नाही, मेजर अर्जुन. महत्त्वाचं हे आहे की हा अटॅक इनसाइड जॉब असू शकतो, यावर हा सहावा दहशतवादी असू शकतो.''

हे ऐकून माझं डोकंच फिरलं. ''अशा प्रकारचा आरोप करायची तुमची हिंमतच कशी झाली? असं कसं म्हणू शकता तुम्ही? कुठला पुरावा आहे तुमच्याकडं? तुम्ही आर्मी किंवा पोलिसांकडून हे व्हेरिफाय केलंय का? तुमची माहिती चुकीची असली तर?''

शिबानी तिच्या कर्कश्श आवाजात बोलत राहिली, ''मेजर अर्जुन, एक फोटो हजार शब्दांचं काम करतो. डोळ्यांनी पाहिलेलं खोटं नसतं. आमच्या टीमनं दुनिया हलवून टाकेल असा एक फोटो शोधून काढलाय जो मी आता ऑडियन्सला दाखवू इच्छिते. मी ऑडियन्सला हे विशेषकरून सांगतेय, की ही बातमी अतिशय सेन्सिटिव्ह आहे आणि ही बातमी दिल्याबद्दल मला आणि माझ्या टीमला कदाचित अटकही होऊ शकते. पण आम्ही कुणाला घाबरत नाही आणि आम्ही सत्य उघडकीस आणण्यावाचून राहणार नाही.''

अचानक स्क्रीनवर एक फोटो झळकला. फोटोमध्ये यावर आणि एक दहशतवादी शेकहँड करताना दिसत होते, ते दोघंही कॅमेऱ्याकडं पाहत, पोज देत होते.

''तुम्ही बघू शकताय या दोघांनी स्पोर्ट्सचे कपडे घातले आहेत. हा त्यांच्या शाळेतला फोटो असावा. म्हणजे ते एकाच शाळेत होते. मग कशावरून ते दोघं मित्र नसतील आणि त्यांनी हे सगळं प्लॅन करून केलं नसेल?'' शिबानीनं चिडून विचारलं.

मी संतापानं ओरडलो, ''कुणी काढलाय हा फोटो? कुठून मिळवलाय? मी तुझ्याबरोबर असाच शेकहँड करताना फोटो काढतो शिबानी, त्यामुळे लगेच आपण फ्रेंड्स होत नाही. पुन्हा एकदा तेच विचारतोय, तुम्ही ही माहिती पडताळून पाहिली आहे का?''

शिबानी माझ्यावर ओरडली, ''मेजर, आमच्या व्ह्यूवर्सबरोबर मिळालेली माहिती शेअर करणं हे आमचं काम आहे आणि त्यांना ठरवू दे की काय बरोबर आहे आणि काय चूक आहे ते!''

मी ओरडलो, ''जे पडताळून पाहिलेलं नाहीये ते तुम्ही असं नाही दाखवू शकत आणि एखाद्याची आयुष्यभराची इज्जत तुम्ही अशी कशी डिस्ट्रॉय करू शकता!''

शिबानी ओरडली, ''आम्हाला आमचं काम नीट कळतं, मेजर! आर्मी आणि पोलिस गेलेल्या ऑफिसरची इज्जत राहावी म्हणून सत्य लपवतायत का?''

मी पुन्हा एकदा जोरजोरात ओरडलो, ''हे बघा, मी पहिल्यांदा हा फोटो बघतोय. हा संपूर्ण आरोप निराधार आणि बोगस आहे. तुम्ही हा फोटो आणि यामागची स्टोरी पडताळून घेतलेली नाही आणि तुम्ही एका निर्दोष आर्मी ऑफिसरवर आरोप लावताय, ज्याने देशासाठी त्याचं आयुष्य दिलंय. हे अनबिलिव्हेबल आहे!''

माझं बोलणं संपलंही नव्हतं की किशोर नावाचा एक राजकारणी बोलायला लागला.

''हाच आहे आपल्या हिंदूंचा प्रॉब्लेम! हा बावळट मेजर यावरला वाचवायला बघतोय कारण तो त्याचा मित्र होता. पण इथं यावरनं

सगळ्या देशाला मूर्ख बनवलंय. माझ्या मते त्या धर्माच्या लोकांना आर्मीत येण्यावर आपण बंदी घातली पाहिजे.'' त्यानं प्रत्युत्तर दिलं.

मी जवळपास बेंबीच्या देठापासून ओरडलो, ''कुणावर बंदी घालायची?''

किशोर ओरडला, ''मी कुणाविषयी बोलतोय ते तुम्हाला नक्की समजलंय. हे मुसलमान अजिबात विश्वास ठेवण्यालायक नाहीत.''

मी ओरडत राहिलो, ''तुमचं डोकं फिरलंय का? काय बोलताय काय तुम्ही? अनेक वर्षांपासून ते भारतीय सैन्यात सेवा बजावतायत आणि त्यांनी कधीही निराश केलेलं नाही. तुमच्या बोलण्याला आधार तरी काय आहे? एक शेकहँड करतानाचा फोटो. हा सगळा मूर्खपणा आहे. तुम्ही सगळे मूर्ख आहात. शिबानी, तू मला इथे वेगळं काही बोलायला बोलवलं होतंस आणि हे नाही. ते प्रश्न तू का विचारात नाहीयेस?''

शिबानी उर्मटपणाने म्हणाली, ''विथ ड्यू रिसेप्क्ट मेजर, पण माझ्या शोमध्ये तुम्ही असे ओरडू शकत नाही. तुम्ही असेच ओरडत राहणार असाल तर मी तुमचा माइक बंद करेन.''

''ते यावरवर असे घाणेरडे आरोप करत होते, तेव्हा तू त्यांना का थांबवलं नाहीस? ते एका धर्माला आर्मीत काम करायला बंदी घाला म्हणतायात तेव्हा तू का थांबवलं नाहीस? सांग मला!'' मी ओरडत राहिलो.

''मेजर अर्जुन, तुम्ही ओरडताय आणि मला बोलू देत नाहीयात म्हणून मी तुमचा माइक बंद करतेय. प्लिज त्यांचा माइक बंद करा.''

शिबानीनं तिच्या क्रूला ऑर्डर दिली.

मी अजूनही ओरडत होतो पण त्यांनी माझा माइक बंद केला होता. मी मात्र त्यांचं बोलणं ऐकू शकत होतो.

''हे बघा, आपण हिंदूंनी आता जागृत व्हायला हवंय आणि समजून घ्यायला हवंय की हे सगळं काय चाललंय. आपण घोर संकटात सापडलो आहोत.'' किशोर बडबडत होता.

आता मात्र मी संतापानं इतका वेडापिसा झालो, की मी माइक फेकून दिला आणि रूमबाहेर निघून गेलो.

एव्हाना बाहेरच्या जगात ही बातमी वणव्यासारखी पसरली होती. यावरचा त्या दहशतवाद्याशी शेकहँड करत असतानाचा फोटो इंटरनेट आणि टीव्हीवर सतत दिसत होता. प्रत्येक घरात, कॉलेजात, ऑफिसमध्ये, बारमध्ये, ट्रेन्समध्ये, बसमध्ये, विमानांमध्ये सगळीकडे एकच चर्चा सुरू झाली होती. सोशल मीडियावर आग लागली होती. काही दहशतवादी संघटनांनी यावरचं कौतुक केलं होतं. हेतू अगदी स्पष्ट होता : होता होईल तितकं नुकसान करायचं. माझ्यासारखे अनेक जण यावरचा बचाव करत होते. एका फोटोने काहीही सिद्ध होत नव्हतं. फोटो बराच जुना वाटत होता. कदाचित ते दोघं एका शाळेत असतीलही. हा योगायोग असू शकतो. कुणी तर या फोटोच्या सत्यतेविषयीच सवाल केला होता. हा फोटो बनावटही असू शकतो असं काही एक्स्पर्ट विचारत होते. पण बहुतांशी लोकांनी यावरला गद्दार ठरवून तसं जाहीर केलं होतं. हा कट यावरनं रचलाय अशी त्यांची खात्री पटली होती. ते इंटरनेटवर एकेक थिअरीज जाहीर करत होते. वेगवेगळे डिटेल्स जोडून बघत होते. यावर सगळ्यांत वरच्या मजल्यावर का थांबला? त्याला प्रॉमिस मिळालेलं असेल की लोकांना फक्त ओलीस ठेवलं जाईल आणि कुणाला मारणार नाही. पण त्यांनी फायरिंग सुरू केल्यामुळे यावरलाही हल्ला करणं भाग पडलं असणार, वगैरे.

असलं सगळं काही लिहिणाऱ्या कुठल्याही माणसाकडं खरी माहिती नव्हती. त्यातलं कुणीही यावरला पर्सनली ओळखत नव्हतं. यातलं कुणीही इन्व्हेस्टिगेशन टीमचा भाग नव्हतं आणि त्या फोटोच्या मुळाविषयी तर कुणालाच माहिती नव्हती.




यशाचं एक वैशिष्ट्य म्हणजे दूरदृष्टी;
परंतु आपल्याकडे आहे का? या तपासू या..

ebook available

**चिरंतन यशाचे १० नियम**

मारिया बार्टिरोमो । अनु.: मृणाल काशीकर-खडक्कर
किंमत : ₹ ३८०

# तो सहावा दहशतवादी

भारताची फाळणी झाली होती. यावरला सपोर्ट करणाऱ्यांनी प्रत्येक मोठ्या शहरात यावरसाठी रॅलीज काढल्या, यावरचा फोटो प्रत्येक बॅनरवर होता. त्याला गद्दार समजणाऱ्या लोकांनी सवाल उठवले. दोन्ही बाजूंनी घोषणा दिल्या आणि चढाओढ सुरू झाली. कुणाच्या रॅलीमध्ये दुसऱ्यापेक्षा जास्त माणसं गोळा होतील अशी रेस लागली. एखादा SMS किंवा एखादी फेसबुक पोस्ट पडायचा अवकाश की शेकडो लोक जमा व्हायला लागले.

लवकरच राजकारणी, ॲक्टर्स, गायक, बिजनेसमेन आणि प्रत्येक जण या विषयावरच वादविवाद करायला लागला. दर तासाला नवनवीन स्टेटमेंट्स येऊ लागली, मग दुसऱ्या बाजूनं प्रतिवाद करणारी स्टेटमेंट्स येऊ लागली. यामुळे परिस्थितीतला ताण वाढायला लागला. शाळा, कॉलेजातही हा एकमेव विषय डिस्कस होऊ लागला. वातावरण भावनांनी तापलं. लवकरच शाळा, कॉलेजात या विषयावर बोलायचं नाही अशा नोटिसा निघाल्या. तेच सरकारी संस्थामध्ये झालं. तिथंही अशाच ऑर्डर्स काढायला लागल्या. पब्लिक मीटिंग्जमध्ये हा विषय बोलू नये असं सांगितलं जाऊ लागलं. रॅलीजमध्ये हिंसा होऊ लागली तसं त्यात सहभागी होण्यावर बंदी घालायला लागली.

सगळ्यात वाईट गोष्ट ही होती, की एक देश म्हणून आपण हा प्रश्न सोडवायला कमी पडत होतो. दुसरी बाजू कशी चुकीची आहे, देशद्रोही आहे आणि फक्त आमचा पॉइंट ऑफ व्ह्यू बरोबर आहे हे सिद्ध करण्यात सगळे बिझी होते. मोठमोठ्या धर्मपीठाच्या धर्मगुरूंनी वास्तविक पाहता द्वेष कमी करण्याचा सल्ला देणं अपेक्षित होतं, पण ते उलट नागरिकांमध्ये फूट पाडण्याचं काम करत होते. जे लोक कायम एकीविषयी बोलायचे, नेहमी तटस्थ असल्याचं दाखवायचे ते अचानक एका टोकाचं वागू लागले. कदाचित, ते कायम अशाच विचारसरणीचे असतील, पण आतापर्यंत शांत बसले असतील.

आतापर्यंत भारतात असं ध्रुवीकरण झालं नव्हतं. मेन स्ट्रीममध्ये अशी घटना पहिल्यांदा घडत असावी.

मीडियावर पण सतत हेच सुरू होतं. काही वर्षांपूर्वी ज्या गोष्टी बोलणं भारतीयत्वाच्या विरुद्ध समजलं गेलं असतं, त्या आता सर्रास बोलल्या जात होत्या. 'यावर शाह'वरून विषय 'मुसलमान आणि त्यांची देशाप्रती असलेली निष्ठा' हा कधी झाला हे कुणाच्या लक्षातही आलं नाही.

मुसलमानांच्या निष्ठेवर इतके सवाल उठवण्यात आले होते, की त्यांना यावरच्या वागण्याचं स्पष्टीकरण देण्याची इच्छा उरली नव्हती. त्यांच्यासाठी यावर मातृभूमीची सेवा बजावत असताना वीरमरण आलेला वीर होता. त्यांना जाणून घ्यायचं होतं की असं अजून किती यावरना बळी जावं लागेल म्हणजे मुसलमानांचं रक्त शुद्ध समजलं जाईल. मुस्लिमांच्या देशनिष्ठेविषयी प्रश्न विचारणं कधी बंद होईल. मुस्लिम त्यांच्या विरोधकांना विचारत होते, की तो दहशतवाद्याला शेकहँड करतानाचा फोटो डेव्हिड किंवा मनूचा असता तर त्यांच्या देशप्रेमावर पण असेच सवाल उठले असते का? त्यांनाही गद्दार म्हटलं गेलं असतं का? त्यांच्या घरावरपण दगडफेक झाली असती का? त्यांना शौर्य ॲवॉर्ड द्यायला विरोध झाला असता का?

त्यांच्या देशभक्तीवर प्रश्नचिन्ह लागलं असतं का? सगळे मुस्लिम सैतान असतात का?

आणि हिंदूंचं काय? हिंदूंच्या देशभक्तीवर कधीतरी सवाल उठवायला काय हरकत आहे? सगळे हिंदू देशभक्त असतात का? मग लाखो रुपयांच्या घोटाळ्यात अडकलेल्या हिंदू राजकारण्यांचं काय? विनयभंग आणि गँग रेप केलेल्या हिंदू गुन्हेगारांचं काय? ज्यांनी कर बुडवून सरकारची चोरी केलीय, त्या हिंदू नागरिकांचं काय? घोटाळ्याच्या स्कीम्स घेऊन येणाऱ्या आणि लोकांची आयुष्यभराची कमाई लुबाडणाऱ्या लबाड हिंदूंचं काय? मुलगी नको असणाऱ्या आणि मुलगाच हवा असणाऱ्या हिंदू माणसांचं काय? हुंडा मागणाऱ्यांच काय? डोळ्यांसमोर चुकीची गोष्ट घडत असून चूप बसणाऱ्या हिंदूंचं काय?

अनेक शहरं आणि सरकारी ऑफिसेस प्रामुख्याने हिंदू डॉमिनन्स असणारी आहेत, मग त्यांची अवस्था आणि परफॉर्मन्स मुस्लिमबहुल एरियापेक्षा चांगला आहे का? उत्तर 'नाही' असं आहे. कुठलाही एक समाज दुसऱ्या समाजापेक्षा अधिक देशभक्त असतो असं नसतं. देशावर दहशतवादी हल्ला झाला किंवा देशावर आक्रमण झालं की मग अचानकच देशभक्तीचा विषय कसा वर येतो?

दुसऱ्यांना दोष देण्याआधी हिंदूंनी फार ग्रेट काम करायला हवंय. या देशातला कुठलाही एक कामाचा एरिया दाखवावा जिथं केवळ हिंदूंनी देशासाठी जास्त काम केलंय? राजकारण असो की गायन किंवा अभिनय, सोशल वर्क असो की सायंटिस्ट असो किंवा आर्मी असू दे. एकही क्षेत्र असं नाही जिथं केवळ आणि केवळ हिंदूच उत्तम काम करतात, मग सरसकट हिंदू मुसलमानांपेक्षा अधिक देशभक्त का समजले जातात?

हिंदूंकडे अर्थातच त्यांची आर्ग्युमेंट्स तयार होती : दहशतवादी ॲक्टिव्हिटीजमध्ये नेहमी मुसलमानच का इन्व्हॉल्व्हड असतात? यावरने त्या दहशतवाद्यांशी शेकहँड का केला? आमच्याच देशात आम्ही मंदिर का बांधू शकत नाही? ही हिंदूंची भूमी आहे ना? शेजारच्या देशांमधून मुसलमानांना नेहमी अधिक सहानुभूती का मिळते? ज्या काश्मिरी पंडितांची घरं गेली त्यांचं काय? त्यांच्यासाठी रॅली का काढू नये आणि त्यांची मदत का करू नये? जगभर तुमच्या धर्माचा केवळ तिरस्कार होतो. तुमच्या धर्मामुळं युद्ध होतात, असं असताना तुम्ही तुमचा धर्म इतरांवर का लादत असता? मुसलमानांवर ॲटॅक झाला की तुम्ही सगळे एकत्र येऊन तुफान आक्रोश करता, पण दुसऱ्या कुठल्या धर्माच्या लोकांवर अत्याचार झाला की मात्र अलिप्त राहता. समजा भारत आणि मिडल

ईस्ट यांच्यात वॉर झालं, तर भारतातले मुसलमान कुणाला सपोर्ट करतील? आम्ही तुमच्यावर विश्वास कसा काय ठेवायचा? इतर धर्मांतील लोकांशी नातं वाढवण्यापेक्षा मुसलमान नेहमी स्वतःतच गुंतलेले का राहतात? मुस्लिम त्यांची मुलं शाळेत पाठवतात का मदरसांमध्ये? मुसलमानांना अल्ला आणि देश यापैकी एक निवड करायला सांगितली तर ते काय निवडतील?

हा संघर्ष लवकरच हिंसेत बदलला. शहरं जाळली गेली. निर्दोष माणसांचा क्रूरपणे छळ झाला, कत्तली झाल्या. दुकानं लुटली गेली. धंदे बंद पडले. संपूर्ण देशाच्या इकॉनॉमीला झळ बसली.

ट्रान्सपोर्ट, मेडिकल फॅसिलिटीज सगळं काही बंद पडलं. लोकांना वैद्यकीय मदतीची गरज होती, पण मदत वेळेवर पोहोचू शकली नाही अशा अनेक घटनांच्या बातम्या न्यूज चॅनेलवर येत होत्या. देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी लोकं असाहाय परिस्थितीत अडकले. अनेकांना बेसिक ॲमिनिटीज मिळेनात. शांततेचं आवाहन बहिऱ्या कानांवर आदळत राहिलं. सिच्युएशन कंट्रोल करायला आर्मीला पाचारण करायला लागलं.

माझा देश इतका संतापलेल्या अवस्थेत मी पहिल्यांदा पाहिला. मी टीम Aमध्ये असताना अशा बातम्या वाचायचो, पण प्रत्यक्षात अवस्था इतकी वाईट असेल असं वाटलं नव्हतं.


मीडियासाठी तर हा जणू जॅकपॉट होता. न्यूज चॅनेल्स २४ ५ ७ हेच दाखवत होती. चर्चा सुरूच होत्या. प्रत्येक चर्चेचा परिणाम अधिकाधिक माणसांना संताप आणण्यात होत होता. चर्चांमधून उत्तरं कमी तर प्रश्न निर्माण होत होते. मी एका चॅनेलवरून दुसऱ्या चॅनेलवर सर्फ करून पाहिलं तर निवेदक पार्टीसिपेन्ट्सपेक्षा अधिक पिसाळलेले दिसायचे. सोशल मीडियावर तर अजूनच गलिच्छ वातावरण होतं.

प्रत्येक साइडचे लोक आपापले मुद्दे प्रूव्ह करण्यात बिझी होते. भाषा तर याहून वाईट पद्धतीनं कधीच वापरली गेली नसेल. लोक एकमेकांना, एकदुसऱ्याच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करत होते आणि ठार मारायच्या धमक्या देत होते.

तो फोटो पहिल्यांदा कुणी पोस्ट केला होता ते शोधून काढण्यात मला दोन महिन्यांच्या अथक प्रयत्नांनंतर यश आलं. त्या माणसानं मला सांगितलं, की तो यावरचा बॅचमेट आहे आणि त्याची आठवण म्हणून तो फोटो त्यानं पोस्ट केला होता. त्या माणसानं हेदेखील स्पष्ट केलं की यावरचं आणि त्या दहशतवाद्याचं आयुष्य किती विरोधात्मक आहे हे त्यानं मेन्शन केलं होतं. एक नॅशनल हिरो होता, खरा देशभक्त होता आणि दुसरा गद्दार होता.

त्यानं हेही सांगितलं, की यावर त्या दहशतवाद्याला ओळखत असेल अशी शक्यता अजिबात नव्हती. तो फोटो इंटर कॉलेजिएट कॉम्पिटिशन दरम्यान काढलेला होता. यावर १०० मीटर रनिंग स्पर्धेमध्ये पहिला आला होता आणि तो दहशतवादी मुलगा दुसरा आला होता. लोकल न्यूजपेपरसाठी तो फोटो काढला गेला होता. ते एकमेकांना मुळीच ओळखत नव्हते. त्यांच्या शाळा, ज्युनिअर कॉलेजेस आणि घरं एकमेकांपासून फार लांब होती. त्या स्पर्धेच्या आधी आणि नंतरही यावर आणि तो मुलगा एकमेकांना कधी भेटलेले नव्हते.

मी शिबानीला अनेकदा फोन केले, पण काही उपयोग झाला नाही. तिनं एकही कॉल घेतला नाही आणि माझ्या एकाही ई-मेलला रिप्लाय दिला नाही. सगळ्या मीडिया हाउसेसकडून असाच रिस्पॉन्स आला. या सत्यामध्ये त्यांना काहीच इंटरेस्ट उरलेला नव्हता. प्रत्येक जण पुढे गेला होता. सुपरनोवा अटॅकची जागा आता क्रिकेटनं घेतली होती. एक एक्सायटिंग टूर सुरू होणार होती. संतापयुक्त चर्चांची जागा आता पिचेस आणि खेळाडूंच्या क्रिकेट एक्स्पर्टकडून होणाऱ्या ॲनालिसिसनं आणि मजेशीर जाहिरातींनी घेतली होती.

साहित्याचा अनोखा आविष्कार असलेलं
जॉर्जियन महाकाव्य

ebook available

**वाघाचे कातडे पांघरणारा शूर सरदार**

शोथा रूस्थावेली । अनु.: निर्मिती कोलते
किंमत : ₹ ५९५

काही दिवसांनी एक मोठा डान्स शो सुरू झाला आणि मग तर सुपरनोव्हा अटॅकला सगळे विसरूनच गेले.

मी सोडून सगळे पुढे निघून गेले.

सुपरनोवा अटॅकपासून आपण काय धडा घेतला पाहिजे आणि काय करायला पाहिजे? आपण मॉल्सची सिक्युरिटी वाढवायला पाहिजे का? इंटेलिजन्स नेटवर्क वाढवायला पाहिजे का? लढताना आयुष्य गमावलेल्या त्या शूरवीर ऑफिसर्सच्या कुटुंबीयांचं काय होणार?

यावरचं काय? तो अजूनही देशभक्त आणि गद्दार या दोन स्टेटसमध्ये लटकतोय. शेकडो हेट मेल्स आणि धमक्या मिळालेल्या यावरच्या कुटुंबीयांचं काय? त्यांना आता घरी जायची भीती वाटते, त्यांच्या मुंबईतल्या घरावर अनेकदा दगडफेक झालीय. त्या फोटोमागच्या खऱ्या स्टोरीमध्ये मीडियाला इंटरेस्ट का नव्हता?

बहुतेक हा सगळा विषय त्यांच्यासाठी लगेच जुना झाला. पण शायराचं काय? तिचं भविष्य कायमसाठी कलंकित झालं. शायरानं केवळ बाप गमावला नाही तर कुटुंबाची इज्जतपण गमावली.

जेमतेम एका महिन्यानंतर नवीन काँट्रावर्सी उसळली. दिल्ली मधल्या एका प्रसिद्ध युनिव्हर्सिटीमधल्या काही स्टुडंट्सवर इतर स्टुडंट्सनी ते देशद्रोही कारवाया करतात असा आरोप केला. ते स्टुडंट्स सुपरनोवा अटॅकमध्ये मारलेल्या तरुण दहशतवाद्यांच्या सपोर्टसाठी घोषणा देत होते, असा आरोप त्यांच्यावर लागला. या ताज्या द्वेषाने भरलेल्या बातमीनं मीडिया भरभरून वाहायला लागला.

चॅनेल्स त्या घोषणा देणाऱ्या स्टुडंट्सचा व्हीडिओ दाखवत होते. त्यात निदान ५०-६० स्टुडंट्स फलक घेऊन जाताना दिसत होते. त्यातल्या काही स्टुडंट्सची ओळख पटली. कम्प्लेंट केलेल्या स्टुडंट्सनी हा मॅटर स्वतःच्या हातात घ्यायचं ठरवलं आणि या मुलांना सरळ करायचं ठरवलं. ते ॲडमिनिस्ट्रेशन ब्लॉकमध्ये गेले आणि प्रॉपर्टीची नासधूस केली. त्यांना रक्ताची तहान लागली होती. लवकरच दोन्ही बाजूंच्या स्टुडंट्सना अटक करण्यात आली. राजकीय पार्टीजनी फटाफट बाजू निवडल्या.

दिल्लीत हे असं सगळं घडावं हे बऱ्याच लोकांना रुचलं नव्हतं. युनिव्हर्सिटीतले बरेचसे स्टुडंट्स एका बाजूचे होते, नाहीतर दुसऱ्या बाजूचे होते. दोन्ही बाजूंचे लोक एकमेकांवर आरोप करत होते, देशाच्या धार्मिक तेढीमध्ये वाढ होईल अशी आगीत तेल ओतणारी विधानं करत होते. देशद्रोहाचा आरोप लावत होते. पुढचे काही दिवस काही स्टुडंट्सना वेगवेगळ्या ठिकाणी कोपऱ्यात गाठून मारहाण करण्यात आली, दोन स्टुडंट्सचा त्यात मृत्यू झाला. दुसऱ्या बाजूकडून साधा पश्चात्तापही व्यक्त करण्यात आला नाही.

पुन्हा एकदा सोशल मीडिया आर्ग्युमेंट्स, भांडणं, आरोप आणि धमक्यांनी भरून गेला. काही स्टुडंट्सनी सरकारवर बायस्ड असल्याचा आणि बनावट पुरावे तयार केल्याचा आरोप केला.

बऱ्याच चॅनेल्सनी मला डिबेट्समध्ये भाग घ्यायला बोलावलं. या सगळ्या प्रकरणावर आर्मीचा काय प्रस्पेक्टिव्ह आहे हे त्यांना जाणून घ्यायचं होतं म्हणे. आधीच्या कटू अनुभवामुळे मी झटकन नकार दिला, अर्थात, बोलायची इच्छा असणाऱ्या लोकांचा काही दुष्काळ पडलेला नव्हता. पण मी या सगळ्या प्रकारावर लक्ष ठेवून होतो. इतके लोक बोलत होते आणि झालेल्या घटनांचा ॲनालिसिस करत होते, तरी आपण कुणाशी काय बोलतोय याचं भान लोकांना उरलं नव्हतं. तुम्ही कुणाशी काय बोलताय या गोष्टीमुळेही बरंच काही घडतं. लोकांनी चमकण्याची संधी सोडली नाही.

या लोकांनी त्यांचीच मतं कशी बरोबर असतात, ते कसे नेहमीच बरोबर असतात आणि बाकीचे सगळे कसे चुकीचेच असतात अशी मांडणी केली. हा देश पुन्हा एकदा विभागला गेला. आता या देशात याहून अधिक द्वेष उरला नसेल असं वाटत असतानाच भरभरून द्वेष दिसला. प्रत्येक जण संतापलेला होता. कुणाला हे अंतर जोडायची इच्छा नव्हती.

तेवढ्यात एक नवीन फिल्म रिलीज झाली. सगळ्यांचं लक्ष तिकडं खेचलं गेलं. एकमेकांवर आरोप करणारे लोक पिक्चर पाहायला तिकिटांच्या लायनीत उभे राहिले. पिक्चरमधला मेन ॲक्टर किती चांगला आहे आणि ॲक्टरेस किती सुंदर आहे यावर रिव्ह्यूज आणि चर्चा सुरू झाल्या. टीव्ही आणि रेडिओवर आयटम साँग हिट झालं. देशात सिव्हिल वॉर होईल असं वाटत असतानाच काहीतरी नवीन आलं आणि जनतेचा फोकस बदलला.

आमच्या देशानं फूट पाडणारं, इतकं नुकसान करणारं, माणसांचा जीव घेणारं, धंदा बंद पाडणारं सगळं काही झटकन मागे टाकलं आणि जनता पुढे गेली. ज्यांच्या घरातली माणसं ठार मारली गेली होती, ते मात्र पुढे जाऊ शकत नव्हते. ते त्यांच्या माणसासाठी शोक करत राहिले. बाकीचे सगळे पुढच्या चमचमीत टॉपिककडे वळले.

सुपरनोव्हा अटॅकला सहा महिने लोटले यावर माझा विश्वास बसत नव्हता. सरकारकडून आणि आर्मीकडून होणाऱ्या सर्व चौकश्या संपल्या आणि फाइल बंद झाली. हा सगळा विषय परत एकदा बातम्यांमध्ये आला. ऑफिशिअल कमिटीनं या हल्ल्यामध्ये यावरचा रोल काय होता याविषयीचा रिपोर्ट दिला. कमिटीनं यावरवर कोणताही आरोप ठेवलेला नव्हता. यावर अगदी स्वच्छ होता. माझ्यासारखंच कमिटीचंही सहमत होतं, की तो केवळ एक कॅज्युअल शेकहँड होता. यावरला त्या दहशतवाद्यासोबत कधीही पाहिलं गेलेलं नव्हतं. त्यांच्यात इतर कुठल्याही मार्गाने कधीही कोणताही कॉन्टॅक्ट नव्हता.

यावरवर आरोप करणाऱ्या लोकांची तोंडं आता बंद झाली. काही जणांनी माफीही मागितली. पण बहुतेक जणांनी गप्प राहणंच पसंत केलं. त्यातले बहुतेक जण आता ही बातमी चघळण्यात बिझी झाले. यावरचे कुटुंबीय त्यांच्या मुंबईतल्या घरी परत निघून गेले. त्यांनी सुरक्षित वाटावं म्हणून सिक्युरिटी एजेन्सीचे बॉडीगार्ड्स नेमले. जस्ट सुरक्षित वाटावं म्हणून त्यांनी हे केलं.

मी आई-बाबांचं घर सोडून दिल्लीमधल्या आर्मी क्वार्टरमध्ये

शिफ्ट झालो. मला एकट्यानं राहणं बरं वाटत होतं. माझा दिवस ऑफिसमध्ये जाणं, दिवसभर काम करत असल्याचं दाखवणं आणि परत येणे यात जात असे.

मी नियमितपणे मनू, डेव्हिड आणि यावरच्या कुटुंबीयांच्या संपर्कात राहत असे आणि त्यांची मदत करण्यासाठी जे करता येईल ते करत असे.

बरेचदा मी संध्याकाळी दारू पीत बसण्यात घालवत असे. कधी कुटुंबासोबत किंवा मित्रांसोबत बसे, पण बहुधा एकटाच असे. मी बराच वेळ चिंतनात घालवत होतो. मी विचार करत होतो की IIT सोडून या देशासाठी लढण्यात आयुष्य घालवण्याचा माझा निर्णय योग्य होता का? तरुण सैनिकांनी त्याग करावा अशी आपली देश म्हणून लायकी तरी आहे का? सैनिक वर्षानुवर्षं कुटुंबापासून दूर राहतात आणि त्यांचे कुटुंबीय इथं सुरक्षित नसतात. सैनिक कुणाचं संरक्षण करत असतात? अशा देशाचं जिथं लोक एकमेकांचा इतका प्रचंड द्वेष करतात, एकमेकांशी नीचपणे वागतात आणि एकमेकांचा जीव घेण्याची एक संधीही सोडत नाहीत?

हे आयरॉनिक नाही का, या देशातला एक भाग श्रीमंत होतोय, त्यांना सगळा आराम आणि सुखसोयी मिळतायत आणि दुसरीकडं देशात अधिकाधिक द्वेष वाढतोय. मला जुना भारत आवडतो, ज्या भारतात आपल्याकडं फारसं काही नव्हतं पण तरी द्यायला बरंच काही होतं. जुन्या भारतात मॉबलिंचिंग भयंकर निंदनीय अपराध समजला जात असे. त्या वेळी एकमेकांच्या कॅरॅक्टरवर प्रश्न उठवले जात नव्हते. नक्की काय झालं की आपला देश इतका बदललाय? मी स्वतःलाच विचारत राहिलो, जर डेव्हिड, मनू आणि यावरने हे सगळं काही पाहिलं असतं तर त्यांनी कदाचित आर्मी जॉइन केली नसती.

अमेरिका आणि युरोपबद्दल मी खूप चांगल्या गोष्टी ऐकल्या होत्या, तिथं सगळे एकमेकांवर प्रेम करतात, तिथं द्वेष नाही, प्रेम आहे. अशाच कुठल्यातरी देशात मला जन्म मिळाला असता तर बरं झालं असतं. पण मी तिकडं शिफ्ट होऊ शकतो. काही मित्रांनी तिकडच्या संधींचा उल्लेख केला होता. तिथलं आयुष्य खूप कम्फर्टेबल आहे असं सांगितलं होतं.

दुसऱ्या दिवशी मी न्यूयॉर्कमध्ये राहणाऱ्या मित्राला फोन केला. तो तिथं गेली दहा वर्षं राहत होता आणि त्याचं तिकडं मस्त चाललं होतं. मला अमेरिकेत येण्यात इंटरेस्ट आहे हे ऐकून मित्राला फार आनंद झाला. त्यानं अमेरिकेतल्या सगळ्या छान गोष्टी पुन्हा पुन्हा सांगितल्या आणि आवर्जून हे सांगितलं, की माझा अनुभव त्याच्या कंपनीसाठी विशेष उपयोगी ठरू शकतो. मित्रानं माझ्या येण्याची सगळी सोय करेल असं आश्वासन दिलं आणि पुढची स्टेप काय असेल ते ठरलं की कळवेल असं सांगितलं. त्याच्याकडून एका महिन्यानं फोन आला.

सगळं काही ठरलं होतं.


माझ्या अमेरिकेत जाण्यासंदर्भात गोष्टी पुढे नेण्यासाठी आता त्याला माझ्याकडून अप्रूव्हल ई-मेल हवी होती. एकदा माझा व्हिसा आला, की मी आर्मीचा राजीनामा देणार होतो.

हे ऐकून माझ्या घरचे सगळे जण निराश झाले, पण त्यांनी मला सपोर्ट केला. आता देशाचा विचार करणं थांबवून स्वतःचा विचार करायची वेळ आली होती.

मी विचार केला, 'आताही मला एखादी छान बायको मिळेल, मी काय म्हातारा झालेलो नाही.'

बस, अजून काही आठवडे, मग मी या देशातून कायमचा निघून गेलेलो असेन.

✪





भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांच्या जीवनकहाणीबरोबर उलगडणारा मूकपटांचा इतिहास

ebook available

**द सायलेंट फिल्म**

शरयू फाळके-सम्मनवार । अनु.: नीता गद्रे, इंदुमती पोळ
किंमत : ₹ ३९९




# परमवीर चक्र

## रणांगणावरील आपले महान योद्धे

मे. ज. इयान कारडोझो

**अनु. : ज्योत्स्ना लेले**

## परमवीर चक्र : मूळ रचना

'परमवीर चक्र' हे युद्धातील शौर्याबद्दल देण्यात येणारे, भारतातले सर्वोच्च पारितोषिक आहे, हे त्या नावावरूनच स्पष्ट होते. शत्रूबरोबर लढताना, प्रकर्षाने प्रतीत होणाऱ्या शौर्य, धैर्य वा स्वार्थत्याग ह्या गुणांच्या धीरोदात्त कामगिरीबद्दल, हा सर्वोच्च बहुमान प्राप्त होतो. भारतीय संघराज्याच्या राष्ट्रपतींनी २६ जानेवारी, १९५०पासून असे पदक देण्याची प्रथा सुरू केली. तेव्हापासून आजपर्यंत (जानेवारी २००३), संरक्षण सेवेतील फक्त एकवीस जणांना हा बहुमान प्राप्त झाला आहे. ही पदके मरणोत्तरही प्रदान करण्यात आली. 'परमवीर चक्र' हे पारितोषिक, शूरांमधील सर्वश्रेष्ठ शूरवीरांस देण्यात येते. हा पुरस्कार देण्याचे निकष उच्चदर्जाचे आहेत. ज्या एकवीस जणांना ही पदके देण्यात आली, त्यांपैकी चौदा जणांनी आपल्या प्राणांची आहुती दिली होती.

ह्या पदकाच्या मानकऱ्याला ते पदक, भारताचे माननीय राष्ट्रपती प्रत्यक्ष देतात. दुर्भाग्यवश जर त्या मानकऱ्याचा मृत्यू झाला असेल, तर त्याच्या विधवा पत्नीस अथवा त्याच्या कुटुंबीयास, हे पदक राष्ट्रपती स्वत: देतात. सैन्यदलातील (सैन्यदलाच्या अधिपत्याखाली येणारी सर्व सेवा व दले, परिशिष्ट-१) अधिकारी आणि सैनिक, पुरुष वा स्त्री, हा सन्मान मिळवण्यासाठी पात्र असतात.

हे पदक ब्राँझपासून बनवलेले असून ते आकाराने गोल आहे. या पदकाच्या दर्शनी भागावर इंद्रदेवाच्या 'वज्र' ह्या अस्त्राच्या चार प्रतिकृती चार बाजूला कोरलेल्या असतात आणि मध्यभागी राजचिन्ह व बोधवाक्य कोरलेले असते. पदकाच्या मागील भागावर 'परमवीर चक्र' ही अक्षरे हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये कोरलेली आहेत. ह्या शब्दांमध्ये दोन कमळे कोरलेली आहेत. हे पदक छातीच्या डाव्या बाजूस सव्वा इंच रुंदीच्या, जांभळ्या रंगाच्या, फितीच्या आधारे लटकवायचे असते. ह्या पदकाच्या मानकऱ्याला जर दुसऱ्यांदा हे पदक मिळण्याचा मान प्राप्त झाला, तर फितीला एक दांडी जोडून, त्याला दुसरे पदक लटकावण्याची व्यवस्था करण्यात येते. (काही प्रसंगी) जेव्हा फक्त फीतच लावायची असेल, तेव्हा 'इंद्राच्या वज्रा'ची छोटी प्रतिकृती, दांडीऐवजी लावली जाते.

परमवीर चक्रासाठी 'वज्रा'च्या प्रतिकृतीचे चिन्ह स्वीकारणे हा निर्णय अगदी योग्य होता. इंद्राने, वित्र ह्या दुष्काळ-राक्षसाचा वध करण्यासाठी 'वज्र' ह्या अमोघ अस्त्राचा वापर केला व मानवजातीच्या भल्यासाठी, जीवनदायी असे पाणी उपलब्ध करून दिले. जगाच्या कल्याणासाठी, दधिची ह्या सर्वज्ञानी ऋषींनी आपल्या अस्थी देऊ केल्या व त्यांच्या अस्थींपासून 'वज्र' हे अस्त्र बनविण्यात आले.

इंद्राच्या वज्राच्या चार प्रतिमांच्या मधोमध चारी दिशांना तोंड करून असलेल्या 'अशोकाच्या सिंहांचे' (आपली राजमुद्रा) 'बुद्ध' परंपरेशी नाते आहे. त्यामधून पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण ह्या चारही दिशांना काय चालते, ह्याचे आकलन तसेच सर्वसमावेशक व सर्वव्यापी धर्माची कल्पना सूचित होते.

परमवीर चक्रासाठी वापरावयाच्या फितीचा रंग जांभळा असणे, याचेही खास महत्त्व आहे. ब्रिटिशांच्या सर्वोच्च पदकासाठी– व्हिक्टोरिया क्रॉससाठीही जांभळ्या रंगाची फीत वापरली जाते. भूदलाचा लाल, नौदलाचा निळा व वायुदलाचा आकाशी, ह्यांच्या मिश्रणातून जांभळ्या रंगाची निर्मिती होते. शिवाय हृदयाचा रंगही जांभळाच असतो. ह्या पदकासंबंधीची संपूर्ण नियमावली, जी भारत सरकारच्या गॅझेटमध्ये आहे, ती परिशिष्ट-१मध्ये दिली आहे.

## परमवीर चक्र : रचनाकर्ती

युद्धामधील शौर्यासाठी देण्यात येणाऱ्या 'परमवीर चक्र' या पदकाची निर्मिती एका स्त्रीने केली आहे! शत्रूबरोबर लढताना दाखवलेल्या शौर्याबद्दल देण्यात येणाऱ्या सर्वोच्च पदकाची रचना करण्याची जबाबदारी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेचच, अॅडज्युटंट जनरल, मेजर जनरल हिरालाल अटल यांनी, सौ. सावित्री खानोलकर (ज्या पुढे 'सावित्रीबाई' ह्या नावाने परिचित होत्या.) हिच्यावर सोपवली. स्वतंत्र भारताच्या सेनादलाच्या गौरवचिन्हांच्या निर्मितीची व नामाभिधानाची जबाबदारी मेजर जनरल अटल, ह्यांच्यावर सोपवली होती. सौ. खानोलकरांचा संस्कृत व वेदान्ताचा गाढा अभ्यास होता व त्यांना भारतीय पौराणिक कथांबद्दल सखोल माहिती होती. सौ. खानोलकरांची, रचनाकार म्हणून केलेल्या निवडीमुळे, पदकांच्या निर्मितीत भारतीय शैली प्रतिबिंबीत होईल, असे त्यांना वाटले. सावित्रीबाई चित्रकार व कलाकारही होती. सेनादलात कार्यरत असलेल्या, मेजर जनरल खानोलकरांची ती पत्नी होती. भारतीय पौराणिक कथांबद्दल तिला असलेली ओढ आणि तिच्यातील एका कलाकाराची प्रगल्भता यांमुळे ह्या पदकाची निर्मिती करण्यासाठी केलेली तिची निवड अत्यंत समर्पक ठरली. तिने जे 'पदक' निर्माण केले, ते खरोखरच उत्कृष्ट आहे.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे सावित्रीबाई जन्माने भारतीय नाही. तिची आई रशियन व पिता हंगेरीयन होते. तिचे मूळ नाव होते, 'इव्हा ह्योन्ने लिन्डा मादे दी मारोस.' तिचा जन्म २० जुलै, १९१३ला स्वित्झर्लंडमध्ये झाला. इव्हाला लहानपणापासून भारताचे व सर्व भारतीय गोष्टींचे आकर्षण होते. हिवाळी खेळांचे आकर्षण असलेली ती एक अतिशय धडाडीची व सुंदर मुलगी होती.

१९२९च्या हिवाळ्यात, चार्गोनिक्स येथे स्कीईंग करत असताना, तिची विक्रम खानोलकर या सँडहर्स्टमध्ये सैनिकी शिक्षण घेणाऱ्या तरुणाशी गाठ पडली. ते एकमेकांच्या प्रेमात पडले, पण आई-वडिलांच्या विरोधाची धार बोथट व्हायला, दोन वर्षांचा काळ लागला. १९३२मध्ये इव्हा हिंदुस्थानात आली. तिने हिंदूधर्म स्वीकारला व 'सिख रेजिमेंट'मधील कॅप्टन विक्रम खानोलकर, ह्या उमद्या तरुणाबरोबर तिचा विवाह झाला. तिला हिंदुस्थानी गोष्टींचे आकर्षण होतेच. त्यामुळे इथल्या चालीरीती तिने लगेचच आत्मसात केल्या व सेनादलातील अधिकाऱ्याची पत्नी म्हणून लगेचच रुळली.

पाटणा विद्यापीठात ती हिंदी व संस्कृत शिकली. तसेच भारतीय संगीत व कथ्थकली नृत्य शिकली आणि त्यामध्ये तिला खूप रुची निर्माण झाली. हिंदी, संस्कृत व मराठी भाषा तिने चांगल्या आत्मसात केल्या. ती एक प्रतिभासंपन्न चित्रकार होती. तिने चितारलेल्या अनेक कलाकृतींमध्ये हिंदू तत्त्वज्ञान व वेदांतील मूल्ये प्रतीत होतात. रामकृष्ण मिशनच्या सामाजिक कार्यामध्ये तिने हिरिरीने भाग घेतला. तसेच सेनादलातील जवानांच्या व त्यांच्या कुटुंबीयांसाठीच्या कल्याणकारी प्रकल्पांत, तिने काम केले. तिने सर्वार्थाने एक संपन्न जीवन व्यतीत केले. 'उत्तर-भारत फ्लाईंग क्लब'मध्ये भाग घेणारी, ती पहिली स्त्री होती. उदय शंकरकडूनही तिने नृत्याचे धडे घेतले. तिच्यावर हिंदू तत्त्वज्ञानाचा विलक्षण पगडा होता. हिंदू तत्त्वज्ञानाचे अंतरंग शोधण्याचा, मथितार्थाचा अन्वय लावण्याचा तिने सखोल प्रयत्न केला. तिने लिहिलेल्या पुस्तकांमध्ये 'Sanskrit Dictionary of Names', 'Saints of Maharashtra' आणि तिच्या अप्रकाशित आत्मचरित्राचे दोन खंड यांचा समावेश आहे.

शौर्यासाठी देण्यात येणाऱ्या, सर्वश्रेष्ठ भारतीय पदकाची रचना करण्याच्या विनंतीला, तिच्याकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दधिची ऋषींनी 'वज्र' या अमोघ अस्त्राच्या निर्मितीसाठी प्राणांचे बलिदान केले. शत्रूचा नाश करण्यासाठी बनवलेल्या या अस्त्रामध्ये, त्यांच्या मांडीच्या हाडाचा वापर केला होता. सावित्रीबाईंनी दधिची ऋषींपासून प्रेरणा घेतली. तिने पदकाच्या रचनेमध्ये वज्राच्या जोडीचा वापर केला. प्रत्येक बाजूला शिवाजीची 'भवानी' तलवार चित्रित केली. तिच्या रचनेस मान्यता मिळाली. अशा प्रकारे 'परमवीर चक्र' पदक आकारास आले.

पहिले 'परमवीर चक्र' पदक, हे कुमाऊँ पलटणीतील मेजर सोमनाथ शर्मास, १९४७-४८च्या भारत-पाकिस्तानमधील 'काश्मीर' युद्धात दाखवलेल्या शौर्यपूर्ण

कामगिरीबद्दल मिळाले. परमवीर चक्र पदकाचा हा मानकरी, सावित्रीबाईंच्या मुलीचा दीर होता. पहिल्या पदकाचा मानकरी, त्यांचा नातेवाईक असेल, हे त्यांनी स्वप्नातही कल्पिले नसेल.

२६ नोव्हेंबर, १९९०ला सावित्रीबाईंचे देहावसान झाले.

## मानपत्र : कॅप्टन विक्रम बात्रा

**१३ जम्मू व काश्मीर रायफल्स (IC ५७५५६)**

२० जून, १९९९ला 'ऑपरेशन विजय'मध्ये कॅप्टन विक्रम बात्रा या डेल्टा कंपनीच्या कमांडरवर, ५१४० या पॉइंटवर हल्ला करण्याची कामगिरी सोपवली गेली. कॅप्टन बात्रा व त्यांच्या कंपनीने त्या टेकडीला पूर्वेकडून वेढले व शत्रूवर अचानकपणे संपूर्ण हल्ला जवळून करता येईल अशा ठिकाणी ते पोहोचले. कॅप्टन बात्रा यांनी आपल्या सैनिकी तुकडीची पुनर्रचना केली. शत्रूच्या ठाण्यावर प्रत्यक्ष हल्ला करण्यासाठी आपल्या लोकांना उद्युक्त केले. अशक्यप्राय असा धाडसी हल्ला करत, ते शत्रूवर तुटून पडले. समोरासमोर झालेल्या लढाईत, त्यांनी शत्रूच्या चौघा सैनिकांना ठार केले.

७ जुलै, १९९९ला एका दुसऱ्या लढाईत, एका अरुंद, दोन्ही बाजूंनी धारदार कडे असलेल्या पॉइंट ४८७५ वर हल्ला करण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपवली गेली. त्या जागेवर शत्रूचा कडेकोट बंदोबस्त होता. तिथे जाण्यासाठी एकमेव रस्ता होता. झटपट मारा करण्यासाठी, कॅप्टन बात्रा यांनी त्या अरुंद खिंडीमध्ये शत्रूवर हल्ला करून समोरासमोर लढाई केली. शत्रूच्या पाच सैनिकांना कंठस्नान घातले. स्वत: जबर जखमी झाले असतानाही ते शत्रूच्या दिशेने रांगत, घसपटत गेले व त्यांनी शत्रूवर हातगोळे फेकले. स्वत:च्या जिवाची पर्वा न करता, त्या ठिकाणाहून त्यांनी शत्रूला हुसकावून लावले. आपल्या वैयक्तिक सुरक्षिततेची पर्वा न करता, शत्रूला सामोरे जाऊन आपल्या सैनिकांचे नेतृत्व केले व आपल्या हाताखालच्या लोकांना हल्ला करायला उद्युक्त केले. शत्रूकडून तुफानी गोळीबार होत असतानाही, त्यांनी अशक्य कोटीतली सैनिकी कामगिरी पार पाडली. परंतु त्यांना झालेल्या गंभीर जखमांमुळे अखेर त्यांना वीरमरण आले. त्यांच्या ह्या अचाट कर्तृत्वाने प्रेरित होऊन त्यांच्या फौजेने सुडाने पेटून, शत्रूचा समाचार घेतला. शत्रूचा पराभव करून पॉइंट ४८७५ हस्तगत केले.

कॅप्टन विक्रम बात्रा यांनी अशा प्रकारे शत्रू समोर उभा ठाकला असताना, अत्युच्च प्रकारचे शौर्य व नेतृत्वगुण यांचे प्रदर्शन केले व भारतीय सैन्यादलाच्या उज्ज्वल परंपरेस साजेसा स्वार्थत्याग केला.

(गॅझेट ऑफ इंडिया नोटीफिकेशन नं. १६/प्रेस/२०००)

**ये दिल मांगे मोअर**

*'आपल्या निर्धारित मोहिमेवर ज्यांचा अतूट विश्वास आहे, अशा निश्चयी लोकांचा छोटासा समूहही इतिहासाची दिशा बदलू शकतो.'*

– महात्मा गांधी.

कारगील युद्ध हे असे युद्ध होते की, ज्या युद्धात तरुण सेनाधिकारी त्यांच्या जोशपूर्ण स्वत्वात आविष्कृत होत होते. आधीच्या कुठल्याही, युद्धात तरुण अधिकाऱ्यांचे इतके प्राबल्य नव्हते, जितके ते कारगीलच्या युद्धात होते. यांच्यापैकी काही जणांना त्याहून अधिक सन्मान प्राप्त व्हायला हवा होता आणि काहीजणांचे कर्तृत्व उजेडातच आले नाही. त्यांच्या कर्तबगारीची अजिबात नोंद झालेली नाही.

पण प्रसारमाध्यमांच्यामुळे ज्याच्या कर्तृत्वाला लोकमान्यता मिळाली, असा तरुण होता 'विक्रम बात्रा.' आपली निर्धारित कामे पूर्ण करताना त्यांनी दाखवलेले अचाट धैर्य, जोखीमपूर्ण कामगिरी यांमुळे लोक अचंबित झाले, ते त्यांना अजिंक्य भासले, ते 'आ' वासून बघत राहिले. तरीही प्रत्येक आव्हानामध्ये जिवावर बेतलेल्या संकटामधून त्यांच्या सुखरूप येण्यासाठी लोकांनी देवाची प्रार्थना केली.

त्यांचे Code name होते 'शेर शाह', हेच त्यांचे टोपणनाव बनले आणि शत्रुसैनिकांनाही ते समजले. युद्धभूमीवर एकमेकांना आव्हाने देताना, शत्रुसैनिक या नावाने ओरडून चिथावणी देत असत. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेला मजकूर याप्रमाणे–

कारगीलचे एक महत्त्वाचे शिखर पुन्हा परत मिळवल्यावर दूरदर्शनच्या प्रवक्त्याने विक्रम बात्राला विचारले होते,

'आता तुला कसे वाटतेय?'

दाढी वाढलेला तो तरुण तत्परतेने म्हणाला होता, 'ये दिल

मांगे मोअर.’

लाखो लोकांनी आपल्या दिवाणखान्यातील दूरदर्शन संचावर हे पाहिले होते. त्यानंतर लवकरच पॉइंट ५१४० हे ठिकाण हस्तगत करण्यासाठी जी लढाई झाली, त्यात शत्रूबरोबर समोरासमोरची लढाई करताना त्यांनी चार घुसखोरांना कंठस्नान घातले.

दिलेली कामगिरी फत्ते केल्यानंतर त्यांना वीरगती प्राप्त झाली.

डिसेंबर, १९९७मधील इंडियन मिलिटरी ॲकॅडमीच्या पदवीधारकांपैकी दोघांना या युद्धासाठी परमवीर दिले गेले. ‘ऑपरेशन विजय’ ह्या कारगील युद्धातील शौर्यासाठी देण्यात आलेल्या परमवीर चक्रांपैकी एक मानकरी होते, कॅप्टन बात्रा व दुसरे होते लेफ्टनंट मनोज पांडे, ज्यांनी स्वत: बुलेटच्या भडिमाराने जखमी असतानाही, खंदका-खंदकामधून शत्रूचा बीमोड केला. शेवटी दुखापतीपुढे त्यांनी दम सोडला.

कॅ. बात्रा व लेफ्टनंट मनोज पांडे यांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले आणि जो आदर्श त्यांनी मागे ठेवला, त्यामुळे तरुण युवकांना सेनादलात भरती होण्यासाठी प्रोत्साहित केले आहे.

९ डिसेंबर, २००० मध्ये इंडियन मिलिटरी ॲकॅडमीचा जो अभ्यासक्रम पूर्ण झाला, त्यामध्ये आठशे तीन कॅडेट उत्तीर्ण झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची ही सर्वांत अधिक संख्या होय.

इंडियन मिलिटरी ॲकॅडमी या लष्करी विद्यालयाचे मुख्य, लेफ्टनंट जनरल युवराज मेहता यांनी मान्य केले आहे की, तरुण अधिकाऱ्यांच्या उत्साहामुळे प्रेरित होऊन पुष्कळ जवान सैन्याच्या पायदळाचा, जो सैन्याच्या युद्धाचा विभाग आहे, स्वीकार करतात. हे त्यांच्या संख्येत आठ-दहा टक्के वाढ झाल्याने, सहज लक्षात आले आहे.

IMAने आपल्या अभ्यासक्रमात नव्या गोष्टींचा समावेश केला आहे, जसे की संगणकशास्त्र व प्रत्यक्ष परिस्थितीचा, प्रतिकृतींवरून केलेला अभ्यास.

पण, कदाचित सर्वांत महत्त्वाचा बदल म्हणजे, शौर्यासाठी देण्यात येणाऱ्या बक्षिसांसाठी, प्रशिक्षितांचाही समावेश हा होय.

आर. पी. नायवाल

२१ जानेवारी, २००१. सन्डे टाइम्स.


ज्या लढाईमध्ये कॅप्टन बात्रांना हा सर्वोच्च बहुमान प्राप्त झाला, त्या लढाईचा हा वृत्तांत :

हम्प, पॉइंट ५१४० व पॉइंट ४८७५ हस्तगत करण्यासाठीची लढाई

१२ जून, १९९९ला १३ जम्मू व काश्मीर रायफल्सला द्रासला जाण्याचा हुकूम मिळाला. तोलोलिंग ह्या मुख्य भागाशी संलग्न अशा ‘हम्प’ म्हणून संबोधल्या जाणाऱ्या भागावर ताबा मिळवण्यासाठी १८ ग्रेनडिअर्सचे राखीव सैन्य म्हणून ते जात होते. दोन रात्रींच्या घनघोर लढाईनंतर १७ जूनला संध्याकाळी पाच वाजता ‘हम्प’ तसेच त्याच्या जवळचे ‘रॉकीनॉब’ ही दोन्ही ठिकाणे काबीज करता आली. शत्रुसैन्यापैकी आठ जण मरण पावले व नऊ जण जखमी झाले. शत्रुसैन्याने तीन UMG (युनिव्हर्सल मशिनगन्स) व बऱ्याच मोठ्या प्रमाणात दारूगोळाही तिथेच सोडून पळ काढला होता. आपल्या फौजांनी नंतर याच मशिनगनचा, शत्रूवर मारा करण्यासाठी उपयोग केला.

## पॉइंट ५१४० काबीज

१३ जम्मू व काश्मीर रायफल्सवर त्यानंतर सोपवलेली कामगिरी म्हणजे पॉइंट ५१४० हस्तगत करणे. हे द्रास खोऱ्यातले अत्यंत मोक्याच्या ठिकाणी वसलेले, महत्त्वाचे ठिकाण होते. ह्याच


भारतातल्या आघाडीच्या बालसाहित्यकार सुधा मूर्ती यांच्या लेखणीतून उतरलेल्या कथामालिकेतील एक नवीन रोमांचकारी साहसकथा!

ebook available

**आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी**

सुधा मूर्ती । अनुवाद : लीना सोहोनी

किंमत : ₹ २३०

ठिकाणाहून शत्रूने 'स्टिंजर मिसाइल'च्या साहाय्याने आपले एक हेलिकॉप्टर खाली पाडले होते. त्यानंतर या ठिकाणावरून आपले एकही हेलिकॉप्टर फिरकू शकत नव्हते. हे ठिकाण हस्तगत करणे म्हणूनच फार महत्त्वाचे झाले होते.

पॉइंट ५१४० हस्तगत करण्याची जबाबदारी 'बी' व 'डी' कंपनीवर सोपवली होती. कॅप्टन एस. एस. जामवालकडे 'बी' कंपनीचे नेतृत्व होते व 'डी' कंपनी कॅप्टन विक्रम बात्रा यांच्या अधिपत्याखाली होती.

१९ जून, १९९९ला पहाटे चार वाजता त्यांनी 'टोलोलिंग' टॉपहून प्रयाण केले. सकाळी साडेसहाला हम्पच्या पश्चिमेकडील उतारावर सर्व एकत्र जमले व दिवसभर तेथे निपचित पडून राहिले.

दिवसभरात दोन्ही कंपनींच्या कमांडरना त्यांच्या कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल वाय. के. जोशी यांनी सविस्तर माहिती पुरवली होती. त्यानंतर त्या दोघांनी त्या प्रदेशाची बारकाईने पाहणी केली होती.

कमांडिंग ऑफिसरला माहिती देत असताना कॅप्टन विक्रम बात्रांनी सांगितले होते, 'काम फत्ते झाल्यावर मी यशप्राप्तीचा संदेश देईन, 'ये दिल मांगे मोअर' व कॅप्टन एस. एस. जामवाल यांचा यशाचा संदेश असणार होता, 'ओह या! या! या!'

अंधार पडल्यावर तोफांच्या भडिमाराचा फायदा घेत, दोन्ही कंपन्या पॉइंट ५१४०कडे निघाल्या.

सुमारे पंधराहजार फूट उंचीवर असलेल्या या डोंगरमाथ्यावरच्या ठिकाणाकडे, चढून जाणे फार त्रासाचे होते. डोंगराचा कडा उभा व चढायला कठीण होता. हवा विरळ असल्यामुळे श्वास घेण्यासाठी एकसारखे थांबावे लागत होते.


तोफांनी फेकलेले प्रकाशगोळे वापरून शत्रूने ती जागा चांगली प्रकाशित केली होती. त्यामुळे चढणाऱ्या सैनिकांचा वेग आणखी मंदावला होता. शत्रूने हल्ला करावयास आलेल्या आपल्या सैन्यावर, तोफांचा भडिमार केल्यामुळे आपल्या सैनिकांना इजा पोहोचली होती. हल्ला करणाऱ्या शत्रूवर, तोफांचा परिणामकारक भडिमार करून, आपल्या सैनिकांनी त्यांचे खूपच लोक मारले. अशा विपरीत परिस्थितीत ही कंपनी आगेकूच करत होती.

रात्री तीन वाजून पंधरा मिनिटांनी ते त्या ठिकाणाजवळ पोहोचले. त्या ठिकाणी शत्रूचे एकूण सात खंदक होते, दोन माथ्यावर व पाच पूर्वेच्या बाजूला होते. कॅप्टन एस. एस. जामवाल यांच्या नेतृत्वाखालील 'बी' कंपनी प्रथम माथ्यावर पोहोचली व त्यांनी डाव्या बाजूकडून हल्ला केला. हल्ला करण्याच्या थोड्या आधी पॉइंट ५१४० स्थित शत्रू, १३ जम्मू व काश्मीर रायफलच्या रेडिओ नेटवर्कवर आला व त्याने हल्ला करावयास आलेल्या 'शेरशहा'ला (कॅप्टन विक्रम बात्राला) आव्हान दिले व हल्ला करण्यापासून परावृत्त करण्यासाठी धमकावून सांगितले की, त्यांच्यापैकी कोणीही जिवंत परत जाणार नाही.

जे रेडिओ नेटवर्कवर होते, त्या सैनिकांनी व विक्रम बात्रांनी त्यांच्यावर यथेच्छ तोंडसुख घेतले. मानसिक दहशत घालणे हेच त्यांचे लक्ष्य असेल, तर त्यात शत्रूला घोर अपयश आले होते. कॅप्टन एस. एस. जामवाल यांच्या कंपनीला पहाटे तीन वाजून पस्तीस मिनिटांनी आपले निर्धारित लक्ष्य गाठण्यात यश मिळाले. त्यांचा 'ओह या! या! या!' हा यशाचा इशारा, कमांडिंग ऑफिसरच्या कानाला संगीतासारखा आनंदमयी वाटला.

या दरम्यान विक्रम बात्रांच्या कंपनीने, पूर्वेकडील खंदकावर तीन रॉकेट्स सोडली व नंतर विक्रम बात्रांच्या पुढाकाराने शत्रूवर हल्ला चढवला. यात सहा पाकिस्तानी सैनिक मारले गेले व उरलेले पळून गेले.

सकाळी चार वाजून पस्तीस मिनिटांनी विक्रम बात्रांचा आवाज


ज्ञान, भक्ती आणि लोककल्याण ही त्रिसूत्री...
सर्वसामान्यांसाठी ठरेल कल्याणकारी

ebook available

## ज्ञानयोगी एकनाथ

मंजुश्री गोखले
किंमत : ₹ ५२०

रेडिओवर दुमदुमला, ‘ये दिल मांगे मोअर!’

त्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात हत्यारे व दारूगोळा हस्तगत झाला. यावरून पॉइंट ५१४० या ठिकाणी पाकिस्तानी फौजेची एक प्लॅटून कार्यरत होती, हे स्पष्ट दिसत होते.

पॉइंट ५१४० काबीज केल्यानंतर द्रास सेक्टरमधील युद्धाच्या लाटेने वेगळे वळण घेतले. या आघाडीनंतर शत्रूचे धाबे दणाणले. अचानक व गुप्तपणे केलेली कारवाई, फौजेची लवचिकता, पुढाकार घेण्याची वृत्ती, धैर्य या गुणांमुळे यश मिळाले. पॉइंट ५१४० काबीज केल्यानंतर तोलोलिंग टॉपवर हेलिकॉप्टर्स उतरू लागली. यानंतर जम्मू व काश्मीर रायफल्स सेनेस २६ जून, १९९९ला द्रास सेक्टरमधून फौजा काढून घेण्याचा व मुश्कोह खोऱ्यामध्ये कारवाई करण्याचा आदेश दिला गेला.

## पॉइंट ४८७५ काबीज

पॉइंट ४८७५ हे लढाईच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण होते. मुश्कोह खोऱ्यातील या ठिकाणावरून १/A राष्ट्रीय महामार्गावरील द्रास ते मातायन ह्या भागावर प्रभुत्व ठेवणे शक्य होते. ह्या ठिकाणाहून तीस ते चाळीस किलोमीटरच्या टापूवर नजर ठेवता येत असे व पाहिजे तेव्हा परिणामकारकरीत्या गोळीबार करता येत असे. त्याचमुळे शत्रूला इथून हुसकावून लावून हे ठिकाण काबीज करणे फार जरुरीचे होते.

द्रास हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरू शकत नसे, कारण त्या ठिकाणास शत्रूने आपले लक्ष्य बनवले होते. हेलिकॉप्टरना पान्ड्रास रिजवळून कमी उंचीवरून उड्डाण करावे लागत होते. पॉइंट ४८७५ काबीज करण्याची जबाबदारी १३ जम्मू व काश्मीर रायफल्सवर सोपवली होती. या बटालियनने घुमरीला विसावा घेऊन, पुनर्बांधणी करून, पुढच्या मोहिमेसाठी ताजेतवाने व्हायचे अशी योजना आखली होती. पण ती रद्द करून त्यांना ३० जून, १९९९ला मुश्कोह खोऱ्याकडे जावयास सांगितले. ७९ माऊंटन ब्रिगेडच्या अधिपत्याखाली त्यांना पॉइंट ४८७५ काबीज करण्याची कामगिरी पार पाडावयाची होती. पॉइंट ४८७५ वरून शत्रूला आपल्या सैन्याच्या हालचालींवर सहज नजर ठेवता येत असल्यामुळे रात्रीच्या अंधारात सैन्याची जुळवाजुळव करावी लागली.


१ जुलै, १९९९ला प्राथमिक टेहळणी करण्याची व हल्ला करण्याची योजना आखण्याच्या दृष्टीने, कमांडिंग ऑफिसर कर्नल वाय. के. जोशी व ‘ए’ कंपनीचे कमांडर मेजर विजय भास्कर हे दोघे, जिथून घडामोडी सुस्पष्टपणे दृष्टिपथात येतील, अशा ठिकाणावर चढून आले. २ जुलै, १९९९ला ७९ माऊंटन ब्रिगेडच्या प्रधान कार्यालयामध्ये या योजनेवर चर्चा झाली.

जनरल ऑफिसर कमांडिंग ८ माऊंटन डिव्हिजन मेजर जनरल मोहिंदर पुरी, ब्रिगेडिअर कक्कर, कमांडर ७९ माऊंटन ब्रिगेड्स व लेफ्टनंट कर्नल वाय. के. जोशी, कमांडिंग ऑफिसर १३ जम्मू व काश्मीर रायफल्स या सर्वांनी चर्चेत भाग घेतला होता.

सर्व बटालियनना हल्ला चढवायच्या ठिकाणी आणण्यात आले. हे ठिकाण पॉइंट ४८७५पासून पंधराशे मीटरवर होते. ती जागा आगप्रतिबंधक करण्यात आली होती.

दिनांक २ व ३ जुलै, १९९९ या दोन दिवसांमध्ये २८ राष्ट्रीय रायफल्स व ह्या बटालियनच्या ओझे वाहणाऱ्या (पोर्टर्स) सैनिकांकरवी, जड शस्त्रास्त्रे व दारूगोळा आणून ठेवला.

४ जुलै, १९९९ला ‘ए’ व ‘सी’ कंपन्यांचे कमांडर्स मेजर एस. व्ही. भास्कर व मेजर गुरप्रीत सिंग यांनी दिवसा शेवटची टेहळणी केली व आपल्या सर्व ‘ओ’ ग्रुप्सना लक्ष्य प्रत्यक्ष दाखवले.


सागरी मार्गाने आलेल्या दहा दहशतवाद्यांनी
देशाच्या आर्थिक राजधानीत घातलेल्या
रक्तरंजित थैमानाची प्रत्यक्षदर्शी कहाणी...

ebook available

**२६/११ मुंबईवरील हल्ला**

संपादन : हरिंदर बावेजा । अनुवाद : प्रा. मुकुंद नातू
किंमत : ₹ २९५

४ जुलै संध्याकाळी सहा वाजता बोफोर्स तोफांतून व मल्टी बॅरेल लाँचर्समधून गोळाफेक चालू झाली. हल्ला चढवणाऱ्या कंपन्यांनी वीस वाजून तीस मिनिटांनी (रात्री साडेआठ वाजता) मारा सुरू केला.

रात्र दाट काळोखी होती. जमीन खडकाळ असल्यामुळे पुढे जाणे कठीण जात होते. नियोजित लक्ष्यापासून दोनशे मीटर्स अलीकडे, शत्रुसैन्याने आपल्या कंपन्यांवर जोरदार गोळाफेक केली. हल्ला करणाऱ्या कंपनीने पहाटे साडेचार वाजता, आपल्या स्वयंचलित तोफा डागल्या व टेकडीच्या माथ्यावरील चांगला बंदोबस्त असलेल्या शत्रूच्या मोक्याच्या ठिकाणावर, गोळ्यांचा वर्षाव केला. प्रथम दोन्ही कंपन्यांना यश मिळाले होते.

पण पॉइंट ४८७५च्या सपाट माथ्यावरून जोरदार गोळाफेक झाली. त्यामुळे त्यांना थांबावे लागले. गोळाफेकीच्या प्रकाशात ते दिसण्याचा फार मोठा धोका होता.

शत्रूने अतिशय परिणामकारकरीत्या छोट्या बंदुकींतून व लपतछपत गोळीबार केला. हल्ला करण्यासाठी फार मर्यादित जागा असल्यामुळे आपला हल्ला थांबवावा लागला.

५ जुलै, १९९९ला सुमारे सव्वादहा वाजता 'सी' कंपनीचे कमांडर, कमांडिंग ऑफिसरांबरोबर बोलले व उद्भवलेल्या अडचणींची त्यांना कल्पना दिली. ज्या जागेवरून शत्रुसैन्याकडून परिणामकारकरीत्या गोळीबार होत होता, त्याबद्दलची माहिती दिली. कमाडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल जोशींनी स्वत: फायर-बेसवरून दोन FAGOT क्षेपणास्त्रे टाकली व व्यत्यय आणणाऱ्या शत्रूचा नायनाट केला. या बरोबर झालेल्या माऱ्यामुळे शत्रुसैनिक खंदकातून पलायन करताना दिसले. 'सी' कंपनीने ताबडतोब त्या ठिकाणावर हल्ला केला. ५ जुलै, १९९९ला रात्री दहा वाजता, पॉइंट ४८७५च्या उत्तरेकडील भागातून, या दोन्ही कंपन्यांवर शत्रूकडून अचूक व जोरदार गोळीबार करण्यात आला. सतत कराव्या लागत असलेल्या गोळीबारामुळे दारूगोळा संपत आला होता. ६ जुलै, १९९९ला पहाटे पावणेपाच वाजता 'सी' कंपनीने तसे कळविले. 'बी' कंपनी राखीव म्हणून तैनात होती. तिने ताबडतोब दारूगोळा आणला व गोळीबारास पुन्हा सुरुवात झाली.

६-७ जुलै, १९९९च्या रात्री युद्ध करणाऱ्या दोन्ही बाजूचे सैन्य इतके जवळ आले की, त्यांच्यामध्ये घनघोर लढाईबरोबरच शाब्दिक चकमकीही उडाल्या. पाकिस्तानी ठाणे उद्ध्वस्त करण्यासाठी तातडीने काही करणे आवश्यक आहे, नाहीतर परिस्थिती हाताबाहेर जाईल, हे आता स्पष्ट झाले होते. ह्याच सुमारास पॉइंट ४८७५च्या उत्तरेकडील एका अरुंद अशा तुटलेल्या कड्यावरील मध्येच पुढे आलेल्या भागावर, शत्रुसैन्य असल्याचे आढळले. तो भाग शत्रूच्या ताब्यात होता व तिथे सैन्याची मोठी कुमक होती. त्या भागातून पाकिस्तानी घुसखोरांना हुसकावून लावण्याची कामगिरी 'डी' कंपनीवर सोपवली होती. अगदी जवळ असलेल्या संगरातून शत्रू प्रतिकार करत होता. त्यामुळे कंपनीला पुढे जाण्यामध्ये अडथळा निर्माण झाला होता. ७ जुलै, १९९९ला कॅप्टन विक्रम बात्रांनी आपल्या सैनिकांबरोबर पुढे जाऊन पॉइंट ४८७५च्या भागाची पाहणी करण्याची व त्या कड्यावर पाय रोवण्याचा प्रयास करण्याची जबाबदारी स्वत:हून स्वीकारली.

शत्रुसैन्याकडून स्वयंचलित बंदुकांमधून व तोफांमधून तुफानी गोळीबार होत होता; तरीही कॅप्टन विक्रम बात्रा पुढे जात राहिले. संगरजवळ जात त्यांनी आपल्या AK४७चा सतत गोळीबार चालू केला. ते संगरच्या तोंडाशी एका अरुंद वाटेने पोहोचले. त्यांच्या अकस्मात येण्याने शत्रू भांबावला. त्यांनी तिथेच पाच पाकिस्तानी सैनिकांना ठार केले. पण संख्याबळात ते कमी पडले. शत्रूने अगदी जवळून त्यांच्या छातीत गोळी मारली. ते खाली कोसळले. याच वेळी तोफेतून उडणाऱ्या ठिकऱ्यांनी ते आणखी जखमी झाले.

कॅप्टन बात्रांनी त्यांच्यावर सोपवलेल्या कामगिरीच्याही पुढे जाऊन कामाविषयी असणाऱ्या आपल्या निष्ठेचे प्रदर्शन केले. आपल्या प्राणांचे बलिदान केले. आपल्या कंपनीचा पुढे जाण्याचा मार्ग सुकर केला. त्यांच्या कामगिरीमुळे पॉइंट ४८७५वर ताबा मिळवणे शक्य झाले. द्रास ते मातायन या राष्ट्रीय महामार्गावरचे शत्रूचे वर्चस्व संपुष्टात आले.

कॅप्टन बात्रा नेहमीच आपल्या फौजेच्या अग्रणी असत. आपल्या आघाडीमधील धोक्याची त्यांना पूर्ण कल्पना होती. 'लेज'वरून पाकिस्तानी फौजांना हुसकावून लावण्यासाठी ते कृतनिश्चयी होते. त्यांच्या जोखीमपूर्ण हल्ल्यामुळे पॉइंट ४८७५ सर झाले आणि शत्रूचा कणा मोडला. त्यांचे धाडस व कृती त्यांना नेमून दिलेल्या कामापलीकडची होती. ते धोका पत्करत राहिले. त्यांनी भारतीय सैन्यदलाच्या श्रेष्ठ परंपरेला साजेसा अत्युत्तम त्याग केला.

'ये दिल मांगे मोअर' या त्यांच्या घोषणेमुळे देशप्रेमाला एक नवा अर्थ प्राप्त झाला. आपल्या सैनिकांकडून देशाची काय अपेक्षा आहे? लोकांकडून सैनिकांना कोणत्या पाठिंब्याची अपेक्षा असते? कॅप्टन विक्रम बात्रांसारख्या तरुण अधिकाऱ्यांच्या आयुष्याकडून काय मागण्या आहेत. मोठे धोके, मोठी आव्हाने? ह्या सर्व गोष्टींना नवा अर्थ प्राप्त झाला आहे.


'कितीही मोठे आव्हान असले तरी ते स्वीकारण्यासाठी जिवाचे रान करू, आणखी सांगा!' असे सांगणारेच हे विधान आहे. आपण पत्करत असलेल्या धोक्याची कॅप्टन बात्रांना कल्पना होती; पण बहुतेक तरुण अधिकाऱ्यांप्रमाणेच, मृत्यूची शक्यता त्यांच्या मनाला शिवलीच नाही. ते त्या दिवसासाठी जगले. प्रत्येक दिवसासाठी जगले पण भरभरून जगले.

युद्धबंदीपूर्वीच्या शेवटच्या लढाईत पोहोचण्यासाठी अशक्य असणाऱ्या ठिकाणी शत्रूने जोरदार गोळीबार चालू केल्यामुळे,

# पेरुमाल मुरुगन यांची पुस्तके


२५ वर्षांची परंपरा

ebook available





अनु.:
डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

₹ २७०





अनु.:
दीपक कुलकर्णी

₹ ३२०




अनु.:
डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

₹ २७०




अनु.:
डॉ. मानसी केळकर

₹ ३६०

त्यांच्या बटालियनला हल्ला थांबवावा लागला होता. एका अरुंद कड्यावरून जाणारा फक्त एक मार्ग होता व तो शत्रूच्या ताब्यात होता. त्यांच्या अचाट साहसी कृत्यामुळेच ती जागा हस्तगत झाली पण त्यात त्यांच्या प्राणाची आहुती पडली. त्यांनी वडिलांना पाठवलेल्या शेवटच्या पत्रावरून जाणवतेय की त्यांना स्वत:पेक्षा वडिलांची जास्त काळजी वाटत होती. 'आधीच्या' लढाईतील यशाबद्दल ते सांगतात व पुढच्या कार्यातील यशासाठी प्रार्थना करायला सांगतात.

*'मी पुन्हा खाली केव्हा यायला निघेन सांगता येत नाही. पण जेव्हा शक्य होईल तेव्हा मी तुम्हांला फोन करेन. माझ्या पुढच्या कामातील यशासाठी प्रार्थना करा. काळजी घ्या.'*

तुमचा मुलगा विकी.

## कारगील युद्धाची निष्पत्ती

*'घरामध्ये चांगले मार्गदर्शन, सल्लामसलत झाली नसेल, तर युद्धभूमीवर सैन्य निरुपयोगी पडते.'*

– मार्कस् तुलियस सिसेरो

कारगील हे असे युद्ध आहे की, जे घडावयासच नको होते. यावरून एकच सिद्ध होते 'इतिहासाकडून आम्ही एकच धडा शिकलो आहोत की इतिहासाकडून आम्ही काहीही शिकत नाही.' कारगीलचे युद्ध हे आमच्या पूर्वीच्याच अनेक चुकांची परिणती आहे.

आणखी कारगील युद्धे होतील का? याचे नि:संदिग्ध उत्तर 'होय' असेल. जोपर्यंत राजकीय व सैन्यदलाचे नेतृत्व हे मानत नाही की, आपल्या कार्यप्रणालीमध्ये फार मोठ्या उणिवा आहेत, ज्यामुळे पाकिस्तानने हा वेडगळ साहसी प्रयत्न करून पाहिला! या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही, हेही आपल्या नेतृत्वाने लक्षात घ्यायला हवे. मुलकी व सैनिकी अधिकाऱ्यांनी ह्या प्रश्नांची उत्तरे शोधावयास हवीत की, सत्य शोधण्याचा व मिळालेल्या माहितीच्या उपयोगाचा प्रयत्न होतो का? सैन्यदलासाठी आवश्यक त्या साधनांची, शस्त्रास्त्रांची मागणी करून ती मिळवणे त्यांना शक्य होते का? अधिकाराच्या सर्व स्तरांतील जबाबदारी व विश्वासार्हता स्वीकारणे शक्य आहे का?

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातील मुलकी व सैनिकी दोन्ही हेरखात्यांच्या माहितीचे अपयश हे आमचे जुने दुखणे आहे. जे कोणी सत्तेवर असतील ते हा दोष मान्य करून, सुधारण्यासाठी प्रयत्न करत नाहीत, तोपर्यंत हे असेच चालू राहणार.

ज्या भागात परिस्थिती निश्चित संशयपूर्ण होती, तेथे आम्ही बेसावध राहिलो व ते अक्षम्य आहे. त्यामध्ये तेथे तैनात केलेल्या फौजा व अधिकारी यांचाही समावेश आहे. सगळ्यांत वाईट गोष्ट होती ती म्हणजे दुसऱ्या कोणावर तरी, खापर फोडण्याची वृत्ती! दुसऱ्यावर कामाची जबाबदारी ढकलण्याची वृत्ती यास कारणीभूत आहे. तसेच आवश्यक त्या बाबी उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खातरजमा न करता, चूक सावरण्यासाठी प्रथम फौजांना पुढे ढकलून, त्यांना अशक्य कोटीतले काम करावयास लावण्याची आपली वृत्ती हीसुद्धा अक्षम्य आहे.

या युद्धानंतर सरकारने 'कारगील रिव्ह्यू कमिटी' नावाची कमिटी स्थापन केली. पाकिस्तानने कारगीलमध्ये आक्रमण केले, त्याला कारणीभूत झालेल्या घटनांचे मूल्यमापन करावयाचे काम, ह्या कमिटीवर सोपवले होते. तसेच अशी सैनिक घुसखोरी पुन्हा होऊ नये, म्हणून देशाच्या संरक्षणासाठी कोणते प्रतिबंधात्मक उपाय करावे, याचाही विचार करावयाचा होता.

हा अहवाल सैनिकी इतिहास, सैनिकी भूगोल व काय घडले ह्याचा उत्तम दस्तऐवज आहे. पण जे घडले त्याची जबाबदारी व उत्तरदायित्व या गोष्टींबद्दल कोरा आहे. याबद्दल विचारणा झाली असता, कमिटीचे उत्तर होते, 'हा या अहवालाचा उद्देश नव्हता'. हे उत्तर अर्थातच प्रश्नकर्त्यांचे समाधान करू शकले नाही.

एक गोष्ट विचाराविशी वाटते, 'देशाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असणाऱ्या उपायात, 'जबाबदारी व उत्तरदायित्व' या गोष्टींची आवश्यकता या प्रमुख बाबी नाहीत का?'

जबाबदारीच्या बाबी हाताळणीमध्ये सरकारची असमर्थताच दिसून येते. त्यामुळे या अहवालामध्ये कारणांचा शोध घेण्याऐवजी, घडलेले दडवण्याचाच अट्टाहास जाणवतो.

जोपर्यंत आपल्या कार्यप्रणालीमध्ये, पारदर्शकता येत नाही; तोपर्यंत अशी परिस्थिती, अनेकवेळा उद्भवण्याची शक्यता आहे आणि ही दु:खद गोष्ट आहे.

हे सांगून झाल्यावर हेही सांगणे आवश्यक आहे की, जशी परिस्थिती स्पष्ट झाली तसे, सरकारने व सैन्यदलाने जिंकण्याची जिद्द दाखवली. त्यांनी दाखवलेले राजकीय व रणांगणावरील कौशल्य हे वाखाणण्याजोगे आहे. राजकीय, आर्थिक व आंतरराष्ट्रीय असा पुष्कळ दबाव असतानाही, त्यांनी आपल्यापुढे स्पष्ट उद्दिष्ट ठेवले. आपल्या या ठोस उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी, घुसखोरांना हुसकावून लावण्यासाठी, सुस्पष्ट ध्येय अधोरेखित केले. त्यांच्या निर्णयाला भूदलाकडून, विमानदलाकडून आणि ज्यांनी पुढे जाऊन नेतृत्व केले त्या तरुण अधिकाऱ्यांकडून, सर्वतोपरी सहकार्य मिळाले. परमवीर चक्र पदकाच्या चार मानकऱ्यांच्या कहाण्या, ह्या उच्चतम शौर्याचे, मासलेवाईक नमुने आहेत. सैनिकांनी दाखवलेल्या धैर्याच्या इतरही अनेक हकिकती आहेत. त्या लोकांपुढे यायला हव्यात. कुणीतरी एक दिवस त्यांना शब्दरूप देईल, अशी आशा आहे.




सच्चेपणा, बुद्धिचातुर्य व
हजरजबाबीपणाचा
दिलखुलास नजराणा.


★

**सज्जन बिरबल**
**आदर्श बिरबल**
**अमोल रत्न बिरबल**


★

मंजूषा आमडेकर


₹ २७५




₹ २५०




₹ २७५



# परमवीर चक्र पुरस्कार मिळविणाऱ्यांची यादी

**१९४७-४८**

- मेजर सोमनाथ शर्मा, ४ कुमाऊँ, ३ नोव्हेंबर, १९४७, बडगाम, काश्मीर (मरणोत्तर).
- नाईक जदुनाथ सिंग, १ राजपूत, १३ ऑक्टोबर, १९४८, नौशेरा, काश्मीर (मरणोत्तर).
- कंपनी हवालदार मेजर पिरू सिंग, ६ राजपुताना रायफल्स, १७-१८ जुलै, १९४८ टिथवाल, काश्मीर (मरणोत्तर).
- लान्सनाईक करम सिंग एम. एम., १ सिख, १३ ऑक्टोबर, १९४८ टिथवाल, काश्मीर.
- सेकंड लेफ्टनंट रामा राघोबा राणे, बॉम्बे इंजिनीअर्स, ८ एप्रिल १९४८, नौशेरा-राजौरी, काश्मीर.

**१९६१**

- कॅप्टन जी. एस. सलारिआ, ३/१ गुरखा रायफल्स, ५ डिसेंबर, १९६१, एलिझाबेथ व्हिला, कटांग, कांगो (मरणोत्तर).

**१९६२**

- सुभेदार जोगिंदर सिंग, १ सिख, २३ ऑक्टोबर, १९६२, टोंगपेन ला, नेफा, (मरणोत्तर).
- मेजर शैतान सिंग, १३ कुमाऊँ, १८ नोव्हेंबर, १९६२, रेझांग ला, लडाख (मरणोत्तर).
- मेजर धान सिंग थापा, १/८ गुरखा रायफल्स, २० ऑक्टोबर, १९६२, लडाख.

**१९६५**

- कंपनी क्वार्टरमास्टर हवालदार अब्दुल हमीद, ४ ग्रेनेडिअर्स, १० सप्टेंबर, १९६५, चीमा, खेमकरण (मरणोत्तर).
- लेफ्टनंट कर्नल ए.बी. तारापोर, १७ हॉर्स, १५ ऑक्टोबर, १९६५, फिलोरा, सियालकोट, पाकिस्तान (मरणोत्तर).

**१९७१**

- लान्सनाईक अल्बर्ट एक्का, १४ गार्ड्स, ३ डिसेंबर, १९७१, गंगासागर, बांगलादेश (मरणोत्तर).
- सेकंड लेफ्टनंट अरुण खेत्रपाल, १७ हॉर्स, १६ डिसेंबर, १९७१, जरपाल, शकरगड पाकिस्तान (मरणोत्तर).
- मेजर होशियार सिंग, ३ ग्रेनेडिअर्स, १७ डिसेंबर, १९७१, बसनतर नदी, शकरगड, पाकिस्तान.
- फ्लाईंग ऑफिसर निर्मलजित सिंग सेखोन, १४ डिसेंबर, १९७१, श्रीनगर, जम्मू व काश्मीर (मरणोत्तर).

**१९८७**

- नाईक सुभेदार बाना सिंग, ८ जम्मू व काश्मीर लाईट इन्फन्ट्री, २३ जून, १९८७, सियाचीन ग्लेसियर, जम्मू व काश्मीर.
- मेजर रामस्वामी परमेश्वरन, ८ महार, २५ नोव्हेंबर, १९८७, श्रीलंका (मरणोत्तर).
- कॅप्टन विक्रम बात्रा, १३ जम्मू व काश्मीर रायफल्स, २० जून, १९९९, पॉइंट ५१४० द्रास/कारगील, जम्मू व काश्मीर (मरणोत्तर).
- लेफ्टनंट मनोज कुमार पांडे, १/११ गुरखा रायफल्स, २३ जून, १९९९, खालुबार, बटालिक, कारगील, जम्मू व काश्मीर (मरणोत्तर).
- ग्रेनेडिअर योगिंदर सिंग यादव, १८ ग्रेनेडियर्स, ४ जुलै, १९९९, टायगर हिल, कारगील, जम्मू व काश्मीर.
- रायफलमन संजयकुमार, १३ जम्मू व काश्मीर रायफल्स, ४ जुलै, १९९९, फ्लॅट टॉप एरिया, कारगील एरिया, जम्मू व काश्मीर.




# अरुंधती रॉय


यांची साहित्यसंपदा

ebook available

२५ वर्षांची परंपरा









२५ वर्षांची परंपरा


रसिक वाचकांसाठी


## अमेरिकन क्लासिक्स


आता मराठीत...
















ebook available




# अथक

स्वाती चांदोरकर


पुनर्वसन केंद्रातील अपंग जवानांच्या वास्तव कहाण्यांना कल्पनेची जोड देऊन लिहिलेली कादंबरी आहे 'अथक.' कर्नल मुखर्जी या पुनर्वसन केंद्राचे प्रमुख आहेत, जे ममतेने या जवानांचा सांभाळ तर करतातच; पण त्यांचं जीवन अधिकाधिक सुखावह व्हावं, यासाठी झटतात, या जवानांना सकारात्मक ऊर्जा पुरवत राहतात.

नायक सुरेश कार्की यांचं छातीपासून खालचं शरीर एका अपघातामुळे लुळं झालं. व्हीलचेअरवर आले ते. फुटबॉलपटू होते. पुण्यातील खडकीच्या रिहॅबिलिटेशन सेंटरमध्ये दाखल झाले. आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर टेबल टेनिस आणि अन्यही खेळ खेळत होते. स्विमिंग करत होते. आता त्यांनी बॅडमिंटनमध्ये प्रावीण्य प्राप्त करून जागतिक क्रमवारीत स्थान पटकावलं आहे. या केंद्रातील अन्य जवानांचं मनोबल वाढवण्याचं कामही कार्की करत असतात. त्यांचं कुटुंबही त्यांच्याबरोबर या सेंटरमध्ये राहतं.

मृदुल घोष हा जवान विमानांची देखभाल-दुरुस्ती करणारा. अपघातात त्याचं मानेपासून खालचं शरीर लुळं पडलं; पण आता तो तोंडात ब्रश घेऊन उत्तम चित्र काढतो. अधूनमधून गावी जाऊन येतो.

अशा आणखी काही जवानांच्या कहाण्या आहेत. या जवानांबरोबरच हे रिहॅबिलिटेशन सेंटर आणि त्याच्या कार्यपद्धतीबद्दलही माहिती मिळते. या कादंबरीत शेफाली आणि क्षितिज या तरुण-तरुणीचं काल्पनिक कथानक आहे. खडकीच्या या रिहॅबिलिटेशन सेंटरमध्ये काही कामानिमित्ताने हे दोघं एकत्र येतात. इथल्या जवानांच्या कहाण्या ऐकून, त्या सेंटरची एकूण कार्यपद्धती पाहून ते प्रभावित होतात. अपंग जवानांचं पुनर्वसन या केंद्रात होतं; पण सर्वसामान्य माणूस अपंग झाला तर त्याचं काय, हा प्रश्न दोघांच्याही मनात उभा राहतो; कारण सर्वसामान्य माणसाकडे पैसा असेलच असं नसतं, अपंग माणसाला सांभाळणं सर्वसामान्य माणसाच्या कुटुंबाला शक्य नसतं. तर अशा सर्वसामान्य अपंगांसाठी एखादं सेंटर सुरू करण्याचं बीज शेफाली आणि क्षितिजच्या मनात पडतं आणि त्या दृष्टीने ते पावलं टाकायला लागतात. कर्नल मुखर्जी असतातच त्यांच्या मदतीला आणि मग शेफाली आणि क्षितिजच्या प्रयत्नांतून कन्नू मेहता सेंटर, हे सर्वसामान्य अपंगांसाठीचं पुनर्वसन केंद्र सुरू होतं.

तर जवानांच्या प्रचंड इच्छाशक्तीची आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन सर्वसामान्य अपंगासाठी सेंटर सुरू करणाऱ्या शेफाली आणि क्षितिजची ही प्रेरणादायक कथा आहे.





एक खून आणि विलक्षण गुंतागुंत...गुन्हेगार,
पोलीस आणि गुप्तहेर संघटना...
तिढा वाढतच जातो...आणि?

ebook available

## अ वॉन्टेड मॅन

ली चाइल्ड । अनु.: सरिता आठवले
किंमत : ₹ ७५०

---





आतंकवाद्यांची पाशवी क्रूरता आणि
हार्वथची मानवतावादी निर्भयता
यांच्यातील संघर्षाचं थरारक चित्रण

ebook available

## यूज ऑफ फोर्स

ब्रॅड थॉर । अनु.: जयंत गुणे
किंमत : ₹ ७००

---




राजकीय षडयंत्र उलथवून टाकणाऱ्या
गृहमंत्र्यांची आत्मकथा


ebook available


## डायरी ऑफ ए होम मिनिस्टर

अनिल देशमुख
किंमत : ₹ ४९९

## वाचकांचं उदंड प्रेम लाभलेली, मैलाचा दगड ठरलेली पुस्तकं


स्वामी



बनगरवाडी


कर हर मैदान फतेह


मृत्युंजय



अनवादातून अनुसर्जनाकडे



झोंबी



नदीमुख



स्माइल प्लीज



थर्ड मॅन



द हिडन हिंदू भाग १


झंझावात


रणखैंदळ


आय ऑफ द नीडल



सिकॅमोर रो


इंडियाज रेल्वेमॅन



असा असावा जोडीदार...



स्मार्ट प्ले स्मार्ट टॉईज



थ्रिल्स


खुलभर दुधाची कहाणी



हिटलर आणि भारत



जंगली कुलगुरूची जंगी कथा


गोपीची डायरी


गोपीची डायरी एक उनाड दिवस


डॅम इट आणि बरंच काही


शाहू महाराजांच्या आठवणी


चुटकीचं जग


जेफ्री आर्चर यांच्या बालकथा

# दिनविशेष

१६ ऑक्टोबर ते १५ डिसेंबर २०२५ दरम्यानचा दिनविशेष
दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

**खालील संचांवर १६ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत**

**१६ ऑक्टोबर** — ऑस्कर वाईल्ड यांचा जन्मदिन

'द पिक्चर ऑफ डोरियन ग्रे' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-

**२० ऑक्टोबर** — चेतन जोशी यांचा जन्मदिन

'कॉकटेल कार्निवल' व 'आंधळी कोशिंबीर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
मूळ किंमत ८९४/- । सवलत किंमत ६७७/-

**२१ ऑक्टोबर** — सर आल्फ्रेड नोबेल यांचा जन्मदिन

'नोबेल ललना भाग १', 'नोबेल ललना भाग २'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३१५/- । सवलत किंमत १९९/-

**२१ ऑक्टोबर** — पॉल विल्सन यांचा जन्मदिन

'शांततेनं काम करा!' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २७३/-

**२३ ऑक्टोबर** — मायकेल क्रायटन यांचा जन्मदिन

'नेक्स्ट', 'पायरेट लॅटिट्यूड्स', 'प्रे (सावज)',
'स्टेट ऑफ फिअर', 'मायक्रो', 'डिस्क्लोजर'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २३३०/- । सवलत किंमत १४१७/-

**२३ ऑक्टोबर** — अरविंद अडिगा यांचा जन्मदिन

'द व्हाइट टायगर', 'ॲम्नेस्टी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६४५/- । सवलत किंमत ४३२/-

**२४ ऑक्टोबर** — रोशन दलाल यांचा जन्मदिन

'सत्तरीतला भारत' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

**२४ ऑक्टोबर** — आर. के. लक्ष्मण यांचा जन्मदिन

'कसं बोललात!' - भाग १ ते ७
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६६५/- । सवलत किंमत ३९९/-

**२६ ऑक्टोबर** — हिलरी क्लिंटन यांचा जन्मदिन

'लिव्हिंग हिस्ट्री', 'हिलरी क्लिंटन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७६५/- । सवलत किंमत ५१९/-

**२७ ऑक्टोबर** — ॲरन राल्स्टन यांचा जन्मदिन

'ते १२७ तास!' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-

**२९** ऑक्टोबर

### ली चाइल्ड यांचा जन्मदिन

‘नथिंग टू लूज’, ‘वन शॉट’, ‘नेव्हर गो बॅक’, ‘अ वॉन्टेड मॅन’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १९९०/- । सवलत किंमत ७४४/-

**२९** ऑक्टोबर

### सुनीता देवस्थळी यांचा जन्मदिन

‘ऋणानुबंध’ या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २३०/- । सवलत किंमत १५४/-

**३०** ऑक्टोबर

### डेव्हिड बेनब्रिज यांचा जन्मदिन

‘टीनएजर्स’ या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २२९/-

## खालील संचांवर १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान खास सवलत

**२** नोव्हेंबर

### जयश्री कुलकर्णी यांचा जन्मदिन

‘मांजराची सावली’, ‘विषवल्ली’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-

**२** नोव्हेंबर

### कविता भालेराव यांचा जन्मदिन

‘तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग - १’,
‘तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग - २’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-

**२** नोव्हेंबर

### अरुण शौरी यांचा जन्मदिन

‘गव्हर्नन्स’, ‘द पार्लमेन्टरी सिस्टिम’, ‘हे सर्व आपल्याला कोठ नेणार?’, ‘कळेल का ‘त्याला’ आईचं मन?’, ‘मागील पानावरून... मागेच’!, ‘आत्मवंचना’, ‘वाळवीग्रस्त वृक्षाला पोलादी कुंपण वाचवेल का?’, ‘ख्यातनाम इतिहासकार’, ‘अनिताला जामीन मिळतो’, ‘द कमिशनर फॉर लॉस्ट कॉझेस’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ४६४५/- । सवलत किंमत ३५१७/-

**२** नोव्हेंबर

### ल्यूसी हॉकिंग यांचा जन्मदिन

‘जॉर्ज अॅन्ड द बिग बँग’, ‘जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट’, ‘जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स’, ‘जॉर्ज अॅन्ड द ब्लू मून’, ‘जॉर्ज अॅन्ड द शिप ऑफ टाइम’, ‘जॉर्ज अॅन्ड द अनब्रेकेबल कोड’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २६७०/- । सवलत किंमत १७९०/-

**३** नोव्हेंबर

### लीला गोविलकर यांचा जन्मदिन

‘मराठीचे व्याकरण’ या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २९९/-

**३** नोव्हेंबर

### रिचर्ड होम्स यांचा जन्मदिन

‘चर्चिलच्या पाऊलखुणा’ या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३९९/-

**५** नोव्हेंबर

### डॉ. अतुल गवांदे यांचा जन्मदिन

‘बीइंग मॉर्टल’, ‘बेटर’, ‘जीव जिथे गुंतलेला...’, ‘यशप्राप्तीचा जाहीरनामा!’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १०९०/- । सवलत किंमत ७४९/-

## ६ नोव्हेंबर — श्याम भुर्के यांचा जन्मदिन

‘आनंदाचं पासबुक’, ‘गोष्टींचं एटीएम’, ‘खुमासदार अत्रे’, ‘मंत्र श्रीमंतीचा’, ‘पु.ल. : एक आनंदयात्रा’, ‘पुणं एक साठवण’, ‘सभेत कसे बोलावे’, ‘द माइंड जिम’, ‘द स्टार प्रिन्सिपल’, ‘द माइंड जिम रिलेशनशिप्स’, ‘मार्ग आत्मविश्वासाचा’, ‘द माइंड जिम : मला वेळ हवाय’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २८४०/- । सवलत किंमत २१२६/-

## ६ नोव्हेंबर — संजय ढोले यांचा जन्मदिन

‘अंतराळातील मृत्यू’, ‘अश्मजीव’, ‘डिंभक’, ‘प्रेमाचा रेणू’, ‘संकरित’, ‘प्लँटोन’, ‘खुजाबा’, ‘राफिणू’, ‘थर्ड मॅन’, ‘पाठलाग’, ‘दूरचे प्रवासी’, ‘झाडाचं गुपित’, ‘अवकाशातील दूत’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३५१०/- । सवलत किंमत २१०६/-

## ७ नोव्हेंबर — रत्नावली दातार यांचा जन्मदिन

‘सुखद बालसंगोपन’, ‘सुखद मातृत्व’, ‘सुखद वृद्धत्व’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ४१५/- । सवलत किंमत २४९/-

## ७ नोव्हेंबर — हेलन गार्नर यांचा जन्मदिन

‘एक विश्रांती स्थळ’ या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-

## ७ नोव्हेंबर — जागतिक कर्करोग जागरूकता दिन

‘कॅन्सर रोखू या एका सजग जीवनशैलीसह’, ‘इट्स नॉट अबाउट द बाइक’, ‘द जॉय ऑफ कॅन्सर’, ‘आयुष्याचा अंतिम संस्कार’या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ४६९/-

## ११ नोव्हेंबर — सुरेखा शहा यांचा जन्मदिन

‘थेंबभर पाणी अनंत आकाश’ या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ६३०/- । सवलत किंमत ४१०/-

## १२ नोव्हेंबर — ख्रिस्तोफर रिच यांचा जन्मदिन

‘रुल्स ऑफ डिसेप्शन्स’ या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४८०/- । सवलत किंमत २९९/-

## १३ नोव्हेंबर — ना. रा. वडनप यांचा जन्मदिन

‘बुद्धिबळाचा ओनामा’, ‘सुसंघटित मारा’, ‘चतुरंग (बुद्धिबळातील) सापळे,’ ‘बुद्धिबळाचा श्रीगणेशा’, ‘बुद्धिबळ शिका’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ९१५/- । सवलत किंमत ६३२/-

## १४ नोव्हेंबर — बालदिन

किमान १५००/- च्या खरेदीवर ३० टक्के सवलत

## १४ नोव्हेंबर — जागतिक मधुमेह दिन

‘चला जाणून घेऊ या ! मधुमेह’, ‘मधुमेह एक आव्हान’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-

## १४ नोव्हेंबर — जोसेफ तुस्कानो यांचा जन्मदिवस

‘ग्रेटाची गोष्ट’, या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३५/-

**१५ नोव्हेंबर** संजय राऊत यांचा जन्मदिन

'एकवचनी भाग १ आणि २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५९९/-

**खालील संचांवर १६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान खास सवलत**

**१७ नोव्हेंबर** रत्नाकर मतकरी यांचा जन्मदिन

रत्नाकर मतकरी लिखित १७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३३७०/- । सवलत किंमत २५३५/-

**१७ नोव्हेंबर** मोहना जोगळेकर यांचा जन्मदिन

'रिक्त' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७५/-

**१९ नोव्हेंबर** जॅक शॅफिर यांचा जन्मदिन

'भल्या दिलाचा माणूस' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३९/-

**२१ नोव्हेंबर** मंजुश्री गोखले यांचा जन्मदिन

मंजुश्री गोखले लिखित १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ४५४०/- । सवलत किंमत ३१७८/-

**२४ नोव्हेंबर** डेल कार्नेगी यांचा जन्मदिन

डेल कार्नेगी लिखित ६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १३९०/- । सवलत किंमत ९११/-

**२४ नोव्हेंबर** अरुंधती रॉय यांचा जन्मदिन

'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज', 'द मिनिस्ट्री ऑफ अटमोस्ट हॅपिनेस', 'आजादी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १२२५/- । सवलत किंमत ७७७/-

**२४ नोव्हेंबर** सुधीर गाडगीळ यांचा जन्मदिन

'लाइफ-स्टाइल' पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४३/-

**२६ नोव्हेंबर** वीणा देव यांचा जन्मदिन

'स्वान्सीतील दिवस' पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

**२६ नोव्हेंबर** मुंबई ॲटॅक डे

'२६/११ मुंबईवरील हल्ला' पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-

**२६ नोव्हेंबर** अनंत भोयर यांचा जन्मदिन

'आभाळझुंज', 'हराळी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३२९/-

**२८ नोव्हेंबर** विश्वास पाटील यांचा जन्मदिन

'बंदा रुपाया', 'क्रांतिसूर्य', 'नागकेशर', 'नॉट गॉन विथ द विंड', 'संभाजी', 'गाभुळलेल्या चंद्रबनात', 'आंबी', 'पानिपतचे रणांगण (नाटक)', 'महासम्राट' (झंझावात, रणखैंदळ) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ४५२०/- । सवलत किंमत ३१६४/-

**३० नोव्हेंबर** आनंद यादव यांचा जन्मदिन

आनंद यादव लिखित ३३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७५१५/- । सवलत किंमत ५५६६/-

**३० नोव्हेंबर** मार्क ट्वेन यांचा जन्मदिन

'हकलबेरी फिनची साहसं', 'टॉम स्वॉयरची साहसं', 'मार्क ट्वेनच्या निवडक कथा' या पुस्तकांवर विशेष सवलत
मूळ किंमत १०१५/- । सवलत किंमत ६८०/-

**३० नोव्हेंबर** योजना यादव यांचा जन्मदिन

'मरी मरी जाय सरीर', 'करुणेचं बीज' या पुस्तकांवर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २३५/- । सवलत किंमत १५६/-

**३० नोव्हेंबर** संजीव परळीकर यांचा जन्मदिन

'चार जबरदस्त फंडे', 'चार शब्द द्यावे-घ्यावे', 'केल्याने होत आहे रे...', 'पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र', 'पुढाकार घ्या', 'विक्रीकौशल्य शिका', 'याला जीवन ऐसे नाव', 'झटपट व्यक्तिमत्त्व विकास' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ९३०/- । सवलत किंमत ६१५/-

**३० नोव्हेंबर** हॅरिएट लर्नर यांचा जन्मदिन

'द डान्स ऑफ अँगर', 'द डान्स ऑफ डिसेप्शन', 'द डान्स ऑफ इन्टिमसी', 'द मदर डान्स' पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १०२०/- । सवलत किंमत ६९९/-

**खालील संचांवर १ ते १५ डिसेंबर दरम्यान खास सवलत**

**१ डिसेंबर** अर्न्स्ट टोलर यांचा जन्मदिन

'तुरुंगातील पत्रे' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत १०९/-

**१ डिसेंबर** हिमसागर ठाकूर यांचा जन्मदिन

'महागाई एक चक्रव्यूह' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-

**३ डिसेंबर** जागतिक अपंग दिन

'दिव्यगुणी', 'लाइफ विदाउट लिमिट्स', 'रुक जाना नही', 'चाकाची खुर्ची', 'आंधळ्याचे डोळे', 'तिबेटच्या वाटेवर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
मूळ किंमत २११०/- । सवलत किंमत १३७४/-

**४ डिसेंबर** निक व्होयचिच यांचा जन्मदिन

'लाइफ विदाउट लिमिट्स' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-

**६ डिसेंबर** मिनेक शिप्पर यांचा जन्मदिन

'नेव्हर मॅरी अ वुमन विथ बिग फीट' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४२९/-

**७ डिसेंबर** विला कॅथर यांचा जन्मदिन

'देवाची माणसे' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-

**९ डिसेंबर** सोनिया गांधी यांचा जन्मदिन

'निमित्तानिमित्ताने...', 'सोनिया गांधी : एक अनन्यसाधारण जीवनप्रवास' या पुस्तकावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७९०/- । सवलत किंमत ५२१/-

**११ डिसेंबर** ओशो यांचा जन्मदिन

ओशो लिखित ३७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७९७०/- । सवलत किंमत ५३२४/-

**१३ डिसेंबर** मेरी ॲन शाफर यांचा जन्मदिन

'गर्नसी वाचक मंडळ' या पुस्तकावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-

**१५ डिसेंबर** गीता फोगाट यांचा जन्मदिन

'आखाडा' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-

**१५ डिसेंबर** सुरेश पाटील यांचा जन्मदिन

'दाह' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ५६१/-


**१५ डिसेंबर** ग्रेचेन रुबिन यांचा जन्मदिन

'आनंदतरंग' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

आमच्या लेखकांच्या जन्मदिनानिमित्त, तसेच दिनविशेषांवर आधारित विषयांवरील पुस्तकसंचांवर विशेष सवलत
**किमतींमध्ये बदलाची शक्यता**

अधिक माहितीसाठी संपर्क
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२
Whatsapp No. : ९४२०५९४६६५
Website : www.mehtapublishinghouse.com
FREE SHIPPING

बैसरन खोऱ्यातील दहशतवादी हल्ला
आणि भारताचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या काश्मीरमधील
पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न
या मुद्द्यांची चर्चा होणे आजची गरज आहे.
अशाच मुद्द्यांवर प्रकाश टाकणारे
मेहता पब्लिशिंग हाऊसचे आगामी पुस्तक




ले. ज. सुदर्शन हसबनीस
अनुवाद : डॉ शुचिता नांदापूरकर फडके

RNI No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune 411 030
Publication Date: 21/10/2025   Posting Date: 21/10/2025




मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१, सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी, पुणे ३०
फोन : ०२०-२४४७६९२४
०२०-२४४६०३१३
मोबा. : ९५४५०००५१३
Email:
production@mehtapublishinghouse.com
Website:
www.mehtapublishinghouse.com

प्रति

.........................................

.........................................

.........................................

.........................................

‘मेहता मराठी ग्रंथजगत’ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉजमागे, पुणे ४११०११ येथे छापून, १९४१, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.